

अगस्ति कॉलेज ग्रंथालय
*DN2901*

# ग्रामीण साहित्य : स्वरूप आणि चिकित्सा

डॉ. भास्कर शेळके

# ग्रामीण साहित्य : स्वरूप आणि चिकित्सा

DADASAHEB RUPWATE SCIENCE COLLEGE LIBRARY AKOLE 422601 DIST. AHMEDNAGAR

891.46309
SHE
DN 2901

प्रा. डॉ. भास्कर शेळके

अगस्ति कॉलेज ग्रंथालय
*DN2901*

Agasti Arts, Commerce & Dadasaheb Rupwate Science College, Akole, Dist. Ahmednagar
LIBRARY DONATION
Acc.No. DN 2901
Price 160/- Dt. 6/12/17

स्नेहवर्धन प्रकाशन
पुणे

ॐ स्नेहवर्धन प्रकाशन : क्र. ९६९

ॐ ग्रामीण साहित्य : स्वरूप आणि चिकित्सा

ॐ **प्रकाशक आणि मुद्रक :**
श्री. एल. व्ही. तावरे
स्नेहवर्धन, ८६३ सदाशिव पेठ, महात्मा फुले सभागृहामागे,
पुणे - ४११ ०३०.
टेलिफॅक्स : (०२०) २४४७ २५ ४९ / २४४३६९६१
ई-मेल : snehavardhan@vsnl.net

ॐ © सर्व हक्क सुरक्षित

ॐ **प्रथमावृत्ती :** २५ एप्रिल २०१५

ॐ **मुखपृष्ठ :** राजेंद्र गिरधारी

ॐ **अक्षरजुळणी :** सॉफ्टवर्ल्ड सर्व्हिसेस, पुणे

ॐ **मुद्रणस्थळ :** स्मिता प्रिंटर्स, पुणे

ॐ ISBN 978-93-80321-43-1

ॐ **पृष्ठसंख्या :** १६०

ॐ **मूल्य : ₹ १६०/-**

आदरणीय आई–वडील

**श्री. त्रिंबकराव कुंडलिकराव पाटील शेळके**

आणि

**सौ.दुर्गाताई त्रिंबकराव शेळके**, आडगाव बु।।

तसेच

**श्री. भिकाजीराव आनंदा शिंदे पाटील**

व

**सौ. लक्ष्मीबाई भिकाजीराव शिंदे**, वाघापूर

यांना सविनय अर्पण.

**प्रा.डॉ. भास्कर शेळके**

# अनुक्रमणिका

## विभाग अ

१. ग्रामीण साहित्याची संकल्पना / ५
२. बदलती राजकीय, आर्थिक स्थिती आणि साहित्य / १६
३. रंजनवादी मराठी ग्रामीण साहित्य / २२
४. लोकसाहित्य आणि ग्रामीण साहित्य / २८
५. एकविसावे शतक आणि ग्रामीण साहित्य / ३४
६. ग्रामीण साहित्यातील प्रादेशिकता : स्वरूप आणि विचार / ३८
७. आधुनिक मराठी ग्रामीण साहित्याची भूमिका / ४३
८. शोषणाविरुद्ध उभी ठाकलेली, संस्कृती संघर्षाचे चित्रण करणारी ग्रामीण कादंबरी / ४७
९. नव्वदोत्तर काळातील ग्रामीण कादंबरी / ६३
१०. साठोत्तरी ग्रामीण कविता / ७२
११. १९८० नंतरची प्रादेशिक कथा / ८३
१२. मराठी कादंबरीतील प्रादेशिकता / ८८
१३. ग्रामीण कादंबरीतील मराठा स्त्रीचे चित्रण / ९७
१४. ग्रामीण साहित्य संशोधन : अडचणी व उपाय-दिशा / १०४

## विभाग ब

१५. प्राचार्य रा. रं. बोराडे यांची कथा / १०९
१६. कालचक्र : बदलत्या वास्तवाचे चित्रण / ११६
१७. मुक्या जितराबाची कथा – 'सर्जा' / १२०
१८. मराठवाड्याचे दर्शन देणारे 'पाचोळा' / १२५
१९. 'तहान' कादंबरीतील वैशिष्ट्यपूर्ण व्यक्तिरेखा / १२९
२०. 'पाटलाची लंडनवारी' मधील प्रतिमा / १३५
२१. 'हाल्या हाल्या दुधू दे !' / १४१
२२. 'कुकडीकाठच्या कथा' : द. स. काकडे / १५७

ARTS, COMMERCE & DADASAHEB RUPWATE SCIENCE COLLEGE
LIBRARY
AKOLE

# ग्रामीण साहित्याची संकल्पना

मराठी साहित्याच्या इतिहासात 'स्वातंत्र्योत्तर' हा कालखंड अनेक प्रकारे वैशिष्ट्यपूर्ण ठरला आहे. कारण अनेक साहित्य प्रवाह या कालखंडात निर्माण झाले आहेत. समाजाभिमुख साहित्यनिर्मितीला अधिक चालना मिळाली. बारा बलुतेदार, सहा अलुतेदार, भटके-विमुक्त इ.कृषी संस्कृतीशी निगडित समाजस्तर शिक्षणाने जागे झाले. परिणामी ग्रामीण साहित्य, दलित साहित्य हे प्रवाह निर्माण झाले. प्रस्तुत ठिकाणी फक्त ग्रामीण साहित्याची संकल्पना, या संकल्पनेचे स्वरूप, सैद्धांतिक भूमिका, व्याप्ती, सामर्थ्य, मर्यादा इ. विचारात घ्यायचे आहेत.

स्वातंत्र्योत्तर काळात शिक्षणाचा प्रचार व प्रसार झपाट्याने झाला. अभ्यासक्रमाच्या निमित्ताने किंवा आवड म्हणून साहित्य वाचले जाऊ लागले; त्यामुळे त्यांना आपला गाव, आपली माणसे, आपला शिवार, आपली माती, त्यांची सुखदु:खे, हर्षखेद, यशापयश इ. चे दर्शन ग्रामीण साहित्यातून घडते. ग्रामीण भागात जन्मलेली आणि वाढलेली पिढी त्यात होती. स्वातंत्र्यपूर्व काळात रुचिपालट म्हणून लिहिलेले जानपद साहित्य ग्रामीण जीवनाचे वास्तव चित्रित करण्यासाठी असमर्थ ठरले. रविकिरण मंडळ आणि रविकिरण मंडळाच्या समकालीन कवींनी 'ग्रामीण जीवन असे आहे.' असे ग्राह्य धरून ग्रामीण जीवनाचे चित्रण केले आहे. ग.ल.ठोकळ, ग.ह.पाटील, र.वा.दिघे यांना ग्रामीण जीवनाचा अनुभव होता. शिक्षण, नोकरी, व्यवसायासाठी शहरात स्थिरावले. परिणामी परिवर्तने, साहित्याच्या नोंदी होऊ लागल्या.

१९६० नंतर खेड्यात अनेक बदल होऊ लागले. समकालीन राजकीय, आर्थिक, सांस्कृतिकता इ.बदलांची सजगता येऊ लागली. 'ग्रामीण साहित्य' ही मराठी साहित्यातील एक महत्त्वाची संकल्पना होय. या संकल्पनेतील ग्रामीण हे विशेषण मराठी साहित्यात रूढ होण्यापूर्वी तशा आशयाची, संदर्भाची साहित्यनिर्मिती मराठीत झालेली असली तरी त्याला या विशेषणाने ओळखले जात नव्हते. ग्रामीण हे विशेषण आढळत नसले तरी 'ग्राम्य', 'नागर' या संकल्पना परिचित होत्या.

'ग्राम्य', 'ग्रामीण' व 'नागर' ही विशेषणे आज साहित्याची विशेषणे म्हणून वापरली जात असली तरी ती मूलत: सामाजिक संदर्भातून निर्माण झाली आहेत. भारतीय ग्रामीण समाजाचे जे ऐतिहासिक स्वरूप स.मा.गर्गे यांनी स्पष्ट केले

आहे, मानवी जीवनातील विकासाला अनुलक्षून त्याचे -

१. वन्यजीवन

२. कृषिजीवन

३. सत्ताजीवन

४. धर्मजीवन

५. विज्ञानजीवन इ. टप्पे कल्पिले आहेत.

मानवी समाज व संस्कृतीचा विकास 'ग्रामीण' जीवनाच्या अस्तित्वानंतरच झालेला आहे. भारतापुरता विचार केल्यास 'ऋग्वेद' कालखंडाच्या आसपास भारतीय ग्रामजीवनाला प्रारंभ झालेला दिसतो. 'ग्रामा'त मानवी समूह सर्वप्रथम स्थिर झाला. 'शेती'केंद्रित अर्थव्यवस्थेने ग्रामीण जीवन नियंत्रित केले. प्राचीन काळापासून 'ग्रामीण' व 'नागर' अशा दोन जीवनपद्धती रूढ आहेत. साहित्यक्षेत्रातही या शब्दांचा वापर करताना यामागे सामाजिक संदर्भ असतो. 'ग्राम', 'ग्रामीण' या संकल्पना लोकवस्तीच्या निदर्शक आहेत. जीवनशैलीचे पृथगात्मपण स्पष्ट करणाऱ्या आहेत.

'वाङ्मयीन संज्ञा व संकल्पना कोशा'मध्ये ग्रामीण साहित्याचे स्वरूप पुढीलप्रमाणे स्पष्ट करण्यात आले आहे. ''ग्रामीण वास्तव, ग्रामीण संस्कृती, ग्रामीण बोली यांचा वापर करणारे साहित्य, खेडी व त्यांचा परिसर व त्यात वावरणारी माणसे, त्यांचे जीवन हे ग्रामीण साहित्याचे कथनकेंद्र असते. खेड्यातील माणसांच्या जीवनरीती, श्रद्धाविश्वे, शेती व निसर्ग यांच्याशी असणारे भावबंध, ग्रामव्यवस्थेतील बलुतेदारी, सामाजिक, आर्थिक संबंधांची पारंपरिक व्यवस्था, आधुनिक काळात आलेली पंचायत राजव्यवस्था, सहकार तत्त्वावर चालणाऱ्या विविध संस्था, यंत्रसंस्कृतीचे ग्रामीण जीवनावर झालेले आक्रमण व त्याचे परिणाम, आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेने बदलत चाललेले ग्रामीण जीवन, तेथील व्यक्ती व समूह यांतील ताण ही ग्रामीण साहित्याची आशयसूत्रे असतात.''

'मराठी वाङ्मय कोशा'त ग्रामीण साहित्याचा उल्लेख 'जानपद साहित्य' असा केला जातो. १९४० पूर्वी ग्रामीण साहित्याला 'जानपद साहित्य' असे म्हटले जात असे. त्याचा शब्दश: अर्थ या देशातील जनसामान्यांचे साहित्य असा होतो. आपल्या देशातील ७० ते ७५ टक्के सामान्यजन ग्रामीण विभागात राहतात. ग्रामीण साहित्य आणि जानपद साहित्य हे समानअर्थी शब्दप्रयोग ठरतात. ग्रामीण साहित्य हा असा वेगळा साहित्यप्रकार नाही. फारतर तो एक वेगळा साहित्यप्रवाह मानता येईल. ग्रामीण विभ्रागाशी संबंधित असे जीवनानुभव ग्रामीण साहित्यातून व्यक्त होतात.'

'सुलभ विश्वकोशा'त ''हा साहित्याचा प्रकार खेड्यातील लोकांच्या जीवनांची चित्रे वठवितो. मराठीत ना.ह.आपटे, ग.ल.ठोकळ वगैरे कवींनी

नावीन्य म्हणून आपली प्रतिभा या बाजूस वळविली. ग्रामीण जीवन जगणाऱ्यांनीच स्वतः लेखन केल्याशिवाय या वाङ्मय प्रकाराला जिवंतपणा येणार नाही.''

डॉ. सरोजिनी बाबर म्हणतात की, ''ग्रामाग्रामातून-खेड्यापाड्यातून विखुरलेल्या सर्वसामान्य जनतेचे असलेले व त्यांच्यासाठी लिहिलेले वाङ्मय हे ग्रामीण वाङ्मय होय. या वाङ्मयात सामान्य लोकांचे जीवन प्रतिबिंबित झालेले असते. त्यांच्या भावना व आकांक्षा त्यात चित्रित झालेल्या असतात. एवढेच नाहीतर ही माणसे आपल्या भोवतालच्या निसर्गासह या ठिकाणी आपल्याच ढंगाला बोलकी झालेली असतात.''

रमा बखले म्हणतात की, ''जानपदासंबंधी-बहुसंख्य ग्रामीण जनतेसंबंधी रचलेले साहित्य, त्याचप्रमाणे ग्रामस्थांनी-गावकऱ्यांनी स्वतःविषयी रचलेले साहित्य होय. दोन्ही प्रकारच्या साहित्याची जमा ग्रामीण साहित्यातून होऊ शकते. ग्रामीण जीवनावरचे साहित्य नागर जीवनावरच्या साहित्यापेक्षा भिन्न असणे अगदी स्वाभाविक आहे.''

मधू कुलकर्णी म्हणतात की, ''ग्रामीण जीवनातील सुखदुःखे, चढउतार, स्थितिगती यांचा आविष्कार करणाऱ्या साहित्याला ग्रामीण साहित्य असे म्हटले जाते. ग्रामीण व प्रादेशिक या दोन्ही संज्ञा तशा समानअर्थी आहेत. किंचितसा फरक मानायचाच झाला तर प्रादेशिक ही संज्ञा ग्रामीण या संज्ञेपेक्षा जास्त व्यापक आहे.''

आनंद यादव म्हणतात की, ''संकुचित अर्थाने 'ग्रामीण साहित्य' या शब्दप्रयोगातील 'ग्रामीण' हा शब्द वापरलेला नाही. ते ग्रामीण समाजव्यवस्थेशी, एकूणच भारतीयांच्या 'ग्रामीण जीवनाशी' निगडित आहे. या समाजव्यवस्थेत ब्राह्मणांपासून तो अस्पृश्य आदिवासीपर्यंतची सर्व जाति-जमातींची समाजरचना अभिप्रेत आहे.

'ग्रामीण' हा शब्द 'ग्राम'पासून आलेला असला, तरी हा शब्दप्रयोग फक्त ग्रामातील व्यवस्थेशी निगडित नाही, हेही येथे स्पष्ट केले पाहिजे. त्याचा अर्थ शहरी व्यवस्थेव्यतिरिक्त जी भारतीय जीवनव्यवस्था आहे, त्या सर्व व्यवस्थेला व्यापणारा असा अर्थ अभिप्रेत आहे. म्हणजे असे की, 'ग्राम व ग्रामाच्यालगत बाहेर राहणारे पूर्वास्पृश्य, तसेच रानावनात राहणारे आदिवासी, भारतीय आणि त्यांचे जीवन हेही 'ग्रामीण' या विशेषणाला अभिप्रेत आहे. या सर्वांची संवेदना ज्यात व्यक्त होते, ते 'ग्रामीण साहित्य' असा 'ग्रामीण साहित्य' या शब्दप्रयोगाचा अर्थ आहे.

रा.रं.बोराडे म्हणतात की, ''बहुतांश ग्रामीण साहित्यिक हे विस्थापित साहित्यिक आहेत. शिक्षण घेण्याची हौस आहे म्हणून ते नागरी भागांकडे आलेले नाहीत, तर शेती व्यवसायावरच्या अतिरिक्त भारांमुळे विस्थापित होऊन

पुनर्वसनासाठी ते नागरी भागाकडे आलेले आहेत. याचाच अर्थ असा आहे की, आमच्या बहुतांश ग्रामीण साहित्यिकांची साहित्यनिर्मिती ही विस्थापितांची साहित्यनिर्मिती आहे.''

भास्कर चंदनशिव म्हणतात की, ''आज ग्रामीण अथवा प्रादेशिक साहित्य वाचत असताना आपण पूर्वीप्रमाणे त्यातील 'ग्रामीणत्व' किंवा 'प्रादेशिकत्व' शोधत बसत नाहीत.'' अशा वाङ्मयाकडून ज्या काही स्थूलपणे अपेक्षा केल्या जायच्या, काही हेतू घेऊन त्यांचे वाचन व्हायचे, ती पारंपरिक जाणीव राहिलेली नाही.''

रा.ग्र.जाधव म्हणतात की, ''ग्रामीण साहित्याच्या पृथकत्वाच्या जाणिवेमागे जो ऐतिहासिक संदर्भ आहे, तो नीटपणे लक्षात घेतला पाहिजे. मुख्यतः स्वतंत्र भारताच्या स्वतंत्र समाजाचा हा ऐतिहासिक संदर्भ आहे. आज-उद्याच्या भारतीय समाजाची ध्येयधोरणे या स्वतंत्र समाजाने निश्चित केली आहेत.'' ग्रामीणतेचे सर्जनशील भान म्हणजे या नवरचनेच्या आशयाचे व आकृतिबंधाचे भान होय.''

नागनाथ कोत्तापल्ले म्हणतात की, ''ग्रामीण साहित्य हे व्यक्तिकेंद्रित तर असतेच; पण त्या व्यक्तिमनाच्या जडणघडणीस केंद्रित संस्कृती, या संस्कृतीने निर्माण केलेले लोकमानस, या संस्कृतीसाठी निर्माण झालेला गावगाडा किंवा तत्सम उपयोगी समाजरचना इ. घटक जबाबदार असल्याने त्या व्यक्तिमत्त्वाला केंद्रस्थानी ठेवून लिहीत असताना उपरोक्त घटक सहजपणे ध्वनीत होत जातात आणि त्यातूनच ग्रामीण साहित्य आकार घेत जाते.''

वासुदेव मुलाटे म्हणतात की,'' ग्रामीण संकल्पनेत ग्रामीण जीवन अपेक्षित आहे. ग्रामीण माणसाचे जगणे, वागणे, राहणे, आचार-विचार, दृष्टिकोण, भाव-भावना यांना महत्त्व आहे. त्याची स्वतःची काही एक जीवनदृष्टी, तत्त्वज्ञान, कल्पना असतात.. त्याच्या जीवनातील घटना-प्रसंगच विचारात घेऊन चालत नाही. मनातील आंदोलने, ताण-तणाव, जीवनविषयक दृष्टी, आचार-विचार, निसर्ग, वातावरण, परिस्थिती यातून त्याच्या काही वैशिष्ट्यपूर्ण अशा जाणिवा निर्माण झालेल्या असतात. या जाणिवाच ग्रामीण या संकल्पनेत सर्वांत अधिक महत्त्वाच्या असतात. ग्रामीण हे विशेषण नुसते स्थलनिर्देशक नाही. तर विशिष्ट अशा जाणिवांचा निर्देश करणारे आहे. येथे आशयाला विशेष स्थान आहे.''

द. ता. भोसले म्हणतात की, ''आज ग्रामीण साहित्य दलित साहित्यापेक्षा, नागर साहित्यापेक्षा नेमके कोणत्या बाबतीत वेगळे वाटते? त्याला खरे उत्तर निसर्गाच्या चित्रणात 'ग्रामीण जीवनाचे 'ग्रामीणत्व' आणि त्याचे साहित्यातील 'ग्रामीणत्व' निसर्गामुळेच प्रतीत होत आहे.' ग्रामीण साहित्याला स्वतःचे जे 'स्वरूप दर्शन' घडवायचे आहे, 'आयडेंटिफाय' व्हायचे आहे, त्याचे सारे

गुणधर्म या निसर्गाशी निगडित आहेत.''

गो.मा.पवार म्हणतात की, ''ग्रामीण जीवनाचे, मनाचे चित्रण करणारे साहित्य म्हणता येते. कथा, कादंबरी, कविता या वाङ्मयप्रकारांना एवढ्याच अर्थाने हे विशेषण लावता येते. ग्रामीण संवेदनशीलता ज्या लेखनातून प्रत्ययाला येत असेल, ते अस्सल ग्रामीण साहित्य होय.''

रवींद्र ठाकूर म्हणतात की, ''ग्रामीण ही संज्ञा वापरत असताना तिची ग्रामजीवनसंबंधता स्पष्टपणे नजरेत येईल. कोणत्याही प्रदेशातील एक किंवा एकाहून अधिक खेडी साहित्यकृतीत साक्षात होत असतील तर ती साहित्यकृती ग्रामीण. तेथे समग्र प्रदेशाऐवजी ग्रामजीवन हेच केंद्रस्थानी असेल. यात त्या खेड्याचे समूहजीवनचित्रण समाविष्ट होऊ शकेल. 'नागर जीवनाऐवजी कृषिप्रधान आणि प्रादेशिक साहित्याचा विषय आहे. असे म्हणावे लागते. प्रादेशिक या संज्ञेचा आस ग्रामीणतेकडेच झुकताना दिसतो.''

श्रीराम गुंदेकर म्हणतात की, ''ग्रामीण साहित्य म्हणजे ग्रामीणांनी ग्रामीणांचे अस्सल जीवनदर्शन घडविणारे देशी वळणाचे साहित्य.''

आनंद यादव या संदर्भात म्हणतात की, 'ग्रामीण साहित्य ' म्हणजे नेमके काय? ग्रामीण साहित्य म्हणजे ग्रामीणांनी लिहिलेले? ग्रामीणांबद्दल लिहिलेले? की ग्रामीणांकरिता लिहिलेले? की हे सर्वच? हा असाच आणखी एक प्रश्न. 'खेडेगाव, तेथील जीवनपद्धती, तेथील खास अशा रीती, शेती, तेथील निसर्गाशी, मातीशी असलेले मानवीपण; प्रदेशनिष्ठ, वैशिष्ट्यपूर्ण संबंध, तेथील एकूण संस्कृतीला लाभलेली काही प्रादेशिक वैशिष्ट्ये, मानवी जीवनाला त्याच प्रदेशानुसार पडलेल्या आर्थिक, सामाजिक, धार्मिक, ज्ञानविषयक मर्यादा व त्यातून उद्‌भवणारे प्रश्न आणि समस्या' या साऱ्याचा त्यांनी 'ग्रामीण'या कक्षेत अंतर्भाव केला आहे.

आनंद यादव यांची ही व्याख्या जीवनसंबद्धताच स्पष्ट करणारी आहे. महाराष्ट्रासारख्या अर्धविकसित प्रदेशाचे स्वरूप लक्षात घेतले तर तेथे नागर व ग्रामीण असे दोन भेद ठळकपणे दिसून येतात. ग्रामीण भागास यंत्रसंस्कृतीचा स्पर्श झालेला असला तरी ग्रामीण जीवनावर कृषिसंस्कृतीचाच प्रभाव दिसून येतो. ही संस्कृती निसर्गशरण आहे; त्यामुळेच तेथे परंपरानिष्ठा वा संकेतशरणता यांचाच जास्त प्रमाणात आढळ आहे.

दादा गोरे या संदर्भात म्हणतात की, ''ग्राम हा घटक महत्त्वाचा आहे. त्याचा अर्थ खेडे असा आहे.'' म्हणजे खेड्याचा, गावगाडा, लोकजीवन, तेथील व्यवसाय, शेती आणि शेतीवर अवलंबून इ. उद्योग.

नागनाथ कोत्तापल्ले म्हणतात की, ''शेतमाल, नवी शोषण व्यवस्था, असमानी संकटांबरोबर सुलतानी संकटे. निर्माण, परिवर्तन आणि विकासाच्या नावाखाली विस्थापितांचा प्रश्न, उदा.पाणी समस्या, नापिकी, जातीय शक्तींचे

उग्र रूप या सर्वांचे भान लेखकांना येऊ लागले आहे.''

ही संकल्पना 'ग्रामीण संवेदनेशी' निगडित आहे. ही ग्रामीण संवेदना ज्या व्यक्तिमनातून उद्‌भवेल, ते व्यक्तिमन कोणत्या जाती-जमातीचे आहे, हे या चळवळीला मुळीच महत्त्वाचे वाटत नाही. लोकशाहीपूर्व अवस्थेत 'ग्रामीण' हा शब्द 'ग्रामीण समाजव्यवस्थेशी,' एकूणच भारतीयांच्या 'ग्रामीण जीवनाशी' निगडित आहे. या समाजव्यवस्थेत ब्राह्मणापासून ते अस्पृश्य-आदिवासीपर्यंतची सर्व जाती-जमातींची समाजरचना अभिप्रेत आहे. 'ग्रामीण' हा शब्द 'ग्राम'पासून आलेला असला तरी, ग्रामातील व्यवस्थेशी निगडित नाही. म्हणजे शहरी व्यवस्थेव्यतिरिक्त जी भारतीय व्यवस्था आहे, त्या सर्व व्यवस्थेला व्यापणारी ही संज्ञा आहे.

'ग्रामीण' या विशेषणात 'ग्राम' व ग्रामाच्या लगत बाहेर राहणारे पूर्वास्पृश्य, रानावनात राहणारे आदिवासी होत. या सर्वांची संवेदना ज्यात व्यक्त होते ते ग्रामीण साहित्य होय. या संवेदनेतून १९२५ ते १९५०-६० पर्यंतचे ग्रामीण साहित्य निर्माण झाले.

'ग्रामीण साहित्य' या शब्दप्रयोगातील 'ग्रामीण' हे विशेषण भौगोलिक, प्रादेशिक, निसर्ग इ. शी निगडित आहे. ग्रामीण साहित्यातून ज्या ग्रामीण जीवनाचे अनुभव व्यक्त केले जातात त्या ग्रामीण जीवनाचा भौगोलिक संदर्भ शहरी साहित्यातील शहरी जीवनसंदर्भापेक्षा वेगळा आहे. ग्रामीण जीवनपद्धती ही शहरी जीवनपद्धतीपेक्षा, संस्कृतीपेक्षा, परंपरेपेक्षा काही प्रमाणात वेगळी आहे. भाषाही काही प्रमाणात वेगळी आहे. ग्रामीण जीवनाला शाहिरी वाङ्मयाची परंपरा ही पंडिती वाङ्मयाच्या परंपरेपेक्षा जवळची आहे.

१८७५ ते १९२० पर्यंतच्या मराठी साहित्यात ग्रामीण जीवनानुभवाला स्थान नव्हते. ग्रामीण जीवन हा वेगळेपणाने उठून दिसणारा भाग असला तरीही मूलतः मराठी जीवनाचा तो एक भाग आहे. ग्रामीण जीवनाचा अनुभवाविष्कार मराठी साहित्यात काही काळ नसला तरी १९२५ पासून तो होऊ लागला. हा आविष्कार पुरेशा प्रातिनिधिक व वास्तव स्वरूपात होताना दिसत नाही; त्यामुळे येथे भेद निर्माण होतो. एकूण मराठी जीवनाचा राजकीय इतिहास, हिंदुधर्म परंपरा, जातिवंश-परंपरा, काही वाङ्मयीन परंपरा, काही सांस्कृतिक परंपरा, शहरवासीयांना व ग्रामीणांना समान आहेत. ग्रामीणांची भाषा वेगळी असली तरी ती मराठी प्रमाण भाषेची बोली भाषा आहे.

सारांश, भाषेच्या 'ग्रामीण'या विशेषणामुळे साहित्यक्षेत्रात भौगोलिक संदर्भ, भाषिक संदर्भ, साहित्यपरंपराचा संदर्भ, कृषिप्रधान जीवनसंदर्भ निर्दिष्ट केले जातात.

**ग्रामीण साहित्याची भूमिका :**

ग्रामीण साहित्याची भूमिका सम्यक परिवर्तनाची आहे. महात्मा जोतिराव

फुले यांचा परिवर्तनवादी विचार ग्रामीण भागातील माणसांच्या शोषणाविरुद्ध आणि त्यांना सोसाव्या लागणाऱ्या विषमतेविरुद्ध आहे. अशा सामान्य माणसाला गुलामगिरीतून मुक्त करणे आणि त्याचे हक्क त्याला प्राप्त करून देणे हे महात्मा फुले यांचे कार्य होते. फुल्यांच्या प्रेरणेतून सत्यशोधक चळवळ सुरू झाली. त्यातूनच भालेकर, मुकुंदराव पाटील यांच्यासारखे लेखक निर्माण झाले. १९२० नंतरच्या ग्रामीण जीवनावरील साहित्यात फुल्यांचा विचार जाणवत नाही; त्यामुळे ग्रामीण जीवनावरील साहित्य हे रंजनपर आणि लोकप्रिय ठरले. १९६० नंतरच्या काळातील ग्रामीण साहित्य वास्तवाला जवळ जाण्याचा प्रयत्न करताना दिसते. ग्रामीण माणूस आणि ग्रामीण समाज यावरील अन्यायाविरुद्ध ग्रामीण लेखक आपल्या साहित्याच्या माध्यमातून प्रतिकार करताना दिसतो आहे.

**ग्रामीण साहित्याचे वेगळेपण व वैशिष्ट्ये :**

१. कृषिकेंद्रितता
२. निसर्गसन्मुखता
३. सहअस्तित्व
४. स्वाभाविकता
५. स्वावलंबीपणा
६. बलुतेदार पद्धत
७. दैवाधीनता व परंपराप्रियता
८. भाषिक पृथगात्मता
९. कुटुंब व जातिसंस्थेचा प्रभाव इ.

याशिवाय अज्ञान, दारिद्र्य, भाबडेपणा इ. काही वैशिष्ट्येही खास ग्रामीण समाजाची म्हणून नोंदविता येतील. 'शेती' हे केंद्र करून निर्माण झालेल्या ग्रामीण समाजाच्या गरजा मर्यादित असत. जातिसंस्थेने सामाजिक तर बलुतेदारी व्यवस्थेने आर्थिक व्यवस्थापन घडवून आणल्यामुळे स्पर्धेचा अभाव निर्माण होऊन ग्रामीण समाजाची मानसिकता अल्पसंतुष्ट राहण्याची, परंपराप्रियतेची राहिली. परस्पर-साहचर्याला महत्त्व प्राप्त झाल्यामुळे माणुसकी, आस्था, प्रेम, त्याग, संयम इ. मूल्ये निर्माण होऊन ग्रामीण समाजात भावनिक व सांस्कृतिक ऐक्य निर्माण झाले; त्यामुळे शतकानुशतके ग्रामीण समाजात लक्षणीय असे परिवर्तन घडले नाही.

ग्रामीण समाजाची ही सर्व वैशिष्ट्ये आज प्रत्ययाला येतात का? त्याचे उत्तर शोधणेही आवश्यक ठरते. ही सर्वच वैशिष्ट्ये आधुनिक काळातील ग्रामीण समाजात आढळून येतातच असे नाही. मुळातच मानवी समाजाच्या वर्तनाचा व व्यवहाराचा विचार केल्यास, त्यात आढळणारी परिवर्तने ही सगळीकडे सारखीच जाणवतात, असे ठामपणे म्हणता येत नाही. तेच तत्त्व ग्रामीण समाजालाही लागू

पडते. तरीही 'कृषिकेंद्रितता' हे ग्रामीण समाजाचे, खेड्याचे सनातन व मूलभूत वैशिष्ट्य मानता येईल. याशिवाय निसर्गसन्मुखता, भाषिक पृथगात्मता, स्वाभाविकता, सहकार्याची भावना इ. काही गोष्टी आजही कायम दिसतात. कुटुंब–जात संस्थेत, भौगोलिक अलिप्तपणा, बलुतेदारी पद्धत, स्वावलंबीपणा इ. मध्ये आज काही बदल घडत आहेत; त्यामुळे परंपरागत समाज व मूल्यव्यवस्था यांच्यात परिवर्तने होत आहेत. तरीही ग्रामीण समाजाचे अन्य समाजाच्या तुलनेतील वेगळेपण कायम आहे.

ग्रामीण समाजाच्या जुन्या–नव्या वैशिष्ट्यांचा प्रत्यय यावयाचा असेल तर मागील शतकात प्रसिद्ध झालेल्या 'गावगाडा' - त्रिं. ना. अत्रे, 'ग्रामरचना'- लोकहितवादी, 'जनजागरण' - हेमलता राईरकर, 'महाराष्ट्राची ग्रामीण समाजरचना' - दांडेकर–जगताप, 'ग्रामोद्धार'- ना. ह. आपटे, 'खेड्याची आर्थिक–सामाजिक पाहणी' - तोंडारे - काळे, 'नागाव' - शांताराम आवळसकर, 'अजरालय ग्राम' - गणेश निरसुरे, 'गावगाड्याबाहेर' - प्रभाकर मांडे, 'ग्रामसंस्कृती' - आनंद यादव, 'संस्कृतीच्या पाऊलखुणा' - द.ता.भोसले, 'भारतीय समाजरचना' - सुधा काळदाते, इ. काही ग्रंथांकडे दृष्टिक्षेप जरी टाकला तरी ग्रामीण समाजाच्या रचनावैशिष्ट्यांचा प्रत्यय सहजपणे येईल.

'शेतकऱ्याचा आसूड' - महात्मा फुले, 'पिराजी पाटील'- धनुर्धारी, 'मुचकुंददरी' - वि.ल.बर्वे, 'पाणकळा'- र.वा.दिघे, 'उपेक्षितांचे अंतरंग'- श्री.म.माटे, 'माणदेशी माणसं' - व्यंकटेश माडगूळकर, 'खळाळ–गोतावळा' - आनंद यादव, 'धग' - उद्धव शेळके, 'पाचोळा' - रा.रं.बोराडे, 'ऐसे कुणबी भूपाळ'–भारत काळे, 'गोबड'–दिलिप भावसार इ. कितीतरी ग्रामीण साहित्यकृतींमधून जुन्या–नव्या ग्रामीण समाजजीवनाचे दर्शन घडते. 'गावगुंड', 'टारफुला', 'गांधारी' इ.कादंबऱ्या, बहिणाबाईंच्या कविता, गो.नी.दांडेकर, श्री.ना.पेंडसे, रणजित देसाई यांच्या कादंबऱ्या, दलित आत्मकथने इ.मधून त्याचे चित्रण आलेले दिसते. साहित्याला सामाजिक दस्तऐवज मानता येत नाही, त्यामुळे यापूर्वी ग्रामीण समाजाचे वेगळेपण लक्षात येईल. पूर्वीच्या नागर व आजच्या शहरी समाजाशी त्याची तुलना केल्यास त्याचे 'स्वतंत्रपण' ठळकपणे जाणवेल.

**ग्रामीण साहित्याच्या प्रेरणा आणि प्रवृत्ती :**

**अ) प्रेरणा –**

१. महात्मा फुले व त्यांची साहित्यनिर्मिती.

२. सत्यशोधक चळवळ

३. महात्मा गांधी – 'खेड्याकडे चला'

४. भारतीय स्वातंत्र्य

५. प्रजासत्ताक लोकशाही

६. पंचवार्षिक योजना

७. महाराष्ट्र राज्याची निर्मिती

८. शरद जोशी–शेतकरी संघटना व शेतकरी चळवळ इ.

९. संत तुकाराम, संत तुकडोजी, संत गाडगेबाबा.

**ब) प्रवृत्ती –**

१. रोमँटिक मनोवृत्ती –उदा.ग.ल.ठोकळ, र.वा.दिघे, लक्ष्मणराव सरदेसाई, अण्णा भाऊ साठे.

२. अनुकरणाची प्रवृत्ती

३. भूक, दारिद्र्य, उपेक्षा आणि शोषण

४. वर्तमान वास्तव चित्रित करण्याची प्रवृत्ती

५. आधुनिकता आणि यंत्रयुगाचा स्पर्श

६. शैशववृत्तीचे स्मरण

७. आत्मनिवेदनपर प्रवृत्ती

८. विनोदी कथा आणि किस्से

९. निवेदनाची भाषा

१०. ग्रामीण वास्तवाचा 'रिपोर्टाज' स्वरूपात आविष्कार करणारी प्रवृत्ती

**ग्रामीण साहित्याचे सामर्थ्य :**

ग्रामीण समाजाला असंख्य प्रश्न भेडसावतात, त्यांचे व्यापक चित्रण होऊ शकते.

परंपरागत पूर्वसंस्कार झटकून समताधिष्ठित समाजनिर्मितीचे स्वप्न साध्य करणे.

समताधिष्ठित समाज निर्मितीचे स्वप्न साध्य झाल्यावर दलित साहित्याचे आणि ग्रामीण साहित्याचे इप्सित एकच होईल.

या दोन्ही साहित्य चळवळी हातात हात घालून समतेचा लढा उभारतील.

**ग्रामीण साहित्याने मराठीला काय दिले ?**

कृषी संस्कृतीशी निगडित नवे आशय अनुभवविश्व दिले.

भाबडे अनुकरण टाळून ग्रामीण लेखकांना आत्मभान दिले.

ग्रामीण साहित्याने बहुजिनसी वाचकवर्ग प्राप्त करून दिला.

निर्भेळ वाङ्मयीन अभिरुची घडविली.

ग्रामीण साहित्याने नवी जीवनमूल्ये, नवे समाजशास्त्र, नवा आशय–अनुभव, नवी अभिव्यक्ती बहाल केले.

ग्रामीण साहित्याने लोकशाहीमूल्ये, समता, शोषणमुक्ती, स्वातंत्र्य रुजविले आहे.

महाराष्ट्राच्या विविध प्रदेशांतून विविध ग्रामीण बोलींचा आविष्कार घडविला.

कृषी संस्कृतीत वावरणाऱ्या शेतकऱ्याचे दु:ख, दैन्य, दारिद्र्य, शोषणाचे चित्रण केल्यामुळे मराठी साहित्य अधिक समृद्ध झाले आहे.

**ग्रामीण साहित्याच्या मर्यादा :**

१९२५ पासून मराठी साहित्यात ग्रामीण जीवनावर लिहिण्यास प्रारंभ झाला. १९६० नंतर खऱ्या अर्थाने 'ग्रामीण साहित्य' हा प्रवाह निर्माण झाला. ग्रामीण साहित्याची व्यापकता, सामर्थ्य विचारात घेऊन या साहित्याला काही मर्यादाही आहेत. ग्रामीण साहित्याच्या मर्यादेबाबत या साहित्याचे समीक्षक डॉ. नागनाथ कोत्तापल्ले यांनी आपल्या 'ग्रामीण साहित्य : स्वरूप आणि शोध' या ग्रंथात खालीलप्रमाणे मर्यादा सांगितलेल्या आहेत.

१) १९२५-४५ पर्यंत ग्रामीण साहित्य स्वप्नरंजनपर, बोधवादी होते. अपवाद श्री. म. माटे यांनी लिहिलेल्या ग्रामीण जीवनावरील लेखनाचा.

२) १९४५ पूर्वीचे ग्रामीण साहित्य म्हणजे ग्रामीण परिवेशातील नागर जाणिवांचे प्रकटन होय.

३) १९२५ पासून सुरू झालेल्या साहित्याला १९४५ पर्यंत आणि नंतरसुद्धा म्हणावी तशी सखोलता मिळू शकली नाही. व्हावा तसा विकास नाही, मोठी झेप नाही.

४) ग्रामीण विश्वाचे कृषिकेंद्रित असणे प्रथम ग्रामीण साहित्यिकांच्या लक्षात आले नाही.

५) ग्रामीण संस्कृतीशी बांधलेल्या घटकांचे जीवनचित्रण नाही. (उदा. चांभार, कुंभारापासून कोल्हाटी-कैकाडीपर्यंत)

६) ग्रामीण कथा शेतकरी कुटुंबाभोवती फिरते.

७) शेतकरी समाजाशिवाय इतर समाजजीवनाचे चित्रण अपवादात्मक आहे.

८) ग्रामीण जीवनातील दलितांच्या प्रश्नांवर किती ग्रामीण लेखक लिहितात. अपवाद श्री. म. माटे, म.भा. भोसले यांची 'मुकामार' कथा, शंकर पाटील यांची 'येणार येणार' ही कथा. रा. रं. बोराडे यांची 'विहीर' हे नाटक. भास्कर चंदनशीव यांची दलित-ग्रामीण सीमारेषेवरची कथा.

९) ग्रामीण साहित्यात शेतमजुरांचे, तीव्र दारिद्र्याचे चित्रण नाही. (काही अपवाद)

१०) ग्रामीण साहित्य हे ग्रामीण मध्यमवर्गीयाभोवती घोटाळते.

११) दलित साहित्याप्रमाणे प्रचंड दारिद्र्याविरुद्ध, अन्यायाविरुद्ध ग्रामीण साहित्यात विद्रोहाची जाणीव का येत नाही? कारण ग्रामीण साहित्यिकांचे मध्यमवर्गीयत्व आड येते.

१२) जातीच्या बेटाकडून होणारी कोंडी ग्रामीण साहित्यात चित्रित झालेली दिसत नाही.

१३) ग्रामीण साहित्यात कविता कमी आहेत. कादंबरीही कमी आहे. नाटकही

फारच कमी आहे. ललित गद्यलेखन फारसे लिहिले जात नाही.

१४) दलित साहित्याच्या तुलनेत समाजव्यवस्थेच्या विरोधी बंड करून उठण्याची प्रखर जाणीव ग्रामीण साहित्यात कमीच आहे.

१५) नवी समताधिष्ठित समाज उभारण्याची जाणीव ग्रामीण साहित्यात कमी प्रमाणात आहे.

१६) ग्रामीण साहित्य अजूनही मध्यमवर्गीय संवेदनशीलतेपासून संपूर्णतः मुक्त होत नाही. याशिवाय ग्रामीण साहित्याला स्वत:ची शब्दकळा नाही.

१७) दलित साहित्यासारखे मध्यमवर्गीय अभिरुचीचे संस्कार ग्रामीण साहित्याने नाकारले पाहिजेत. हे जोपर्यंत होत नाही, तोपर्यंत ग्रामीण साहित्याची चळवळ सुदृढ होणार नाही.

१८) ग्रामीण लेखकांच्या ग्रामीण जीवनानुभवाचे विश्वही फार मोठे नाही. व्यापक नाही.

१९) अफाट पसरलेला ग्रामीण समाज हजारो चिरफाळ्यांमध्ये विभागला गेला आहे. दुभंगला गेला आहे. अशा दुभंगलेल्या जीवनाचे चित्रण ग्रामीण साहित्यातून येत नाही.

२०) ग्रामीण परिवेशातील विविध जाती-जमाती, विविध धंदेवाईक यांच्यातील ताणतणाव ग्रामीण साहित्यात येत नाहीत.

# बदलती राजकीय, आर्थिक स्थिती आणि साहित्य

साहित्य आणि समाज यांचा जसा अनोन्य संबंध असतो तसाच सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, राजकीय, धार्मिक स्थिती यांचाही संबंध साहित्याच्या संदर्भात महत्त्वाचा असतो.

१९२० ला टिळक युगाचा अस्त झाला आणि गांधी युगाचा उदय झाला. महात्मा गांधींच्या उदयामुळे खेड्याचा कायापालट होण्यास सुरुवात झाली. खेड्यांमध्येही प्रबोधनाचे वारे वाहू लागले. खेड्यांकडे चला असे आवाहनच महात्मा गांधींनी केले. १९४२ ला स्वातंत्र्याची चळवळ उग्र रूप धारण करू लागली. महात्मा गांधींच्या विचारांनी समाजाला नवे बळ प्राप्त झाले. या स्वातंत्र्य चळवळीतूनच १९४७ ला भारत स्वतंत्र झाला. शिक्षणाची गंगा खेड्यापाड्यांत गेली. ग्रामीण माणूसही शिकू लागला. परिणामी नव्या युगाच्या परिवर्तनाला सुरुवात झाली.

१९६० ला महाराष्ट्राची निर्मिती झाली. साहित्याचीही निर्मिती व्हायला प्रारंभ झाला. साहित्यात आर्थिक, राजकीय स्थितीचे चित्रण होऊ लागले.

१९६० नंतर ग्रामीण साहित्याचा नवीन प्रवाह जोम धरू लागला. ग्रामीण भागात झपाट्याने राजकीय, आर्थिक बदल घडू लागले. या दरम्यान मानवाचे अंतर्बाह्य मन बदलण्यास चालना मिळाली. साहजिकच सामाजिक, आर्थिक, धार्मिक, राजकीय, शैक्षणिक, सांस्कृतिक बदल होण्यास मदत झाली. या दुष्काळात सामान्य जनता भयभीत झाली. याच दरम्यान राजकारणाने पूर्ण महाराष्ट्र पिंजून काढला. ग्रामीण जीवनात प्रचंड उलथापालथ झाली. सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, राजकीय शोषण वाढले. समाजात स्वार्थ बोकाळला, नीतिमत्ता नष्ट झाली. स्वत्वहीन समाज निर्माण झाला, परिणामी समाज नाशाच्या उंबरठ्यावर येऊन उभा राहिला. या सर्व परिस्थितीचा साहित्यावर परिणाम झाला, नव्हे, परिणाम होणे क्रमप्राप्त असेच होते.

काळानुरूप आणि परिस्थितीनुरूप समाजामध्ये अनेक प्रश्न निर्माण झाले. समाजाची वैचारिक आणि मानसिक कोंडी फोडण्याचे काम या दरम्यान साहित्यिकच करतात. परिवर्तनातूनच राजकीय आणि आर्थिक बदल घडून येतात. परिवर्तन प्रक्रिया ही दीर्घकाळ चालणारी आहे. परिवर्तन प्रक्रियेतूनच समाजाला आकार आणि विचार देण्याचे प्रयत्न केले जातात. भारतीय

राजकारणात गांधींच्या नेतृत्वाला विशेष महत्त्व प्राप्त झाले. सर्व राजकीय व सामाजिक कार्यकर्त्यांचे लक्ष खेड्याकडे गेले.

महात्मा गांधींच्या राजकारणाला शेतकरी आणि बहुजन समाज प्रतिसाद देऊ लागला. या सर्व बाबींचा परिणाम साहित्यावरही झाला. परंतु अपवादानेच ग्रामीण भागातील वास्तवतेचे चित्रण होताना दिसते. महात्मा फुले मात्र याला अपवाद आहेत. त्यांनी साहित्याच्या वास्तव चित्रणाची मुहूर्तमेढ रोवली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय राज्यघटना लिहून लोकशाही मूल्य समाजाला बहाल केले. व्यक्तिस्वातंत्र्य आणि मतदान यामुळे देशाच्या सत्तेच्या राजकारणात सर्वसामान्य माणूस दाखल झाला. शिक्षणामुळे, सवलतींमुळे तळागाळातील समाज शिकू लागला. त्याला आत्मभान प्राप्त झाले. परिणामी, आजवर दबून राहिलेली मने गुलामगिरीतून मुक्त होण्यासाठी पुढे सरसावली. या सर्वांचा उहापोह साहित्यातून होऊ लागला. आपल्या जीवनास दुय्यमत्व देणाऱ्या व्यवस्थेत आजचा ग्रामीण लेखक प्रश्न विचारतो आहे. आपले जगणे विस्कटून टाकणाऱ्या व्यवस्थेच्या विरोधात संघर्ष करायला सिद्ध झाला आहे.

परिवर्तन काळ हा लोकशाहीचा दिसत असला तरी त्याचे अंतरंग हे भांडवलशाहीचे आहे. ह्या काळात आत्मकेंद्री वृत्ती वाढीला लागली. विज्ञान खेड्यापाड्यापर्यंत पोहोचले, जग जवळ आले. त्याचा फटका आधुनिक युगाला बसल्याशिवाय राहणार नाही. बागायतदार शेतकरी, व्यापारी दृष्टीमुळे लोभी झाला. काळ्या आईला गुलामासारखे राबवू लागला. चंगळवादी बनल्याने तो आळशी झाला. राजकारण, निवडणुका, सभा, डावपेच, संघर्ष यामुळे परंपराप्रिय आणि प्रामाणिक शेतकऱ्यांमधील चांगुलपण नष्ट झाले. एकत्र कुटुंब विभक्त झाले. नीतिमूल्ये पायदळी तुडवली जाऊ लागली.

१९७० नंतर खेड्यापाड्यातील बहुजन समाजातून एक मोठा शिक्षित वर्ग तयार झाला. दळणवळणाच्या साधनांमुळे शहर आणि खेडे यातील अंतर कमी झाले. आधुनिक काळाचा दुष्परिणाम होऊन ग्रामीण समाज आणि संस्कृती यामध्ये परिवर्तन झाले. औद्योगिकीकरणाच्या प्रभावातून आणि पंचवार्षिक योजनांमुळे सहकार्याच्या प्रभावामुळे शेतीचे रूप पालटले. उत्पन्नात वाढ झाली; पण शेती मालाची किंमत ठरविण्याचा अधिकार मात्र उत्पादक शेतकऱ्याला नसल्यामुळे अडते, दलाल, व्यापारी आणि शहरी भांडवलदार यांनी स्वार्थ साधला. याला विरोध करण्याच्या उद्देशाने शरद जोशी यांनी शेतकरी संघटना स्थापन केली. शेतकऱ्यांना संघटित करण्याचा प्रयत्न झाला. परंतु ही चळवळ देखील राजकारण्यांच्या हातचे बाहुले बनली. देशाच्या स्वातंत्र्यासाठी त्याग केलेल्या सेवाभावी पिढीची जागा छक्केपंजे करणाऱ्या राजकारण्यांनी घेतली. स्वार्थ, त्याग, देशसेवा, समाजाचे कल्याण या गोष्टी नष्ट झाल्या. गटागटांचे राजकारण, कुरघोडी करून सत्ताकेंद्रे ताब्यात ठेवणारी नवी पिढी उदयास आली.

वैयक्तिक महत्त्वाकांक्षा आणि गणगोतवाद यातून अगदी खालच्या पातळीवरचे तत्त्वहीन राजकारण होऊ लागले. खोटी आश्वासने देऊन सामान्य जनतेची दिशाभूल करणे, पुरोगामित्व सिद्ध करण्यासाठी वाटेल त्या स्तराला जाणे असले बेरकीपण सुरू झाले. (ताम्रपट, पाचर, गांधारी इ. च्या संदर्भाने हे अधिक स्पष्ट करता येईल.)

खऱ्या अर्थाने स्वातंत्र्योत्तर काळातच आर्थिक, राजकीय स्थिती झपाट्याने बदलू लागली. त्याचे पडसाद साहित्यातही उमटू लागले. येथे मी विशेषतः ग्रामीण कादंबरीत सत्तेच्या विकेंद्रीकरणामुळे कोणते झपाट्याने बदल झाले त्याचा थोडक्यात परामर्श घेणार आहे.

ग.ल. ठोकळ, शंकर पाटील, व्यंकटेश माडगूळकर, रणजित देसाई, आनंद यादव, रा.रं.बोराडे, डॉ. नागनाथ कोत्तापल्ले, डॉ. वासुदेव मुलाटे, पुरुषोत्तम बोरकर, रंगनाथ पठारे, विश्वास पाटील, राजन गवस, ना. धों. महानोर, बाबाराव मुसळे, सदानंद देशमुख यांच्या कादंबरी लेखनात बदलत्या राजकीय आणि आर्थिक स्थितीचे कोणते पडसाद उमटले आहेत याचा परामर्श घेणे येथे क्रमप्राप्त आहे. ग.ल. ठोकळ यांची 'गावगुंड' ही कादंबरी १९४६ साली प्रसिद्ध झाली. या कादंबरीला १९४२ च्या आंदोलनाची पार्श्वभूमी आहे. या काळात क्रांतिसिंह नाना पाटील यांच्यासारख्या नेत्यांनी सातारा जिल्ह्यात प्रतिसरकारची स्थापना करून इंग्रज सत्तेला आव्हान दिले होते. भूमिगतांच्या चळवळीने सारा महाराष्ट्र घुसळून निघाला होता. राजकीय अंदाधुंदीचा फायदा घेऊन काहींनी दरोडेखोरी सुरू केली होती. भूमिगतांच्या आणि दरोडेखोरांच्या कथा ऐकण्यात लोकांना रस वाटणे स्वाभाविकच होते.

१९४० नंतर ग्रामीण साहित्यनिर्मिती मोठ्या प्रमाणात झालेली दिसते. हा काळ महात्मा गांधींच्या राजकारणाने आणि विचाराने भारवलेला काळ होता. सर्वसाधारणपणे बी. रघुनाथ, मर्ढेकर, यांची कादंबरी युद्धकालीन व युद्धोत्तर ग्रामीण वास्तवाचा वेध घेताना दिसते.

देशकार्यासाठी स्वतःला वाहून घेणाऱ्या ग्रामीण तरुणांची कथा 'बाबू दडके' (१९४४) या कादंबरीत येते. तर 'आडगावचे चौधरी' (१९५४) मध्ये मराठवाड्यातल्या सुलतानी अंमलात सामान्य जनतेवर चौधऱ्यांसारख्या जुलमी जहागीरदारांचेच राज्य होते. निर्दय राजकारण करून सामान्य माणसाच्या जीवनाशी खेळणे, प्रतिष्ठा सांभाळण्यासाठी वाममार्गाने संपत्ती मिळविणे यापलीकडे चौधऱ्यांनी काही केले नाही. तर 'म्हणे लढाई संपली' (१९४६) मध्ये युद्धकाळातील टंचाईच्या परिस्थितीत सामान्य माणूस कसा शोषणाचे भक्ष्य बनत होता याचे चित्रण आले आहे. मर्ढेकरांच्या 'तांबडी माती' (१९४५) या कादंबरीतही युद्धकालीन ग्रामीण वातावरण प्रतिबिंबित झाले आहे. वि.वि. बोकील यांची 'आबा' (१९४२) ही कादंबरी गांधीवादाला वाहिली आहे. त्याच

बरोबर वि.वा. शिरवाडकरांच्या 'वैष्णव'(१९४६) या कादंबरीत गांधीवादी विचारांच्या प्रभावातून विनायकराव या शिक्षकाच्या जीवनात कसे आमूलाग्र परिवर्तन होते याचे चित्रण येते. तत्कालीन राजकीय चळवळीचे लोण सामान्य माणसांपर्यंत कसे पोहोचले, सामान्य माणसाला असामान्यत्व कसे प्राप्त झाले याचे प्रातिनिधिक चित्रण प्रस्तुत कादंबरीत येते.

भा. द. खेर यांनी 'क्रांतीच्या वाटेवर' (१९४७) ही बेचाळीसच्या आंदोलनाची पार्श्वभूमी असलेली कादंबरी लिहिली आहे. र.वा. दिघे, 'पाणकळा', 'सराई', 'आई आहे शेतात' या कादंबऱ्यांतून आर्थिक स्थितीचा परामर्श घेतला आहे तर आर्थिक बदलाचे चित्रण वि.वा. हडप यांच्या 'अन्नदाता उपाशी' (१९४७) या ग्रामीण कादंबरीत मार्क्सवादाच्या प्रेरणा दिसतात. जुलूम असह्य झाल्यावर गरीब शेतकरीही जुलमी जमीनदाराचा कसा खून करू शकतात हे लेखक प्रस्तुत कादंबरीत चित्रित करतात. 'वावटळ' (१९६४) मध्ये गांधीवधामुळे ग्रामीण भागात ब्राह्मण समाजावर जे गंडांतर कोसळले त्यांचे चित्रण माडगूळकरांनी केले आहे. 'फकिरा' (१९५९). इंग्रजी अमदानीत फकिराने वारणेच्या खोऱ्यात जी बंडखोरी केली त्याचे चित्रण प्रस्तुत कादंबरीत येते.

शंकर पाटलांची 'टारफुला' (१९६९) ही कादंबरी गाव आणि त्या गावच्या सत्तेसाठी चालणारा संघर्ष हाच येथे केंद्रस्थानी आहे.

'इंधन' (१९६५) मध्ये हमीद दलवाईंनी स्वातंत्र्योत्तर काळात हिंदु-मुस्लिम संबंधात निर्माण झालेले ताणतणाव टिपले आहेत. 'गांधारीचे डोळे', 'उलट चालला प्रवाह' या कादंबऱ्यांत डॉ. नागनाथ कोत्तापल्ले यांनी राजकारणाचे विकृत रूप व त्यातील सामाजिक जाणिवांचे बेगडीपण उघडकीस आणण्याचा प्रयत्न केला आहे.

'विषवृक्षाच्या मुळ्या' ह्या वासुदेव मुलाटे यांच्या कादंबरीने राजकारणात आणि आर्थिककारणात आज सहकाराचा वृक्ष अमृतवृक्ष राहिला नसून तो विषवृक्ष बनला आहे हे दाखवून दिले आहे.

रामचंद्र पठारे यांनी 'पाचर' या कादंबरीतून ग्रामीण भागातला राजकारणी वर्ग हा प्रामुख्याने उच्चवर्गीय असल्याने परंपरावादी आणि मतांसाठी पुरोगामी दिमाख कसा दाखवतो हे स्पष्ट केले आहे.

विश्वास पाटील यांची 'पांगिरा' (१९७०) ही एक वैशिष्ट्यपूर्ण अशी कादंबरी आहे. या कादंबरीत आर्थिक आणि राजकीय बदलांत सत्त्व हरवलेल्या दोन गावांची कथा आहे. एकेकाळी अत्यंत सुखीसमाधानाने वागणारी ही गावे एकमेकांना खायला उठलेली दाखवली आहेत. कारण की श्रीमंत शेतकऱ्यांच्या हातात खेळणारा पैसा हे होय. 'झाडाझडती' ही त्यांची वैशिष्ट्यपूर्ण कादंबरी आहे. धरणग्रस्तांचा प्रश्न ती समर्थपणे मांडते.

अरुण साधूंनी 'शापित'मधून दुष्काळामुळे सामान्य माणसाची झालेली

ससेहोलपट दाखवली आहे. आर्थिकतेमुळे या लोकांचे जगणे कसे अवघड बनते. याचे चित्रण केले आहे. पुरुषोत्तम बोरकर यांनी 'मेड इन इंडिया ' (१९८७) या कादंबरीमधून सरपंचाच्या व्यक्तिरेखेतून राजकीय स्थिती आणि सरकारी योजनेच्याद्वारे हित साधण्याऐवजी तेथील समाज कसा भरकटलेला आहे हे लक्षात येते. आर्थिकतेमुळे बेरोजगारी, दारिद्र्य, अज्ञान यांच्या खाईत गेला आहे. चक्री, पत्ते, व्ही.डी.ओ., मटका यांच्या आहारी गेल्यामुळे समाजात अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. तर बाबुराव मुसळे यांच्या 'हाल्या हाल्या दुध दे' यामधूनही आर्थिक समस्यांमुळे गरीब माणूस कसा हतबल झाला आहे हे स्पष्ट होते.

रा. रं. बोराडे यांच्या 'आमदार सौभाग्यवती' या कादंबरीतून राजकीय प्रश्न/ राजकीय स्थिती हाताळली आहे. राजकारण हा सत्ता स्पर्धेचा खेळ कसा आहे याचे चित्रण केले. या कादंबरीतील राजकारण सत्तासंघर्षाधिष्ठित असे आहे.

सारांश रूपाने असे सांगता येईल की गांधीवाद, कार्ल मार्क्स, बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले यांच्या वैचारिक अधिष्ठानामुळे आर्थिक, राजकीय स्थिती ही झपाट्याने बदलताना दिसते.

जरी ग्रामीण साहित्य हे शेतीशी निगडित असलेतरी या ग्रामीण/कृषी संस्कृतीचा आर्थिकतेशी घनिष्ठ संबंध आहे. शेतीशी निगडित शेतकऱ्याचा आणि बलुतेदारांचा राजकारणात कसा वापर होतो याचेही चित्रण साहित्यातून होताना दिसते. त्याचबरोबर अलीकडील काळात उत्पन्नाचे स्रोत झपाट्याने बदलले. त्याचेही चित्रण साहित्यात व्हायला हवे. खेड्यातील राजकारण, त्यातून ग्रामीण माणसाचे होणारे शोषण याचेही चित्रण होणे कसे महत्त्वाचे आहे हे लक्षात येते.

आधुनिकतेमुळे, यांत्रिकतेमुळे बदलते राजकीय, आर्थिक जीवन यांचेही प्रतिबिंब साहित्यात पडायला हवे हेही तितकेच महत्त्वाचे.

पुढील काही कादंबऱ्यांची नोंद घेतल्याशिवाय आर्थिक, राजकीय स्थितीचे ग्रामीण जीवन चित्रणाचे स्वरूप पुरेसे स्पष्ट होणार नाही असे वाटते. येथे प्रकाशनानुसार सूची केली नसली तरी आर्थिक आणि राजकीय जीवनचित्रणाच्या अनुषंगाने नोंद केली आहे. तरीही त्यांचा एकत्रितच विचार करावा लागेल.

**आर्थिक :**

| | |
|---|---|
| ऐसे कुणबी भूपाळ | – भारत काळे |
| झाडाझडती | – विश्वास पाटील |
| बनगरवाडी | – व्यंकटेश माडगूळकर |
| गोतावळा | – आनंद यादव |
| धग | – उद्धव शेळके |
| रूपसावली | – तान्हाजी पाटील |

तहान, बारोमास – सदानंद देशमुख
बुढाई, पार्ट टाईम – प्रतिमा इंगोले
असं जगणं तोरुचं – शेषराव मोहिते
गणगोत – गणेश आवटे

**राजकीय :**

तणकट – राजन गवस
एस. ई. झेड. – शंकर सखाराम
ताम्रपट – रंगनाथ पठारे
तंट्या – बाबा भांड
माझा गाव – रणजित देसाई
गांधारी – ना. धों. महानोर
पाचोळा, सावट – रा. रं. बोराडे
पाचर – रामचंद्र पठारे
कुणाच्या खांद्यावर – बा.ग. केसकर
भाकरी आणि फूल – मधू मंगेश कर्णिक
कागूद आणि सावली – आनंद पाटील

या प्रकारे अनेक कलाकृतींचा परामर्श घेता येईल. कादंबरीचीच मर्यादा मी येथे घालून घेतल्याने कथा, कविता आणि इतर साहित्यकृतींचा परामर्श मी घेऊ शकलो नाही. त्यातूनही आर्थिक, राजकीय जीवन चित्रण झाले आहे हे सर्वांना माहीत आहेच.

# रंजनवादी मराठी ग्रामीण साहित्य

पाश्चात्त्य साहित्यविचारधारेतूनच मराठी साहित्यामध्ये अभिजातवाद, स्वच्छंदवाद किंवा सौंदर्यवाद, अतिवास्तववाद, अस्तित्ववाद हे वाङ्मयीन संप्रदाय निर्माण झाले. लेखकाच्या मनपटलावर कोणत्या विचारसरणीचे संस्कार झालेले आहेत, हे उपरोक्त साहित्य संप्रदायांद्वारे शोधता येते. साहित्यनिर्मिती होत असताना साहित्यिकाची भूमिका नेमकी काय आहे? त्याच्या व्यक्तिमत्त्वावर कोणाचा प्रभाव आहे? त्याची विचारसरणी कोणती आहे? लेखकाचा साहित्यनिर्मितीमागील हेतू काय आहे? या सर्व प्रश्नांचा मागोवा या साहित्य संप्रदायांच्या आधारे घेता येतो.

सर्व साहित्य संप्रदायांचा उगम एकमेकांच्या विरोधात झाला आहे. अभिजातवादाचा अतिरेक झाला म्हणूनच स्वच्छंदवादाचा उदय झालेला दिसून येतो. अभिजातवादाचे स्वरूप लक्षात घेता असे जाणवते की, आर्थिकदृष्ट्या संपन्न अशाच वर्गाचे येथे चित्रण झालेले दिसून येते. देवदेवता आणि राजे महाराजे यांचेच चित्रण अपेक्षित होते. परंतु अभिजातवादाचा अतिरेक होऊ लागल्यावर त्याला विरोध म्हणून स्वच्छंदवादाचा उदय झाला. साहजिकच कोणत्याही गोष्टीचा अतिरेक झाला की तिच्या विरोधात प्रतिक्रिया उमटतातच. अभिजातवादातील साहित्यविशेषांच्या अतिरेकामुळे, आग्रहामुळे व त्यांना कर्मकांडातील सांकेतिकता प्राप्त झाल्याने वैगुण्यात रूपांतर झाले. साचेबंदपणा, नियमांचा जाच, निर्जीव अनुकरण, जीर्णसंकेतांचा बडिवार, कलाहीनता, नावीन्याचा अनादर इ. वैगुण्यांचा प्रतिकार करण्यामधून साहित्यक्षेत्रात स्वच्छंदवादाचा उगम झाला.[१] (भालचंद्र खांडेकर/लीला गोविलकर – पाश्चात्त्य साहित्य विचार, अनमोल प्रकाशन, पुणे–२, पृष्ठ २४६)

स्वच्छंदवादाला इंग्रजीमध्ये 'रोमँटिसिझम' असे म्हणतात. अभिजातवादाला जसा एक दर्जेदार अर्थ आहे, तसा भारदस्त अर्थ रोमँटिक या शब्दाला नाही. अव्यवहारी, असंभाव्य, अतिरंजित, चमत्कारिक इ. थोडेसे कमीपणाची छटा असलेले अर्थ या शब्दांतून प्रतीत होतात.[२] (पृष्ठ २४७).

स्वच्छंदवादी साहित्यालाच मराठीत रंजनवादी साहित्य असा पर्यायी शब्दप्रयोग केला आहे. मराठी साहित्यात बाळकृष्ण कोल्हटकर, प्र.के. अत्रे, ना.सी. फडके असे अनेक लेखक रंजनवादी प्रवाह गतिमान करण्यात रमले असे

दिसून येते. पर्यायाने हाच रंजनवाद मराठी साहित्यातूनच ग्रामीणललित साहित्यात झिरपत आला असे लक्षात येते.

लेखकांना आकलन झालेल्या जीवनानुभवाचे स्वरूप त्यांच्या अंगी असलेल्या कल्पना सामर्थ्यासह कलाकृतीत प्रकट करीत असतो. हे करीत असताना वास्तवानुभवापेक्षा कल्पनासामर्थ्य, रंजकता, अतिरंजकता, अद्‌भुतता, चमत्कृतिजन्यता, कल्पनारम्यता, स्वप्नरंजकता या घटकांचाही लेखकाच्या लेखन प्रकृतीनुसार आविष्कार झालेला असू शकतो.

प्रत्येक लेखकाची लेखनप्रेरणा ही वेगवेगळी असते. ना. वि. कुलकर्णी, र. वा. दिघे, ग. ल. ठोकळ, म. भा. भोसले या लेखकांनी फडके-खांडेकर यांच्या प्रभावाखाली लेखन केले आहे; त्यामुळे प्रत्यक्ष जीवनानुभवाला रंजक स्वरूपामध्ये मांडण्याची त्यांची धडपड प्रत्ययाला येते. रंजकता आणि कल्पनारम्यता यांचे तंत्र आदर्श मानून आपल्या कथा-कादंबऱ्यांमधून ते मांडण्याचा प्रयत्न या लेखकांचा दिसून येतो; त्यामुळे प्रत्यक्ष ग्रामजीवनातील अज्ञान, भयावह दारिद्र्य यांकडे दुर्लक्ष होते.

उदा. र.वा. दिघे यांच्या 'सराई'त वास्तवापेक्षा प्रणयप्रसंग आणि कोर्टकज्यांच्या प्रसंग चित्रणावरच भर दिसतो. काही प्रमाणात 'पाणकळा' याला अपवाद म्हणता येईल. ग. ल. ठोकळांची 'गावगुंड' आणि म. भा. भोसले यांची 'उघड्या जगात' या दोन कादंबऱ्यांत प्रणयप्रसंगावरच भर दिसतो. रंजकता आणि कल्पनारम्यता यांचे तंत्र आदर्श मानले आहे. रणजित देसाई आणि अण्णा भाऊ साठे वेगळ्या वळणाने जात असले तरी कल्पनारम्यता आणि भडक नाट्यात्मकता यामुळे ते वास्तवापासून दूर जातात. जीवनचित्रणात विविधता असली तरी फडकेतंत्राचा प्रभाव त्यांच्या लेखनातही दिसतो. प्रारंभापासून ते आजतागायत फडके तंत्राचा प्रभाव कमीअधिक प्रमाणात ग्रामीण साहित्यावरही दिसतो.

वास्तविक १९६० नंतर ग्रामीण साहित्याचा प्रवाह नावारूपाला आलेला दिसून येतो. त्याअगोदर ग्रामीण साहित्य लिहिले जात नव्हते असे नाही. सुरुवातीच्या काळात ग.ल. ठोकळ, र. वा. दिघे यांनी ना. सी. फडकेंच्या तंत्रवादाचा अंगीकार करून मराठी ग्रामीण साहित्यात रंजनवाद आणला. ग.ल.ठोकळांनी ग्रामीण कथा लिहिताना वास्तवापेक्षा नाट्यपूर्ण घटनांना विशेष महत्त्व दिले. केवळ प्रेमप्रकरणे, बारा भानगडी आणि कल्पनारम्य गोष्टींत त्यांची कथा जास्त रमताना दिसते. 'अद्‌भुतता' ही त्यांच्या कथेत ओतप्रोत भरलेली दिसून येते. निसर्गवर्णन अगर व्यक्तिवर्णनातून काव्य, कल्पकता, रांगडेपणा, रानदांडगेपणा, जुलूम, जबरदस्ती, शक्तीचे प्रयोग या गोष्टींचे प्राबल्य त्यांच्या साहित्यात मोठ्या प्रमाणात दिसून येते. अत्यंत चमकदार, उपमाप्रचुर, दणकेबाज ग्रामीण भाषेतून त्यांची कथा व्यक्त होते. आकर्षक आरंभ, घटनांची मन रमवून

टाकणारी मालिका, तसाच चटकदार शेवट असा त्यांच्या कथेचा आदि-मध्य-अंत असतो. वास्तवापेक्षा अद्‌भुतता, व्यक्तीपेक्षा घटना, अर्थपूर्णतेपेक्षा कल्पनाजन्य काव्यमयता, नाट्यपूर्णता यांचे त्यांना आकर्षण फार दिसते. यामुळेच त्यांची कथा ग्रामीण वास्तवापासून, ग्रामीण जीवनदर्शनापासून बाजूला सरकते नि वाचकाच्या मनाची पकड घेत घेत अधिक अधिक मनोरंजक होत जाते.[३] (यादव आनंद - ग्रामीण साहित्य : स्वरूप आणि समस्या, पृ. १४).

ग.ल. ठोकळांवर केवळ ना.सी.फडकेंचाच प्रभाव होता असेही नाही तर इंग्रजी वाङ्मयाचाही प्रभाव होता. हे त्यांच्या मनोरंजनवादी प्रवृत्तीच्या लेखनातून दिसून येते. अगदी थॉमस हार्डीचाही त्यांच्यावर प्रभाव जाणवतो. शृंगार-प्रेम याच गोष्टी त्यांच्या लेखणीला जवळच्या वाटल्या. साहित्य हे मानवी जीवनदर्शनासाठी असते याचा जणू काही त्यांना विसर पडला की काय असेच जाणवत राहते. म्हणूनच की काय ते मानवी जीवनाच्या दर्शनापेक्षा वाचकांचे मनोरंजन करण्यात रमताना दिसतात. 'गावगुंड', 'ठिणगी', 'टेंभा' आणि त्यांच्या इतर कथा कादंबऱ्याही याला अपवाद नाहीत.

दुसऱ्या पिढीतील लेखन करणाऱ्या ग्रामीण लेखकांनीही ग्रामीण साहित्याचा वापर रंजनासाठी केला असे निदर्शनास येते. यामध्ये विशेषत: आनंद यादव, रा.रं. बोराडे, शंकर पाटील, द. मा.मिरासदार यांच्याही नावांचा आवर्जून उल्लेख करावा लागतो. उदा. आरंभीच्या काळात शंकर पाटलांनी आपली लेखणी मनोरंजनासाठीच वापरली असे निदर्शनास येते. उदा. 'ताजमहालात सरपंच' या कथेचा येथे उल्लेख करावा लागेल. या काळात अनेक लेखकांनी बाई-बाटली अशाच स्वरूपाचे लेखन केले आहे; परंतु नंतरच्या काळात आभाळ, वेणा, सारवण, पात यांसारख्या उल्लेखनीय कथाही त्यांनी लिहिल्या आहेत.

द.मा. मिरासदारांनी तर वेगळ्याच अंगाने साहित्य लेखन केलेले दिसून येते. खरे पाहता अगदी शुद्र ग्रामीण विनोदी कथा द.मां.नी सुरुवातीला लिहिली असेच म्हणावे लागते. मराठी वाङ्मयात अनेक विनोदी साहित्यिक झाले. त्यांनी व्यक्तिचित्रे, ललित लेख, टीकात्मक लेख नाटके इत्यादी प्रकार विनोदाच्या प्रेरणेने हाताळले. पण सतत विनोदी कथा यशस्वीपणे लिहिणारे द.मा. मिरासदार हेच पहिले लेखक होत.[४] (यादव आनंद, पृष्ठ २०)

द.मा. मिरासदारांनी खेड्यातील माणसाच्या जीवनदर्शनाचा उपयोग विनोद निर्मितीसाठी केला. पर्यायाने रंजनवादाची एक प्रवृत्तीच मराठी ग्रामीण साहित्यात बाळसे धरू लागली. आनंद यादवांनी काही सकस कथा, कादंबऱ्या लिहिल्या; परंतु 'स्पर्शकमळे'सारखे विनोदी प्रवृत्तीचे, रंजनवादी वळणाचे पुस्तक लिहून या रंजनवादाला खतपाणीच घातले, असे म्हणावे लागेल. 'माळावरची मैना', 'घरजावई' हे वाचकांच्या मागणीप्रमाणे आलेले दोन विनोदी किस्से केवळ रंजन

करणारे कथासंग्रह आहेत. उद्धव शेळकेंचीसुद्धा 'धग' ही कलाकृती सोडली तर बाकी कथा, कादंबऱ्यांमधून मनोरंजनवादी प्रवृत्तीतून लेखन केले आहे. उदा. 'बाईविना बुवा', 'लेडीज होस्टेल' इ.

मराठी ग्रामीण लेखकांनी वास्तवतेचा पाया भक्कम करण्यापेक्षा नाट्यपूर्ण प्रसंगांचीच रेलचेल साहित्यातून जास्त केलेली दिसून येते. कमी श्रमात झपाट्याने लोकप्रियता मिळविण्याचा हा हेतू होता की काय हा पुन्हा एक संशोधनाचा विषय होऊन बसेल. परंतु यातून काही लेखक मंडळी सुटलेली दिसतात. यामध्ये श्री. म. माटेंच्या नावाचा आवर्जून उल्लेख करणे महत्त्वाचे ठरते. त्यांनी फक्त वास्तवतेचा धागा पकडून मराठी ग्रामीण कथेला वास्तवतेचे भान आणून दिले असेच म्हणावे लागते.

रा. रं. बोराडे यांनी सर्व साहित्यप्रकारांत लेखन केले. ग्रामीण जीवन हा त्यांच्या चिंतनाचा विषय राहिला. परंतु अगदी प्रारंभीच्या काळात त्यांनी विनोदी स्वरूपाच्या कथा लिहित्या. 'ताळमेळ' या कथासंग्रहातून त्यांच्या या विनोदीवृत्तीचा प्रत्यय आल्याशिवाय राहत नाही. 'मळणी', 'राखण', 'बोळवण', 'वाळवण', 'नातीगोती' या कथांतून हे प्रकर्षाने जाणवते. परंतु त्यांचे संपूर्ण साहित्य हे रंजनवादाकडे झुकले आहे, असे मात्र नाही. मानवी स्वभाववृत्तीतून त्यांची कथा विनोद साधते. प्रारंभी वाचक व प्रकाशकांच्या मागणीप्रमाणे लेखन केल्याचे त्यांनी एका मुलाखतीत म्हटले आहे. वगनाट्य, एकांकिकादेखील त्यांनी रंजनवादी प्रेरणेतून लिहिल्या.

एकूणच, मराठी ग्रामीण साहित्यात निर्माण झालेली रंजनवादाची प्रवृत्ती ही मराठी साहित्यातूनच झिरपत आली आहे असे अभ्यासांती लक्षात येते. अगदी अलीकडच्या पिढीबाबत विचार करतानादेखील असे जाणवते. अलीकडील लेखकमंडळीसुद्धा रंजनवादाचे बळी ठरले आहेत.

**अणा भाऊ साठे :**

अण्णा भाऊ साठे यांच्या कादंबरीसंदर्भात डॉ. रवींद्र ठाकूर लिहितात, ''गावागावांच्या आणि घराण्यांच्या आपसातील वैराच्या कहाण्या हा त्यांच्या अनेक कादंबऱ्यांचा विषय आहे. ही वैरे कधी प्रतिष्ठेसाठी तर कधी अब्रूसाठी खेळली जातात. त्यामुळे त्यांच्या कादंबऱ्यांमध्ये संघर्ष आणि त्यातून उद्भवणाऱ्या नाट्यमय घटनांना साहजिकच प्राधान्य मिळते. अण्णा भाऊंच्या कादंबऱ्यांची रचना अशी रंजनानुकूल आहे. रूपसुंदर नायक-नायिका, प्रणय प्रसंग, रहस्ये, योगायोग हे रंजनाचे सांकेतिक घटक ते टाळू शकलेले नाहीत. (मराठी ग्रामीण कादंबरी, पृ. ९२) अर्थात 'फकिरा', 'वारणेचा वाघ' असे काही अपवादही नोंदविता येतात.

**द.ता. भोसले**

प्रामुख्याने ग्रामीण कथाकार म्हणून प्रसिद्ध असलेल्या द. ता. भोसले यांनी

'मी आणि माझा बाप' (१९६९) ही उत्कृष्ट ग्रामीण कादंबरी लिहिली आहे, तसेच 'इथे फुलांना मरण जन्मता' (१९८५) ही त्यांची कादंबरी रमा या ग्रामीण युवतीच्या दुर्दैवाची कहाणी आहे, दोन्ही कादंबऱ्यांवर रंजन प्रवृत्तीचा प्रभाव स्पष्ट दिसतो.

**चंद्रकांत काकोडकर**

'निसर्गाकडे', 'कुणाच्या स्वातंत्र्यासाठी', 'गोमंतका जागा हो' (१९५०), 'अन्नपूर्णा' (१९६०) या गोमंतकीय प्रादेशिक कादंबऱ्या रंजनवादाच्या प्रभावातून मुक्त होऊ शकल्या नाहीत.

**सुभाष भेंडे**

सुभाष भेंडे यांच्या 'आमचे गोंय आमकां जाय' (१९७०) व 'जोगीण' (१९७४) या दोन कादंबऱ्या गोमंतकीय वास्तव चित्रण करीत असल्या तरी फडके तंत्राचा प्रभाव त्यावर स्पष्ट दिसतो.

**बाबा कदम**

बाबा कदम यांनी विविध स्वरूपाचे विपुल कादंबरी लेखन केले आहे. रंजक कथानकाची निर्मिती हे त्यांचे मुख्य उद्दिष्ट असते. 'राही' (१९६९), 'प्रलय' (१९६२), 'दगा' (१९७४) आणि इतरही कादंबऱ्यांना रंजनवादी प्रवृत्ती टाळता आलेली नाही. देवदत्त पाटील यांच्या 'संघर्ष' (१९७९), 'फेरा' (१९७९), 'व्याध' (१९८०), 'सिद्धनाग'(१९८०), या कादंबऱ्यादेखील बाबा कदमांच्या कादंबरीप्रमाणेच आहेत. यासंदर्भात डॉ. रवींद्र ठाकूर लिहितात, ''अण्णा भाऊंच्या कादंबरीतही सनसनाटी घटना येतात; परंतु त्या निदान कधी काळी घडलेल्या असतात किंवा घडू शकतील, अशा तरी असतात; परंतु (देवदत्त पाटील) यांच्या कादंबरीतील घटना केवळ लेखकाच्या कल्पनेतच घडू शकतात. दुसरे म्हणजे अण्णा भाऊंचे कथानक मनोरंजक असले तरी त्यांची ग्रामीण पार्श्वभूमी वास्तव असते. तसेही येथे घडत नाही. येथे ग्रामीण पार्श्वभूमी फक्त कथानकाचे अनुकूल सेटिंग एवढ्याच स्वरूपात व प्रमाणात येते. (मराठी ग्रामीण कादंबरी, पृ. १२३). या सर्व कादंबऱ्या शहरी रुचिपालट म्हणूनच उदयास आल्या. अण्णा भाऊ साठे, चंद्रकुमार नलगे, शंकर खंडू पाटील, श्रीपाद काळे यांची कादंबरी फडके रचनातंत्रात अडकलेली दिसते. बाबा कदम, देवदत्त पाटील, आप्पासाहेब खोत याला अपवाद नाहीत. त्यांच्या पुढचे पाऊल व. बा. बोधे होय.

कथासंग्रह :- रानगंगा, गवनेर

कादंबरी :- 'गाव पांढर, गावपांढरीच्या वाटेवर'

**व. बा. बोधे**

व. बा. बोधे यांना 'लोकप्रिय ग्रामीण कादंबरीकार' असे डॉ. रवींद्र ठाकूर म्हणतात. (म.ग्रा.कां., पृ. १४०) देवदत्त पाटील धाटणीची कादंबरी

मनोरंजनात्मक लिहिण्यातच धन्यता मानताना दिसते. 'जंगल', 'कातण', 'वाघीण', 'चांगभलं', 'बिजली', 'भुंगा', 'गुंडगी', 'गजरी', 'वेताळ', 'तुणतुण', 'टिटवी', प्रमाणेच त्यांचे आजपर्यंतचे विपुल लेखन आहे. 'कोकर उड्या', हे आत्मकथन मात्र याला अपवाद आहे.

अप्पासाहेब खोत, संजय कळमकर, बाबासाहेब सौदागर, अशोक कोळी, चं.वि.जोशी, बाबुराव उपाध्ये याप्रमाणेच द.स. काकडे यांनीही विपुल लेखन केले आहे. काही अपवाद वगळता याच वळणाचे रंजनात्मक लेखन त्यांनी केले. ते पुढीलप्रमाणे :

कथासंग्रह :- कुकडीकाठच्या कथा, मुऱ्हाळी, गोरी मेहुणी, श्रावणधार, रातचांदणी, डोह.

एकांकिका :- खानदान, माणूस नावाची ज्योत

कादंबऱ्या :- सात एकर जमीन, दानपत्र, माळ हा सरेना, सारा जन्म उन्हात, कामभूल, रात्री अर्धी चंद्र अर्धा, राणी, पंचफुला, चांदणी, चंद्रमुखी, छबिना, कल्याणी, प्रेमबंधन, नवे पाणी, चंदन, वावधान, नागीण, तमाशा, मोहर, नदीपार, कातळ, दुरावा, खेड्यामधले घर कौलारू, तांबड सांज, घायाळ, कलंदर, रानोमाळ, फिरंगी, रानवारा, जन्मदुःखी, व्याकूळ, निष्पर्ण, बिबळ्या, सोडिला मी गाव, जिंदगी, अतमा, मॅडम, वंश, राही, घरंदाज, काळोख, फार्म हाउस, रांगडा, बंधमुक्ता, भुजंगा, जन्मठेप, केळीचे सुकले बाग.

साहित्य या शब्दाचा अर्थ लक्षात घेता असे जाणवते की, साहित्य म्हणजे सामाजिक हित जपणे; परंतु साहित्याला जेव्हा आपण कलेच्या पातळीवर नेऊन बसवितो तेव्हा ही व्याख्या अपुरी ठरते. कारण कलेचा शुद्ध हेतू आहे तो वाचकाचे मनोरंजन करणे.

म्हणूनच जीवनवाद आणि कलावाद यांनी हातात हात घालून मार्गक्रमण केल्याशिवाय कलेचा हेतू सफल होणार नाही एवढे मात्र निश्चित. मानवाच्या अतिरिक्त भावनेला रंजनवादी साहित्याने एक वेगळी वाट करून दिली आणि जगण्याचे बळ प्राप्त करून दिले हे नाकारता येणे शक्यच नाही.

साहित्याचे प्रयोजन जर आनंद मिळविणे असेल तर 'रंजनवादी प्रवृत्ती ही साहित्याला मारक आहे' हे विधान जरा जपून करावे लागेल.

# लोकसाहित्य आणि ग्रामीण साहित्य

लोकसाहित्य आणि संतसाहित्य, महाकाव्य इत्यादींचा अनुबंध स्पष्ट करण्याचे प्रयत्न यापूर्वी झाले; परंतु ग्रामीण साहित्याकडे दुर्लक्षच झालेले दिसते. लिखित साहित्याची निर्मिती होण्यापूर्वी मौखिक परंपरेने चालत आलेले लोकसहित्य आपल्या मराठीत आहे. स्वाभाविकपणे लिखित साहित्य व मौखिक परंपरेतील लोकसाहित्याचाही अभ्यास आवश्यक ठरतो. लिखित व मौखिक अशा दोन्ही परंपरेतील साहित्याभ्यासानेच साहित्याचा समग्र अभ्यास होईल. म्हणून लोकसाहित्याचा अभ्यास महत्त्वाचा वाटतो. लोकसाहित्यातून लोकमानस व लोकसंस्कृतीची अभिव्यक्ती झालेली दिसते. संस्कृतीच्या विकासाच्या खुणा लोकसाहित्यातून प्रत्ययास येतात. त्याने माणसांच्या मनावर संस्कार केलेला असतो. लोकसाहित्याच्या अभ्यासाने वाङ्मयाच्या परंपरेबरोबर त्यातून प्रकट होणाऱ्या अनेक रचनाबंधांचे आकलन होते; त्यामुळे आपले वाङ्मयीन आकलन, अभिरुची विकास वाढून आपल्या जीवनाला संपन्नता प्राप्त होते. लोकसाहित्य, लोकसंस्कृती, पुराणपरंपरा, भाषा साहित्य व इतर सामाजिक शास्त्रांशी निगडित आहे. लोककथा, विधिनाट्ये, म्हणी, वाक्प्रचार, कोडी, प्रहेलिका, उखाणे अशा प्रकारच्या शब्दसामग्रीबरोबरच विधी, परंपरा, रूढी, विविध कौशल्याच्या कला, लोकशैलीतील चित्र, शिल्प इत्यादींचा समावेश होतो. लोकसाहित्याची लक्षणे पुढीलप्रमाणे :

१) मौखिकता, २) पारंपरिकता, ३) पूर्वसंस्कृती / लोकमानसाचे दर्शन, ४) समाजनिर्मिती / व्यक्ती गौण / समूहनिर्मिती / समूहस्पंदन / मूळ निर्माता अज्ञात. ५) आदिम मानवाची अभिव्यक्ती, ६) व्यवहारी शहाणपणापासून अभिव्यक्त इत्यादी.

ग्रामीण साहित्याचा मूळ स्रोत, उगमस्थान लोकसाहित्यातच आहे. भेद एवढाच की, येथे लेखक नाम समोर येते; परंतु ग्रामीण साहित्यातदेखील लोकमानस, लोकसंस्कृती, रूढी, परंपरा, प्रथा इत्यादीचे चित्रण होताना दिसते. उदा. अण्णा भाऊ साठे यांच्या 'फकिरा' कादंबरीतील जोगतिणीची प्रथा ही लोकविश्वासातून आली आहे. श्री. ना. पेंडसे 'हद्दपार' मधून 'शेरणं' प्रकरण चित्रित करतात. ते लोकसमाजाचे द्योतक आहे. तर र.वा. दिघे 'सराई' म्हणून कातोडी समाजातील प्रथा उदा. मुलांच्या पाचवीला लोबराची (भाताचे कणीस)

पूजा करतात किंवा मृतास मूठमाती देताना गीत गाऊनच पुन्हा कातोड्यांच्या जन्माला येण्याची विनंती करतात. हे परंपरेने चालत आलेले दिसते. ही उदाहरणे घेण्यांचा उद्देश एवढाच की, लेखकांच्या संस्कारक्षम वयात याने आपल्या घरात ग्रामीण-प्रदेशात काही परंपरा, रूढी, प्रथा पाहिलेल्या, अनुभवलेल्या, जगलेल्या असतात. त्यांचा खोल संस्कार त्याच्या मनावर स्वाभाविकपणे झालेला असतो. प्रत्यक्ष लेखन करताना या पारंपरिक जीवनापासून त्याला चित्रित करावयाचा अनुभव वेगळा काढताच येत नाही. म्हणून अनुभवाचे एक अविभाज्य अंग म्हणून लोकमानस, लोकसंस्कृती व परंपरांचे चित्रण तो निर्माता स्वाभाविकपणे करतो, नव्हे, ते त्याच्याकडून होत असते व त्याच्या अंतरमनावरील ठसा उमटत असतो. साहित्य आणि समाज यांचा 'तेन'ने मांडलेल्या वंश, प्रसारमाध्यमे, युगप्रवृत्ती यांचा परस्परसंबंध असतो, हेही उपरोक्त विवेचनावरून स्पष्ट होईल.

डॉ. अनिल सहस्रबुद्धे यांनी 'लोकबंध' या (पृ. ९८, ९९) ग्रंथात केलेले विवेचन या प्रकारचा आशय स्पष्ट करणारे आहे. 'कलावंतांची शैली' ही स्थलकाल, परिस्थिती, व्यासंग व त्याची सौंदर्य लोलूपदृष्टी तसेच त्याच्या भाषाशैलीची झालेली जडणघडण या सर्वांतून म्हणजे एकंदर त्याचे साहित्यिक व्यक्तिमत्त्व त्याच्या साहित्यिक आत्मप्रकटीकरणातून प्रकटते. त्याचे आत्मप्रकटीकरण नैसगिक व लौकिक विश्वात लोकबंधात्मकतेने साकारले जावे म्हणजे त्याच्या साहित्य सृजनातील बहुतांशी वाटा 'अंगस्वरूप लोक'चा असतो म्हणजे 'लोकबंधा'चा असतो. त्याआधारेच कलावंत आपला प्रतिभाविलास करतो. सारांश, लेखकाची निर्मिती ही त्याची एकट्याची असली तरी त्याच्या व्यक्तिमत्त्वावर लोकमानस संस्कृतीचा प्रभाव असतो, हे या विवेचनातून स्पष्ट होते. 'लोकबंध आणि ललित साहित्य' यासबंधी डॉ. सहस्रबुद्धे यांनी केले. विवेचन लोकसाहित्य व ग्रामीण साहित्य अनुबंध स्पष्ट करण्यात पूरकच आहे. ''साहित्य ही कलावंतांची एकट्याची निर्मिती असली तरी ती व्यक्तीपासून समष्टीपर्यंत भावत जाते.'' (पृ. ९८). थोडक्यात, लोकसाहित्य हीदेखील व्यक्तिनिर्मितीच असते. परंतु काळाच्या ओघात कर्ता कालबाह्य ठरतो. व ते साहित्य समाजनिर्मित मानले जाते, तसेच ग्रामीण साहित्य हेदेखील एका विशिष्ट लेखकाचा प्रतिभाविलास असला तरी तो लोकमानसातून साकारलेला असतो, हे उपरोक्त विवेचनातून स्पष्ट होते.

शहरांच्या तुलनेत ग्रामजीवनात आजही अधिक सहजता, स्वाभाविकता, परंपराप्रियता दितसे. आधुनिकीकरणामुळे आलेली गतिमानता ग्रामात आली असली तरी ग्रामीणांनी आपल्या संस्कृतीचे जतन करण्याचा प्रयत्न चालूच ठेवलेला दिसतो. अनेक जातींच्या आजही जातपंचायती भारतात. वाद-संघर्षाचा निवाडा तेथे होतो. या दृष्टीने अण्णा भाऊ साठे यांची 'माकडीचा माळ' कादंबरी विचारात घेता येईल. शेवटी साहित्य जीवनाचे अविभाज्य अंग आहे, हे मान्य केल्यावर

लोकसाहित्य, ग्रामीण साहित्य या सीमारेषा अस्पष्ट होताना दिसतात.

लोकसाहित्य विशिष्ट जनसमुदायाने निर्माण केलेले मौखिक साहित्य आहे. त्यात रूढी, परंपरा, आचार, यांचा समावेश होतो. त्यातून लोकनाट्ये, लोकगीते, लोककथा असे प्रकार निर्माण होतात. हे साहित्य लोकांसाठी व लोकांच्याच बोलभाषेत निर्माण केलेल असते. ग्रामीण साहित्यदेखील एका लेखकाची निर्मिती असली तरी तो लेखक विशिष्ट भाषिक समाजाचा घटक असतो. त्या त्या समाजाची बोलीभाषा त्याच्या निर्मितीचे माध्यम असते. थोडक्यात, शब्द हे दोन्हीच्या अभिव्यक्तीचे माध्यम आहे. ग्रामीण लेखक म्हणूनच काही ग्रामीण लेखकांनी अन्य प्रदेशातील वाचकांसाठी ग्रामीण बोलीतील शब्दांचा अर्थ कलाकृतीच्या शेवटी स्पष्ट केलेला असतो. अनुभवाच्या अभिव्यक्तीच्या त्याने तो मूळ शब्द सहजपणे वापरला असतो. तेथे जाणीवपूर्वक सहजता, स्वाभाविकता अधिक असते.

भाषा संदेशाचे उत्तम माध्यम आहे. त्यामुळे सामाजिक व्यवहार सुलभ होतात. परंतु पारंपरिक जीवनपद्धती असणारे लोकसमूह भिन्न भाषा वातावरणातसुद्धा आपल्या बोलीची वैशिष्ट्ये टिकवून ठेवतात. लोकसाहित्य सामान्य किंवा मौखिक भाषेत नसते, तर बोलीरूपात ते अभिव्यक्त होते. लेखक शहरात वास्तव्य करू लागला तरी त्याच्या बोली भाषेचा बाज, त्याच्या लेखणीद्वारे सहजपणे प्रकट होतो, उलट त्याच्या बोलीऐवजी त्याने संस्कारित केलेली भाषा कृत्रिम ठरण्याचा धोकाच अधिक असतो. लेखकाची नाममुद्रा नसलेले व नाममुद्रा असलेले एवढाच लोकसाहित्य व ग्रामीण साहित्यात भेद दिसतो! बाकी अनुभव व अभिव्यक्तीत साम्यच दिसते.

डॉ. आनंद यादव, डॉ.द.ता. भोसले, डॉ. नागनाथ कोत्तापल्ले आणि इतरही अनेक ग्रामीण साहित्याच्या अभ्यासकांनी ग्रामीण साहित्याची व्याप्ती स्पष्ट केली आहे. त्याआधारे ग्रामीण / प्रादेशिक साहित्याची व्याख्या पुढीलप्रमाणे सांगता येईल.

'उद्योगप्रधान संस्कृतीपासून दूर असलेली विशिष्ट भूप्रदेशातील निसर्ग, परंपरा, सामाजिक, राजकीय, धार्मिक, आर्थिक, सांस्कृतिक समस्यांचे व लोकसंस्कृतीचे बोलीभाषेतील वास्तव अस्सल कलात्मक चित्रण म्हणजे ग्रामीण साहित्य होय.

पश्चिम महाराष्ट्रातील लोकजीवनाचे चित्रण गो.नी. दांडेकर, र.वा.दिघे, ग.ल. ठोकळ, व्यंकटेश माडगूळकर, अण्णा भाऊ साठे, रणजित देसाई, शंकर पाटील, दि. बा. मोकाशी, आनंद यादव, उत्तम बंडू तुपे, राजन गवस, आनंद पाटील, रामचंद्र पठारे, सुरेश शिंदे व विश्वास पाटील या ग्रामीण लेखकांच्या कलाकृतींतून येते. र.वा. दिघे, 'पापकळा' मध्ये खेडुतांचे तमाशाचे वेड, गाय न विकण्याची परंपरा, शुभ-अशुभाच्या कल्पना, कुलस्वामिनीची आण, शंकरदेव

व भिल्लांचा घरजावई (त्यांची गिरजा भिल्लीण, त्याला दिसत नाही.) जखणीच्या गुहेतून स्त्रीच्या रडण्याचा आवाज येतो. मारुतीच्या देवळाजवळील बळदातून लग्नकार्यास भांडी मिळतात इत्यादी लोकविश्वासांचे चित्रण येते.

ग.ल.ठोकळ 'गावगुंड' मधूनही विठ्ठलभक्तीचे वर्णन करतात. पायाळू माणसाने पाय लावला की चमक थांबते. कंबरदुखीवर रामबाण उपाय म्हणजे वाघाची चरबी होय. हे औषधोपचार, तर लग्नविधीतील बारीकसारीक तपशीलही ते नोंदवितात, त्याचबरोबर मुलीला अपत्य होईपर्यंत खानदानी घरातील लोक तिच्या घरी जेवत नाहीत. अशी परंपराही सांगतात. सण-उत्सव, यात्रांचे वर्णनही येते. म.भा. भोसले यांनी 'उघड्या जगात' या कादंबरीतूनही देवीचा कोप, देवी अंगात येणे, तिला नैवेद्य देणे, कौल लावणे, जनावर चुकणे अशुभ समजणे, सर्पदंश मंत्राने उतरविणे, नवस, भूतावर विश्वास, पीराची पुण्याई इ. प्रसंगानुरूप लोकसमाजाचे दर्शन घडविले आहे. विभावरी शिरूरकर 'बळी'मधून मांग गारुडी लोकांचा मरीआई जोखाईवरील विश्वास सहजपणे सांगून जातात. अंगारा, धुपारा, जारणमारण या क्रियांवरील त्यांचा विश्वास प्रसंगानुरूप येतो. 'बळी' वगळता उपरोक्त विवेचनात आलेल्या कलाकृती फडके यांच्या रजंनतंत्राच्या आहारी गेलेल्या दिसून येतात.

गो. नि. दांडेकरांनी 'पवनाकाठचा धोंडी' मधून तुंगी गडावरील महादेवावरील लोकांची श्रद्धा, धोंडीच्या शेतातील वीरावरची श्रद्धा, बैलपूजा, नवससायास, दूध विक्रीस विरोध, मीठमिरच्यांनी दृष्ट काढणे, परंपरेबद्दल अभिमान, इर्जिकची पद्धत, स्वप्नातील दृष्टांत इत्यादींचे यथार्थ दर्शन घडते. 'माचीवरचा बुधा'मधून बहिरोबावरील श्रद्धा व टेमलाईच्या पठरावर एक मोठ्ठे जनावर असून त्याच्या अंगावर केस आहेत. कपाळावरील मणी रात्रीचा झगमगतो. रान उजळत असते. असा लोकविश्वास तर झाडपाल्याच्या औषधांचाही उल्लेख येतो. व्यंकटेश माडगूळकरांची 'बनगरवाडी' तर धनगरांच्या संस्कृतीचे जिवंत चित्रच आहे. अण्णा भाऊ साठे यांनी 'फकिरा', 'वैजयंता,' 'माकडीचा माळ', 'चिखलातील कमळ', इ. कलाकृतींतून लोकविश्वास, लोककला, लोककलावंताच्या जीवनसंस्कृतीचे दर्शन घडविलेले आहे. अनुक्रमे बलुतेदारांच्या जोगतिणीची यात्रा, तमाशा कलावंतांचे जीवन, आलुतेदार, फिरस्त्यांचे जीवन व मुरळी प्रथा इ. रणजित देसाईंची 'बारी' बेरडांच्या संस्कृती ऱ्हासाचे चित्र तर आहेच; पण फरशीशी इमान, मुलीला देज देणे, वीरपूजा, लग्नप्रथा, इ. चे प्रसंगानुरूप लेखकाने वर्णन केले आहे. दि. बा. मोकाशी 'देव चालले'मधून गावकऱ्यांची नरहरी देवावरची श्रद्धा, कुळकायद्याच्या विपरित परिणामाबरोबर येते. आनंद यादव आधुनिकीकरणाच्या प्रभावातून ग्राम-संस्कृतीला बसलेला धक्का सहजपणे 'गोतावळा' मधून व्यक्त करतात. नारबाच्या विश्वास, म्हसोबाला कोंबडा कापणे, गाय विकण्यास रामू सोनवडेचा विरोध

इ.तून लोकमानसाचे दर्शन घडते. बा. ग. केसकरांच्या 'कुणाच्या खांद्यावर' या ऊसतोडणी मजुरांच्या जीवनावरील कादंबरीतून लोकसंस्कृतीच्या दर्शनाबरोबर सुरुवातीला उखाणा येतो. कोणाची कशी का असेना नजर मल्हारी राजाचं नाव घेत मी जनमभर.'' तसेच लोकगीतेही प्रसंगानुरूप येतात. आनंद यादवांचे 'मायलेकरं' हे दीर्घकाव्य 'माय' हा शब्ददेखील लोकबंधातील आहे.

राजन गवस यांनी चौंडक, भंडारभोग या कादंबऱ्यांतून जोगतीण व जोगत्याच्या उपेक्षित लोकजीवनावर प्रकाशझोत टाकणारा आहे. तर 'सर्जा'मधून शेतकऱ्यांच्या घरात होणारी प्राणिपूजा सुरेश शिंदे प्रकट करतात.

पश्चिम महाराष्ट्रापेक्षा भूप्रदेश निसर्गामुळे कोकणी लोकजीवन वेगळे आहे. दिघे, बोरकर, दळवी, पेंडसे, कर्णिक व दलवाई इ. नी कोकणी लोकसंस्कृतीचे दर्शन आपल्या प्रतिभाविलासाने घडविले आहे. विशेषत: भाविणीची प्रथा, शेरणं प्रकरण, महालक्ष्मीची मिरवणूक, गणपतीचा उत्सव, गावगाड्यांचा ऱ्हास, ग्रामपंचायतीचा निर्णय, बहिष्कार टाकण्याची पद्धत, कातोडी जीवन 'उद्याची काळजी उद्याला कातोड्याला नाही,' बाळाच्या पाचवीला भाताच्या लोंब्या पूजनाची परंपरा, चोरी धर्म व कृषिजीवनाशी निगडित परंपरा विस्ताराने 'सराई'तून येतात. यापेक्षाही 'आई आहे शेतात' ही कादंबरी लोकजीवनाच्या म्हणी, उखाणे व ओव्यांतून स्वाभाविक वाटते. 'घर नाय दार! बायको गव्हाण वि.वा. हडपांची 'अन्नदाता उपाशी', कोकणी लोकसंस्कृतीचे दर्शन घडविणारी कादंबरी तर बा. भ. बोरकरांची 'भावीण' व लक्ष्मणराव सरदेसाईंची 'मांडवी! तू आटलीस!' या गोव्यातील संस्कृतिदर्शन घडविणाऱ्या आहेत. 'पडघवली', 'हद्दपार', 'सारे प्रवासी घडीचे', 'भाकरी व फूल' या कादंबऱ्याही कोकणी लोकजीवन संस्कृतीच्या पार्श्वभूमीवर आहेत.

बी. रघुनाथ 'आडगाचे चौधरी' मधून घराण्याचा दहा पिढ्यांचा इतिहास सांगताना मराठवाड्यातील श्रद्धा समजुतीचे चित्रण करताना दिसतात. जसे नवस करणे, होराशास्त्र, ब्राह्मणभोजन, सत्यता पटविण्यासाठी मारोतीचा 'शेंदूर' काढणे, मरीआईच्या नावाने मूल जगावे म्हणून रुप्याचे कडे घालणे, महादेवावरील श्रद्धा, कोल्हाटणींचा जलसा-नाच-तमाशा, गुप्तधनावर बसलेल्या नागाच्या अंगावर लांब केस असतात. पायाळू मांत्रिक-ज्योतिषी यांना गुप्तधनाची जागा दिसते. एखादी इच्छा अतृप्त राहिली तर मृत्यूनंतर त्यांच्या पिंडाला कावळा शिवला नाही इ. रा.रं. बोराडे यांच्या 'पाचोळा'मधून पार्वतीच्या तोंडच्या म्हणी - वाक्प्रचारांतून लोकमानसाचे दर्शन घडते, जसे 'कुनाला कस्याचे आन् बलुत्याला पस्त्यांचं', 'अवचिंद उठलं कुंडाला भेटलं', ना. धों. महानोरांची 'गांधारी', जलसा, तमाशाचे लोकांचे वेड, पुत्रप्राप्तीसाठी अमावास्येच्या दिवशी वेशीला टिळा लावणे, मीठ-मोहऱ्यांनी दृष्ट काढणे, नागनागिणीचे जुळे पाहणे शुभ समजणे, मारुती, भवानी मातेवरील श्रद्धा इ.

समजुतींचे व लोककलांच्या आस्वादांचे चित्रण येते. गणेश आवटे यांच्या 'गणगोत'मधून ओव्या, उखाणे प्रसंगानुरूप येतात. उदा. 'झुल झुंबराचे - फूल उंबराचे', कळी चाफ्याची, लेक बापाची, सून सासऱ्याची, वैनी देंडर नणंदाची उखाण्याचं नाव घेते मी राणी इठ्ठलरावांची.'' ओवी, 'सासू सारे महे देवाऱ्याचे देव, पडते मी पाया मनी नाही दुजाभाव', लग्नाचा जोडा गळ्यातली गळपेटी, सोडले गणगोत एका जिवासाठी!

समजुती : वांझ बायांनी दुसऱ्यांच्या लेकाला पाजलं की त्येह्याला लेक व्हतेत.

वैदर्भी जीवनातील आदिबंध गो. नी. दांडेकरांच्या 'पूर्णमायची लेकरं'मधूनही येतात. कंदुरी करणे,. मंत्रतंत्र, लिंबू मिरच्यांचा उतारा, सादिलबुवावर विश्वास, 'ठोकापिटी'ची लोककथा इ. तर उद्धव शेळके याची 'धग' ही याच वळणाची आहे. बाबाराव मुसळे 'हाल्या हाल्या दूधु दे' मधून आसरांची बारव, पंचमीचा सण, शिरवाळशेठचा नवस, जात्यावरील ओव्या, पावसाबद्दलचे लोकसमज वर्णन करतात, तर पुरुषोत्तम बोरकरांच्या 'मेड इन इंडिया' मध्ये ओव्या प्रसंगानुरूप येतात व मधुकर वाकोडे 'झेलझपाट' मधून केरू फुलय यांच्या प्रेमकथेबरोबर कोकरूंच्या विविध चालीरिती, समजुतींचे वर्णन करतात जसे 'लामजाण्याची प्रथा', सालबर्डी या महादेवावर श्रद्धा, होळीउत्सव, मुलीला हुंडा देणे इ.''

सारांश, लोकसाहित्य व ग्रामीण साहित्याचे अतूट नाते आहे. लोकसाहित्यच ग्रामीण साहित्याचा मुख्य स्रोत आहे. लोकसाहित्य मौखिक असले तरी व्यवहारी शहाणपण 'शब्दांतून' व्यक्त होते. उलट एका व्यक्तीकडून निर्मिलेले शब्दरूपातील दृश्य असे ग्रामीण साहित्य लेखकांच्या संस्कारक्षम वयातील 'आदिबंध'च त्यांच्या कलाकृतीतून उत्स्फूर्तपणे प्रकट होतात. असेही शेवटी म्हणावे लागेल.

ஐ

DN 2901

# एकविसावे शतक आणि ग्रामीण साहित्य

संगणक व माहिती तंत्रज्ञानाचे युग म्हणून आपण एकविसाव्या शतकाकडे पाहतो. औद्योगिकीकरण, दळणवळणाची साधने यांसारख्या कारणांनी व विशेषत: शिक्षणामुळे खेडे व शहर यामधील अंतर नष्ट झाल्याचाही भास निर्माण केला जात आहे. खेडे व शहर वेगळे असणारच नाही असे सांगितले जाते. याची कारणे प्रसारमाध्यमांचा वाढता प्रभाव, आधुनिक शेती अवजारे आणि खते, कीटकनाशकांचा वापर ही सांगितली जातात. औद्योगिकीकरण आणि शिक्षणप्रसार, सुधारणा या गोष्टी कल्याणकारी आहेत हे अमान्य करण्याचे कारणच उद्‌भवत नाही. प्रश्न आहे, तो ग्रामीण संस्कृती, परंपरा, चालीरीती, स्त्रीपुरुष समानता यांचा. उत्सवप्रियता, ग्रामीणांचे विविध मार्गांनी होणारे शोषण या गोष्टी कधीच समूळ नष्ट होणार नाहीत. याचे उत्तम उदाहरण सांगायचे तर इंग्रजांनी दीडशे वर्षे राज्य केले, फॅशन आल्या. स्त्रीपुरुष समानतेचा प्रचार प्रसार झाला; पण आजची पंजाबी कुडत्यातील स्त्री, उपासतापास, पूजा, हळदी कुंकू, वडाची पूजा करताना दिसते. म्हणजे बाह्य रूप बदलले तरी अंतरंगात बदल होणे केवळ अशक्य झाले नव्हे, वाढले. तसेच शहरे आणि खेडी जोडली गेली, बाह्य परिवर्तन झाले तरी ग्रामांचीच म्हणून जी वैशिष्ट्ये आहेत त्यात बदल संभवत नाहीत. मग एकविसाव्या शतकातील ग्रामीण साहित्य कसे असेल? असेल का? मूळ प्रवाहात एकजीव होऊन जाईल का? की मुख्य प्रवाहच ग्रामीण दलित मिळून असेल? असे प्रश्न पडतात. त्यांचा शोध घेतला पाहिजे. त्यासाठी मागे वळून ग्रामीण साहित्याचे स्वरूप, प्रयोजन, भूमिका, चळवळीचे योगदान, चळवळीचा आजार, त्यावरील मलमपट्टी यांचा परामर्श घ्यावा लागेल. आणि त्याच्या आधारे एकविसाव्या शतकातील ग्रामीण साहित्य नेमके कसे असेल हे स्पष्ट होईल. मी काही कुडमुड्या जोशी नाही; त्यामुळे ग्रामीण साहित्याचे नेमके भविष्य सांगण्याचा प्रयत्न करणार असे नाही तर आजच्या पार्श्वभूमीवर उद्याच्या ग्रामीण साहित्यावर भाष्य करण्याचा माझा हा प्रयत्न आहे.

ग्रामीण साहित्य हा आधुनिक साहित्यातील महत्त्वाचा नवप्रवाह आहे. ग्रामीण साहित्याने मराठी साहित्याचे दालन समृद्ध केले आहे. तोचतोचपणा, तीस टक्के लोकांचे प्रतिनिधित्व, अनुभवविश्वाच्या मर्यादांतून मराठी साहित्याला बाहेर काढण्याचे काम ग्रामीण साहित्याने केले. सामान्यातल्या सामान्य माणसाला

साहित्याच्या केंद्रस्थानी आणले, त्याला नायक बनवले, त्यामध्ये खलनायकांनाही निसर्ग, भूप्रदेश, असमानी सुलतानी संकटांमुळे निर्माण झालेला संघर्षही यामध्ये स्वाभाविकपणे येतो. स्वातंत्र्योत्तर काळात विशेषत: संयुक्त महाराष्ट्राची स्थापना झाल्यानंतर नववाङ्मयीन प्रवाह निर्माण झाले. सत्तेच्या विकेंद्रीकरणातून ग्रामीण भागातल्या पुढाऱ्यांकडे नेतृत्व आले. सत्तेसाठी राजकारण स्पर्धा आली. शिक्षण प्रचार, प्रसार वाढला. जाणीव जागृती होऊन उपऱ्या, कृत्रिम अनुभवविश्वात रमण्यापेक्षा आपण आपले अनुभव वाचावे, आविष्कृत करावे अशी भावना वाढीला लागली. यातून सुरुवातीला ग्रामीण माणसाला 'बावळट' असे रेखाटले. खरेच तो तसा आहे का? नव्हे, लेखकांनी मागणीप्रमाणे पुरवठा केला; पण त्यातून पुढे शंकर पाटील, व्यंकटेश माडगूळकर, आनंद यादव, बोराडे, कोत्तापल्ले, चंदनशिवादी लेखकांनी ग्रामीण जीवनातील वास्तव चित्रित केले. ग्रामीण जीवनातील परिवर्तन चित्रण रंजकतेच्याऐवजी वास्तवाभिमुख झाले. औद्योगिकीकरण, सुधारकांच्या काळात शेतीव्यवसाय अधिक भांडवली तर शेती परवडेना असा त्यांचा कोंडमारा झाला. कारखान्यात तयार झालेल्या मालाची किंमत ठरविण्याचा अधिकार कारखानदाराला आहे. परंतु शेतकऱ्याने पिकविलेल्या नाशवंत मालाला भाव ठरविणार व्यापारी व दलाल असा हा सगळा विरोधाभास आहे. उदाहरण द्यायचे झाले तर ऊस शेतकरी पिकवितो, त्याचा भाव मात्र साखर कारखानदार ठरवितो. खर्च अधिक उत्पन्न कमी अशीच शेतकऱ्याची अवस्था; रसवंती गृहात गेले तर एका उसाचा तीन ग्लास रस काढून ग्राहकाला तीन-चार रुपयाला एक ग्लास या दराने गुऱ्हाळवाला विकतो. म्हणजे १० रुपये बरोबर एक ऊस असा हिशेब होतो. शेतकऱ्याला टनाला ७०० ते १००० रुपये भाव दिसतो. एका टनात साधारणपणे १००० ऊस असतात. गुऱ्हाळाच्या भावाने १०,००० टन उसाची किंमत होते. शेतकऱ्याला सर्व कपात जाऊन फकत ७००-८०० रुपये मग बाकी पैसा जातो कोठे? अठरा महिने पाणी भरणारा शेतकरी कंगाल तर संचालक कार्यकारी संचालक गब्बर का? या प्रश्नाचे उत्तर मी देण्याची गरज आहे का? शासकीय पातळीवर आणि बाजारामध्ये शेतकऱ्याची पिळवणूकच होते. त्याचा ताळेबंद कधीच जमत नाही. कर्जाच्या ओझ्यांखाली तो पार गाडला गेला आहे. त्याची अभिव्यक्ती ग्रामीण लेखकांनी केली.

ग्रामीण बोलीत बदलते खेडे आणि खेड्यातील संघर्षाचे चित्रण खऱ्या अर्थाने १९७० पासून पुढे होऊ लागले. रंजकतेच्याबाहेर ग्रामीण साहित्य आले. सभोवतालच्या परिस्थितीचे ग्रामीणांच्या विचार भावनांवर होणारे आघात-प्रत्याघात, त्यातून घडणारे मन, माणसामाणसांतील संबंध आविष्कृत केले. ग्रामीण भागाचा व निसर्गाचा अतूट संबंध आहे. निसर्गाची मोहक रूपे, निसर्गाचा लहरीपणा, ग्रामीण माणूस आणि निसर्ग यांच्या सलोख्याचे आणि अंतर्विरोधाचेही दुसऱ्या तिसऱ्या पिढीवर ग्रामीण लेखकांनी चित्रण केले. दरम्यान शेतकरी संघटनेचा उदय आज

शेतकरी संघटनेत उतरला; पण बाळसे येण्याच्या आतच चळवळ राजकारण्याच्या हातची बाहुले बनली. शेतकऱ्यांच्या पदरात निराशा पडली. परिवर्तनाला, विकासाला, तांत्रिक प्रगतीला गती आली. अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि विकासाचा प्रचंड रेटा वाढला. लोकांच्या राजकीय जाणिवा वाढल्या. सत्ताकांक्षा वाढल्या. त्यातून ईर्ष्या आणि स्पर्धा वाढली. स्वातंत्र्य चळवळीतील त्यागी वृत्ती, निष्ठावान निर्मळ चारित्र्याची पिढी हळूहळू राजकारणातून काळापरत्वे, वयपरत्वे निवृत्त होऊ लागली. बाहेर फेकली गेली. राष्ट्रप्रेम, समाजप्रेम, धर्मातीतता, समाजवाद या विचारांशी थोडी परिचित असलेली काही प्रमाणात गंधही नसलेली पिढी राजकारणात आली. स्वार्थी-भ्रष्टाचार वाढला. महागाई, बेकारीने तोंड वासले. सहकारामुळे शेतकरी उद्धाराची कल्पना पुढे आली. आणि पुढे त्यालाही घरघर लागली. हा सर्व वैचारिक संघर्ष ग्रामीण साहित्यिकांची नवी पिढी अनुभवीत होती. ग्रामीण सामाजिक चळवळ याच काळात जन्मली. याचा परिपाक म्हणजे ग्रामीण साहित्य अधिक स्वाभाविक, जिवंत झाले. अशाच आशयाचे विवेचन डॉ. श्रीराम गुंदेकर यांनी 'ग्रामीण साहित्य : प्रेरणा आणि प्रयोजन' या ग्रंथातही केले आहे.

शेतीवर अवलंबून असणाऱ्या, मातीशी अतूट नाते असणाऱ्या, कष्टकरी स्त्री-पुरुषांच्या जीवनवास्तवाचे कलात्मक दर्शन घडविते. शोषणमुक्त, भयमुक्त, समाजाधिष्ठित समाजनिर्मितीसाठी झटणाऱ्या किंवा अशा प्रकारच्या समाजनिर्मितीची स्वप्ने पाहणाऱ्या नायक-नायिकांचे चित्रण करणे हे ग्रामीण साहित्याचे प्रयोजन आहे. ग्रामीण साहित्य अंधश्रद्धा निर्मूलन, विज्ञान-तंत्रज्ञान यांचे स्वागत करते. ग्रामीण माणसांचे सर्वांगीण जीवन सुखी व्हावे हा ग्रामीण साहित्याचा ध्यास आहे. कृषिनिष्ठ, कृषिअधिष्ठित ग्रामीण समाज हा ग्रामीण साहित्याचा केंद्रबिंदू आहे. ग्रामीण जीवनातील नव्या जाणिवांचे चित्रण करणे हेही ग्रामीण साहित्याचे प्रयोजन आहे. सामान्य माणसांना सन्मान द्यावा, त्यांच्या अस्मितेचा, त्यांच्या कृषिविषयक कसबांचा, श्रमाचा गौरव करण्याच्या हेतूने ग्रामीण साहित्यनिर्मिती होताना दिसते.

ग्रामीण जीवनावर आधुनिकीकरणाचा प्रभाव वाढतो आहे. ग्रामीण भागातील कुटुंब, व्यक्तिसंबंध, भावना, जाणिवा यांचे काही अपरिहार्य परिणाम होतात. शहराभोवती औद्योगिक वसाहती, सहकारी उद्योग ग्रामीण भागातच आपले हातपाय पसरत आहेत. ग्रामीण माणसाला निर्वाहासाठी यंत्राजवळ काम करावे लागत आहे. नवी कृषी अवजारे यंत्रे आणि ते चालविणारा कुशल कामगारवर्ग आहे, तसेच खेड्यात दळणवळण साधने आणि प्रसारमाध्यमे पोहोचली. राहणीमानाच्या बाजूने शहर खेडे अंतर वरवर का होईना मिटत आहे. गरीब-श्रीमंत ही दरी वाढत आहे. शहरातील बिगारी, हमाल, बांधकाम मजूर, बारा बलुतेदार आणि साखर कारखान्याकडे ऊसतोड करणारे मजूर स्थलांतरित आहेत. त्यांचे रोजगार, सुरक्षितता, मुलांची शिक्षणे, म्हणजे प्राथमिक गरजांचा अभाव हे प्रश्न आहेत. ते एकविसाव्या

शतकातही बदलणार का? खाजगी साखर कारखानदारीमुळे नवी भांडवलशाही उदयाला आली आहे. त्यातून नवे प्रश्न निर्माण होणार आहेत. ते ग्रामीण साहित्यातून अभिव्यक्त होणारच.

विविध जीवनक्षेत्रांतील नैतिकतेचा ऱ्हास, मूल्यांचा ऱ्हास, गुन्हेगारी वृत्ती, दडपशाही, घराणेशाही, ही आव्हाने एकीकडे तर गरिबी, लाचारी, बेकारी, उपासमार, कर्जबाजारीपणा, गॅटचा विपरीत परिणाम, सरकारची उदासीनता, खुली अर्थव्यवस्था ही नवी आव्हाने आहेत. लाल फितीचा कारभार, व्यापारी, दलाल यांच्याकडून होणारे शोषण, त्याग, परोपकार, संस्कृतीची निर्मिती आणि रक्षण ग्रामीण माणसांनी करावे; पण त्यांचा वाली कोणी नाही, या अन्याय्य परिस्थितीचा प्रतिकार करणारे ग्रामीण साहित्य एकविसाव्या शतकात निर्माण होईल. धरणग्रस्तांचे पुनर्वसन, भ्रष्टाचार विरोध, एड्ससारखा ग्रामांपर्यंत पोहोचलेले महाभयंकर रोग, त्यातून उद्ध्वस्त होणाऱ्या या सर्वांचे चित्रण करण्याचे आव्हान एकविसाव्या शतकासाठी राहणार आहे. जागतिकीकरणाचे मोठे आव्हान पेलावे लागणार आहे.

ஐ

# ग्रामीण साहित्यातील प्रादेशिकता : स्वरूप आणि विचार

अगदी निमिर्ती क्षणापासूनच प्रादेशिक साहित्याने रसिक मनाला आणि चिकित्सक अभ्यासकांना भुरळ घातलेली आहे. साधारणत: कोकणाशी संबंधित तेवढेच वाङ्मय प्रादेशिक म्हटले जात होते; परंतु कोकणाबरोबरच मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र आणि विदर्भाची स्वत:ची स्वतंत्र अशी प्रादेशिक वैशिष्ट्ये आहेत. त्या त्या प्रदेशाचा स्वतंत्र गंध व्यक्त होण्याच्या दृष्टीने तेथील निसर्ग, समूहसंस्कृती आणि भूवैशिष्ट्यांबरोबरच तेथील बोली, परंपरा, संस्कृती, अर्थकारण, राजकारण, शैक्षणिक प्रगती इ. अनेक घटक महत्त्वाचे वाटतात. यादृष्टीने प्रादेशिकतेची संकल्पना विस्तारित व व्यापक आहे. ''उद्योगप्रधान संस्कृतीपासून दूर असलेली विशिष्ट भूप्रदेशातील निसर्ग परंपरा, सामाजिक, राजकीय, धार्मिक, आर्थिक, सांस्कृतिक समस्यांचे व लोकसंस्कृतीचे बोलीभाषेतील वास्तव अस्सल कलात्मक चित्रणास प्रादेशिक साहित्य म्हणता येईल.''

प्रादेशिक जीवनचित्रणामुळे मराठी साहित्य आशयदृष्ट्या समृद्ध झाले. या ग्रामीण साहित्यिकांच्या साहित्यातून प्रकट झालेली प्रादेशिकता ही त्या त्या लेखकांनी जाणीवपूर्वकच प्रकट केली आहे असे नाही. साहित्यिक त्याला आकलन झालेल्या जीवनानुभवाचे स्वरूप त्याच्या अंगी असलेल्या कल्पना सामर्थ्यासह साहित्यातून प्रकट करीत असतो. हे करीत असताना वास्तवानुभवापेक्षा कल्पनासामर्थ्य, रंजकता, अतिरंजकता, अद्‌भुतता, चमत्कृतिजन्यता, कल्पनारम्यता, स्वप्नरंजकता या घटकांचाही लेखकाच्या लेखनप्रकृतीनुसार आविष्कार झालेला असू शकतो.

प्रत्येक लेखकाची लेखनप्रेरणा ही वेगवेगळी असते. ग्रामजीवनातील दारिद्र्य, व्यसनाधीनता, अंधश्रद्धा आणि नैसर्गिक आपत्ती यांमुळे ग्रासलेल्या ग्रामीण माणसाचे जीवन चित्रणाची प्रेरणा ना. वि. कुलकर्णीसारख्या कादंबरीकाराची असलेली दिसते तर र. वा. दिघे, ग. ल. ठोकळ, म. भा. भोसले यांच्यावरील फडके-खांडेकरांच्या प्रभावामुळे प्रत्यक्ष जीवनानुभवाला रंजक स्वरूप प्राप्त होते. जीवनानुभव, ग्रामीण प्रादेशिक परंतु तंत्ररंजकता व कल्पनरम्यता असे दिसते. मध्यमवर्गीय माणसाच्या संवेदनशीलतेतून प्रचारकी, बोधवादी व प्रदशर्नात्मक झाल्यामुळे त्यांच्या साहित्यातून आढळणारी प्रादेशिकता डागाळली आहे. लक्ष्मणराव सरदेसाई, विभावरी शिरूरकर, बा. भ. बोरकर इ. लेखकांनी ध्येयवाद,

बोधवाद, जीवनाच्या उदात्तीकरणाच्या प्रेरणेतून ग्रामीण समाजाच्या तळातील कष्टकऱ्यांच्या जीवनाच्या व्यथा-वेदना व्यक्त करणे व त्यांचा उद्धार करणे या हेतूने लेखन केलेले दिसून येते. श्री. ना. पेंडसे कोकणातील पारंपरिक लोकजीवनातील ताण-तणाव व या संस्कारांतून निर्माण झालेले स्वभावविशेष रेखाटण्यावर भर देताना दिसतात.

स्वातंत्र्योत्तर ग्रामीण साहित्यातील जीवनचित्रण विविध प्रकारचे आहे. बी. रघुनाथांनी मराठवाड्यातील निजामशाहीच्या अधिपत्याखालील सरंजामशाही वर्गाचे चित्रण केले. गो. नि. दांडेकर जुन्या संस्कृतीचा व पारंपरिक जीवनाचा होत असलेला ऱ्हास चित्रित करतात. व्यंकटेश माडगूळकरांनी ग्रामसुधारणा आणि खेड्यातील धनगराच्या, माणदेशातील माणसाच्या उपेक्षित जीवनावर प्रभाव टाकलेला आहे. अण्णा भाऊ साठे, रणजित देसाई यांनी समाजातील गुन्हेगारीबरोबर त्यांच्या व्यथा-वेदना प्रकट करतात. या काळातील लेखकाच्या साहित्यांवरही फडके तंत्राचा प्रभाव आहेच, त्यामुळे यातील प्रादेशिकता शबलित झाली आहे. याला व्यंकटेश माडगूळकर अपवाद आहेत.

संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापनेच्या आसपासच्या ग्रामीण साहित्यातून ग्रामीण जीवनामध्ये येऊ लागलेल्या परिवर्तनाची चिन्हे प्रकट झालेली दिसतात. उद्धव शेळके, शंकर पाटील, रा. रं. बोराडे, आनंद यादव, जयवंत दळवी आदींच्या साहित्यातून आधुनिकीकरणाच्या काळातील उपयुक्ततावादी विचारसरणीचे आक्रमण स्पष्ट दिसते. अण्णा भाऊ साठे भटक्या जातिजमातीच्या जीवनाचे चित्रण करताना दिसतात. तर ना. धों. महानोरांची कथा-कादंबरी स्वातंत्र्योत्तर काळात सामान्य ग्रामीण माणसांचा झालेला अपेक्षाभंग व ग्रामीण जीवनातील बदलते राजकारण यावर प्रकाश टाकते. ग्रामजीवनांमध्ये येऊ लागलेल्या परिवर्तनाचे, त्यातून निर्माण झालेल्या समस्यांचे चित्रण करण्याची वास्तववादी प्रेरणा उपरोक्त सर्वच लेखकांची दिसते.

तिसऱ्या पिढीतील ग्रामीण लेखकांनी एकदम वेगळे वळण घेतलेले दिसून येते. या साहित्यातून ग्रामीण जीवनामध्ये नव्याने निर्माण झालेले प्रश्न, बदलते राजकारण, समाजकारण, अर्थकारण व यात होरपळून निघणारा ग्रामीण समाज यांचे वास्तवदर्शी चित्र रेखाटण्याचा प्रयत्न या काळातील लेखकांचा दिसून येतो. या काळातील सर्व साहित्यिक आपल्या लेखनातून ग्रामीण वास्तवाच्या विविध अंगोपांगांचा शोध घेत असलेले दिसतात. मधु मंगेश कर्णिक, गणेश आवटे, बा. ग. केसकर, बाबाराव मुसळे, वासुदेव मुलाटे, रामचंद्र पठारे, मधुकर वाकोडे, पुरुषोत्तम बोरकर, विश्वास पाटील, द. ता. भोसले, हमीद दलवाई आणि इंद्रजित भालेराव यांसारख्या सर्व लेखकांची वैशिष्ट्ये ही की त्यांच्या साहित्यातून त्यांनी प्रकट केलेला जीवनाविष्कार अधिकाधिक वास्तवाच्या पातळीवरून करण्याचा प्रयत्न केलेला आहे; त्यामुळे जीवनातील वास्तवदर्शी प्रादेशिकता प्रकट होण्यास

मदत झाली आहे.

काळाला समांतर असे ग्रामीण-प्रादेशिक साहित्याचे विषय व आशय बदलत गेलेले दिसतात. वास्तव जीवनाचे भान अधिकाधिक येत चाललेले दिसते. वास्तवजीवन चित्रणाची प्रेरणाही दिसते. ग्रामीण जीवनतील परिवर्तनाबरोबर आणि स्थित्यंतराबरोबर आशयविषयही बदलत गेलेले दिसते. अभिव्यक्तीमध्येही बदल झाला आहे. प्रारंभीचे प्रादेशिक साहित्य ग्रामजीवन चित्रणाच्या प्रेरणेतून लिहिले गेले असले तरी ते मनोरंजनवादी, प्रचारकी आणि बोधवादी झालेले आहे. मार्क्सवादी प्रेरणेतून झालेली निर्मितीदेखील फडके रचनातंत्राच्या प्रभावाखाली असलेली दिसते. स्वातंत्र्योत्तर दशकातील प्रादेशिक साहित्य अधिक वास्तवस्पर्शी आहे; पण मध्यमवर्गीय दृष्टिकोणातून ग्रामानुभवाचे अवलोकन करून अभिव्यक्ती झाली आहे. संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापनेनंतरच्या दशकातील प्रादेशिक साहित्य मध्यमवर्गीय दृष्टिकोणातून बाहेर पडले आणि आधुनिकीकरणाच्या आक्रमणाचा प्रभाव त्यामधून समर्थपणे रेखाटला गेला. १९७० ते १९९५ मधील प्रादेशिक साहित्यिकांनी सामाजिक समस्यांचे चित्रण वास्तववादी प्रेरणेतून केलेले आहे. जनसामान्य, पददलित व उपेक्षितांच्या जीवनचित्रणामुळे ते अधिक वास्तववादी आणि सामाजिक झाले.

'प्रादेशिक' साहित्यालादेखील मूल्यव्यवस्थेचे वावडे नाही. व्यक्ती, घटना, प्रसंग आणि निसर्ग, वातावरणादी घटक एकजीव झाल्याशिवाय खरी 'प्रादेशिकता' प्रकट होत नाही. या घटकांमध्ये सुसंगती असेल तर जीवनानुभव चैतन्यमय होतो. भावना व विचार यातून ती जीवनसत्याचा आविष्कार स्वाभाविकपणे घडविते. मानवी भावभावना चित्रणास साहित्यात विशेष महत्त्व आहे. ते पुढीलप्रमाणे जीवनानुभवातून दृगोचर होणे अत्यावश्यक आहे.

१) व्यक्ती व समाज २) व्यक्ती व परमेश्वर ३) व्यक्ती आणि निसर्ग ४) व्यक्ती आणि व्यक्तीचा आत्मा, यांचे दर्शन प्रादेशिक साहित्यिकांनी घडविले आहे. त्याचबरोबर दया, प्रेम, क्षमा, ईर्ष्या, सूड, मत्सर, द्वेषादी मानवी भावनांचे दर्शन घडते ते भावाभावातील प्रेम, द्वेष, विसंवादातून घडते, मालक व मजूर यांच्यातील संघर्ष, प्रेम व निष्ठेतूनही घडते. धनिकांची मुजोरी, बदलत्या काळाचे आव्हान समजून न घेण्याची परंपरावादी वृत्ती, बदलत्या सरकारकडून झालेला भ्रमनिरास, अपेक्षाभंग, उपेक्षितांच्या मानव म्हणून जगण्याच्या अपेक्षा व स्त्री ही भोग्य वस्तू नाही, तर ती एक स्वतंत्र व्यक्ती आहे याची अभिव्यक्ती प्रादेशिक साहित्यातून आल्यामुळे ते उत्कृष्ट साहित्य म्हणून स्वीकारायला मुळीच हरकत नाही. यावरून असे लक्षात येते की, रंगभूमी कलाकार, बदललेले परंतु नाटक मानवतेचेच आहे. भौगोलिक प्रदेश कोणतेही असले, तेथील परंपरा कोणत्याही असल्या, स्त्री-पुरुषांची नावे काहीही असेली तरी त्यांचे वर्तन हे मानवी वर्तन असल्याचेही ग्रामीण प्रादेशिक साहित्य दाखविते. म्हणून त्या उत्कृष्ट साहित्यकृती

आहेत, वाचकांचे मनोरंजन हे प्राधान्याने करते तसेच या लेखनाची अनेक भाषांमध्ये स्वैर रूपांतरेही झालेली आहेत. त्यावरून त्याची योग्यताही सिद्ध होते. फडके तंत्राच्या प्रभावातून उपरी प्रादेशिकता केवळ रंग भरण्यासाठी आलेली आहे, निवेदन प्रमाणभाषेत आणि संवाद स्थानिक बोलीत असे प्रारंभीच्या साहित्यातील स्वरूप पुढे लेखाच्या प्रकृतीनुसार बदलले. याचा अर्थ असा की, प्रादेशिकता हा त्यांनी अलंकार म्हणून मान्य केलेला आहे.

ती त्याच्या लेखनाची प्रवृत्ती किंवा प्रकृती नाही, तरी प्रदेशाचे चित्रण महत्त्वाचे जाणवते. पाल्हाळिकपणा, कृत्रिमता व नकलीपणा प्रारंभीच्या ग्रामीण-प्रादेशिक साहित्यांतून स्पष्ट जाणवतो.

प्रादेशिक जीवनचित्रणामुळे मराठी साहित्य समृद्ध झाले. विषयांत विविधता आली. अभिव्यक्तीची नवी वळणे त्यात आहेत. जसे निवेदन प्रमाणभाषेत व संवाद बोलीत किंवा मिश्र भाषेत लेखन, तसेच पात्रमुखी निवेदन व स्वगत अशी ही नवी वळणे आहेत. विविध वर्गांतील व स्तरांतील समस्यांची अभिव्यक्ती झाली. तिचे मानवी वर्तन तीव्रतेने आणि रंगीत पद्धतीने दाखविल्याने एकूण मराठी साहित्य समृद्ध झाले. काळ, देश, सामाजिक परिस्थिती यांच्या चित्रणसामर्थ्यामुळे त्या साहित्यकृती म्हणूनही उत्कृष्ट ठरतात.

आजचे प्रादेशिक साहित्य हेच खरे साहित्य आहे असे विधान करणे धाडसाचे होईल; परंतु वास्तववादी जीवनशोधाची प्रेरणा आणि विषय आशय तसेच अभिव्यक्ती यांच्या नवेपणामुळे ते चैतन्यमय झाले. विविधतेमुळे वैशिष्ट्यपूर्ण झाले.

प्रादेशिक साहित्यदेखील मनाला भिडते, अस्वस्थ करते. ते मानवी भावभावनांचे दर्शन घडविते. वास्तववादी, आत्माविष्कार व जीवनशोधाची प्रेरणा असलेल्या या साहित्याला रहस्यमयता, नाट्यात्मकता, गूढता, सूचकता, जिवंत घटना प्रसंग आणि व्यक्तिचित्रण ही वैशिष्ट्ये आहेत. प्रदेशविशिष्ट जीवनातील सुखदु:खे, समस्या, संस्कृती, निसर्गावलंबी जीवनाचे दर्शन त्यातून घडते. एकप्रकारे हा जीवनशोधच आहे. वेगळ्या समस्या, निसर्गवर्णने, जीवनानुभवाचा अपरिहार्य भाग म्हणून बोलीचा केलेला वापर, नावीन्य यामुळे प्रदेशाने नियत केलेल्या लोकजीवनाचे, त्यांच्या भाव-भावनांचे दर्शन घडते. प्रामुख्याने सामान्य माणसाला, समाजाला केंद्रस्थानी ठेवून त्यांच्या सुखदु:खांचे, भावभावनांचे, ताणतणावांचे चित्रण प्रादेशिक साहित्यातून येते. तळाच्या उपेक्षित, अस्पर्शितांच्या समस्या याही लेखकांनी चित्रित केलेल्या दिसतात. त्या सर्वच समस्यांमध्ये विविधता आहे.

त्यातून जीवनसत्याचे दर्शन घडते. जीवनसत्याच्या दर्शनामागे जीवनमूल्य व्यवस्था कार्यरत असते. सत्याच्या आविष्कारामुळेच तिला कलात्मकताही लाभते. यादृष्टीने विचार करता समाजाभिमुखता, अधिक वास्तवाभिमुखता या साहित्यातून

दिसते. नायकत्व हे चिंतनशील सामाजिक मनाला असलेले दिसते. खलनायकाच्या स्वरूपात एखादी व्यक्ती नसते तर काही एक परिस्थिती, प्रवृत्ती किंवा नियती असते आणि त्यासाठी लेखकाने संघर्ष उभा केलेला दिसतो. प्रादेशिक जीवनाची ओळख पटविणारे हे साहित्य वैशिष्ट्यपूर्ण आहे. कारण काळ आणि जीवनाचा विशालपट त्यातून येतो. मराठी साहित्याचे दालन समृद्ध करणारे तरीही स्वत:चे वेगळेपण सांभाळणारे हे साहित्य वैशिष्ट्यपूर्ण आहे. मराठी साहित्यात ग्रामीण-प्रादेशिक साहित्याचे स्थान त्यामुळेच अनन्यसाधारण आणि समीक्षकांचे लक्ष वेधून घेणारे आहे.

# आधुनिक मराठी ग्रामीण साहित्याची भूमिका

इंग्रजी राजवटीत मराठी साहित्याला आधुनिकतेचे स्वरूप प्राप्त होण्यापूर्वी पहिल्यांदा निबंधाच्या माध्यमातून क्रांती घडवून विविध रूपांनी वैचारिक वाङ्मय, कादंबरी, कविता, कथा, नाटक इ. रूपांत रूढ झाल्या. मात्र आधुनिक होऊ पाहणारा हा समाज शहरी पांढरपेशा, उच्चवर्णीय होता. सर्व समाजसुधारकांचे भान त्यात नव्हते. स्त्री अस्पृश्य व ग्रामीण समाजाच्या उद्धाराचे भान पहिल्यांदा महाराष्ट्रात महात्मा फुले यांना आले. फुल्यांनी 'शेतकऱ्याचा आसूड' हा ग्रंथ लिहून शेतकऱ्यांच्या आर्थिक, शैक्षणिक, सामाजिक यादृष्टीने झालेल्या वाताहातीचे चित्र अतिशय कल्पकतेने मांडून, त्यातून बाहेर पडण्याचे उपायसुद्धा दाखवून दिले. भारतासारख्या कृषिप्रधान देशात साठ टक्के लोक हे खेड्यापाड्यांत राहतात. त्यांच्यावरच या देशाची आर्थिक नाडी अवलंबून आहे. हे पहिल्यांदा त्यांनी दाखवून दिले. शेतकऱ्यांच्या विकासाशिवाय या देशाची उन्नती नाही हे महात्मा फुल्यांनी पहिल्यांदा मांडले, हे सत्य असले तरी संत तुकाराम, अठरा पगड जातींच्या संतांच्या अभंगाचे योगदान मोलाचे आहे. 'ग्रामगीता' तर ग्रामीण साहित्याची निर्मिती प्रेरणा आहे. गाडगेबाबांची कीर्तन परंपरा सुसंवादामुळे समकालीन समाजात लोकप्रिय झाली. ती ग्रामीण साहित्याची प्रेरणाच आहे. महानुभाव साहित्यातील कर्मकांड वगळता ग्रामीण साहित्याची बिजे महानुभाव पंथाच्या वाङ्.मयातही स्पष्ट शोधता येतील.

महात्मा फुले यांच्यानंतर १८९८ मध्ये हरिभाऊ आपटे यांनी 'काळ तर मोठा कठीण आला' ही गोष्ट लिहून दुष्काळाच्या खाईत लोटलेल्या ग्रामीण समाजाचे भीषण चित्रण केलेले आहे. तर १९०३ मध्ये धनुर्धारी यांनी 'पिराजी पाटील' ही कादंबरी लिहून तत्कालीन मराठी शेतकऱ्यांच्या दयनीय स्थितीचे दर्शन घडविले आहे. परंतु नंतरच्या काळात मात्र राष्ट्रवादी व पूर्ण जीवनवादी विचारांनी सामाजिक सुधारणावादी विचारांची पीछेहाट केली. गांधींच्या तत्त्वाचा उदय होईपर्यंत समग्र सुधारणाविचाराबरोबरच ग्रामीण जीवनावरील चित्रण थांबले.

१९२० नंतर साम्यवाद, गांधीवाद, समाजवाद यांचा परिणाम होऊन १९२५ नंतर ग्रामीण साहित्य लिहिले जाऊ लागले. १९५० नंतर कलावादाच्या प्रेरणेने ग्रामीण साहित्याने नवे वळण घेतले. १९६० नंतर ग्रामीण साहित्य नवे रूप

धारण करू लागले व त्याची गती मंद होती. ग्रामीण साहित्याला स्वत:च्या वेगळेपणाचे भान, नवेपणाची जाण, १९८०/८१ पर्यंत आलेली नव्हती. याची काही कारणे डॉ. आनंद यादव यांनी दिलेली आहेत.

१. ग्रामीण साहित्य मराठी साहित्याचाच एक भाग आहे अशी ग्रामीण साहित्याची कल्पना आहे. १९६० ते ८० या कालखंडात बहुत: ग्रामीण साहित्य एकूण मराठी साहित्याच्या अनुसरणातून निर्माण झाले. पूर्वसुरींच्या चाकोरीत राहाणे हे सुरक्षिततेच्या, प्रसिद्धीच्या, वाङ्मय प्रतिष्ठा मिळविण्याच्या दृष्टीने सोयीचे वाटत असल्यामुळे वर्तुळात राहून जे प्रयोग होतात ते दुय्यम दर्जाचे असतात. ग्रामीण जीवनातून पुढे येऊ पाहणाऱ्या लेखकांपुढे शहरी लेखकांचे आदर्श असल्यामुळे त्यांच्याप्रमाणेच साहित्य निर्माण करणे ही चांगुलपणाची खूण मानली गेली.

२. भडक नाट्यपूर्ण घटना, बाई, बाटली, राजकारणाच्या भानगडी, चटकदार संवाद, विनोदी किस्से ही १९६९ ते ८० मधील ग्रामीण साहित्याची लक्षणे सांगता येतील; त्यामुळे या काळातील ग्रामीण साहित्याला नवेपणाचे भान राहिले नाही.

३. १९६० ते १९८० या काळात ग्रामीण भागातून आलेले तरुण साहित्यनिर्मिती करू लागले. ज्या परिस्थितीत ते पदवीधर झाले ती आर्थिक परिस्थिती, पारंपरिक, कौटुंबिक पार्श्वभूमी, ग्रंथालयाच्या पूर्वसुरींच्या ग्रामीण लेखकांचे आदर्श, हीन ग्रामीण परिसर, समीक्षक, रसिक यांच्या मार्गदर्शन व कौतुकाचा अभाव १९७० ते ८० या काळातील बहुसंख्य ग्रामीण साहित्य कालाहीन झालेले दिसते.

१९६० पूर्वीच्या म्हणजेच स्वातंत्र्योत्तर पहिल्या पिढीच्या साहित्याने यथार्थ समाजदर्शन घडविले; परंतु आशयदृष्ट्या ते पूर्वीच्या काळातील जीवनाचे अवधान ठेवणारे आणि अभिव्यक्तीच्यादृष्टीने मध्यमवर्गीय रसिकांचे भान ठेवणारे होते. मात्र १९६० नंतर मराठी खेडे ज्यारीतीने हळूहळू बदलू लागले, त्याकडे डोळसपणाने पाहण्यात ती पहिली पिढी यशस्वी झाली नाही.

१९६० ते ७० मध्ये दुसऱ्या पिढीने, तर १९७० नंतर जन्माला आलेल्या तिसऱ्या पिढीने यातून नेटाने व प्रयत्नपूर्वक बाहेर पडणे आवश्यक आहे. आपल्या संस्कृतीनेही तिचा स्वीकार करणे आवश्यक आहे. या आधुनिक संस्कृतीचा म्हणजेच पाश्चात्त्यांच्या समाजव्यवस्थेचा, त्यांच्या संपूर्ण मूल्यांचा स्वीकार नव्हे. पंचवार्षिक आणि इतर योजना भारतीय खेड्यावर परिणाम करणाऱ्या ठरल्या. अशा बदलत्या खेड्याची वास्तव जाणीव साहित्यिकांनी ठेवली पाहिजे. ग्रामीण साहित्यिकांना मिळणारे शिक्षण, त्यांची नोकरी, त्यांच्या गावी येणारेजाणारे कालवे, धरणे, वीज, नवी शेती यंत्रे, रस्ते, कायदे, निवडणुका यांच्या अनुभवविश्वात येणाऱ्या अनुभवांच्या घटकाचे त्याने डोळसपणे भान

ठेवले पाहिजे, असे आनंद यादवांना वाटते.

त्यांचे हे अनुभवविश्व पहिल्या पिढीच्या साहित्यिकांना अनुभवापेक्षा भिन्न व गतिमान आहे. प्रत्यक्षातील आजचे वास्तव प्रखर आहे. त्याला डोळसपणे सामोरे गेले पाहिजे. त्यातील नवी प्रेरणा मिळून साहित्यनिर्मिती केली पाहिजे. सबंध वास्तव आशयाला विकृत, उथळ करणाऱ्या साहित्यकृतीला चटकदार परीक्षण करून ते मान्यता देतात. ग्रामीण भागात वऱ्हाडी, सुतार, रामोशी इ. रोजगारवर्गातील बलुतेदार महत्त्वाची कामे करत असतात हे या समीक्षकांस दिसत नाही. त्यांना फक्त बागायतदार व श्रीमंत घटक माहीत असतात व त्याबद्दल ते समग्र ग्रामीण जीवनाची कल्पना करतात. त्यांच्याकडून ग्रामीण साहित्याला व साहित्यिकाला मार्गदर्शन करण्याची अपेक्षा करणे योग्य ठरणार नाही. ग्रामीण समाजाच्या खालच्या स्तरातून येणाऱ्या मनोरंजन करण्यातच धन्यता वाटते. त्यांच्या व्यथा व वेदना जुन्या समाज व्यवस्थेतील मनातच होत्या. जुने जाऊन नवे येऊ पाहात असताना जो भीषण आक्रोश होत आहे, त्यातून या लेखनाला प्रेरणा मिळाली पाहिजे ही नवी जाणीव १९७० च्या आसपास लेखन करणाऱ्या तिसऱ्या पिढीच्या ग्रामीण लेखकांच्या लेखनात दिसते. त्यांच्या लेखनात काही पाऊलखुणा उमटत आहेत, हे चित्र अजूनही धूसर आहे. यातूनच नवीन सकस ग्रामीण साहित्य निर्माण होणार आहे असा यादवांचा विश्वास आहे.

शहरी संस्कृती व ग्रामीण संस्कृती यात खूप फरक आहे. शहरी संस्कृती यंत्रनिष्ठ, तर ग्रामीण संस्कृती शेतीनिष्ठ, शहरीमाणूस व्यक्तिकेंद्रित, तर ग्रामीण माणूस समूहाचा एक घटक - त्यामुळे शहरी मराठी साहित्याचे व ग्रामीण साहित्याचे अंतरंग वेगळे असणार हे ग्रामीण साहित्यिकांनी लक्षात ठेवले पाहिजे. शहरी साहित्यिकांनी कलात्मकतेविषयी एक भ्रामक कल्पना उराशी बाळगली आहे. मध्यमवर्गीय साहित्यिकाला स्वतःच्या जीवनचाकोरीतून बाहेर पडून समाजाच्या व्यापक पातळीवरील अनुभव अनुभवणे मानवत नाही. १९६० नंतचे शहरी साहित्य सामाजिक व्यापक अनुभवास पारखे झाले आहे.

१९६० नंतर मराठी ग्रामीण जीवनात स्थित्यंतरे होऊ घातली. १९६७-६८ सालानंतर दलित साहित्य जोमाने मूळ धरू लागले. ते इतके की, दलित साहित्य या नावाने त्याला स्वतंत्र अस्तित्वही प्राप्त झाले. १९६७-६८ नंतर विशेष स्वरूपात साहित्य क्षेत्रात अस्पृश्यतेविरोधी उद्रेक जन्माला येऊ लागला.

आधुनिक समाजव्यवस्थेत दलितांच्या सर्व जातींचा प्रश्न गौणस्थानी जाऊन नवा वर्गवादाचा प्रश्न उद्भवला आहे. एका विशिष्ट दलित जातीलाच महत्त्व आहे. ते दलितच प्रामुख्याने दलित साहित्य निर्माण करीत आहेत व इतर क्षेत्रांत प्रगतीचा मोठा टप्पा गाठला आहे. त्यामुळे हे दलित साहित्य एका विशिष्ट जातीमध्येच घोटाळत आहे. एका विशिष्ट अधिकरण्याची फक्त प्रेरणा स्वीकारत असेल तर ते आशयदृष्ट्या संकोचित होत जाणार आहे.

.अशा पद्धतीत दलित साहित्याचे स्वरूप व्यापक बनले आहे/पाहिजे. केवळ एक अस्पृश्यतेच्या समस्येत अडकलेले दलित मनच सातत्याने साहित्यात आविष्कृत न करता त्याचबरोबर आर्थिक, ज्ञानात्मक, सांस्कृतिक, धार्मिक अशा व्यापक दृष्टीने वास्तव मन रेखाटले पाहिजे. हे जाणून आर्थिक्र सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिकदृष्ट्या जे वंचित आहे ते शेवटी एकच आहे हे समजून जे साहित्यिक साहित्य निर्माण करील तेच उद्या मराठी साहित्य ठरणार आहे. या दृष्टीने दलित साहित्याला १९६० नंतरचे आणि ग्रामीण साहित्य लेखक एकमेकांत मिसळतात. या देशात नवे युग निर्माण करू पाहणारे ही आधुनिक भारतीय समाजवादी समाजनिर्मिती प्रक्रिया आजवरच्या सर्वार्थाने सर्वच वंचितांना न्याय देऊ पाहाणारे आहे. दलित साहित्याच्या पार्श्वभूमीवर पाहता १९६० नंतरच्या आ. ग्रामीण साहित्याची भूमिकाही सर्वच जाती धर्मांच्या पलीकडची आहे. समाजाच्या सर्वांत खालच्या थरात असलेल्या आणि स्वत:च समाजाच्या समपातळीवर आणण्यासाठी धडपडू पाहाणाऱ्या व्यथावेदनांचे हे साहित्य आहे.

आजच्या दलित साहित्याप्रमाणे आ. ग्रामीण साहित्य हे राजकीय आंदोलनाचे किंवा सामाजिक सुधारणावादाचे प्रभावी साधन बनण्याच्या धोक्यापासून दूर ठेवले पाहिजे. ११९५० पूर्वीच्या आशयवादी आणि मनोरंजनवादी, ध्येयवादी, सुधारणावादी साहित्यासारखी त्याच्या अनुभवांच्या कला ठरविलेले व्हायचे नाही. १९५० नंतर कलावादी मर्यादांनाही नजरेआड करता येणार नाही. ग्रामीण भाषेच्या लकबींचे, व्यक्तींचे प्रदर्शन विनोदी अंगाने प्रदर्शन रूपात करू नये.

साहित्याचा हेतू वाचकाला क्रियाप्रबल करणे हा नसून केवळ सौंदर्यानंद देणे ही भूमिका असली तरी साहित्याच्या आशयाचा सत्यावर कोठेतरी परिणाम होत असतो. ही गोष्ट आधुनिक ग्रामीण साहित्य विसरू शकत नाही. ग्रामीण सौंदर्यानंदाबरोबरच बुद्धीची मशागत नीट व्हायला पाहिजे.

प्रादेशिक, ग्रामीण, दलित शेतकी, गुराखी, कृषी या सर्वच महत्त्वाच्या धारा आहेत. श्रेष्ठ कनिष्ठतेचा प्रश्न नाही, सर्वांची प्रेरणा संत तुकाराम, तुकडोजी, गाडगेबाबा तसेच महात्मा फुले, शाहू, आंबेडकर आहे, ग्रामउद्धाराची तळमळ त्यामागे असणे स्वाभाविक आहे. हे 'ग्रामगीता' समजून घेतल्यानंतर अधिक स्पष्ट होईल. आजच्या ग्रामीण साहित्याची भूमिका सर्वसमावेशक, व्यापक हवी, एकांगी राहून चालणार नाही. इतरांना बरोबर घेतल्याने झालाच तर फायदा होईल. नुकसान होण्याचा प्रश्नच येत नाही. आजही सर्वच साहित्य प्रवाहांना चळवळीची गरज आहे. चळवळीने साहित्य निर्माण होत नसले तरी प्रेरणा निश्चितच मिळते याचे भानही ठेवले पाहिजे.

## शोषणाविरुद्ध उभी ठाकलेली, संस्कृती संघर्षाचे चित्रण करणारी ग्रामीण कादंबरी

पाव शतकातील मराठी ग्रामीण कादंबरी ही प्रामुख्याने 'इंधन' (हमीद दलवाई) १९६५, 'पाचोळा', 'गोतावळा', (१९७१) 'गांधारी' (१९७३) यांच्या भक्कम पायावर बांधलेली इमारत आहे. एकूण या काळात मराठी कादंबरी ग्रामीण कादंबरीमुळे समृद्ध झाली. या कादंबरीतून विविध समस्यांचे चित्रण झाले. या संदर्भात डॉ. नागनाथ कोत्तापल्ले यांनी 'ग्रामीणता : संकल्पना, स्वरूप आणि व्याप्ती' यासंबंधी म.सा.पत्रिकेतून (अंक क्र. २९७ ए.मे.जु.२००१) व्यक्त केलेल्या विचारांचा आधार घेतला पाहिजे असे वाटते. ग्रामीणता साकार होण्यामध्ये कृषिनिष्ठ संस्कृती, निसर्गसन्मुखता, त्यातून निर्माण झालेले लोकमानस हे घटक त्यांना महत्त्वाचे वाटतात. कृषी संस्कृतीवरील अर्थव्यवस्थेच्या प्रभावातून असंख्य प्रश्न निर्माण होतात. पर्यावरणाचा प्रश्न ('असं जगणं तोलाचं' - शेषराव मोहिते) यातून ग्रामीण जगण्याची रीत आज विस्कटून गेली आहे. बी-बियाणांच्या प्रश्नांपासून (हाल्या हाल्या दूध दे) ते बेकारीच्या प्रश्नांतर्गत (झेलझपाट/मेड इन इंडिया) अनेक प्रश्न आहेत. जमिनीचे छोटे छोटे तुकडे, पाण्यावरील धनदांडग्यांची मालकी, शेतमजुरांचा अभाव, लोकशाहीच्या निमित्ताने रोजचेच झालेले राजकारण (पाचर) साखर कारखानदारीसारख्या उद्योगांनी निर्माण केलेले प्रश्न (कुणाच्या खांद्यावर - बा.ग. केसकर) अशा असंख्य प्रश्नांनी ग्रामीण इलाखा धगधगू लागला आहे.

ग्रामीण जीवनातल्या वास्तवाचे भान येऊ लागले ते प्रकर्षाने, शेळके, यादव, बोराडे, महानोर, दलवाई यांनी मांडले; परंतु गेल्या पंचवीस वर्षांत ग्रामीण या संज्ञेला अधिक व्यापक रूप येऊ लागले. केवळ वास्तव सांगणे ग्रामीण लेखकाला (या ठिकाणी ग्रामीण कादंबरीकारांना) पुरेसे वाटेनासे झाले. या वास्तवाच्या मागे असणारे आणखी एक वास्तव आहे आणि ते शोधले पाहिजे असे (पृ.५६) त्यांना वाटू लागले. ग्रामीण जीवनामध्ये जे प्रश्न निर्माण झाले आहेत, त्याला कोण जबाबदार आहे? ग्रामीण इलाख्याचे शोषण कोण करीत आहे. विकासाच्या नावाखाली नैसर्गिक जीवन कोण उद्ध्वस्त करीत आहे? शेतकऱ्यांच्या जीवनातील महत्त्वाचे निर्णय कोण घेत आहे? त्याला खरोखर स्वातंत्र्य आहे का?

ग्रामीण जगण्याची वेगळी रीत हे ग्रामीण संकल्पनेत येतेच; परंतु त्या

कडचेही काही आहे. आपल्या जीवनास दुयमत्व देणाऱ्या व्यवस्थेला आजचा ग्रामीण लेखक प्रश्न विचारतो आहे. आपले जगणे विस्कटून टाकणाऱ्या व्यवस्थेच्या विरोधात संघर्ष करायला तो सिद्ध झाला आहे. एकंदरीत आजच्या ग्रामीणतेच्या संकल्पनेमध्ये संस्कृती संघर्षाचाही समावेश करणे गरजेचे झाले आहे.

डॉ. आनंद यादव यांनी 'ग्राम संस्कृती : दशा आणि दिशा' या ग्रंथातून स्वातंत्र्योत्तर पन्नास वर्षांतील ग्रामीण समाज आणि संस्कृतीचा परामर्श घेतला आहे. त्यात त्यांनी विविध समस्यांकडे आपले लक्ष वेधले आहे. प्रामुख्याने खेड्याची संस्कृती ग्राम संस्कृती असे म्हणतात. संस्कृतमध्ये 'प्रकृती' असा शब्द आहे. त्याचा अर्थ सृष्टी, निसर्ग, सृष्टीची स्वाभाविक स्थिती किंवा तिचे स्वाभाविक स्वरूप होय. प्रकृतीत बिघाड होतो तेव्हा विकृती होते. प्रकृतीची अधोगती म्हणजे विकृती. प्रकृतीवर हात चालवून माणूस जेव्हा आपल्या स्वतःच्या सोयीसाठी, हितासाठी बदल किंवा परिवर्तन करतो त्याला संस्कृती म्हणतात. प्रकृतीवर संस्कार करण्याच्या मानवी प्रेरणेतून संस्कृती सिद्ध होते. ग्राम संस्कृतीवरचे निसर्गाचे निरंकुश नियंत्रण आता हळूहळू कमी झालेले दिसते. निसर्गाला शरण जाण्यापेक्षा निसर्गाला जिंकण्याकडे नवी ग्रामसंस्कृती झेपावताना दिसते. जसे पाण्यासाठी बोअरवेल, धरणे, कीटकनाशकांचा वापर, सुधारित बी-बियाणांचा वापर इत्यादी स्वातंत्र्योत्तर काळात ग्रामीण महाराष्ट्रात झपाट्याने स्थित्यंतरे होत गेली. आणीबाणीनंतर म्हणजे १९७७ नंतरच्या काळात या स्थित्यंतरामुळे झालेले फायदे आणि तोटे स्पष्ट झाले. बदलत्या खेड्यांत या स्थित्यंतराने सरंजामदारांचे फायदे झाले; पण जनसामान्यांच्या ग्रामीण समाजाचे अनेक मार्गांनी प्रचंड प्रमाणात शोषण होताना दिसू लागले. प्राणिपूजा करणारी ग्रामसंस्कृती औद्योगिकीकरणामुळे बदलली. मानवी स्वभावातील भल्याबुऱ्या वृत्ति-प्रवृत्तींवर समाजहितासाठी नियंत्रण घातले जाते व त्यांना त्या अपेक्षित दिशेने वळण लावण्याचा धर्म, नीतिकायदा, रूढी-परंपरा प्रयत्न करीत असतात. त्यातून त्या-त्या समाजाची संस्कृती निर्माण होते व तिच्यामुळे समाजाचे स्वास्थ्य निर्मिण्यास मदत होते; परंतु या पंचवीस वर्षांच्या काळात धर्म, नीती, कायदा अस्तित्वात आहे का? हा प्रश्न आजच्या सर्जनशील लेखक कलावंतांना विचार करायला प्रवृत्त करतो, असेच या काळातील कादंबरीचा अभ्यास करताना दिसते.

परिवर्तनकाळ हा लोकशाहीचा दिसत असला तरी त्याचे अंतरंग हे भांडवलशाहीचेच आहे. ह्या काळात आत्मकेंद्रवृत्ती वाढीला लागली. विज्ञान खेड्यापाड्यापर्यंत पोहचले, जग जवळ आले. त्याचा फटका आधुनिक युगाला बसल्याशिवाय राहिला नाही. बागायतदार, शेतकरी व्यापारीदृष्टीमुळे लोभी झाला. काळ्या आईला गुलामासारखा राबवू लागला. चंगळवादी बनल्याने तो आळशी झाला. राजकारण, निवडणुका, सभा, डावपेच, संघर्ष यामुळे परंपराप्रिय

आणि प्रामाणिक शेतकऱ्यांमधील चांगुलपण नष्ट झाले. एकत्र कुटुंब विभक्त झाले. ('टू बाय टू'चे कुटुंब) नीतिमूल्यांना पायदळी तुडवले जाऊ लागले. त्यातून ग्रामसंस्कृतीचा ऱ्हास झाला. १९७० नंतर खेड्यापाड्यांतील बहुजन समाजातून एक मोठा शिक्षित वर्ग तयार झाला. दळणवळणाच्या साधनांमुळे शहर आणि खेडे यातील अंतर कमी झाले. आधुनिकीकरणाचा दुष्परिणाम होऊन ग्रामीण समाज आणि संस्कृती यामध्ये परिवर्तन झाले. औद्योगिकीकरणाच्या प्रभावातून आणि पंचवार्षिक योजनांमुळे सहकाराच्या प्रभावामुळे प्रगतीचे रूप पालटले. उत्पन्नात वाढ झाली; पण शेती मालाची किंमत ठरविण्याचा अधिकार मात्र उत्पादक शेतकऱ्याला नसल्यामुळे अडते, दलाल, व्यापारी आणि शहरी भांडवलदार यांनी स्वार्थ साधला. याला विरोध करण्याच्या उद्देशाने शरद जोशी यांनी शेतकरी संघटना स्थापन केली. शेतमालाच्या उत्पादन खर्चावर आधारित किंमत शेतमालाला मिळावी म्हणून शेतकऱ्यांना संघटित करण्याचा प्रयत्न झाला; परंतु ही चळवळदेखील अलीकडच्या काळात राजकारण्यांच्या हाताचे बाहुले बनू लागली असेच चित्र दिसते. त्यामुळे शेतकऱ्यांना दिसलेला आशेचा किरण नष्ट होतो किंवा काय? देशाच्या स्वातंत्र्यासाठी त्याग केलेली सेवाभावी पिढींची जागा छक्के पंजे करणाऱ्या राजकारण्यांनी घेतली. स्वार्थत्याग, देशसेवा, समाजाचे कल्याण या गोष्टी नष्ट झाल्या. गटा-तटाचे राजकारण, कुरघोडी करून सत्ताकेंद्रे ताब्यात ठेवणारी नवी पिढी उदयाला आली. भ्रटाचार सुरू झाला. त्याला कोणतेही क्षेत्र अपवाद राहिले नाही. वैयक्तिक महत्त्वाकांक्षा आणि गणगोतवाद यातून अगदी खालच्या पातळीवरचे तत्त्वहीन राजकारण होऊ लागले. खोटी आश्वासने देऊन सामान्य जनतेची दिशाभूल करणे, पुरोगामित्व सिद्ध करण्यासाठी वाटेल त्या स्तराला जाणे असले बेरकीपण सुरू झाले. या सर्व विकृतींचे वास्तव चित्रण या काळातील कादंबरीतून झाले असे दिसून येते. तरीही 'पाणी आडवा पाणी जिरवा' सारखी ग्रामकल्याणी योजना, शेतकऱ्यांच्या कर्जबाजारीपणामुळे आत्महत्या, 'आदर्श गाव' सारख्या कल्पना आणि कोकण रेल्वे प्रकल्पामुळे विस्थापित झालेल्या आदिवासींच्या समस्या ग्रामीण कादंबरीत आल्या नाहीत. हे एक निरीक्षण नोंदविण्यासारखे आहे.

(१९७५ ते २०००) या पाव शतकात खऱ्या अर्थाने ग्रामीण कादंबरी बहरास आली. ग्रामीण परिसरात नवशिक्षितांचा वर्ग तयार झाला. त्यात विविध स्तरांतील लेखकांनी आपले ग्रामीण परिसरातील प्रत्यक्ष जगले-भोगलेले-अनुभवलेले अनुभव कादंबरीतून चित्रित केले. त्या अनुभवांत अधिक जिवंतपणा आला. खेड्यातील पारंपरिक व्यावसायिक, कष्टकरी, भटके आणि दलित यांच्या दुःखचित्रणावर भर दिलेला असल्याने संपूर्ण ग्रामीण संवेदना शब्दांकित करण्यात हे कादंबरीकार यशस्वी झाले आहेत. धरणग्रस्तांची समस्या त्यांनी समर्थपणे चित्रित केली आहे. एकूणच नव्या पिढीला शिक्षणामुळे आत्मभान आले.

सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय परिवर्तनवादी चळवळींनी विविध वंचित गटांचे प्रश्न काही लेखकांनी आपल्या कादंबऱ्यांतून आणले आहेत. उदा. 'झेलझपाट', 'हाकुमी', 'एका नक्षलवाद्याचा जन्म', 'पांगीरा', 'सिलीपसेरा', 'तंट्या', 'डांगाणी', 'हयात', इत्यादी. 'कोरकुंचे जीवन आणि त्यांचे प्रश्न' यांचे चित्रण मधुकर वाकोडे 'झेलझपाट'मधून करतात, 'सिलीपसेरा'मधून डॉ. मधुकर वाकोडे यांनी ग्रामीण आदिवासींच्या जीवनातील भटक्या जमातींच्या स्थिरस्थावर होण्याच्या प्रयत्नाचे यथार्थ दर्शन घडविले आहे. झिंगा भोई या आदिवासी जमातीतील लोक गावोगाव भटकत राणबोके मारून उदरनिर्वाह करतात. त्यांची स्थायिक होण्याची धडपड या कादंबरीत पाहयला मिळते. 'माडिया-गोंड' समाजाचे चित्राण सुरेश द्वादशीवार 'हाकुमी'मधून करताना 'आदिवासींची मूल्य व्यवस्था' स्पष्ट करतात. तसेच त्या भागातील नक्षलवादी चळवळीचे प्रतिबिंबही तिच्यातून आलेले आहे. 'तंट्या' (बाबा भांड) या प्रदीर्घ कादंबरीतून तेराव्या शतकातील एका लोकविलक्षण भिल्ल नायकाचा जीवनसंघर्ष प्रखरपणे व्यक्त केला आहे. माधुरी महाशब्दे यांनी लोकसत्ता २० मे २००१ पुस्तक परीक्षण केले आहे. ते मुळातून पाहण्यासारखे आहे. तसेच चंद्रशेखर जहागीरदारांनी तिचा यथार्थ गौरव केला आहे.

**शिक्षण आणि समस्या :**

संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापनेनंतर ग्रामीण जीवनात परिवर्तन आले. खेड्यातील शेतकऱ्यांची मुले शिकू लागली; पण या शिक्षणामुळे त्यांच्या समस्या सुटल्या नाहीत तर त्यांची गुंतागुंत वाढली. घरात शिकलेली आणि न शिकलेली अशी दोन प्रकारची माणसे वावरताना, एकत्र राहताना नवेच प्रश्न निर्माण झाले. अभावग्रस्त माणसे लवकर एकमेकांविरुद्ध उभी राहतात, भांडतात. शिवाय नव्या आर्थिक व्यवस्थेतही सामान्य शेतकऱ्यांची पिळवणूक, त्यांचे कर्जबाजारीपण कमी झालेले नाही, अशा परिस्थितीत घरातील शिकून सुशिक्षित झालेल्या तरुण मनाची विलक्षण कोंडी होते. या अर्थाने 'असं जगणं तोलाचं' शेषराव मोहिते यांची ही कादंबरी 'वास्तववादी' म्हणता येईल. (नवे साहित्य नवे आकलन, डॉ. वासुदेव मुलाटे).

भारत हा शेतीप्रधान देश म्हणून आजही ओळखला जातो. म्हणजेच या ठिकाणची जनता बहुसंख्य प्रमाणात शेतीवर अवलंबून आहे. शेतीचा व्यवसाय जसा मानवी सामर्थ्यावर अवलंबून आहे, त्यापेक्षा तो निसर्गावर अधिक अवलंबून आहे. महात्मा फुले, कृष्णराव भालेकर, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे इत्यादी विचारवंतांनी त्यांच्या साहित्यामधून शेतकऱ्यांच्या दरिद्री, कष्टमयी व दुःखकारक जीवनाविषयी आता पोटतिडकीने लिहिलेले आहे. अशा जगण्यामागची कारणे लक्षात घेतली तर असे लक्षात येते की, त्यांचा कर्जबाजारीपणा, त्यांचे अज्ञान, धर्मभोळेपण आणि त्यांचे विस्थापित असणे हीच

कारणे प्रामुख्याने आहेत. स्वातंत्र्यानंतरच्या काळात शेतकऱ्यांच्या या जीवनमानात फरक पडावा, ते सुधारावे, उंचवावे यासाठी शासकीय पातळीवर प्रयत्न सुरू झाले; परंतु हे प्रयत्न फारसे फलदायी झाले आहेत असे दिसत नाही. शिक्षण, सहकारी पतसंस्था, अनुदान, पाणी पुरवठ्याच्या जलसिंचनाच्या योजना, शासकीय पातळीवरून होणारा कीटकनाशके आणि रासायनिक खतांचा पुरवठा, प्रक्रिया संस्था किंवा कारखाने यांचा काही प्रमाणात का होईना शेतकऱ्याला नक्कीच फायदा झाला; पण छोटा शेतकरी किंवा अल्पभूधारक, कोरडवाहू, जमीनधारक, शेतमजूर यांच्या पदरात तो किती पडतो? असे बघितले तर फारशी समाधानकारक परिस्थिती नाही. शेती व्यवसाय अजूनही बेभरोशाचाचे राहत आहे. निसर्गाची अवकृपा, शेती-मालाच्या किंमती ठरवण्याबाबतचे शासनाचे निष्क्रीय धोरण, राज्यकर्ते आणि पुढारी यांचे राजकारण, व्यापाऱ्यांचे संघटन यामुळे आजही मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांचे शोषण होते असेच म्हणावे लागेल.

शेतकऱ्यांच्या शोषणाकडे, त्यांच्या अडचणींकडे मराठी साहित्यामधून फारसे लिहिले गेले नाही. शेतकऱ्यांच्या जीवनातील सूक्ष्म ताणतणावांचे वास्तव चित्रण झाल्याचेही दिसत नाही. 'असं जगणं तोलाचं' या पहिल्याच कादंबरीतून शेषराव मोहिते यांनी हरीबा व कासाबाई या शेतकरी दाम्पत्याच्या कुटुंबातील समस्यांचे चित्र रेखाटले आहे.

**बेकारी आणि हुंडा समस्या :**

सुशिक्षित बेरोजगारांची समस्या गणेश आवटे यांच्या 'चुकार', 'पाणसळ' मधून प्रभावीपणे आली आहे. त्यांच्या 'गणगोत', रा.रं. बोराडे यांच्या 'सावट' मधून हुंडा समस्या हाताळली आहे. समाजाच्या तळागाळातून आणि खेड्यापाड्यांतून शिक्षणाचा प्रसार झाला खरा; पण बेकारी वाढली. धड इकडचा ना तिकडचा अशी त्रिशंकूसारखी अवस्था ग्रामीण सुशिक्षित तरुणाची झाली. तारुण्यातील स्वप्नांना कुरवाळण्याऐवजी कठोर वास्तवाने त्याची होणारी कुतरओढ चिंतनीय आहे. ग्रामीण साहित्यसंदर्भात तोचतोपणाच्या आरोपापासून मुक्त असणारी गणेश आवटे यांची 'पाणसळ' ही कादंबरी महत्त्वाची आहे. (नवसाहित्य : नवे आकलन - डॉ. वासुदेव मुलाटे).

'पाणसळ' ही गणेश आवटे यांची तिसरी कादंबरी. 'चुकार' व 'गणगोत' या त्यांच्या दोन कादंबऱ्या यापूर्वी प्रकाशित झालेल्या आहेत. गणेश आवटे यांच्या साहित्यातून प्रकट होणारा अनुभवांचा प्रदेश हा प्रामुख्याने ग्रामीण आहे. ग्रामीण माणसाच्या जाणिवा प्रकट होतात. रंजनतंत्र आणि भूतकाळातून या पावशतकातील कादंबरी बाहेर पडली. प्रामुख्याने आजचे लेखक आत्मपीडेतून, आत्मभानातून लेखन करतात. ते स्वत:च त्या भयाण वास्तवाशी झुंजणाऱ्यांपैकी एक आहेत. त्याला लेखनाची परंपरा नाही. तरीही तो लिहितो याचे कारण

अस्वस्थ वर्तमान त्याला लिहिते करते. अशा लेखकांच्या पिढीचे प्रतिनिधित्व करणारे दमदार लेखक म्हणजे गणेश आवटे. त्यांच्या सर्व लेखनातून याचा प्रत्यय येतो. वर्तमान ग्रामीण जीवनातील ताणतणाव आणि स्थित्यंतरे त्यांच्या साहित्यामधून अत्यंत प्रत्ययकारी पद्धतीने चित्रित होत असलेली दिसतात. त्यांना वर्तमान ग्रामीण जीवनातील प्रश्न आणि समस्यांची चांगली जाण आहे. त्याचबरोबर ग्रामीण माणसाच्या मानसिकतेचीही उत्तम जाण आहे.

ग्रामीण भागात शिक्षणाचे प्रमाण वाढले; पण त्याप्रमाणे पदवीधरांना नोकऱ्या व्यवसाय उपलब्ध नाही. बेकारांची संख्या वाढतच गेली. अर्थातच खेड्यातील शिकून सुशिक्षित झालेल्या; परंतु बेकार असणाऱ्या तरुणांची स्थिती मोठी विचित्र झाली. खेड्यातील मुख्य व्यवसाय हा शेती, ती निसर्गावलंबी, जर शिकून नोकरी-व्यवसाय मिळत नसेल तर खेड्यात शेती किंवा शेतीशी निगडित अशी कामे श्रमाची असतात. त्यासाठी कामाचा सरावही असण्याची गरज असते. शिक्षणाच्या निमित्ताने या सुशिक्षित तरुणांना ही श्रमांची कामे करण्याची सवय उरलेली नसते. शिवाय गावाकडील मंडळींचाही समज असा असतो की शिक्षण घेतलेला मुलगा ही श्रमाची कामे आता करू शकणार नाही, किंवा शिकलेल्या या मुलाला ही कामे करायला कशी सांगायची? आणि हीच कामे करायची असतील तर शिक्षण कशाला घेतले? विनाकारण खर्च आणि आयुष्य वाया गेले. एकूण काय की हा तरुण इकडचा ना तिकडचा असा होतो.

गणेश आवटे यांना ग्रामीण जीवन, ग्रामीण समाज, संस्कृती आणि रितिरिवाज यांची उत्तम जाण आहेच; पण मराठवाड्यातील विशेषत: परभणी जिल्ह्यातील बोली चांगली अवगत आहे. हे या कादंबरीतील संवादांतून जाणवते. बोलीचा स्पर्श असलेल्या त्यांच्या निवेदनातही सहजता आहे. रचनातंत्राचा मोह सोडला तर 'पाणसळ' ही ग्रामीण साहित्यात भर घालणारी कादंबरी आहे.

'भाकरी आणि फूल'मधील मधू मंगेश कर्णिकांनी चित्रित केलेला संघर्ष हा संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापनेनंतर रौप्यमहोत्सवी वर्षाचे कार्यक्रम आयोजित केले गेले; परंतु सामान्य जनतेचे शोषण थांबले का? आपले प्रतिनिधी सत्तास्थानी जातात. जनतेच्या कल्याणासाठी कायदे केले जातील असा आशावाद सामान्य माणसाला वाटत होता. न्याय-समतेचे, स्वातंत्र्याचे राज्य प्रस्थापित होईल, हा भ्रमनिरासच ठरला. हक्कापासून सामान्य माणूस वंचित असल्याचे चित्र दिसते किंवा 'मेड इन इंडिया' (पुरुषोत्तम बोरकर) मधून 'चिल्लर माणसाले आणि चिल्लर गावायते किंमतच नाही' अशी खंत व्यक्त केली आहे.

स्वातंत्र्योत्तर काळात शिक्षण प्रचार-प्रसार झाला; पण गुणात्मकदृष्ट्या वाढ झाली का? विनाअनुदानित शिक्षणातून पदविका-पदवी अभ्यासक्रमांना मान्यता दिली गेली. त्यातून शिक्षणाचा धंदा सुरू झाला. आर्थिकदृष्ट्या समर्थ शिक्षणमहर्षी झाले. भालचंद्र नेमाडे यांनी 'कोसला', 'झूल', 'जरीला', 'बिढार'

या कादंबऱ्यांतून ग्रामीण नायक, ग्रामविभागातील उच्च शिक्षणाच्या दुर्दशेचे चित्रण केले. पुढे गणेश आवटे 'पाणसळ' किंवा शेषराव मोहिते 'असं जगणं तोलाचं' मधून नवशिक्षितांच्या समस्या चित्रित करतात.

ग्रामीण शिक्षण प्रचार-प्रसार आणि जनसंपर्क माध्यमांचा प्रभाव या संघर्षातून राजकीय-सामाजिक जागृती होऊ लागली. धनदांडग्यांचे हित आणि गरिबांकडे डोळेझाक अशी राजकारण्यांची नीती सत्तास्पर्धामुळे, सत्तेच्या विकेंद्रीकरणामुळे वाढीला लागली. लोकप्रतिनिधी किसानपुत्र असूनही धोरण मात्र किसानविरोधी असे दिसते.

गॅट करार, ग्लोबल व्हिलेजेस (वैश्विक खेडे) (उदारीकरण, खाजगीकरण, जागतिकीकरण) यांसारख्या अनेक धोरणांचा खेडे-शेती-शेतकरी यांच्यावर विपरित परिणाम झाला; परंतु यांचे चित्रण १९७५ नंतरच्या मराठी कादंबरीत समर्थपणे आलेले दिसत नाही. तरीही भांडवलदार, सरंजामदार, उच्चवर्णीय हे सत्तेसाठी एकत्र आले. सत्तेचे विकेंद्रीकरण, शेतमजूर, दलित आदिवासी स्त्रियांवरील वाढते अत्याचार, दहशतवाद, जातीय-धार्मिक दंगली, प्रतिगामी शक्तींचा उठाव, सरकारी नोकरांची अरेरावी, जंगलाचा कायदा, प्राण्यांना अभय आणि माणसांना भय, दुष्काळाचा प्रभाव यांचे चित्रण १९७५ नंतरच्या मराठी ग्रामीण कादंबरीत होऊ लागल्याचे दिसते. 'डांगाणी', 'झाडाझडती', 'सिलीपसेरा', 'झेलझपाट', 'हाकुमी', 'तंट्या' इत्यादी कादंबऱ्यांतून आदिवासी समाजाच्या शोषणाचे प्रभावी चित्रण झाल्याचे दिसते.

**राजकारण आणि सहकार :**

राजकारणाबरोबरच सामाजिक, सांस्कृतिक परिवर्तनाच्या चळवळी कार्यरत झाल्याचे चित्रही या काळात दिसते. दलित, ग्रामीण, स्त्रीवादी, जनवादी असे नववाङ्मयीन प्रवाह उदयाला आले. संमेलने, चर्चासत्रे होऊ लागली. नागर-ग्रामीण संघर्ष सुरू झाला. 'एक गाव एक पाणवठा', 'एक गाव एक मसणवटा' यांसारख्या चळवळी केवळ सत्तेतील आपले पुरागामित्व सिद्ध करण्यासाठी आल्या. रामचंद्र पठारे, 'पाचर'मधून धूर्त राजकारण्यांचे कुटील डाव आणि पुरोगामीत्व सिद्ध करण्यासाठी सवर्णांच्या स्मशानात दलितांचा केलेला अंत्यविधी हे सर्व ढोंग आहे. तसेच डॉ. नागनाथ कोत्तापल्ले यांच्या 'गांधारीचे डोळे', 'उलट चालिला प्रवाह', किंवा 'चारापाणी', 'आमदार सौभाग्यवती', 'हल्या हल्या दुदू दे' इत्यादींमधून राजकीय संघर्षाचे चित्रण प्रभावीपणे केले आहे. त्याचप्रमाणे देवदासी, जोगतिणी, जोगते या उपेक्षितांचे जीवनदर्शन घडविणाऱ्या उत्तम बंडू तुपे यांच्या 'झुलवा' आणि राजन गवस यांच्या 'भंडारभोग', 'चौंडक' इत्यादी कादंबऱ्या महत्त्वपूर्ण आहेत.

सहकाराचा मूळ उद्देश बाजूला जाऊन निर्माण झालेले नवे प्रश्न - (संघर्ष) बा. गं. केसकर (कुणाच्या खांद्यावर), वासुदेव मुलाटे (विषवृक्षाच्या मुळ्या),

यांच्या कादंबऱ्यांतून चित्रण झाले आहे. 'दु:खाचे श्वापद' ही रंगनाथ पठारे यांची कादंबरी शिक्षण क्षेत्रातील प्रदुषणाचे चित्रण करते. 'एक होतं जगणं'मधून मंगेश उदगीरकर यांनी बंडू फुलगीकर हा मध्यमवर्गीय तरुण उभा केला आहे. लातूरसारख्या शहरातील बेकार, भाऊ-भाऊजाईचे खोचक बोलणे, आई-वडलांचे दुबळेपण यामुळे कोंडमारा होऊन जगण्यासाठी मुंबईला जातो. पोटासाठी धडपडतो, झोपडपट्टीत आधार शोधतो. 'माहिमची खाडी' या मालिकेतली नसली तरी मध्यमवर्गीय कुटुंबातील तरुणांचीच कादंबरी आहे. या कादंबरीचा समावेश ग्रामीण कादंबरीत करता येईल की मनोहर तल्हारांच्या 'माणूस'प्रमाणे वेगळीच नोंद घ्यावी लागेल ते ठरवायला हवे. 'घरदार' ही मधू साबणे यांची कादंबरी. प्रतिकूल आर्थिक परिस्थितीत लहान-लहान-नोकऱ्या करून शिक्षण घेणाऱ्यां बापूची ही कथा आहे. पुढे घर चालवण्यासाठी तो घर सोडतो. 'रेश्मा' ही डॉ. तानाजीराव चोरगे यांची कादंबरी ग्रामीण जीवनातील पार्श्वभूमी आणि वास्तवतेचा स्पर्श असलेली सामान्य कादंबरी आहे. 'गाव पांढरं' ही अप्पासाहेब खोत यांची कादंबरी राजकारणाने खेड्यातील प्रत्येक घराला कीड लावली हे असे सूत्र घेऊन साकारली आहे. सत्तास्पर्धेतून आलेला संघर्ष, सुशिक्षित बेकारांचे गैरवर्तन, ढोंगी राजकारणी, पार्ट्या-पार्ट्यांमधील राजकारण, त्यात सामान्य जनतेची होणारी ससेहोलपट हा या कादंबरीचा विषय आहे. सामाजिक परिवर्तनाचा ध्यास घेतलेले सद्वर्तनी प्रा. बाळासाहेब, त्यांचे सहकारी शिंदे आणि इतर खलप्रवृत्तीचा शंकर आणि मफलरवाले पाटील यांच्यातील संघर्ष अप्पासाहेब खोतांनी चित्रित केला आहे. ग्रामसुधारणा आणि शिक्षणप्रसार ही काळाची गरज आहे, याकडे लक्ष वेधले आहे. बदलत्या ग्रामीण संस्कृतीचा, समाजाचा होणारा ऱ्हास, नव्याने उदयाला येणारी पिढी, सहकारातून होणारी गुंतागुंत, राजकारणातील स्वार्थी वृत्ती यावर प्रकाशझोत टाकला आहे. 'गावपांढरीच्या वाटेवर' ही त्यांची अलीकडची कादंबरी वैशिष्ट्यपूर्णच आहे. 'व्हायरस' ही कादंबरी समाजातील राजकीय आणि सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांच्या ऱ्हास पावणाऱ्या जीवनाचा आंतरिक वेध घेऊन, त्यांच्या दैनंदिन जगण्यातून माणसाच्या आदिम अशा पाशवी प्रेरणांचे स्रोत शोधण्याचा प्रयत्न करते. 'कोंडणातलं जिणं' मधून नागनाथ पाटील यांनी विनाअनुदानित महाविद्यालयातील विविध प्रश्नांकडे दृष्टिक्षेप टाकला आहे. 'भूमिपूजन'मधून मनसाराम पाटील खेड्यातल्या माणसांच्या वृत्ति-प्रवृत्तींचे चित्रण करतात. खेड्याच्या विकासाचा प्रश्न सुष्ट-दुष्ट संघर्षाच्या पार्श्वभूमीवर त्यांनी रेखाटला आहे. 'भोग'मधून पांडुरंग जाधव यांनी ग्रामीण भागातील व्यथित करणारे जीवन नाट्यपूर्ण रेखाटले आहे. 'गावगुंड', 'ठिणगी' यानंतरची ग.ल.ठोकळ यांची 'टेंभा' ही ग्रामीण जीवन चित्रण करणारी कादंबरी फडके रचनातंत्राच्या आहारी गेली आहे. 'गोबड'मधून दिलीप भावसार

बेकारीची समस्या समर्थपणे मांडतात. शिक्षणामुळे गावाला, परंपरेला पारखा झालेला शिवराम खानदेशाच्या पार्श्वभूमीवर त्यांनी रेखाटला आहे.

**नव्या पिढीची ग्रामीण कादंबरी :**

१९७५ च्या सुमारास सामाजिक अपरिहार्येतून ग्रामीण साहित्य चळवळ सुरू झाली. शिक्षण प्रसार-प्रचारामुळे बहुजन समाजातील तरुणांनाही आपल्या भावनांना शब्दरूपे देण्याविषयी आत्मविश्वास वाटला. त्यांच्या संवेदनाक्षम मनाला उच्चवर्गाची मक्तेदारी, शोषण, समस्या यामुळे नवे आत्मभान आले. समतावादी मूल्यांच्या प्रेरणेतून ग्रामीण समाजाची सुखदु:खे व्यक्त झाली पाहिजेत या जाणिवेतून आनंद यादव, रा.रं.बोराडे, नागनाथ कोत्तापल्ले, चंद्रकुमार नलगे, द.ता.भोसले यांनी ग्रामीण साहित्य चळवळीला वैचारिक पाठबळ दिले. गाव, तालुका-राज्यपातळीवरील सम्मेलने, चर्चासत्रांतून ग्रामीण साहित्य चळवळीची भूमिका विशद केली जाऊ लागली. शोषणमुक्तीच्या प्रेरणेतून लेखनाला प्रारंभ झाला. या जाणीवजागृतीचा ग्रामीण साहित्य निर्मितीवर प्रभाव पडला आणि डॉ. आनंद पाटील यांच्यासारखे नव्या दमाचे लेखक लिहू लागले. डॉ. आनंद पाटलांनी 'कागूद आणि सावली', १९८६ मधून खेड्यातील निरक्षरांचे कशाप्रकारे विविधांगी शोषण होते, ते समर्थपणे शब्दबद्ध केले. जमिनीचे खरेदीखत करताना शेतकऱ्यांना किती अनंत अडचणींना तोंड द्यावे लागते याचे वास्तव चित्र 'कागूद'मध्ये आले आहे. घटना साधीच परंतु ग्रामीण माणसाचे व त्याच्या जीवनाचे अस्सल दर्शन घडवून जाते.

वडलांच्या काळापासून गहाणवट पडलेल्या किसन बनसोडेच्या जमिनीच्या निमित्ताने पाडंबा (आबा) जाधवांच्या घरात समस्या निर्माण होते. किसनचा वंश बुडतो. परंतु त्याच्या मुली आणि भाऊबंद शेतावर हक्क सांगू लागतात. त्यांची समजूत घालून जमीन खरेदी करावी असा विचार आबा करतो. खरेदीखतासाठी मदत व्हावी म्हणून शहरात शिकणाऱ्या मुलाला- बाबूला बोलावून घेतो. आबा जमीन खरेदी करणार म्हणून भाऊबंदांचे द्वेष-मत्सर उफाळून येतात. मध्यस्थ पैसे खातात, आर्थिक समस्येमुळे मुलाच्या नावावर कर्ज काढावे लागते. सरकारी कर्मचारी, तलाठी यांच्याबरोबर त्याची म्हणवणारी सेक्रेटरीसारखी माणसेही आबाला लुबाडायला टपली आहेत. खरेदीखत व्यवस्थित झाले पाहिजे म्हणून तो सारे काही मुकाट्याने सहन करतो. कॉलेजात शिकणाऱ्या बाबूला ही बेरकी माणसे सहज फसवून जातात. शहरात कॉलजमध्ये शिकणाऱ्या बाबूने 'कागूद'ची कथा सांगितली आहे. जीवनानुभवाकडे पाहण्याचा त्याचा दृष्टिकोण कोणत्याही प्रकारे संस्कारित झालेला नाही. जीवनानुभव आहे, तसा तो मांडतो. आशयानुरूप, सुसंगत अशी प्रमाण आणि ग्रामीण यांना सहज सामावून घेणारी भाषा तो वापरतो. 'सावली'मधील जीवनानुभवही अस्सल ग्रामीण आहे. घर बांधून घेण्याच्या व्यापात खेड्यातील एका गरीब कुटुंबाचे प्राण कसे कंठाशी येतात, याचे चित्रण या

कादंबरीत आले आहे. भाऊबंद, पंचायत, तलाठी, फॉरेस्टर तिढे निर्माण करतात. सावकाराचे तगादे, दागिने, गहाण पडलेले म्हणून शेत विकण्याची वेळ धोंडीबावर येते. मानवी मनोवृत्तीचे आणि स्वभावांचे त्याने केलेले चित्रण मार्मिक आहे.

बाबाराव मुसळे यांची 'हाल्या हाल्या दुदू दे' ही १९८५ मध्ये प्रसिद्ध झालेली तिसऱ्या पिढीची ग्रामीण कादंबरी पुरस्कारप्राप्त आहे. 'धग', 'पाचोळा', 'गोतावळा' प्रमाणे हीदेखील वळणावरची कादंबरी आहे. डॉ. मधुकर वाकोडे यांनी कादंबरीचा नायक न्यानबाची तुलना डॉन क्विझोटशी केली आहे. ही कादंबरी न्यानबा-आनसाच्या संसाराची शोकांतिका आहे. नऊ दहा एकर जमिनीचा मालक न्यानबा, त्याची बायको आनसा, मुलगी सोबा आणि मुलगा पर्कास असे हे छोटे सुखी कुटुंब आहे. परंतु अंथरूण पाहून पाय न पसरल्यामुळे त्यांच्या आयुष्यात संकटांची मालिकाच सुरू होते. मुलीच्या लग्नासाठी सावकाराचे कर्ज काढतो, शेतात एच.-४ कापूस लागवड करतो. सोसायटीचे कर्ज घेतो, गावातील गटबाजी, कारकून, तलाठी आणि ग्रामसेवक कर्जप्रकरण अडवितात. दुष्काळ, सोबावर सासऱ्याकडून अतिप्रसंग, न्यानबाला कॅन्सर होतो. जावई मनोरुग्ण अशी आसमानी सुलतानी संकटे येतात, त्यात त्याचा मृत्यू होतो.

नागनाथ कोत्तापल्ले यांच्या 'उलट चालिला प्रवाहो' आणि 'गांधारीचे डोळे' या दोन महत्त्वाच्या ग्रामीण कादंबऱ्या आहेत. दलित वस्ती जळीत प्रकरणाची माहिती मिळविण्यासाठी आणि त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी एका गावात गेलेल्या नारायण कोल्ल्ळीला आजही वर्णव्यवस्थेची गढी तशीच आहे हा कोलमडून टाकणारा अनुभव येतो. स्वातंत्र्यासाठी जिवाची बाजी लावणारी सदाशिवरावांची पिढी अजून तिची जागा आता पांडोबासारख्या सुखवादी पिढीने घेतली आहे. ग्रामीण नेतृत्वही मानेसारख्या राजकीय स्वार्थ साधू पाहणाऱ्या संधिसाधू आणि स्ट्रगल फंडाच्या नावाखाली स्वतःची तुंबडी भरू पाहणाऱ्या शिराढोणकरसारख्या प्रसिद्धिलोलूप माणसांनी बळकावले आहे. त्यात मूळ प्रश्न बाजूला राहून नारायणसारख्या तळमळीच्या कार्यकर्त्यांची ओढाताण होते. ज्यांच्यासाठी तो तळमळतो तेच त्याच्यावर विश्वास ठेविनासे होतात. त्यांच्या समाजकार्यातही त्याची जात आडवी येते. परिवर्तनवादी विचारांची कास धरणाऱ्या नारायणची मानसिक घुसमट होते. कोण पुरोगामी? कोण प्रतिगामी? कोण प्रामाणिक? कोण ढोंगी? कोण खरा? कोण खोटा? कोण गुन्हेगार? कोण निर्दोष अशा अनेक प्रश्नांचे ओझे उरावर घेऊन नारायण गावाबाहेर पडतो. गावाने हाकलून दिल्यावर सकाळ होण्याची वाट पाहत माळावर बसलेल्या नारायणच्याभोवती काळोखाच्या हसण्याचे ध्वनी पुन्हा-पुन्हा प्रतिध्वनित होत राहतात?

'गांधारीचे डोळे'मध्ये डॉ. नागनाथ कोत्तापल्ले यांनी राजकारणाचे हिडीस रूप व त्यातील सामाजिक जाणिवांचे बेगडीपण उघडकीस आणले आहे.

वासुदेव मुलाटे यांनी 'विषवृक्षाच्या मुळ्या'मधून ग्रामीण भागातील सहकारक्षेत्र हे स्वाहाकार क्षेत्र कसे बनले आहे याचे वास्तव चित्रण केले आहे. रामचंद्र पठारे यांच्या 'पाचर'मधून राजकारण्यांचे बेगडी पुरोगामित्वाचे वर्णन येते, तर अरुण साधूंच्या 'शापित'मधून दुष्काळामुळे वाताहत झालेल्या शेतकरी कुटुंबाची कथा आकार घेते. शिक्षणासाठी धडपडणाऱ्या परंतु परिस्थितीमुळे हताश झालेल्या वसंता या ग्रामीण नवतरुणाच्या जीवनसंघर्षाची कथा बा.ग.केसकरांच्या 'वायटूळ' मध्ये येते. तर ऊसतोडणी मजुरांची समस्या आणि राजकारण्यांची स्वार्थी वृत्ती ते 'कुणाच्या खांद्यावर'मधून समर्थपणे मांडतात.

**वैशिष्ट्यपूर्ण ग्रामीण कादंबरी :**

आज कादंबरीत विशेष नोंद घ्यावी अशा कादंबऱ्या राजन खान, डॉ. तानाजी पाटील, भारत काळे, राजन गवस, बाबा भांड, पांडुरंग कुंभार, शं.रा.पेंडसे, व.न.इंगळे, बाबू बिरादार आणि रा.रं. बोराडे यांनी लिहिल्या आहेत. राजन गवस यांनी 'सत ना गत' या कादंबरीमधून उपेक्षित घिसाडी समाजाची व्यथा शब्दबद्ध केली आहे. दामू घिसाड्याची बलात्कारित पत्नी नामी, तिचा व्यभिचार, आजची पीत पत्रकारिता, स्वार्थ, बेडरपणा यांतून सामाजिक वास्तवाचा खेळ उभा करतात. स्वार्थ आणि हितसंबंध राखणाऱ्या खेड्यात सारेजण आपआपल्या कुवतीनुसार खेळत असताना एखाद्याच्या सुख-दु:खाला कवडीइतकेही मोल उरत नाही. याचा प्रत्यय देऊन आपल्याला अस्वस्थ करतात. अंतर्मुख होण्याला प्रवृत्त करतात. एका घटनेचे धागे-दोरे उभे करताकरता खूप मोठा पट आपल्यासमोर साकार करणारी व समकालीन वास्तवाचे अतिशय भेदक चित्रण करणारी ही आजची एक महत्त्वाची कादंबरी आहे. तानाजी पाटील यांची 'रूप सावली' ही कादंबरी स्त्रीच्या शोषणाचा अस्सल ग्रामीण नमुना आहे. सदूची बायको लक्ष्मी आणि त्याची थोरली मुलगी सुशीला कोल्हापूर जिल्ह्यातल्या भूदरगडाजवळच्या सोनवली गावात शेती करणारे हे कुटुंब. आडनाव शिंदे. डोंगर उतारावरची जमीन, अफाट पाऊस आणि त्याहूनही अफाट असे कष्ट. गोठ्यात बैलजोडी, घरात दोन वेळचे जेवण आणि अंगावर धडसा कपडा हे सुखाचे स्वप्न, कोणत्याही नाट्यमयतेच्या मोहात न पडता डॉ. तानाजी पाटील यांनी या कुटुंबाचे, त्यांच्या दारिद्र्याचे आणि त्यातील भाऊबंदकीचे एक वास्तव चित्र या कादंबरीतून आपल्यासमोर उभे केले आहे. एकविसाव्या शतकात प्रवेश करणाऱ्या संगणक आणि अणुऊर्जेच्या क्षेत्रात भरारी मारू पाहणाऱ्या भारताचे दुसरे चित्र म्हणजे सोनवली गावचे हे शेतकरी कुटुंब. या कुटुंबाला, विशेषत: त्यातील स्त्रिया दास्यामध्ये जखडून ठेवणाऱ्या शृंखला केवळ पुरुषप्रधान संस्कृतीच्या नाहीत तर आर्थिक दुरावस्थेच्याही आहेत याची जाणीव आपल्याला ही कादंबरी वाचत असताना वारंवार होत राहते. 'माजवं रूप सावली व्हऊन हुभ - हायल्यासरकं दिसतंय', आपल्या मुलीकडे

पाहताना लक्ष्मीला झालेली ही जाणीव ग्रामीण स्त्रीच्या जीवनामध्ये न घडलेल्या स्थित्यंतरांबद्दल बरेच काही सांगून जाते. म.द. हातकणंगलेकरांनी कादंबरीला सत्तावीस पानांची प्रदीर्घ प्रस्तावना लिहिली आहे.

'ऐसे कुणबी भूपाळ' ही भारत काळे यांची निजामी राजवटीच्या पार्श्वभूमीवरील कादंबरी आहे. सत्तेच्या झुलीमुळे परंपरेचा विसर पडला. अहंकार वाढला. मान-सन्मानाची अपेक्षा वाढली, इतरांनी आपले कौतुक करावे असे वाटू लागले. भोगवादी-चंगळवादी वृत्ती वाढीला लागली. दारिद्र्य, वांझोटी स्पर्धा, नात्यातील तेढ, व्यभिचार, वासनांधता इत्यादींचे चित्रण करणारी कादंबरी आहे.

मराठवाडा हा निजामाच्या राज्यात असलेला प्रदेश. सुधारकी वारे येथे स्वातंत्र्यानंतरच पोचले; त्यामुळे आजही येथील मनोवृत्ती निजामशाहीच्या वळणाची. जमीनदारीच्या शिल्लक खाणाखुणा येथे रेंगाळत आहेत. जुन्या-नव्याच्या मिश्रणाने येथील समाजजीवन विचित्र बनलेले. या अवस्थेत हा समाज त्यातही प्रामुख्याने ग्रामीण समाजजीवन जगत आहे. या परिस्थितीचा मोठा फटका बसला तो एकेकाळी जमीनदारसदृश्य जीवन जगलेल्या, भरपूर शेती असलेल्या कुटुंबांना. त्यातून कुटुंबे विभक्त होऊ लागली. गाव भकास होऊ लागले.

पूर्वीचे स्वयंपूर्ण खेडे ही संकल्पना मोडीत निघाली. मागच्या वीस-पंचवीस वर्षांत शेतीच्या उत्पादनावरील खर्च हळूहळू वाढू लागला; परंतु उत्पन्न मात्र त्या प्रमाणात नव्हते. त्यामुळे शेतकऱ्यांची स्थिती हलाखीची बनू लागली. वर दिसायला उत्पन्न भरपूर होऊ लागले; परंतु खर्चाचा हिशेब बराच असल्याने हातातला बराचसा पैसा त्यातच जाऊ लागला. याचाच परिणाम घरातल्या माणसांत मालकाविषयीच्या अविश्वासात होऊ लागला. आपला मालक पैसे विनाकारण खर्च करतोय, अशी कुटुंबाची भावना बळावत गेली नि घराघरात संघर्ष पेटत गेला. पाश तोडले जात. जगण्यासमोर नाते कमकुवत ठरले आहे. या सगळ्या दु:खाचे मूळ शेतीत आहे. तरीही ती समज नसल्याने अशा टोकाच्या क्षणी त्याच्या सगळ्या पाशवी प्रवृत्ती जागोजाग प्रकट झाल्या आहेत. मालकीची आदिम प्रेरणा त्यातूनच प्रकट होते. म्हणून हा त्या मालकीच्या संघर्षाच्या मूळ गाभ्याचा वेध आहे.

'चौडकं'मधून राजन गवस यांनी जोगतिणींचे संघर्षमय जीवन चित्रण केले आहे. तरी 'भंडारभोग'मधून जोगत्याची व्यथा चित्रित केली आहे; परंतु पुढे पद्मश्री विखे पाटील पुरस्कारप्राप्त राजन गवस यांची 'कळप' ही एका तरुणाने केलेली आपल्या सामाजिक व सांस्कृतिक व्यवस्थेची तपासणी आहे. वाङ्मयीन चळवळी व व्यवहार, तसेच सामाजिक चळवळी यातील विविध अंत:सूत्रांचे सूक्ष्मातिसूक्ष्म पदर निर्लेप तटस्थतेने उलगडून त्यात एका संवेदनाक्षम तरुणाची होणारी तडफड,

त्याच्या पिढीच्या वाट्याला येणारी विमनस्कता व अखेरीस त्याचे निब्बर समजदार होणे या कादंबरीत अत्यंत प्रभावीपणे व्यक्त झाले आहे. हा 'कळप' उभा करताना त्यातील व्यक्ती व प्रवृत्तीचे राजन गवस यांनी केलेले टोकदार चित्रण अत्यंत अस्सल उतरलेले आहे. त्यातून एका पिढीची, तिच्या समकालीन व्यवस्थेसंबंधीची प्रतिक्रिया अतिशय सामर्थ्याने उभी राहिलेली आहे.

साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळालेली 'तणकट' ही राजन गवस यांची १९९८ मध्ये प्रकाशित झालेली कादंबरी. गेल्या दोन-तीन दशकांत समाजकारणातील आणि राजकारणातील दिशाहीनता आणि मूल्यभ्रष्टता यांचा विदारक दस्तावेज असे राजन गवस यांच्या 'तणकट' या कादंबरीचे यथार्थ वर्णन करता येईल.

विविध जातींतील नवशिक्षित तरुणांना हतबल करून टाकणारे समकालीन वास्तव गवस यांनी प्रवाहीपणे मांडले आहे. ज्वलंत समस्या, आदर्शांचे विडंबन, मूल्यांचा ऱ्हास आणि चळवळीच्या विपरीत फोफवणाऱ्या जाणवणारी उपक्रमशीलतेची निरर्थकता यांचे सावट मानवी संबंधातील मौलिकता कशी ग्रासून टाकते याचे शोकात्म प्रत्यंतर म्हणजे 'तणकट'. निखळ स्वार्थाच्या एकलक्षी पूर्तीसाठी लागणारी अविचारी आक्रमकता आणि मूल्यविवेकाच्या जोपासणीतून जन्मणारी असहायता यातील चिरंतन द्वंद्व बाळासाहेब शेडबाळे आणि कबीर या व्यक्तिरेखा जिवंतपणे साकारतात. कागदी प्रसिद्धीच्या आधुनिक तंत्रातून निर्माण झालेल्या बेगडी नेतृत्वाची निरंकुश सत्तालोलुपता गवस यांनी दाहकपणे चित्रित केली आहे. व्यापक उलाढालींचा व्यक्ति-व्यक्तीच्या संबंधांवर होणारा गुंतागुंतीचा प्रभाव अत्यंत सूक्ष्मतेने या कादंबरीत येतो. हे 'तणकट' या कादंबरीचे यश आहे. वर्तमानाची जटीलता अधिकृत इतिहासात हरवून जाते. या तत्त्वाची प्रचिती कादंबरी आणि इतिहास-लेखन यात तफावत करण्यासाठी उपयुक्त ठरते.

'दशक्रिया' ही बाबा भांड यांची १९९५ मध्ये प्रसिद्ध झालेली सात पुरस्कार मिळालेली कादंबरी. चंद्रकांत पाटील लिहितात, "'दशक्रिया' ही भानुदास नावाच्या एका शाळकरी मुलाच्या आयुष्याची कहाणी आहे. बुद्धिचातुर्य व साहसपणाला लावून पोटाची खळगी भरू पाहणाऱ्या, दारिद्र्याने ढासळून गेलेल्या आपल्या कुटुंबाला आधार देण्याचे स्वप्न पाहणाऱ्या भानुदासची ही कहाणी हळूहळू विस्तारत जाते आणि रोगट रूढींमुळे धर्माला आलेली अवकळा, विदारक जातिव्यवस्था, अर्थार्जनाचे एकाच वेळी संतापजनक आणि करुणाजनक वाटणारे पर्याय, पार कोलमडलेली कुटुंबव्यवस्था, उच्च-नीच अशा अनेक वर्णांना, वर्गांना पोटासाठी एकाच पातळीवर आणणारी विचित्र समाजस्थिती, आधुनिकीकरणाकडे पाठ फिरवणारे समूह, मानवी नात्यांचे पैशांमुळे पटापट बदलत जाणारे रंग, मृत्यू आणि धर्माबाबतचे चिंतन, सोनेरी इतिहासाचे सडलेले कोते, अंगार ओढून सुस्त पडलेली नगरी इत्यादी असंख्य गोष्टींना कवेत घेऊन

सद्य:स्थिती क्लेशदायक बनते. तटस्थ-वास्तवदर्शी शैलीमुळे, खोट्या काव्यात्मेला जाणीवपूर्वक दूर ठेवण्यामुळे, सहज-ओघवत्या, अचूक बोलभाषेमुळे अस्सल मराठी व मितव्ययी शब्दकलेमुळे, चित्रसदृश वर्णनांमुळे आशयाशी अंगभूत झालेल्या चिंतनामुळे आणि जगण्यातून आलेल्या निश्चित वैचारिक भूमिकेमुळे बाबा भांड यांची ही कादंबरी आपल्या समकालीन साहित्यापेक्षा वेगळी व वैशिष्ट्यपूर्ण झाली आहे. वास्तववादी कादंबरी म्हणून या कादंबरीची नोंद घेण्यासारखी आहे.

'वेगळ्या वाटा' ही पांडुरंग कुंभार यांची कादंबरी शहरी संस्कृतीने ग्रामसंस्कृतीला दिपवून टाकले. भ्रष्टाचार वाढला. माणुसकी मेली. ग्राम-संस्कृतीने जीवमोलाने जपलेली नीतिमूल्ये वेगळ्या वाटांच्या आक्रमणाने उद्‌ध्वस्त झाली, याचे वास्तव चित्र पांडुरंग कुंभारांनी रेखाटले आहे. 'काळोखाच्या छायेत' शं. रा. पेंडसे यांची एकमेव कोकणी कादंबरी. 'कुळकायदा', भाऊबंदकी यामुळे झालेल्या जमीनदार कुटुंबाची वाताहत असे या कादंबरीचे वर्णन करता येईल. प्रस्तुत कादंबरीत पेंडसेंनी श्रीवर्धन संस्थानातील जमीनदार शंकरअण्णा दामल्यांच्या परिवारातील घटना-प्रसंगांच्या आधारे कोकणी जीवन चित्रण केले आहे. कोकणातील श्रीवर्धन येथील दामले घराण्याचे स्वातंत्र्यपूर्वीच्या वैभवाचे चित्रण, त्यांचा गावातील दबदबा, शंकरअण्णांच्या मृत्यूनंतर त्यांची दोन मुले नारायण व नरहरी यांच्यातील वाद व नंतर वाटणी. कालांतराने दामले घराण्याचे वैभव नष्ट होणे. अर्थात कोकणातील ग्रामीण जीवनाचे चित्रण दामले घराण्याच्या माध्यमातून प्रस्तुत कादंबरीत पेंडसेंनी रेखाटले आहे. 'दरिद्री नारायण' व न. इंगळे यांची ही कादंबरी, साने गुरुजींनी जशी श्यामच्या आईची मंगलगाथा सांगितली तशी सुखदेवच्या बापाची कथा 'दरिद्री नारायण'मध्ये व.न.इंगळे यांनी सांगितली आहे. या कादंबरीचा नायक म्हणजे दाजी ! दाजीच्या व्यक्तिमत्त्वाने वाचक झपाटला जातो. ग्रामीण जीवन, तेथील संस्कृतीची खोलवर रुतलेली नात्यागोत्याची पाळेमुळे आणि जगताना होणारी ससेहोलपट, सूक्ष्मपणे लेखक उलगडीत जातो. आज दिवसेंदिवस बकाल होत चाललेल्या ग्रामीण जीवनाचा ठसठशीत पोत 'दरिद्री नारायण'मध्ये दिसतो आहे. 'अग्निकाष्ठ' बाबू बिरादार यांची १९९५ मध्ये लिहिलेली कादंबरी आयुष्याच्या वाटेवर सुखापेक्षा दु:ख मोठे, नशिबाला दोष देऊनही उपयोग काय? जीवनमूल्ये, श्रद्धा, वासना, स्वार्थ इत्यादींचा दु:खात मोठा वाटा, अंतर्मुख करणारी, विचारांच्या वेगळ्या दिशा दाखविणारी ही कादंबरी आहे. 'सर्जा' सुरेश शिंदे यांची मुक्या जितराबाची कथा वैशिष्ट्यपूर्ण आहे. 'गाव ढासळत आहे' - प्रशांत पोखरकर, 'पांगुळवाडा' - किशोर सानप, 'पागोरा' - रमेश अंधारे, 'तहान' - सदानंद देशमुख यांची नोंद घ्यावी लागेल.

**वेगळी विषय हाताळणी :**

१. शरद जोशींच्या शेतकरी संघटनेच्या यशाचे चित्र शेषराव मोहिते 'असं जगणं तोलाचं', रा.रं. बोराडे–'चारापाणी' यांच्या कांदबरीतून येते. २. लोकरंजनाचे कार्य करणाऱ्यांची ससेहोलपट 'नटरंग' (आनंद यादव) – 'घुंगरू' (शंकर खंडू पाटील) 'डाळिबांचे दाणे' (अण्णा भाऊ साठे) ३. आत्मचरित्रात्मक ग्रामीण कादंबरी – आनंद यादव – 'झोंबी', 'नांगरणी', 'घरभिंती', 'काचवेल' इत्यादी. ४. रा.रं. बोराडे यांच्या 'इथं होतं एक गाव' एक गाव कादंबरीत ३० सप्टेंबर १९९३ रोजी किल्लारी व किल्लारीच्या आसपासच्या परिसरात झालेल्या भूकंपाने केवळ भारतीय मनालाच नव्हे, तर जागतिक मनाला हादरा दिलेला आहे. या दृष्टीने या भूकंपाला ऐतिहासिक महत्त्व आहे याचे यथार्थ चित्रण आले आहे.

जनसामान्यांच्या जगण्याचा इतिहास सहसा लिहिला जात नाही. क्वचित प्रसंगी तो लिहिला गेला तरी तो वास्तव असतोच असे नाही. मात्र तत्कालीन लेखकाने कलात्मकतेचा अतिरिक्त सोस न बाळगता जनसामान्यांच्या जगण्याचे आपल्या साहित्यातून चित्रण केले तर त्या साहित्याला अस्सल ऐतिहासिक संदर्भ लाभण्याची शक्यता वाढते. हीच भूमिका स्वीकारून मी 'इथं होतं एक गाव' ही भूकंपग्रस्तांच्या जीवनावर कादंबरी लिहिली आहे.' असे मनोगतात लेखकाने म्हटले आहे. फ. मुं. शिंदे लिहितात, 'सृष्टीचं मन बदललं', सृष्टीची नियत बदलली की क्षणार्धात प्रकोप होऊन होत्याचे नव्हते होऊन जाते. सर्व रचना जमीनदोस्त होतात. विश्वाला आकार देऊ इच्छिणारा मानवी आत्मा स्वत:च निराकार परमात्म्यासारखा निराधार बनतो. सृष्टीने ईश्वराला सतत पराभूत केलेले आहे. मराठवाड्यातल्या प्रलयकारी भूकंपाने गणेश विसर्जनाची रात्र साधून 'उष:काल होता काळरात्र झाली' हे विघ्नहर्त्याला दाखवून दिले.

मरणाच्या अनंत वाटा असतात. मोबदल्याने त्या बुजत नसतात. मोबदला माणसातल्या माणुसकीला मारून टाकतो. नाळेच्याही नात्याला नगण्य लेखतो, जिवलगाच्याच जिवावर उठतो, आत्मीय अनुबंधांना आग लावतो. संकटातच माणसे समजतात! माणसाला 'सोशल ॲनिमल' आणि प्राण्यांतचे 'ब्युटीफुल पीपल' समजून घेणे हीच सर्जनशीलतेच्या सामर्थ्याची खूण असते. 'इथं होतं एक गाव' हे लेखन, सृष्टीलाही लाजवणाऱ्या अशा मानवी मनातल्या अनेक भूकंपांच्या हादऱ्यांनी मानसिकता मांडणारी द्वैतपत्रिका आहे. गुरुवर्य रा.रं. बोराडे यांची 'पाचोळा' ही कादंबरी काय किंवा 'चारापाणी' ही कादंबरी काय, इतिहासातील ते अजरामर लेखन आहे. माणूस आणि माणसाचे मन समजून घेणे हेही सर्जनाचे सूत्र असते. भाग न जाणाऱ्या संख्येचे वर्गमूळ काढू पाहणाऱ्या माणसाचे मन फार अगणित असते. प्रस्तुत कादंबरी जगण्यातील गणित जाणून घेणारी, देणारी कृती आहे. जेथे होणे आहे तेथे नाहीसे होणे आहे हे खरे असले, पटत असले तरी संकटातले संघर्ष संपत नसतात. मानसिक संघर्ष, देणारी कृती

आहे. मानसिक संघर्ष, आंदोलन ही चिरंतन धारा हेच या लेखनाचे वेगळेपण आहे. 'धरती'मधून बरजंग शेलार यांनी कोयना भूकंपामुळे निर्माण झालेली समस्या मांडली आहे.

**स्त्री लेखिकेची ग्रामीण कादंबरी :**

डॉ. प्रतिमा इंगोले यांनी आपल्या कथालेखनाने रसिकांचे लक्ष वेधून घेतले. 'हजारी बेलपान', 'आकसिदीचे दाने', 'सुगरनचा खोपा', 'जावयाचे पोर', 'लेक भुईची', 'अंधारपर्व' हे त्यांचे कथासंग्रह प्रसिद्ध झाले आहेत. त्यांनी लिहिलेली एकमेव कादंबरी 'बुढाई' खास वैदर्भी म्हणी, शब्दांच्या लकबींसह अवतरली आहे. वैदर्भी भाषेच्या जिवंतपणामुळे ही कादंबरी वाचकांच्या नजरेत भरते. महाराष्ट्र शासनाचा पुरस्कार यावर्षी तिला मिळाला.

छोट्या खेड्यात कष्टाची कामे करणारी, म्हाताऱ्या नवऱ्याचा संसार आनंदाने करणारी, एकामागून एक मुलांच्या मृत्यूने कासावीस झालेली, मुलगा 'गुलब्या' घर सोडून गेल्याचे दु:ख लपवत, धाकटी मुलगी 'सत्यवतीला' शिकवू पाहणारी, 'कोकर्णा'ची व्यक्तिरेखा ठसठशीत रेखाटली आहे. नवऱ्याचा रोजगार बंद झाल्याने गावातील शाळामास्तरच्या आग्रहाखातर शहरातल्या 'नवजीवन नगर' मधील नवीन बांधकामावर वॉचमन म्हणून जातात. गावापासून तुटल्याचे दु:ख सहन करण्याशिवाय गत्यंतर नसलेली 'गोकर्णा', अगतिकता प्रतिमा इंगोले यांनी चित्रस्पर्शी रेखाटली आहे. शहरी संस्कृतीच्या अनुकरणाची प्रवृत्ती गावात वाढीस लागली. माणूस मात्र माणसापासून तुटला, एकसंघ असणारे ग्रामजीवन आज भेगाळले आहे. त्याला ठिकठिकाणी बुढाया (भेगा) पडल्या आहेत. ह्या आंधळ्या अनुकरणामुळे खेड्यातली माणसे आपली मूळ संस्कृती विसरले. त्यात स्त्रियांचे बळी जाऊ लागले. कुटुंब उद्ध्वस्त झाले. त्याचे प्रातिनिधिक चित्रण म्हाणजे 'बुढाई' ही कादंबरी एक सामाजिक वास्तव आहे. संस्कृती ऱ्हासातून विकती आली, त्याचे हे जिवंत चित्र आहे. पार्टटाईम, कबाडखूर्द या त्यांच्या इतर कादंबऱ्या आहेत.

**सारांश :**

रुचीपालट म्हणून निर्मितीला प्रारंभ झालेली ग्रामीण कादंबरी हळूहळू वास्तववादी झाली. प्रारंभीचे फडकेप्रणित रचनातंत्र तिने नाकारले. जीवनवास्तवाचे सखोल दर्शन घडविले जाऊ लागले. निवेदन प्रमाण भाषेत आणि संवाद बोलीत हे तिचे रूप पालटले आणि निवेदन व संवाद आशयानुरूप बोलीतच येऊ लागले. वास्तववादी प्रवृत्तीला समतावादी, सामाजिक मूल्यांची जोड मिळाली. शिक्षण आणि चळवळीच्या प्रभावातून जसे नवे ग्रामीण तरुण पुढे आले तसे चळवळीपासून दूर असलेल्यांनीही ग्रामीण वास्तवाची व्यामिश्रता टिपण्याचा प्रयत्न केला आहे, असे दिसते. तरीही एक गोष्ट मात्र खरी की आज मधू मंगेश कर्णिकांनंतर कोकणातून एकही ग्रामीण लेखक लिहिता झालेला दिसत नाही.

ॐ

## नव्वदोत्तर काळातील ग्रामीण कादंबरी

ग्रामीण 'साहित्य हा साठोत्तरी' महत्त्वाचा वाङ्मयीन प्रवाह आहे. या प्रवाहाच्या प्रेरणा सर्वश्रुत आहेत. पहिल्या, दुसऱ्या पिढीतील लेखकांच्या योगदानाबरोबर ग्रामीण साहित्य चळवळीचे प्रोत्साहन या वाङ्मय प्रवाहामागे आहे, परंतु आज पहिल्या-दुसऱ्या पिढीतील लेखकांकडून अपवादात्मक लेखन झालेले दिसते. जवळजवळ लेखन बंद झाले आहे. जे होते ते आत्मचरित्रात्मक किंवा चरित्रात्मक स्वरूपाचे, त्याचा चळवळ आणि ग्रामजीवन संस्कृतीशी किंवा शोषण आणि प्रेरणांशी संबंध अधोरेखित होताना दिसत नाही. नव्वदोत्तर काळातील ग्रामीण कादंबरीचा परामर्श घेत असताना काही वेगळेच निष्कर्ष नोंदवावे लागतात, त्यांची कारणेही शोधण्याचा साधारण प्रयत्न या ठिकाणी आहेच. नव्वदोत्तर म्हटल्यावर अगदी नव्वदमधील कांदबऱ्यांचा संदर्भ येथे नोंदविलेला नाही, याचे कारण स्पष्ट आहे, ते म्हणजे विषय विस्तार टाळणे होय.

डॉ. रवींद्र ठाकूर आणि डॉ. र.बा. मंचरकर यांनी १९९०-१९९१ पर्यंतच्या कांदबऱ्यांवर अभ्यासपूर्ण लेखन केलेले आहे. त्यामुळे पुनरावृत्तींचा दोष टाळण्याचाही हा माझा प्रयत्न आहे; एक मात्र निश्चित की या सर्व कादंबऱ्यांचे गंभीरपणे वाचन केल्यानंतर नव्वदोत्तर कादंबरीवर ग्रामीण साहित्य चळवळीपासून दोन हात लांब राहिलेल्या कादंबरीकारांच्या लेखनाचा प्रभाव अधिक स्पष्टपणे जाणवतो. कदाचित या बाबतीत मतभेद होऊ शकतील, त्यादृष्टीने स्वतंत्र संशोधनाचा विषय होऊ शकेल म्हणून वादात न पडता मी केवळ या काळातील कादंबरीकारांच्या निवडक १०१ कादंबऱ्यांच्या आधारे माझी भूमिका स्पष्ट करणार आहे. या संदर्भात एका महत्त्वाच्या तरुण अभ्यासकाची अपेक्षा मी जाणीवपूर्वक येथे नोंदवत आहे; यामुळे त्यांची रास्त अपेक्षा पूर्ण होईल आणि कादंबऱ्यांचे विषयानुरूप वर्गीकरण करणेही शक्य होईल.

प्रा. डॉ. च. वि. जोशी लिहितात, ''कादंबरीसारखा बहुपेडी वाङ्मयप्रकार ग्रामीण लेखकांनी वाळीत टाकला की काय, असा प्रश्न पडतो. कादंबरी ही मानवी जीवनाचे, समस्यांचे दर्शन घडविते. तिने समग्रलक्षी व्हायला हवे असे जरी वाटत असले तरी तिच्या मर्यादांची जाणीव ठेवूनही असे म्हणावेसे वाटते की, ग्रामीण कादंबरीने एखाद्या ग्रामानुभवाचे अस्सल आशयाचे विविध संदर्भाने दिग्दर्शन करावे. या अंशदर्शनातही तिने वास्तवाला भिडायला हवे. मोहन पाटलांची

'बस्तान', सदानंद देशमुखांची 'बारोमास' अशा काही कादंबऱ्या या दृष्टीने महत्त्वाच्या ठरतात. खेड्याची मूलभूत वैशिष्ट्ये स्पष्ट करणारी ग्रामीण कादंबरी मोठ्या प्रमाणात येणे गरजेचे आहे.''

ग्रामीण कादंबरीकारांनी एकूण परिवर्तनाचा खेड्यावर नेमका कोणता परिणाम झाला याचे वैविध्यपूर्ण दर्शन घडवावे. पाश्चात्त्य संस्कृतीचे अंधानुकरण खेड्यापर्यंत पोहोचले आहे. ग्रामीण तरुण आपली ऊर्जा व्यसनांमध्ये खर्च करीत आहे. बिघडलेल्या ग्रामसंस्कृतीत, व्यक्तिगत आणि कौटुंबिक, सामाजिक दुर्दशा होत आहे. अनेक रूपांनी गुन्हेगारी वाढत आहे. अंधश्रद्धेला बळी पडून कोवळ्या बालकांची अपहरणे आजही कमी झालेली नाहीत. त्याचबरोबर महत्त्वाचे म्हणजे ग्रामीण स्त्रीचे सर्व स्तरांवर, सर्व प्रकारचे शोषण होत आहे. तिच्या लेखी स्त्री–मुक्ती कुठेय ? तिचे शोषण आणि त्यातून तिला हवी असणारी मुक्ती याबाबतचे विचार सैद्धांतिक पातळीवर खेड्यातही रुजवायला पाहिजे. ग्रामीण कादंबरीने कलात्मकतेपेक्षा वास्तववादी होणे गरजेचे आहे. व्यक्तिस्वातंत्र्य, सक्रीय राजकारण, माहितीचा अधिकार, आर्थिक सवलती, वैचारिक जागृती, आत्मप्रतिष्ठा, मानसिक गुलामगिरीतून मुक्तता, नव्या तंत्रज्ञानाची गरज अशा अनेक घटकांचे दर्शन समकालीन ग्रामीण साहित्यिकांनी आपल्या साहित्यातून घडविणे गरजेचे आहे. सामाजिक व राष्ट्रीय कर्तव्याच्या जाणिवेतून नवा तरुण वर्ग कसा उभा राहील याचे भान आणून देण्याची जबाबदारी समकालीन ग्रामीण लेखकांनी उचलली पाहिजे. ('रूपगंध', ऋतु प्रकाशन, अहमदनगर, पृ.४१) डॉ. च.वि. जोशी यांच्या या विवेचनासंदर्भात येथे एवढेच म्हणावेसे वाटते की, त्यांच्या अपेक्षा काही प्रमाणत रास्त असल्या तरी एकोणीस वर्षांत दीडशे–दोनशे कादंबऱ्यांचे लेखन झाले म्हटल्यावर कादंबरीसारखा बहुपेडी वाङ्मय प्रकार ग्रामीण लेखकांनी वाळीत टाकलेला नाही, हे स्पष्टच आहे. ग्रामानुभवाचे अस्सल आशयाचे वास्तवदर्शनही ग्रामीण कादंबरी समर्थपणे करते हे पुढील विवेचनाधारे स्पष्ट होईलच. त्यांची तिसरी महत्त्वाची अपेक्षा म्हणजे परिवर्तनाचा खेड्यावर नेमका कोणता परिणाम झाला याचे वैविध्यपूर्ण दर्शन घडवावे हे अधोरेखित करण्यासाठी राजकारण, शिक्षण, भ्रष्टाचार, अन्याय, अत्याचार, शेतकरी आत्महत्या, सेझ यासारख्या विषयांचे चित्रण 'झाडाझडती' ते आजच्या 'धूळ पावलं' पर्यंतच्या सर्वच कांदबऱ्यांमधून दृगोचर होते, याकडेही दुर्लक्ष करता येणार नाही. स्त्रियांची निर्मिती मात्र हाताच्या बोटावर मोजण्याइतकीच आहे, कोकण, खानदेशाचे चित्रण अभावानेच येते, हे मात्र मान्य करावेच लागते. खेड्याची मूलभूत वैशिष्ट्ये स्पष्ट करणारी ग्रामीण कादंबरी मोठ्या प्रमाणात न येण्याचे कारण स्पष्ट आहे की, आज शहर आणि खेडे खूप जवळ आले असून खाजगीकरण, जागतिकीकरण, उदारीकरणाच्या प्रभावामुळे परंपरागत खेडे कादंबरीत येण दुरापास्त झाले आहे.

१९९० नंतरची कादंबरी ही प्रामुख्याने 'झाडाझडती' – विश्वास पाटील

(१९९१), 'ताम्रपट' रंगनाथ पठारे, (१९९४), राजन गवस यांच्या 'कळप' (१९९१), 'धिंगाणा' (१९९२), 'तणकट' (१९९८), सदानंद देशमुखांच्या 'तहान' (१९९४), बारोमास (२००२), बाबाराव मुसळे यांच्या 'हल्या हल्या दुधू दे', (१९८५), 'वारुळ', (२००४), 'पखाल'(१९९५), 'पाटीलकी', (२००५), गणेश आवटे यांच्या 'गणगोत', 'चुकार', 'भिरूड' यांच्या प्रभावातून बहरलेली दिसते तर आज शेवटी तीन तरुण लेखक समर्थपणे आपला अनुभव अभिव्यक्त करताना दिसतात. पहिला आहे अशोक कौतिक कोळी, दुसरा आहे महेंद्र कदम आणि तिसरा कैलास दौंड. यातील 'झाडाझडती', 'ताम्रपट', 'तणकट', 'बारोमास' या चार ग्रामजीवन चित्रण करणाऱ्या कादंबऱ्यांना साहित्य अकादमी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले, तर इतर अनेक कादंबऱ्या पद्मश्री विखेपाटील, भि. ग. रोहमारे, दमानी, महाराष्ट्र शासनाच्या पुरस्काराच्या मानकरी ठरल्या. याचाच अर्थ असा की ग्रामजीवन चित्रण करणाऱ्यांकडेही विविध पुरस्कार देणाऱ्या संस्था, शासनाचे लक्ष वेधण्याचे सामर्थ्य या कलाकृतींमध्ये आहे, याकडे दुर्लक्ष करता येणार नाही, यामुळेच म्हणावेसे वाटते की, मराठी ग्रामीण साहित्याने, त्यातील ग्रामीण कादंबरीने मराठी साहित्य समृद्ध केले, एवढेच नव्हे तर हेच प्रमुख साहित्य आहे.

या पार्श्वभूमीवर विविध प्रश्न किंवा समस्या विषयांच्या अनुषंगाने वर्गीकरण करून मांडणी करता येईल, यामुळे १९९० नंतरच्या ग्रामीण कादंबरीच्या बलस्थानांचा व मर्यादांचा परामर्शही घेता येईल आणि विस्तारभयाचा दोषही टाळता येईल. यासाठी स्वतंत्र सूची सोबत जोडली आहे.

रंगनाथ पठारे 'ताम्रपट' मधून राजकारणी व्यक्तिमत्त्वे सादर करतात. त्याचप्रमाणे शेतकऱ्याचं दुःखी जीवन अनेक कादंबरीकारांनी शब्दबद्ध केले आहे. त्यातून ग्रामीण वास्तव समर्थपणे आले आहे. या संदर्भात जयश्री नाफडे यांचे विवेचन महत्त्वाचे वाटते, '...... ग्रामीण जीवनात घडणारी स्थित्यंतरे, धरणामुळे उठणारी गावे, यांत्रिकीकरणाने माणूस व माती यांचे दुरावलेले संबंध, शहरीकरणामुळे ढासळत जाणारे ग्रामीण व्यावसायिक, श्रीमंत प्रतिष्ठितांकडून होणारे भूमिहीन मजुरांचे शोषण, सुशिक्षित ग्रामीण तरुणांची बेरोजगारी, त्यातून वाढणारा दहशतवाद व वाढती गुंडगिरी, राजकारणातील भ्रष्टाचार अशा प्रकारचे बदलते ग्रामजीवन प्रकट करण्यात आले आहे. (पृ. ७६,७७) (साहित्य : ग्रामीण आणि दलित मदन कुलकर्णी गौरव ग्रंथ) पुढे त्यांनी स्त्री कादंबरीकार किंवा स्त्रियांच्या दुःखासंबंधीही विवेचन केले आहे. ही त्यांची खंत रास्त असली तरी आज ग्रामीण जीवन चित्रणात 'स्त्री' केंद्रस्थानी आहे, हे प्रतिमा इंगोले, मधू सावंत, अनुराधा गुरव, वैशाली कोल्हे, शुभदा मुंजे या स्त्री लेखिकांच्या कादंबऱ्या पाहता किंवा आनंद पाटील, तानाजी राऊ पाटील यांच्या कादंबऱ्या पाहाता हे स्पष्ट होते.

**स्त्री कादंबरीकारांची निर्मिती :**

मथू सावंत, प्रतिमा इंगोले, अनुराधा गुरव, वैशाली कोल्हे, शुभदा मुंजे या आजच्या आघाडीच्या ग्रामीण कादंबरी लेखिका आहेत. 'ग्रामीण साहित्य लेखिकांची निर्मिती' या ग्रंथात प्रतिमा इंगोले यांनी म्हटले आहे की, ''कादंबरीच्या क्षेत्रातही ग्रामीण स्त्री लेखिकांनी आघाडी उघडलेली दिसते. डॉ. प्रतिमा इंगोले यांनी काळ्या भुईवरील 'बुढाई', गावाच्या ओढीने सायंकाळच्या वासरागत गावी परत येणाऱ्या नायकाची कादंबरी 'लळिताचे रंग' तर राजकारणातील ग्रामीण स्त्रीचे अनुभव मांडणारी मथू सावंत यांची 'राहूकेतू' आणि ग्रामीण स्त्रीचे जगणे चितारणारी 'जिनगानी' या कादंबऱ्या लेखिकांची निर्मिती असूनही लक्षणीय ठरल्या आहेत. त्याशिवाय नव्या दमाच्या लेखिकाही आता कादंबरी लेखनाकडे वळत आहेत. त्यात वैशाली कोल्हे ह्यांची 'अंधातरी', शुभदा मुंजे यांची 'पारुल' यांसारख्या कादंबऱ्या नव्यांने प्रकाशित होत आहेत. (पृ. ६०). डॉ. प्रतिमा इंगोले यांच्या अलीकडील 'पार्टटाईम' आणि 'बोडखी' या दोन कादंबऱ्या स्त्री समस्यांचा वेध घेणाऱ्या आहेत.

प्रा. अनुराधा गुरव यांच्या कादंबऱ्या त्यांचे स्त्रीजीवनविषयक चिंतन व्यक्त करतात. त्यांच्या कादंबऱ्यांतूनही आजच्या दोलायमान कुटुंबव्यवस्थेचे चित्रण येते. त्यांच्या पहिल्या 'तम विरते' मध्ये डॉक्टर पति-पत्नीमधील ताणतणावाचे प्रतिबिंब दिसते, तर 'अंजना' नावाच्या दुसऱ्या कादंबरीत ऐन तारुण्यात विधवा झालेल्या नायिकेचे कौटुंबिक ताणतणाव व्यक्त झालेले आहेत. 'रात्रीच्या गर्भात' या तिसऱ्या कादंबरीची नायिका डॉ. तन्मया ही आपल्या पतीच्या आणि मुलांच्या अपघाती मृत्यूने सुन्न होते.

'यश-अपयश' ही त्यांची चौथी कादंबरीसुद्धा नष्ट होणाऱ्या इनामदारी व्यवस्थेचे पीळ व्यक्त करते. तर पाचवी 'अकल्पित' कादंबरी खेड्यापाड्यात रंगलेल्या राजकीय डावपेचांचे चित्रण करते. या कादंबरी लेखनातून संघर्षमय जीवन जगणारी पात्रे आली आहेत; पण ही पात्रे ताठ भूमिका घेऊन लढत राहतात. त्यातून लेखिकेची जीवननिष्ठा व्यक्त होत राहते. (पृ. ८४) या पाच लेखिका मराठी ग्रामीण कादंबरीचे पंचप्राण आहेत. परंतु अनेक कथा-कवितांची निर्मिती करणाऱ्या लेखिका कादंबरी लेखन का करू शकत नाही, हा संशोधनाचा विषय होऊ शकेल, एक मात्र निश्चित की एकविसाव्या शतकातही स्त्री समानता, स्त्रीमुक्ती, सत्तेच्या विकेंद्रीकरणातील तिचे स्थान दुय्यमच असल्यामुळे तिच्या लेखन निर्मिती, प्रकाशनालाच मर्यादा पडल्या आहेत. तसेच खानदेशातील कवी, कथाकार अशोक कौतिक कोळी यांनी ग्रामीण कादंबरीचा अनुशेष भरून काढण्याचा मान मिळविला आहे, पॉप्युलरच्या प्रिय रसिक, ऑगस्ट, २००९ वरील विवेचन हे अधिक स्पष्ट करते. शंकर पाटील यांच्या 'टारफुला' किंवा राजन गवस यांच्या 'तणकट' ची आठवण करून देणारी कोळी यांची 'कुंधा' कादंबरी आहे.

आपल्या वेगळ्याच लेखनशैलीने ग्रामीण जग अचूक बारकाव्यांसह शब्दबद्ध करणारे अशोक कौतिक कोळी यांचा 'कूड' हा पहिला कथासंग्रह २००३ मध्ये प्रकाशित झाला. त्यानंतर तीनेक वर्षांनंतर 'पाडा' ही कादंबरी त्यांनी लिहिली. या कादंबरीला महाराष्ट्र राज्य शासनाचा पुरस्कार लाभला. खेड्यातल्या शेतकऱ्याच्या दुःसह्य जिण्याची, त्याच्या जगण्याच्या वाताहतीची कहाणी प्रभावीपणे या कादंबरीतून कोळी यांनी आपल्यासमोर उभी केली आहे. वेगवान कथानक, भाषेचा लवचीक वापर, जिव्हाळ्याने केलेले लेखन आणि मुख्य म्हणजे जामनेर परिसरात बोलली जाणारी 'तावडी' बोली ही प्रमुख वैशिष्ट्ये या कादंबरीतून नजरेस येतात. त्यामुळे ह्या कादंबरीने वाचकांचे, समीक्षकांचे लक्ष वेधून घेतले. त्यांची 'छोटा कमांडो' ही कुमारांसाठी लिहिलेली कादंबरीही तितकीच महत्त्वाची आहे. जळगाव येथे राहणाऱ्या अशोक कोळी यांनी विविध वाङ्मयीन नियतकालिकांतून सातत्याने लेखन केले. ग्रामीण जीवनाचे भेदक चित्रण करणारे नव्या दमाचे लेखक म्हणून साहित्य जगतात त्यांच्याकडे पाहिले जाते. आपल्या लेखनासाठी त्यांनी खास खानदेशी (तावडी) बोलीचा वापर केल्यामुळे त्यांना जो प्रदेश साहित्यकृतीत उभा करायचा आहे, जी माणसे उभी करायची आहेत, ती चपखलपणे नजरेसमोर साकारतात. हे त्यांच्या लेखनाचे एक वैशिष्ट्य म्हणता येईल. त्यांची 'कुंधा' ही कादंबरी ग्रामीण शेतीला ग्रासणाऱ्या संकटाची भीषण कहाणी आहे. कुंधा म्हणजे पिकाच्या पाळामुळांची नाकेबंदी करणारे, शेतकऱ्याला नामोहरम करणारे एक प्रकारचे तण, ग्रामीण शेतीच्या दुरावस्थेचे कुंधा हे एक प्रतीक आहे. देशातील शेती व शेतकरी यांच्या भवितव्याबद्दल प्रश्नचिन्ह असणाऱ्या आजच्या एका ज्वलंत समस्येला हात घालणारी ही कादंबरी असल्यामुळे तिचे महत्त्व निश्चितच लक्षात घेण्याजोगे आहे. विषयाची सखोलता, गांभीर्य अधिक प्रभावी करणारी भाषा या कादंबरीला एक वेगळीच धार आणते, खानदेशी बोलीभाषेतील अनेक अर्थपूर्ण व लयदार शब्द, वाक्प्रचार आणि म्हणी या कादंबरीतील संवादांतून व वर्णनामधून प्रथम मराठी साहित्यसृष्टीत हजेरी लावताना वाचकाला आढळतील, कुंधा उपटून फेकल्याखेरीज वावर पिकणार नाही हे परंपरेने शेतकऱ्याला शिकवलेले व्यवहारज्ञानच त्याला आताच्या संकटातूनही सहीसलामत बाहेर काढल्यावाचून राहणार नाही, हे प्रमुख सूत्र या कादंबरीतून वाचकांसमोर येते.

थोडक्यात असे म्हणता येईल की, अशोक कोळी यांचा 'पाडा', 'कुंधा' प्राचार्य महेंद्र कदम यांची 'धुळपावलं' किंवा कैलास दौंड यांची 'कापूसकाळ' या ग्रामीण कादंबऱ्या आशेचा किरण आहेत, त्या आजच्या वर्तमान आहेत, ग्रामीण कादंबरीकार गतजीवनात रमतात, हा आरोप नाकारणाऱ्या आहेत.

**निष्कर्ष :**

१. पहिल्या दुसऱ्या पिढीतील लेखकांचे लेखन थांबलेले दिसते. अपवादात्मक लेखन प्राचार्य रा.रं. बोराडे यांनी केले असले तरी ते राजकारणाकडे झुकलेले दिसते, तर ग्रामीण साहित्य चळवळीचे अध्यक्ष डॉ. आनंद यादव आत्मचरित्रात्मक आणि चरित्रात्मक कादंबरी लेखन करताना दिसतात. डॉ. नागनाथ कोत्तापल्ले, डॉ. वासुदेव मुलाटे यांची एकही कादंबरी या काळात नाही.

२. ग्रामीण साहित्याच्या चळवळीपासून दोन हात लांब असलेल्या रंगनाथ पठारे, राजन गवस, विश्वास पाटील, सदानंद देशमुख यांनी अन्य विषयांवर कादंबरी लेखन केले असले तरी त्यांच्या ग्रामीण कादंबरी वाङ्मयाचा प्रभाव १९९० नंतरच्या ग्रामीण कादंबरीवर प्रामुख्याने दिसतो, याला अपवाद रवींद्र शोभणे, किशोर सानप, बाबाराव मुसळे यांच्यासारख्या कादंबरीकारांचा नोंदविता येईल. याचा अर्थ असा की, ग्रामीण साहित्य चळवळ निष्प्राण झाली असे दिसत असले तरी ग्रामीण कादंबरीकारांना ऊर्जा मिळाली म्हणून असंख्य कादंबरीकार लिहू लागले. त्यांना पुरस्कार मिळाले.

३. डॉ. आनंद पाटलांसारखा लेखक नव्या ताकदीने लिहिता झाला हा एक आशेचा किरण म्हणता येईल. प्रत्यक्ष ग्रामीण जीवन जगलेले कादंबरीकार आपल्या भावना व्यक्त करताना दिसतात.

४. 'सर्जा', 'मेंढका' आणि 'हौशा' सारख्या कांदबऱ्यांमधून प्राणिजीवन आणि त्यावर अवलंबून असणाऱ्यांचे स्वाभाविक जीवन चित्रण येते.

५. कोकणी किंवा खानदेशातील जीवन चित्रणाचा अभाव अधोरेखित करावा लागतो, कारण समर्थ कोकणी किंवा अहिराणी लेखन जवळपास या कालखंडात नाही. अपवाद अशोक कोळी यांचा आहे.

६. बदलत्या किंवा ओस पडलेल्या, ढासळत्या खेड्याचे समर्थ चित्रण या काळातील कादंबरीकार करताना दिसतात.

७. ग्रामीण दलित यांच्या सीमारेषेवरील लेखन मोठ्या प्रमाणावर दिसते. म्हणजेच केवळ ग्रामीण किंवा केवळ दलित असे वर्गीकरण करणे त्या त्या कादंबरीकारांवर अन्याय करणारे ठरण्याचा धोका अधिक संभवतो.

८. डॉ. प्रतिमा इंगोले, मथू सावंत, अनुराधा गुरव, शुभदा कोल्हे यांचा अपवाद सोडला तर समर्थ स्त्री लेखिका दिसत नाही.

९. राजकारण, शिक्षण, भ्रष्टाचार, अन्याय, अत्याचाराचे चित्रण या काळातील कादंबरीतून प्रामुख्याने येते, त्याबरोबरच शेतकरी आत्महत्या, सेझ, आदिवासींचे खडतर जीवन अभावानेच आलेले दिसते.

१०. संख्यात्मक वाढ अपूर्व असली तरी सन्माननीय अपवाद वगळता गुणात्मक वाढीला मर्यादाच आहेत.

११. द.स. काकडे, चंद्रकांत महासिने, व.बा. बोधे व इतर विनोद, उपहासाच्या अंगाने करमणूकप्रधान ग्रामीण जीवन चित्रण करताना दिसतात.

| अ.नं | कादंबरी | कादंबरीकार | प्रकाशन वर्ष |
|---|---|---|---|
| १ | झाडाझडती | विश्वास पाटील | १९९० |
| २ | चारापाणी | रा.रं. बोराडे | १९९० |
| ३ | खुळी | उत्तम बंडू तुपे | १९९१ |
| ४ | भस्म | उत्तम बंडू तुपे | १९९१ |
| ५ | पाचरूट | अरुण जाखडे | १९९१ |
| ६ | कळप | राजन गवस | १९९१ |
| ७ | पिंजण | विजय वाकडे | १९९१ |
| ८ | कोंडी | रवींद्र शोभणे | १९९२ |
| ९ | आभाळ | तानाजी राऊ पाटील | १९९२ |
| १० | धिंगाणा | राजन गवस | १९९२ |
| ११ | ताम्रपट | रंगनाथ पठारे | १९९४ |
| १२ | सर्जा | सुरेश शिंदे | १९९४ |
| १३ | तहान | सदानंद देशमुख | १९९४ |
| १४ | पांगुळ वाडा | किशोर सानप | १९९४ |
| १५ | पाणसळ | गणेश आवटे | १९९४ |
| १६ | महाप्रलय | विलास अंभोरे | १९९४ |
| १७ | गोसावी | बाबू बिरादार | १९९४ |
| १८ | दशक्रिया | बाबा भांड | १९९५ |
| १९ | गायरान | राजेशकुमार कांबळे | १९९६ |
| २० | डाळ | माधव कोंडविलकर | १९९६ |
| २१ | काळोखाच्या छायेत | शं. रा. पेंडसे | १९९६ |
| २२ | रूपसावली | तानाजी राऊ पाटील | १९९८ |
| २३ | तणकट | राजन गवस | १९९८ |
| २४ | भोग | पांडुरंग जाधव | १९९८ |
| २५ | मेंढका | सुरेश शिंदे | १९९९ |
| २६ | गावपांढर | अप्पासाहेब खोत | १९९९ |
| २७ | बुढाई | प्रतिमा इंगोले | १९९९ |
| २८ | वारूळ | विजय वाकडे | १९९९ |
| २९ | गोबड | दिलीप भावसार | १९९९ |
| ३० | राहुकेतू | मधू सावंत | १९९९ |
| ३१ | गाव पांढरीच्या वाटेवर | अप्पासाहेब खोत | २००० |
| ३२ | इथं होत एक गाव | रा.रं. बोराडे | २००० |

| | | | |
|---|---|---|---|
| ३३ | वेगळ्या वाटा | पांडुरंग कुंभार | २००० |
| ३४ | हारास | किशोर सानप | २००१ |
| ३५ | गाव ढासळत आहे | प्रशांत पोखरकर | २००१ |
| ३६ | रेश्मा | तानाजीराव चोरगे | २००१ |
| ३७ | दरिद्री नारायण | व.न. इंगळे | २००१ |
| ३८ | मास्तर | दि. र. जायभाये | २००१ |
| ३९ | लगीन | संजीव गिरासे | २००१ |
| ४०. | ऐसे कुणवी भूपाळ | भारत काळे | २००१ |
| ४१ | बारोमास | सदानंद देशमुख | २००२ |
| ४२ | उमल्या उमलता | आनंद कदम | २००२ |
| ४३ | पार्टटाईम | प्रतिमा इंगोले | २००२ |
| ४४ | गराडा | भीमराव वाघचौरे | २००२ |
| ४५ | नासोळी | नरेंद्र इगळे | २००२ |
| ४६ | कोंडणातलं जिणं | नागनाथ पाटील | २००२ |
| ४७ | ऋतुसंहार | विजय वाकडे | २००२ |
| ४८ | आपल्या बापाचं काय जात | विष्णू गुंजाळ | २००३ |
| ४९ | हौशा | जयवंत अवघडे | २००४ |
| ५० | बारदाना | प्रकाश देशपांडे | २००४ |
| ५१ | शिक्षणनामा | योगिराज वाघमारे | २००४ |
| ५२ | निशाणी डावा अंगठा | रमेश इंगळे, उत्रादकर | २००५ |
| ५३ | वारूळ | बाबाराव मुसळे | २००५ |
| ५४ | मला फाशी द्या | राजाराम कांडेकर | २००५ |
| ५५ | गयपानं | दिनकर दाभाडे | २००५ |
| ५६ | अंधार | बा.बा.कोटंबे | २००५ |
| ५७ | जिताड | दिलीप भावसार | २००५ |
| ५८ | पाडा | अशोक कौतिक कोळी | २००६ |
| ५९ | सहकाराचा पट | रंगा दाते | २००६ |
| ६० | बळ | सतीश जाधव | २००६ |
| ६१ | भाऊबंद | विजय जावळे | २००६ |
| ६२ | कोंडवाडा | चंद्रकांत महामिने | २००६ |
| ६३ | अवघाची संसार | रवींद्र पांढरे | २००६ |
| ६४ | कळा ज्या लागल्या जिवा | ए.जी. दिवाण | २००६ |
| ६५ | पहाट | विजय बर्वे | २००६ |
| ६६ | भूक | सुधाकर शुक्ल | २००६ |
| ६७ | नामदार श्रीमती | रा.रं. बोराडे | २००७ |

| | | | |
|---|---|---|---|
| ६८ | एस. ई. झेड. | शंकर सखाराम | २००७ |
| ६९ | बुझ्वीगमन | दिनकर चौधरी | २००७ |
| ७० | बारभाईचा खटला | नरेंद्र इंगळे | २००७ |
| ७१ | तिढा | श्रावण मोडक | २००७ |
| ७२ | चिखल वाटा | सुरेंद्र पाटील | २००७ |
| ७३ | अंगारकूस | भीमराव वाघचौरे | २००७ |
| ७४ | आरंबळ | रामदास गो. चवरे | २००७ |
| ७५ | गोठण | रावजी राठोड | २००७ |
| ७६ | वनवास | आनंद कदम | २००८ |
| ७७ | रौंदाळा | कृष्णांत खोत | २००८ |
| ७८ | ऑक्टोपस | लक्ष्मीकांत देशमुख | २००८ |
| ७९ | इच्छामरण | आनंद पाटील | २००८ |
| ८० | भूवैकुंठ | किशोर सानप | २००८ |
| ८१ | अंथाग | डॉ. श्रीकृष्ण स. जोशी | २००८ |
| ८२ | परिवर्त | मधुकर जाधव | २००८ |
| ८३ | आभाळमाया | धनंजय वाघमारे | २००८ |
| ८४ | कुंधा | अशोक कौतिक कोळी | २००९ |
| ८५ | बोडरवी | प्रतिमा इंगोले | २००९ |
| ८६ | धुळ पावलं | महेंद्र कदम | २००९ |
| ८७ | गावठाण | कृष्णांत खोत | २००९ |
| ८८ | अंगणवाडी | नवनीत देशमुख | २००९ |
| ८९ | कापूस काळ | कैलास दौंड | २००९ |
| ९० | गावकूस | पांडुरंग कुंभार | २००९ |
| ९१ | वस्तान | मोहन पाटील | |
| ९२ | असं जगणं तोलाचं | शेषराव मोहिते | |
| ९३ | अंधार इथला संपत नाही | भालचंद्र देशपांडे | |
| ९४ | पागोरा | रमेश अंधारे | |
| ९५ | आमदार निवास रूम नं.१७ | पुरुषोत्तम बोरकर | |
| ९६ | साखरपेरा | मोहन पाटील | |
| ९७ | भूक | शंकर सखाराम | २००९ |
| ९८ | सभापती | योगिराज वाघमारे | |
| ९९ | अभिसरण | जी.के. ऐनापुरे | |
| १०० | पूर्णाकाठ | गणेश वाघ | २००९ |
| १०१ | वळीव | विष्णू शिंदे | २००९ |
| १०२ | पाणधुई | कैलास दौंड | २००४ |

## साठोत्तरी ग्रामीण कविता

**प्रास्ताविक :**

भारत हा खेड्यांचा देश आहे. शेती हा या देशातील प्रमुख व्यवसाय आहे. कृषिप्रधान ग्रामीण जनजीवनाचे चित्रण प्रारंभी मराठी साहित्यात दिसत नाही, याचे कारण ज्ञानाची क्षेत्रे विशिष्ट वर्गापुरती मर्यादित होती. इंग्रजांच्या मोफत शिक्षणाचा फायदादेखील ग्रामीण तरुणांना मिळाला नाही, नव्हे, स्वातंत्र्योत्तर काळातही पश्चिम महाराष्ट्र–कोकणाच्या तुलनेत विदर्भ–मराठवाडा शैक्षणिकदृष्ट्या मागासच राहिला, अद्यापही हा अनुशेष पूर्ण भरलेला नाही, हे सत्य असले तरी कासवाच्या गतीने शिक्षणप्रसार सुरू झाला. नवसंवेदनाक्षम प्रतिभावान पिढी आपल्या भावभावना अभिव्यक्त करू लागले ते खऱ्या अर्थाने १९८० नंतर हे मात्र सप्रमाण सिद्ध करता येईल, ग्रामीण कवितेची भूमी अंकुरयोग्य केली ती बहिणाबाई चौधरी, आनंद यादव, ना. धों. महानोर आणि विठ्ठल वाघ या ग्रामीण कवींनी. याचा अर्थ यापूर्वी ग्रामीण कविताच नव्हती असे नाही, तर काही कवींनी जाणीवपूर्वक किंवा अजाणतेपणे कळवळ्यातून ग्रामजीवन शब्दबद्ध केलेले दिसते. स्वातंत्र्यपूर्व काळात केशवसुत यांच्या 'एक खेडे' व 'गोष्टी घराकडील' (हरपले श्रेय) तसेच कवी दत्तांच्या 'आसंन्नमरण दुष्काळ पीडितास' व '१८९७ या वर्षाला' अशा कविता बालपणाच्या गावाकडच्या आठवणी, कळवळा, पलायन असेच या कवितांचे स्वरूप दिसते. माधवानुजांची कविता ग्राम जीवनाशी जवळून नाते सांगणारी वाटते. उदा. 'दुष्काळ', 'गाय विकत देताना', 'थंडी', 'दुष्काळग्रस्तांचे सुस्कारे'. कवी चंद्रशेखरांनी ग्रामजीवनावर आधारित 'काय हो चमत्कार', 'दडलं गुपित', 'किस्मतपूरचा जमीनदार' ही तीन खंडकाव्ये आणि काही स्फूट कविता लिहिल्या.

ग.ल. ठोकळ संपादित 'सुगी'मधील कविता रविकिरण मंडळकालीन व नागर कवितेच्या प्रभावातील ग्रामीण कविता आहे. 'मीठभाकर' ग. ल. ठोकळ १९३८, 'बोबडे बोल', पां. श्रा. मोरे, १९३२, ग. ह. पाटील 'रानजाई' १९३४, के. नारखेडे 'शिवार' १९४१, बी रघुनाथ 'आलाप आणि विलाप' १९४१ हे जानपद नावाने ओळखल्या जाणाऱ्या कवितांचे संग्रह आहेत.

मराठी ग्रामीण कवितेचा पाया खऱ्या अर्थाने आनंद यादव, ना. धों. महानोर आणि विठ्ठल वाघ यांनी घातला, त्यांचा परामर्श आपणास घेता येईल.

आनंद यादव यांचे 'हिरवे जग' १९६०, 'मायलेकरं', 'मळ्याची माती'

१९७८ असे दोन काव्यसंग्रह आले. हे दीर्घकाव्य प्रारंभी काव्यलेखन केल्यानंतर कथा, कादंबरी, ललितगद्य त्यांनी लिहिले. ग्रामीण साहित्याच्या चळवळीचे आधारस्तंभ असलेले सर कविता, कथेत अनुभव मावेनासे झाले म्हणून कादंबरीकडे वळले असले तरी त्यांची कविता खास ग्रामीण आहे. जगण्या भोगल्याचा वास तिला आहेच. अक्षयकुमार काळे म्हणतात, ''यादवांचे काव्यलेखन ग्रामीण जीवनाच्या दर्शनार्थ ग्रामीण भाषेचे उपयोजन यादवांनी आपल्या कवितेत केले आहे. खेड्यातील स्त्री पुरुषांचे, त्यांच्या दमदार स्वभावांचे, निसर्गाकडे पाहण्याच्या त्यांच्या दृष्टिकोणाचे दर्शन या कवितेत घडते. काही कवितांना त्यांनी संवादाचा बाज दिला आहे. यादवांची कथाकाराची प्रवृत्ती येथे प्रकर्षाने प्रत्ययाला येते. ग्रामीण जीवनाचे हे दर्शन केवळ आदर्शवादी नाही, त्यांच्या जीवनातील दुःख, दारिद्र्य, कुचंबणा यांचे परोपरीने वर्णन यादवांनी केले आहे. त्याच्या कवितेतील निसर्ग खेड्यापासचा प्रादेशिक आहे. त्याला रेखीव कारागिरी नाही. तो उघडा बोडका आहे. शहरी संस्कारांचा हात त्यावर फिरलेला नाही. खेड्यातल्या जगाशी यादव संपूर्णतः समरस झाले आहेत. त्यांची निसर्गप्रतिमासृष्टी खेड्यांशी संवादी अशीच आहे. तिचा संबंध लोकभाषेशी आहे. लोकभाषेतील मुळातील गोडवा आणि ठसका या कवितेत उतरला आहे. तिच्यातील लयबद्धता, अंतर्गत ताल या गुणांचा प्रत्यय यादवांची निसर्ग कविता वाचताना येतो. ग्रामीण भाषेतील शब्दांचा, शब्द प्रत्ययांचा, शब्दोच्चारांचा प्रयोग यादवांनी केला असल्यामुळे त्या जीवनदर्शनाचा प्रत्यय देणे त्यांना सुलभ झाले आहे.''

ग्रामीण जीवनातील अगतिकता त्यांच्या कवितेतून अभिव्यक्त झाली आहे. निरक्षर आईला आपल्या मुलांना शिकवावे वाटते, त्यांच्या नशिबी कष्टच आल्यामुळे ''आम्हालाही लई वाटतं मुलासनी शिकावं म्हणू...

डोईवर सदानकदा शेणाची पाटी'' असे स्वाभाविकपणे ती म्हणते. आनंद यादवांनी गंमतीने ना. धों. महानोरांना धो. धो. महानोर म्हटले आहे. त्याचप्रमाणे त्यांची कविता आणि वाणी आहे.

ना. धों. महानोर : 'रानातल्या कविता', १९६७, वही १९७० 'पावसाळी कविता' १९८२, प्रार्थना दयाघना (खंडकाव्य) १९८४, पळस खेडची गाणी (लोकगीतांचे संकलन) १९८२, 'गांधारी'– कादंबरी व 'गपसप' व 'गावातल्या गोष्टी' हे लोककथांचे संग्रह प्रकाशित आहेत.

निसर्ग आणि स्त्री ही दोन प्रमुख अनुभूतिकेंद्रे ना. धों. महानोरांच्या कवितेत आहेत. शेतातल्या निसर्गाशी त्यांच्या सगळ्या वृत्ती तादात्म्य पावल्या आहेत, ''ह्या शेताने लळा लावला असा असा की। सुखदुःखाला परस्परांशी हसलो रडलो। असा तर हा जीवच अवघा असा जखडला। मी त्याच्या हिरव्या बोलीच शब्द जाहलो'' किंवा ''गुंतलेले प्राण या रानात माझे'' फाटकी ही झोपडी काळीज माझे अशा ओळी विशिष्ट आदर्शाकरिता किंवा वेगवेगळेपणा दर्शविण्याकरिता येत

नाहीत तर ती त्यांची जिवंत अनुभूतीच असते. या आत्मनिष्ठेमुळे एकूणच सगळ्या भावनांचा आणि वासनांचा साक्षीदार म्हणून निसर्ग महानोरांच्या कवितेत प्रकटला 'डोळे गच्च अंधारून- तेव्हा माझे रान। रानातील झाडे मला-फुले अंथरूण' असा विश्रान्त करणारा निसर्ग आपल्या ज़िवंत स्वरूपात प्रथमच मराठी कवितेत अवतरला. आपले दुःख वाटून घेणाऱ्या निसर्गाशी त्यांचे भावनिक मन समरसवृत्तीने निसर्गाचे विविध आकार चित्रित करू लागले.

महानोरांची समकालीन कवितेपासून अगदी जाणवणारी प्रयोगात्मता स्पष्ट करताना सुधीर रसाळ लिहितात, ''आजच्या कवितेतील निसर्गचित्रात आपण या निसर्गाचे भाग असल्याची प्रगट अप्रगट जाण उमटलेली दिसते. आपल्या जीवनाचे खुरटलेपण, कृत्रिमता, विरूपता या जाणिवेच्या संदर्भात या कवींनी निसर्गामध्ये सौंदर्य, जिवंतपणा, चिरतारुण्य आणि उदात्त मूल्ये या गोष्टी पाहिल्या. आपल्या जीवनाचे उबग आणणारे क्षुद्र वास्तव्य आणि निसर्गाचे भव्योदात्त स्वरूप यातील ताणातून त्यांची कविता जन्मलेली दिसते. महानोरांच्या कवितेत हा 'शहरी ताण' प्रथमतःच नष्ट झालेला दिसतो. (काही मराठी कवी, जाणिवा आणि शैली- १९८४, पृ. १५१).

महानोरांच्या कवितेची अल्पाक्षरत्व आणि सूचकता ही खास वैशिष्ट्ये असून प्रतिमा-प्रतीकांमुळे आशयघनही आहे. लोकगीत-लोकसंगीत यांच्या प्रभावातून गीतानुकूलता तिच्यात आहे.

ना. धों. महानोर, कृत्रिम निसर्ग चित्रण न करता रानातील जिवंत निसर्गचित्रे महानोरांनी रेखाटली. खेड्यातील सुखदुःख आपल्या अनोख्या तपशिलासह या कवितेत साकार झाले. बोलभाषेतील मूलतः प्रवाही असलेल्या आशयघन शब्दप्रतिमांचा वापर करून सपक झालेल्या निसर्गचित्रणाला त्यांनी वेधक रूप दिले. रांगड्या शृंगार चित्रणाने ही कविता बहरली. लावण्या लिहूनही लावणीच्या वाटेनेच आपल्या शृंगार संवेदनांची अभिव्यक्ती न करता आविष्काराच्या विविध वाटा त्यांनी चोखाळल्या, असे मार्मिक मूल्यमापन महानोरांच्या कवितेचे केले आहे.

डॉ. आनंद यादव, ना. धों. महानोर, विठ्ठल वाघ या कवींची कविता आपापल्या वैशिष्ट्यांनी वेगळी आहे. डॉ. यादवांच्या कवितेपासून ग्रामीण कवितेचे स्वरूप अंतर्बाह्य बदलते. महानोर आणि वाघ यांची कविता गीतमयता, लोकलय यामुळे सर्वसामान्यांपर्यंत पोहचली. महानोरांच्या कवितेतील निसर्ग/रान प्रतिमांचा तर वाघांच्या कवितेतील लोकश्रद्धा-लोकभावना आविष्कार या कविता लोकप्रिय होण्यास उपयुक्त ठरला. या तीनही कवींनी मराठी ग्रामीण कवितेत आपापले स्वतंत्र स्थान निर्माण केले. नंतरच्या ग्रामीण कवींनी कमीअधिक प्रमाणात त्यांचे अनुकरणही केले.

**विठ्ठल वाघ :**

विदर्भाचे मागासलेपण कमी करण्याचा प्रयत्न विदर्भातील प्रबोधन चळवळ, गाडगेबाबा, राष्ट्रसंत तुकडोजी आणि डॉ. पंजाबराव देशमुख यांनी केला. त्यातून काही प्रमाणात शिक्षणप्रसार झाला. तेव्हा जानपदगीतांच्या प्रभावातून वऱ्हाडी ग्रामीण कविता पां. श्रा. गोरे यांनी लिहिली, शरदचंद्र सिन्हा या अमराठी माणसाने भावमधुर वऱ्हाडी कविता लिहिली. त्याच दरम्यान बालकवी दे. ग. सोटे यांनी विनोद व विडंबनाचा आधार घेत वऱ्हाडी कविता लिहिल्या. बालकवी सोटे यांचे काव्यगायनाचे कार्यक्रम गावोगावी झाले. वऱ्हाडी कवितेतील नादमाधुर्य आणि शब्दनिष्ठ विनोद अभिव्यक्त करण्यात सोटे चांगलेच यशस्वी झाले होते. १९७० नंतर विदर्भात कापूस उत्पादक संघाच्या चळवळींना प्रारंभ झाला. त्याच दरम्यान लोकगीत व वऱ्हाडी भाषेची चांगली समज असलेल्या विठ्ठल वाघांनी सौंदर्यांमध्ये, शेतीच्या कसदार सृजनामध्ये रमणारी आपली कविता कृषिजीवन मूल्याकडे वळवली. बहिणाबाईंसारखी लोकगीतांची अंगभूत जाण असलेल्या विठ्ठल वाघांनी वऱ्हाडी कवितेच्या नजाकतीने महाराष्ट्र जिंकला. सोटेंनंतर वाघांनी वऱ्हाडी कवितेची वैदर्भीरीती नव्या सामर्थ्याने प्रत्यक्षात आणून दिली. 'साय' आणि त्यानंतर 'काया मातीत मातीत' या काव्यसंग्रहांनी वाघ यांना कीर्तिशिखरावर पोहचविले.

प्रा. मधू जामकरांनी विठ्ठल वाघांच्या कवितेची बलस्थाने आणि मर्यादा स्पष्ट केल्या आहेत. (मराठी कविता - ध्यास आणि अभ्यास पृ. १५१ ते १५८), टाळ्या मिळविणारी वाघांची कविता वाचताना दुर्बोध वाटते; परंतु हीच कविता कवी जेव्हा व्यासपीठावरून म्हणून दाखवितो तेव्हा तिचे सामर्थ्य जाणवू लागते...

'पऱ्हाटी' तील भावानुभव स्वच्छंदवादी, पांढरपेशी तर त्याची अभिव्यक्ती वऱ्हाडी बोलीतून केली आहे.

"काल टोंग्या टोंग्या होती।
आज छात्या मांड्या झाली
परकरातली पऱ्हाटी
जसी लुगड्यात आली ॥"

शेतकरी जीवनातील विषय घेऊन ही कविता एका मध्यमवर्गीय अभिव्यक्तीच्या नागरी मनाने लिहिलेली कविता आहे. या कवीच्या नागरी व्यक्तिमत्त्वाला वैदर्भीय झालर आहे... आपली कविता गाऊन रसिकाला मोहित करण्याच्या हव्यासामुळे ही कविता बोलीखालीच चेंगरते. असे असले तरी अक्षयकुमार काळे 'अर्वाचीन मराठी काव्य दर्शन' (पृ. ६०० ते ६०२) मध्ये विठ्ठल वाघांच्या कवितेचे सामर्थ्य सांगताना म्हणतात, "ग्रामीण लोकजीवनाशी झालेल्या संपूर्ण समरसतेने रांगड्या मातीतून येणाऱ्या अनुभूतीचे बळ वाघांच्या कवितेला मिळाले आहे," अशी कायी माती माही साता जलामची माय/तमुका पांडुरंग

रंगवून घे कपाय'' अशी ऋणानुबंधाची ठेव ही कविता जपते. ग्रामीण जीवनातील व्यथा-वेदना, चालीरिती, शृंगार यांचे दर्शन या कवितांतून घडते. ग्रामीण जीवनातील जोम व कसदारपणा या काव्यात पुरेपूर उतरला आहे. 'तिफन'सारखी कविता शेतकऱ्याच्या वावरातील हिरव्या स्वप्नांची आणि काटा पायी रुतून वाहणाऱ्या भळभळत्या रक्ताच्या वास्तवाची कहाणी रेखाटणारी आहे.

ग्रामीण वातावरण, ग्रामीण निसर्ग, गावाजवळचे पिंपळ, वड आदी वृक्ष, त्यांच्या साक्षीने फुललेले गावातील तरुण-तरुणींचे प्रेमविश्व वाघांच्या कवितेतून साकार होते. बालपणीची कातर व्यथा...

"एका वळाच्या झाळाने साक्षी आणून ठेवलं
एकमेकांचं नावही खेळावर ते कोरलं
रोज शोचा वखत असा पारावर जाय
मैना उडून गेल्यानं माहा उदास पिपय."

अशी वृक्षसाक्षीने आकारास येते. तसे इतर कवितांतून नायक-नायिकांच्या प्रेमानुभूतीच्या आणि शृंगाराच्या मनोरम छटा वाघांनी रंगविल्या आहेत.

ग्रामीण वास्तवाचे भान वाघांना आहे. ग्रामीण जीवनातील शोषण, ओस पडत चाललेली खेडी, शेतकऱ्यांची दैन्यावस्था, हरवत चाललेली माणुसकी यांचा वेध वाघांची कविता घेते. "कसा झाला हा मानुस कव्रू निबांचा पाला। येल काकळीचा होता बार कारल्याचा आला," अशी खंत सभोवतालच्या वास्तवदर्शनाने त्यांच्या मनात निर्माण होते, शोषणाचे चित्रण ते करतात,

१. आम्ही मेंढरं मेंढरं यावं त्यानं हाकलावं । पाच वर्सांच्या बोलीनं होते आमचा लिलाव

२. मर मर मरा दिवस न रात । मातीतला जीव जानार मातीत...

३. उन्हातून आम्ही निघालो अजून सावली नाही । बाभुईच्या आलो बनात काटेच सावली नाही.

अर्वाचीन काव्यात ग्रामीण संस्कृतीशी एकरूपता साधणारी खरी जानपद कविता बहिणाबाईंनीच प्रथम लिहिली. रविकिरण मंडळाच्या कवींचा अशा पद्धतीच्या कविता लिहिण्याचा प्रयत्न स्तुत्य असला तरी ग्रामीण जीवनानुभवाची शिदोरीच त्यांच्याजवळ फारशी नसल्यामुळे काल्पनिक अनुभूतीच्या साहाय्याने रंगविलेली ही चित्रे बेगडी आणि कृत्रिम उतरली. वाघांच्या कवितेने जानपद गीतांना ग्रामीण जीवनाचा खराखुरा गंध मिळवून दिल्यामुळे ती तथाकथित जनवादी काव्यपरंपरेत मोलाचे योगदान देणारी ठरली.

**संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापनेनंतरच्या कविता :**

सरोजिनी बाबर 'झोळणा'मधील कविता स्त्रीच्या भावनांचे अविष्करण करते. पुरुषोत्तम पाटील यांची 'तळ्यातल्या सावल्या'मधील कविता प्रेमानुभव मांडते. एकनाथ देशमुख यांचा 'अनोळखी अनोळखी'चा उल्लेखनीय ग्रामीण कवितेचा

संग्रह आहे तर 'चंद्रास्त' या खंडकाव्यात प्रभाकर श्रवण चौधरी यांनी एका खेड्यातील दारिद्र्य-वासना यामुळे उद्ध्वस्त झालेल्या कथा शब्दबद्ध केल्या आहेत. याशिवाय राजा महाजन, सदाशिव माळी, भानु चौधरी, राजामुकुंद, देविदास सोटे, गणेश कुडे, शंकर बढे, सुधाकर गायधनी, मधु पांढरे इ. कवींनीही ग्रामीण कविता लिहिल्या आहेत.

**संयुक्त महाराष्ट्राच्या रौप्यमहोत्सवी वर्षानंतर ग्रामीण कविता :**

विविधतेने नटलेली समृद्ध ग्रामीण कविता असे शतकाच्या अखेरीच्या ग्रामीण कवितेचे वर्णन करावे लागेल. शिक्षणप्रसार, आर्थिक दुर्बलांना शिक्षण सवलती, महाविद्यालयांचे जाळे, ग्रामीण साहित्य चळवळ, विभागीय साहित्य संमेलने, चर्चासत्रे, मेळावे यामुळे नव्या पिढीची वाङ्मयीन मशागत होऊ लागली, प्रतिभेला अंकुर फुटले, आत्मभान आले, आपणच आपले जीवन अभिव्यक्त करावे असे वाटू लागले. यातून नवी ग्रामीण कविता बहरली. सर्वच कवींच्या कवितांचा परामर्श घेणे शक्य नसले तरी कवी आणि त्यांच्या कवितासंग्रहांची नोंद करता येईल.

१. माधव थोरात - 'आपुन तर माणसं हाय'
२. जगदीश देवपूरकर - गावाकडच्या कविता
३. उत्तम कोळगावकर - जंलझडी
४. नारायण सुमंत - रानगौरी
५. राजन गवस - हुंदका
६. एस. एस. शिंदे - सर्वा
७. दा. र. दळवी - खाजा, सिंधुलहरी, माळवणी
८. फ. मु. शहजिंदे - शेतकरी
९. भास्कर बडे - वावर
१०. मोहन पाटील - गाव आणि मातेच्या कविता
११. शंकर वाडेवाल - माती बोले गुज, गडवाही, आभाळ माती
१२. इंद्रजित भालेराव - पीकपाणी, आम्ही काबाडाचे धनी, गावाकडे चल माझ्या दोस्ता, दूर राहिला गाव, कुळंबिणीची कहाणी, रानमळ्याची वाट
१३. भैरव कुंभार - जित्राब
१४. उत्तम बावस्कर - हिरवी पहाट
१५. बाबुराव उपाध्ये - निवडुंगाची फुले
१६. गणेश देशमुख - गावच्या कविता
१७. प्रदीप पाटील - आत्मसंवाद, पुप्पलनि, शून्य आणि इन्फिनिटी
१८. अशोक सोनवणे - माय आणि इतर कविता
१९. श्रीकांत देशमुख - बलिवंत
२०. जे. एन. कदम - पहाट

२१. जयराम खेडेकर - ऋतुवंत
२२. निवृत्ती चांदोरकर - रानाते अभंग
२३. प्रकाश होळेकर - कोरडे नक्षत्र
२४. दि. वि. देवगावकर - माझा बळिराजा
२५. रघुनाथ कोकाटे - चेअरमन
२६. चंद्रकांत मोरे - ऋतुवंत
२७. राजा मुकुंद - वाढुळले दिस
२८. आशा सावदेकर - जयकृष्ण उपाध्ये, १८८३-१९८३
२९. लक्ष्मण दांडेकर - स्वातंत्र्या
३०. दिवाकर मोरस्कर - बाहवा
३१. श्या. कु. ढाकरे - श्यामगाणे
३२. मधु जामकर - गार्गी
३३. जगदीश देवपूरकर - तिरंगा ते भगवा
३४. संतोष पवार - भ्रमिष्टाचा जाहीरनामा
३५. भाऊ मांडवकर - आम्ही वऱ्हाडी वऱ्हाडी
३६. डॉ. काठोळे (संपादक) - लोकमहर्षी डॉ. पंजाबराव देशमुख
३७. कवी पुंडलीक ऊर्फ भाऊ खोकले 'गानं गाऊं गाळग्यांचं'
३८. नरसिंगराव इंगळे - 'जिव्हाळा'
३९. श्री. पारु कडाळे - करवंद
४०. राजेंद्र सोनवणे - वादळाची अशांतता

**वैशिष्ट्ये :**

★ प्रारंभीची ग्रामीण कविता अनुकरणातून कळवळा, चेंज म्हणून लिहिलेली दिसते. त्यामुळे उत्स्फूर्त वाटत नाही.

★ कवितेच्या मुख्य प्रवाहाची प्रारंभी छाप दिसते.

★ वाचक डोळ्यांसमोर ठेवून प्रमाणभाषेतच निर्मिती झालेली दिसते.

★ लेखनाला प्रारंभ झाला तो रविकिरण मंडळ आणि 'सुगी' ग.ल. ठोकळांच्या प्रभावातून हेही नजरेआड करता येत नाही.

★ शिक्षण, चळवळ, मेळावे, चर्चासत्र, संमेलनाच्या प्रभावातून आत्मभानानंतर ग्रामीण कविता समृद्ध झाली. विषय विविधता हे तिचे खास वैशिष्ट्य सांगता येईल.

★ ग्रामीण अभंग, ओवी, ग्रामीण गीत, ग्रामीण बालगीत, लोकगीत धाटणीची ग्रामीण कविता, चारोळी, चरित्रात्मक कविता, प्रादेशिक कविता, ग्रामीण स्त्री कवयित्रीची कविता, विविधता, आविष्कारभिन्नता.

★ ग्रामीण कविंना-विविध सन्मान-पुरस्कार मिळाले हे तिच्या श्रेष्ठत्वाचे लक्षण सांगता येईल.

★ ग्रामीण कृषिप्रतिमांचा वापर केलेला दिसतो.

★ अनुभवाची सूक्ष्मता, परिणामकारक ग्रामीण कविता.

★ वास्तव जीवनानुभूमीचे चित्रण.

★ शोषणाचे चित्रण / वास्तवाचे चित्रण करणारी शतकाअखेरीची कविता.

हे आणि इतरही वैशिष्ट्ये नोंदविता येतील; परंतु ग्रामीण कवितेचा समग्र अभ्यास चिकित्सकपणे झालेला नाही याची खंत आहेच. संशोधकांनी जाती धर्मांच्या, चळवळींच्या अनुषंगाने स्वतंत्र लेखकांवर संशोधन केले. ग्रामीण कवितेचा डॉ. सार्वेकर यांनी अभ्यास केला असला तरी अनेक ग्रामीण कवी दुर्लक्षित आहेत. त्यासंबंधी प्रयत्न झाला किंवा त्यासाठी कोणी तरुण अभ्यासक पुढे आला तर त्याला सर्व प्रकारची मदत मी करायला तयार आहे, एवढीच संशोधनाची अपेक्षा व्यक्त करतो.

**संदर्भ :**


१. ग्रामीण कविता : कालची आणि आजची - डॉ. कैलास सार्वेकर, धुळे

२. साठोत्तर वैदर्भीय ग्रामीण साहित्य - डॉ. श्रीकांत तिडके, मूर्तिजापूर

३. मराठवाड्यातील नवग्रामीण लेखकांची निर्मिती (१९७५-०२) डॉ. श्रीराम गुंदेकर-लातूर

४. मराठी कविता : ध्यास आणि अभ्यास - मधु जामकर

५. अर्वाचीन मराठी काव्यदर्शन - डॉ. अक्षयकुमार काळे.


## मराठी ग्रामीण काव्यसंग्रह सूची (१९६०-२००५)

| पुस्तकाचे नाव | लेखक | वर्ष | प्रकाशक |
|---|---|---|---|
| १. हिरवे जग | आनंद | १९६० | चंद्रकांत शेट्टे, कोल्हापूर |
| २. रानातल्या कविता | ना. धों. महानोर | १९६७ | पॉप्युलर, मुंबई |
| ३. झोळना | सरोजिनी बाबर | १९६४ | व्हीनस, पुणे |
| ४. वही | ना. धों. महानोर | १९७१ | पॉप्युलर, मुंबई |
| ५. ओळखी अनोळखी | एकनाथ देशमुख | १९७२ | राजेश भारती, जामनेर |
| ६. चंद्रास्त | प्र. श्रा. चौधरी | १९७४ | रसयात्रा, जळगाव |
| ७. मळ्याची माती | आनंद यादव | १९७८ | मेहता पब्लिकेशन, पुणे |
| ८. कविता दशकाची | संपादक पाडगावकर आणि इतर | १९८० | ग्रंथाली, मुंबई |
| ९. आपुन तर मानसं हाय | माधव थोरात | १९८१ | मल्लिकार्जुन, कऱ्हाड |
| १०. गावाकडच्या कविता | जगदीश देवपूरकर | १९८१ | चेतश्री, अमळनेर |
| ११. जंगलझडी | उत्तम कोळगावकर | १९८२ | मौज, मुंबई |
| १२. रानभैरी | नारायण सुमंत | १९८३ | अनुराधा, करमाळा |

| | | | |
|---|---|---|---|
| १३. हुंदका | राजन गवस | १९८३ | पारिजात, पुणे |
| १४. सर्वा | एस. एस. शिंदे | १९८३ | ॲपक्स पब्लिकेशन्स, पुणे |
| १५. सिंधू लहरी | दा. र. दळवी | १९८४ | सुप्रकाश, कणकवली |
| १६. हिरवी चाहूल | सतीष शिरसाठ | १९८४ | समाज प्रकाशन संस्था, पुणे |
| १७. शेतकरी | फ. म. शहाजिंदे | १९८५ | आंतरभारती, औरादशहाजानी |
| १८. रानगंध | सी. जी. चव्हाण | १९८५ | परिमल, औरंगाबाद |
| १९. मालवणी खाजा | दा. र. दळवी | १९८५ | सुप्रकाश, कणकवली |
| २०. रानकामुन्या | उषा भालेराव | १९८८ | अमरवैभव, औरंगाबाद |
| २१. वावर | भास्कर बढे | १९८८ | वावर, औरंगाबाद |
| २२. कडवाही | शंकर वाडेवाले | १९८८ | आविष्कार साहित्य मंडळ, नांदेड |
| २३. हापूस | दा. र. दळवी | १९८९ | सुप्रकाश, कणकवली |
| २४. पीकपाणी | इंद्रजित भालेराव | १९८९ | मेहता पब्लिकेशन, पुणे |
| २५. गाणे मातीचे | गोविंद थेटे | १९८९ | आविष्कार साहित्य मंडळ, नांदेड |
| २६. माय लेकरं | आनंद यादव | १९८९ | मेहता पब्लिकेशन, पुणे |
| २७. प्रार्थना दयाघना | ना. धों. महानोर | १९९० | पॉप्युलर, मुंबई |
| २८. पक्ष्यांचे लक्ष थवे | ना. धों. महानोर | १९९० | पॉप्युलर, मुंबई |
| २९. काया मातीत मातीत | विठ्ठल वाघ | १९९० | देशमुख आणि कंपनी |
| ३०. आम्ही काबाडाचे धनी | इंद्रजित भालेराव | १९९२ | प्रतिभास, परभणी |
| ३१. आभाळ माती | शंकर वाडेवाले | १९९३ | इसाप, नांदेड |
| ३२. जितराब | संपा. भैरव कुंभार | १९९४ | हिरण्यकेशी, कोल्हापूर |
| ३३. वाढुळले दिस | राजा मुकुंद | --- | सत्यप्रभा, नांदेड |
| ३४. हिरवी पहाट | उत्तम बावस्कर | १९९४ | प्रमोद, वैजापूर |
| ३५. दूर राहिला गाव | इंद्रजित भालेराव | १९९४ | बी. रघुनाथ, परभणी |
| ३६. झाली माती कासावीस | रावसाहेब छोले | १९९५ | बी. रघुनाथ, परभणी |
| ३७. माय आणि इतर कविता | अशोक सोनवणे | १९९५ | मृणाल, नाशिक |
| ३८. निवडुंगाची फुले | बापूराव उपाध्ये | १९९५ | बी. रघुनाथ, परभणी |
| ३९. गावाकडच्या कविता | गणेश देशमुख | १९९६ | एस. जी. कोळेकर, पुणे |
| ४०. आत्मसंवाद | प्रदीप पाटील | १९९६ | मानसन्मान, पुणे |
| ४१. शून्य आणि इन्फिनिटी | पुष्पलनी | १९९६ | का. स. वाणी, धुळे |

| | | | |
|---|---|---|---|
| ४२. बळिवंत | श्रीकांत देशमुख | १९९७ | केदार सप्लायर्स, पुणे |
| ४३. पहाट | संपा.जे.एम. कदम | १९९७ | श्रीनाथ मराठी मंडळ, होळसमुद्र |
| ४४. ऋतुवंत | जयराम खेडेकर | १९९७ | मैत्रेय, औरंगाबाद |
| ४५. रानातले अभंग | निवृत्ती चांडोलकर | १९९७ | इसाप, नांदेड |
| ४६. कोरडे नक्षत्र | प्रकाश होलकर | १९९७ | पॉप्युलर, मुंबई |
| ४७. भुलाई | प्रतिमा इंगोले | १९९७ | कॉन्टिनेंटल, पुणे |
| ४८. पानझड | ना. धों. महानोर | १९९७ | पॉप्युलर, मुंबई |
| ४९. इंद्रधनुच्या जखमा | एकनाथ देशमुख | १९९७ | राजेश भारती, जामनेर |
| ५०. रास आणि गोडर | जगदिश कदम | १९९८ | निर्मल, नांदेड |
| ५१. माझा बळीराजा | वि.वि.देवगावकर | १९९८ | महाराष्ट्र साहित्य कला प्रकाशन, पुणे. |
| ५२. चेअरमन | रघुनाथ कोकाटे | १९९८ | सौ. कोकाटे, सांगली |
| ५३. माती बोले गुज | शंकर वाडेवाले | १९९८ | इसाप, नांदेड |
| ५४. कुळंबिनीची कहानी | इंद्रजित भालेराव | १९९८ | प्रतिभास, परभणी |
| ५५. ऋतुगंध | चंद्रकांत मोरे | १९९९ | रामनाथ जामनेर |
| ५६. रानमळा | कवी सुरेश | १९९९ | चेतश्री, अमळनेर |
| ५७. गावाकडे चल माझ्या दोस्ता | इंद्रजित भालेराव | १९९९ | निर्मल, नांदेड |
| ५८. गहिवरलेला पाऊस | रावसाहेब कुवर | २००० | विशाखा,दरखेडी (साक्री) |
| ५९. तिची कहाणी | ना. धों महानोर | २००० | पॉप्युलर, मुंबई |
| ६०. कपाशीची चंद्रफुले | विठ्ठल वाघ | २००० | कैलास, औरंगाबाद |
| ६१. गाव कीर्तन | गोविंद पाटील | २००१ | शब्दालय, श्रीरामपूर |
| ६२. मौनातील पडझड | अशोक कोतवाल | २००१ | ग्रंथाली, मुंबई |
| ६३. उसाच्या कविता | कैलास दौड | २००१ | निलकांत, पुणे |
| ६४. साक्षात्कार | केशव बा. वसेकर | २००१ | प्रतिभास, परभणी |
| ६५. वसान | कैलास दौड | २००२ | चंद्रमाउली, पुणे |
| ६६. पेरा | इंद्रजित भालेराव | २००२ | देशमुख आणि कं. पुणे |
| ६७. मातरं | बालाजी इंगळे | २००२ | निलकांत, पुणे |
| ६८. भंगलेले देऊळ | विलास पाटील | ---- | कॉन्टिनेंटल, पुणे |
| ६९. झाडं माती | जगदिश कदम | २००३ | निर्मल, नांदेड |
| ७०. टाहो | इंद्रजित भालेराव | २००४ | प्रतिभास, परभणी |
| ७१. आषाढ माती | श्रीकांत देशमुख | २००३ | शब्दालय, श्रीरामपूर |
| ७२. कोरडवाहू | प्रमोद माने | २००५ | परभणी |

| | | | |
|---|---|---|---|
| ७३. आम्ही काबाडाचे धनी | इंद्रजित भालेराव | २००५ | प्रतिभास, परभणी |
| ७४. मेघदृष्टी | जयराम खेडेकर | २००५ | शब्दालय, श्रीरामपूर |
| ७५. नामदेव शेतकरी | जगदीश कदम | २००६ | निर्मल, नांदेड |
| ७६. गावाच्या आकाभोवती | प्रकाश किनगावकर | २००६ | पॉप्युलर, मुंबई |
| ७७. पाढा | केशव देशमुख | २००६ | साकेत, औरंगाबाद |
| ७८. चालणारे अनवाणी पाय | केशव देशमुख | २००७ | पद्मगंधा, पुणे |
| ७९. अवान होळ | अजय कंदार | ---- | शब्दालय, श्रीरामपूर |
| ८०. कुणब्याची कविता | लक्ष्मण महाडीक | २००३ | शब्दालय, श्रीरामपूर |
| ८१. खानदानी | भगवान देशमुख | | शब्दालय, श्रीरामपूर |
| ८२. निरिच्छ नभ | विनायक त्र्यं. पाटील | | शब्दालय, श्रीरामपूर |
| ८३. रूप अरूपाचे | अशोक सोनवणे | | शब्दालय, श्रीरामपूर |
| ८४. भोग सरू दे उन्हाचे | कैलास दौंड | | शब्दालय, श्रीरामपूर |
| ८५. बिजान धरलाय कोंब | अनिल पाटील | १९९२ | इंद्रायणी, पुणे |
| ८६. आमी शेतकऱ्यांची पोरं | रमेश चिठ्ठी | १९९६ | निर्मल नांदेड |
| ८७. कढवाही | शंकर वाडेवाले | १९९८ | अण्णासा. म. नांदेड |
| ८८. पंढरीच्या वाटेवर | विठ्ठल वाघ | २००१ | देशमुख आणि कं. पुणे |
| ८९. गावकळा | सदानंद देशमुख | २००५ | सुविद्या पुणे |
| ९०. ग्वाही | फ. म. शहाजिंदे | १९९६ | दिलीपराज, पुणे |
| ९१. नांगरून पडलेले शतक | रमेश चिल्ले | २००३ | शब्दालय, श्रीरामपूर |
| ९२. भिकेची भाकर | पा. श्रा. गोरे | १९८३ | त्रिमूर्ती पिं. अमरावती |
| ९३. महात्मा फुले समग्र वाङ्मय | (सं.)फडके | २००६ | त्रिमूर्ती पिं. अमरावती |
| ९४. बिजानं धरलाय कोंब | अनिल पाटील | १९९२ | प.आ.,इंद्रायणी प्रकाशन, पुणे. |

# १९८० नंतरची प्रादेशिक कथा

महाराष्ट्राचे स्वाभाविक असे चार विभाग आहेत, पश्चिम महाराष्ट्र, कोकण, मराठवाडा, विदर्भ असे हे चार भूप्रदेश निसर्गाच्या आधारे वेगळा चेहरा असलेले दिसतात. या प्रदेशातही जिल्हानिहाय वेगळेपण दिसते, तसेच भाषेच्या, बोलीच्या अंगानेदेखील वेगळेपण दिसते, जसे कोकणी, अहिराणी, वैदर्भी इ. या प्रदेशात जन्मलेले, शिकलेले व पुढे नोकरी व्यवसायाच्या निमित्ताने शहरात स्थिरावलेले प्रतिभावंत आपल्या प्रदेशाच्या ओढीमुळे अपरिहार्यपणे संस्कारक्षम वयातील जीवन व प्रदेश शब्दबद्ध करताना दिसतात. प्रदेशाचा समाजजीवनावर व लेखकाच्या व्यक्तिमत्त्वावरही प्रभाव असतो. प्रदेश लेखनावर प्रभाव गाजविते. साधारणपणे कादंबरी म्हटली की प्रादेशिक व कथा ग्रामीण असे प्रारंभीचे वर्गीकरण दिसते, किंवा कोकणी ते सर्व प्रादेशिक आणि बाकी प्रदेशातील जीवन चित्रण ते ग्रामीण असादेखील समज रूढ झालेला होता. प्रदेश पात्र म्हणून सजीव रूप घेऊ लागला. प्रादेशिक साहित्याला वर्ण्य प्रदेश त्याच्या संपूर्ण वैशिष्ट्यांसह समूर्त झालेला असतो. तेथील ऋतुचक्र, पीक पद्धती, हंगाम, पक्षी, प्राणी, त्यांची बोली भाषेतील नावे, नद्या, प्रदेश लोकांची आहारपद्धती, पोशाखपद्धती बोलण्याच्या ढबी, लकबी यात येतात. प्रादेशिक साहित्याला सबंध प्रदेश त्याच्या रूपा-गुणासह व्यक्त झालाच पाहिजे, अशी अपेक्षा असते. श्रीराम गुंदेकर लिहितात, "प्रादेशिक साहित्यात बोली भाषेचा आवश्यक तेवढाच उपयोग केला जातो. निवेदन प्रमाण भाषेत असले तरी ते बोली भाषेशी मिळतेजुळते असते. प्रादेशिक साहित्याची भाषा निव्वळ ग्रामीण किंवा निव्वळ प्रमाण भाषा नसते!" (पृ. १८, मराठी वाङ्मयातील नवीन प्रवाह, संपादक - शरणकुमार लिंबाळे.)

प्रादेशिकतेची नाळ फक्त कादंबरीशी जोडली गेल्याचे दिसते. असे असले तरी सुखठणकर, जी.ए. कुलकर्णी, र. वा. दिघे, ठोकळ, बी. रघुनाथ, श्री. म. माटे, सरदेसाई, खानोलकर, दांडेकर, माडगूळकर, कर्णिक, माटे, द. ता. भोसले, आनंद यादव, बोराडे, शेळके, नलगे, चारुता सागर, नागनाथ कोत्तापल्ले, आणि अलीकडच्या अनेक कथाकारांनी आपला प्रदेश कथेत त्यांच्या वैशिष्ट्यांसह साकार केला आहे. प्रदेशातील माणसे व त्यांच्या वृत्ति-प्रवृत्तीचे दर्शन घडविले.

१९८० नंतरची प्रादेशिक कथा, थेट अंतर्मनाशी संवाद व वास्तवाशी नाळ असणारी आहे. प्रादेशिक कथाकारांच्या कथांचा विशेष हा की, कथाकारांनी पाहिले, ऐकले, अनुभवले, मनात रुजलेल्या घटनांचा त्यांनी आविष्कार केला आहे.

या कथा केवळ प्रादेशिक कथा म्हणून साकार होत नाहीत तर, त्या त्या प्रदेशातील लोकजीवनाचे, मानवी भावभावनांचे सूक्ष्म मनोविश्लेषण करण्यात यशस्वी झालेल्या आहेत. विविध प्रदेशातील जीवनाचे भावबंध व सुखदु:खे त्यातून स्पष्टपणे कळते. प्रादेशिक कथाकारांनी त्यांच्या प्रदेशातील निसर्ग व जिवंत व्यक्तिमने रेखाटन केली असून त्यात जिवंतपणा आणला आहे. उदा. डॉ. नागनाथ कोत्तापल्ले यांनी औरंगाबाद येथील लेखातील निर्जीव शिल्पांना जिवंत भावनांचा साज चढवून त्यांना सजीव रूप दिले आहे. (उदा. वणवा ही कथा) डॉ. कोत्तापल्ले यांच्या कथांचे उर्दू व इंग्रजीतून अनुवाद झाले आहेत.

गोमंतकीय किंवा कोकणी प्रादेशिक कथा प्रारंभी लिहिली गेली. आज मात्र एकही कोकणी कथाकार नाही, असे, मला मर्यादित अभ्यासात जाणवले; परंतु मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र, खानदेश, विदर्भातून १९८० नंतरचे नव्या दमाचे कथाकार दिसतात. त्यांची सूची दिल्याशिवाय हा शोधनिबंध पूर्ण होणार नाही असे मला वाटते. (येथे १९८० पूर्वीच्या कथाकारांच्या कथांचा उल्लेख केला नाही. या वर्गीकरणासाठी हिराचंद शेकडे यांच्या प्रबंधाचा आधार घेतला.)

**मराठवाडा कथा संग्रह**

| अ.नं. | लेखक | कथासंग्रह | प्रकाशन वर्ष |
|---|---|---|---|
| १ | जगदीश कदम | मुडदे | १९७९ |
| २ | कोत्तापल्ले | कर्फ्यू आणि इतर कथा | १९८० |
| ३ | रविचंद्र हडसनकर | दावण | १९८४ |
| ४ | कोत्तापल्ले | राजधानी | १९८७ |
| ५ | श्रीराम गुंदेकर | उचल | १९९० |
| ६ | भास्कर बढे | पांढर | १९९० |
| ७ | शिवाजी मुंडे | पेरणी | १९९० |
| ८ | मोहन शेळके | वणवा | १९९१ |
| ९ | यु.म. पठाण | जित्राब | १९९२ |
| १० | कोत्तापल्ले | रक्त व पाऊस | १९९२ |
| ११ | गंगाधर पानतावणे | हळगी | १९९३ |
| १२ | कोत्तापल्ले | कवीची गोष्ट | १९९३ |
| १३ | सुरेश धनगर | गावखुणा | १९९५ |
| १४ | कोत्तापल्ले | देवाचे डोळे | १९९६ |
| १५ | मोहन शेळके | थिअेटर | १९९६ |
| १६ | कोत्तापल्ले | सावित्रीचा निर्णय | १९९९ |
| १७ | उत्तम बावस्कर | इस्कोट | २००० |

**पश्चिम महाराष्ट्र कथासंग्रह**

| अ.नं. | लेखक | कथासंग्रह | प्रकाशन वर्ष |
|---|---|---|---|
| १ | बा.ग. केसकर | फलोट | १९८० |

| | | |
|---|---|---|
| २ केशव मेश्राम | खर-वड | १९८० |
| ३ राजन गवस | वाळवी | १९८५ |
| ४ मोहन पाटील | गावठाण | १९८५ |
| ५ उत्तम तूपे | आंदण | १९८६ |
| ६ बळवंत कांबळे | गावकला | १९९२ |
| ७ भीमराव शिरवाळे | फुटलेले बांध | १९९२ |
| ८ अप्पासाहेब खोत | गाव पांढर, गवनेर, रानगंगा | १९९९ |

**खानदेश अहिराणी कथा**

| अ.नं. लेखक | कथासंग्रह | प्रकाशन वर्ष |
|---|---|---|
| १ वासुदेव वाघुळदे | रक्ताची अक्षरे | १९७६ |
| २ चंद्रकांत महामिने | प्रवराकाठची माणसं | १९८२ |
| ३ दादासाहेब मोरे | विमुक्त | १९९४ |
| ४ प्रमिला भिरुड | रेशीम बंध | १९९८ |

मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्रातील कथाकारांच्या कथांच्या तुलनेने अहिराणी कथा मात्र संख्येने अतिअल्प आहे, उलटपक्षी विदर्भ प्रदेशातील म्हणजे बुलढाणा, अमरावती, नागपूर, अकोला, भंडारा, यवतमाळ इ. जिल्ह्यांनी व्यापलेल्या प्रदेशांतील कथा विपुल आहे. मराठवाडा-विदर्भाचा मागसलेपणा, अनुशेष प्रश्न कथेच्या बाबतीत मात्र नाही, हे विदर्भातील कथासंग्रहांची सूची पाहिली तरी स्पष्ट होईल.

| अ.नं. लेखक | कथासंग्रह | प्रकाशन वर्ष |
|---|---|---|
| १ बजरंग सरोदे | पारावरच्या गोष्टी | १९८० |
| २ प्रतिमा इंगोले | हाजारी बेलपान | १९८४ |
| ३ अशा बगे | मारवा | १९८४ |
| ५ बाबाराव मुसळे | मोहरेला चंद्र | १९९२ |
| ६ सदानंद देशमुख | अंधार बन | १९९२ |
| ७ नामदेव कांबळे | परती बंद | १९९४ |
| ८ अनंत भोयर | हराळी | १९९४ |
| ९ बाबु राऊत | कानमंत्र | १९९९ |
| १० आशा पाटील | इशारा | २००० |

यासारख्या लेखकांनी विदर्भाच्या मातीला न्याय दिलेला आहे. वैदर्भी बोलीने रसिकांना भुरळ घातली आहे. प्रदेशनिहाय सूची देण्याचा हेतू एवढाच की १९८० नंतरच्या प्रादेशिक कथाकारांच्या कथांची तोंडओळख व्हावी, सर्वच कथांचा अभ्यास करणे मलादेखील शक्य झाले नाही. या सर्वच कथा प्रादेशिक आहेत. असा माझा दावा नाही, प्रदेशातील लेखक एवढाच निकष वर्गीकरण करताना

ठेवला आहे, त्यातून काही निष्कर्ष हाती येतात, ते असे :

१) कोकणी प्रादेशिक कथालेखन १९३१ साली सुरू झाले.

२) पश्चिम महाराष्ट्र, मराठवाड्यातील प्रादेशिक कथालेखन १९४० नंतर सुरू झाले.

३) विदर्भ खानदेशातील प्रादेशिक कथालेखन स्वातंत्र्योत्तर काळात सुरू झाले.

४) पश्चिम महाराष्ट्रातील कथालेखकांची संख्या सर्वाधिक तर खानदेशातील लेखकांची संख्या सर्वात कमी आहे.

५) पश्चिम महाराष्ट्रापेक्षा शैक्षणिक व सुधारणा या दृष्टीने मराठवाडा मागसलेला असला तरी लेखनात मात्र पश्चिम महाराष्ट्राशी बरोबरी मराठवाड्याने केलेली दिसते. महात्मा गांधी, विनोबा, गाडगेबाबा, तुकडोजी महाराजांच्या प्रबोधनविषयक कार्याच्या प्रभावातून आणि पंजाबराव देशमुखांनी विदर्भात आणलेल्या शिक्षणाने शेतकऱ्यांच्या उद्धाराचे स्वप्न काही अंशी साकार झाले. विदर्भाच्या सार्वजनिक जीवनात शिक्षित बहुजनांची जी शिक्षित पिढी आहे, ती पंजाबराव देशमुखांच्या शैक्षणिक प्रबोधनाची पावती आहे. विदर्भ हा प्रदेश कापसाशी निगडित आहे. १९७० नंतर विदर्भात कापूस उत्पादक संघाच्या चळवळींना प्रारंभ झाला. कापूस ते कापड अशा सर्व प्रक्रिया शेतकऱ्यांच्या हाती असाव्यात, उत्पादन खर्चाचा व हाती येणाऱ्या उत्पन्नाचा विसंवाद चळवळीमुळे प्रकर्षाने जाणवायला लागला, त्याचे प्रतिबिंब वैदर्भीय कथेत पडल्याशिवाय कसे राहिल? उद्धव शेळके यांच्यानंतर मनोहर तल्हार यांनी कथा-कादंबरीच्या क्षेत्रात प्रवेश केला. घटनांपेक्षा व्यक्तीत्व चित्रणाला दिलेल्या अधिक प्राधान्यामुळे मनोहर तल्हार यांच्या कथा अधिक हृदयस्पर्शी झाल्या आहेत. 'बुढीचं खटलं' ते 'नि:संग' असा त्यांचा कथा प्रवास आहे. आधुनिकीकरण व शहराची ओढ यामुळे खेडी ओस पडू लागली. बाजीराव पाटील यांनी विनोदाच्या अंगाने वऱ्हाडी गोष्टी, वेल्हाळपणा फुलविलेला आहे. पोट्टं सात हाती खेयतात, पार्टीशन, गणिताचा पाठ, यासारख्या कथांतून वऱ्हाडातील अंधश्रद्धा, फसवेगिरी, दारिद्र्याचे दर्शन घडते. बाजीराव पाटील यांच्या कथेतील निवेदक हा बालसुलभ कौतुकाने व भाबडेपणाने जगाकडे पाहतो.

भाऊ मांडवकर, सुरेश आकोरकर, दे.शि. दुधलकर, प्रतिमा इंगोले, सतीश तराळ यांनी कथेला कथाकथनाच्या लोकप्रिय प्रवाहात आणले. हजारी बेलपान, सुगरणीचा खोपा, जावयाचं पोर, लेक भुईची हे आणि इतर त्यांचे खास वैदर्भीय जीवनदर्शन घडविणारे कथासंग्रह आहेत. संतोष मुळावकर, अशोक मानकर आणि बाबाराव मुसळे यांची कथा वऱ्हाडी जीवनाचे वेगळे दर्शन घडविते, असे श्रीकांत तिडके म्हणतात. तरीही कादंबरीच्या तुलनेत वैदर्भी प्रादेशिक कथा अपूर्णच वाटते.

### मराठवाड्यातील कथा

आधुनिक काळामध्ये मराठवाड्यातील साहित्याची निर्मितीदेखील लक्षणीय वैशिष्ट्यपूर्ण आहे. बी. रघुनाथ यांच्यापासून प्रारंभ होऊन मुकुंद कृष्ण गायकवाड

ते आजपर्यंतचे अनेक कथाकार सकस निर्मिती करत आहेत. रा. रं. बोराडे सरांच्या कथेपासून ते बंकट पाटील, दादा गोरे, सोपान हाळमकर, डॉ. कोत्तापल्ले, डॉ. मुलाटे, एकनाथ आबूज, गणेश घांडगे, राजा मुकुंद, योगिराज वाघमारे, भास्कर चंदनशिव, अविनाश डोळस, अनुराधा पाटील यांनी मराठवाड्याचे साहित्य समृद्ध केले, हैद्राबाद मुक्तिसंग्राम, संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती, या महत्त्वाच्या घटनांनंतर मराठवाड्याचा चेहरामोहरा बदलला होता. मराठवाडा विद्यापीठ, कृषी विद्यापीठ निर्मितीनंतर महाविद्यालयांची जिल्हा व तालुका पातळीवर वाढ लक्षणीय ठरली. ग्रामीण भागातील तज्ज्ञ परीक्षणाच्या परिघात आले. अनुकूल परिवर्तनाबरोबर निवडणुकांचे राजकारण, गटबाजी, हवेदावे वाढले. गावातील एकोपा संपला. जातीवादाला खतपाणी मिळाले. त्यातून दलित सवर्ण, हिंदु-मुस्लिम, हे वाद वाढले. भ्रष्टाचाराने उग्र रूप धारण केले. शासकीय योजनांचा लाभ पुढारी आणि अधिकारी यांना मिळू लागला, यातून नवे प्रश्न निर्माण झाले. विविध चळवळींनी नवशिक्षितांचे आत्मभान वाढले. त्यातूनच साहित्य व समाजजीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोण प्रगल्भ होऊ लागला. कथा, कादंबरी, कविता, लेखन करणाऱ्यांची संख्या वाढली जसे, जगदीश कदम, राम निकम, गणेश आवटी, श्रीराम गुंदेकर, विजय सिरसाट, नागनाथ पाटील, इंद्रजित भालेराव, शेषराव मोहिते, मधु सावंत, प्रकाश मोगल, शिवाजी मरगिल, रावसाहेब चोरे, बाबू बिराजदार, विलास पाटील, ही यादी भरपूर वाढविता येईल.

साहित्य समाजजीवनाबरोबर विकसित होते, तसेच मराठवाड्यातील साहित्याबाबतही म्हणता येईल. कोरडवाहू शेती, लहरी निसर्गामुळे असुरक्षित जीवनमान, बेरोजगारी, स्थलांतर, नामांतर, आंदोलन, दलितांवरील हल्ले, एक गाव एक पाणवठा, राखीव जागा, मंडल आयोग इत्यादींचे चित्रण करणारे साहित्य निर्माण झाले. भूप्रदेश, तेथील पीक, अन्नधान्ये, पाणी, माती यांचेही गुणवैशिष्ट्ये तेथील मानवी स्वभावनिश्चित करण्यावर प्रभाव जागवित असतात. मराठवाड्याच्या पाणी-मातीचा परिणाम तेथील लोकांवर आहेच. मराठवाडा मागास प्रदेश म्हणून ओळखला जातो, त्याची कारणे नैसर्गिक, सामाजिक, आर्थिक व राजकीय नेतृत्वाचे नाकर्तेपण हे आहे. परंतु साहित्य क्षेत्रात मराठवाडा मात्र मागे नाही. एकविसाव्या शतकाची आवाहने व आव्हाने पेलण्याचे बळ आणि शक्यता आज तरी मराठवाड्याच्या साहित्यातच दिसतात. हे विधान अतिशयोक्तीचे ठरू नये.

कोकणीने प्रारंभ झालेली प्रादेशिक कथा, आज मात्र निर्जीव झाली आहे. पश्चिम महाराष्ट्रातील लेखकांनी कादंबरीतून विविध समस्यांचा वेध घेतल्याने प्रादेशिक कथा ठसठशीतपणे दिसत नाही. ग्रामीण-प्रादेशिकतेच्या सीमारेषेवर रेंगाळणारी १९८० नंतरची प्रादेशिक कथा आहे, असेच शेवटी म्हणावे लागेल.

ஐ

# मराठी कादंबरीतील प्रादेशिकता

१ मे १९६० रोजी विदर्भ, मराठवाडा आणि मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राची स्थापना झाली. तदअनुषंगाने महाराष्ट्राचे भौगोलिकदृष्ट्या चार प्रमुख स्वाभाविक विभाग पडतात. हे चार विभाग पुढीलप्रमाणे आहेत. १) विदर्भ २) मराठवाडा ३) पश्चिम महाराष्ट्र, ४) कोकण या चारही विभागांचे प्राकृतिकदृष्ट्या प्रादेशिक-ग्रामीण जीवन भिन्न स्वरूपाचे आहे. प्रामुख्याने हे जीवन कृषिप्रधान आहे. प्रदेशांचे विशिष्ट व्यक्तिमत्त्व वैशिष्ट्यपूर्ण आहे. या ठिकाणाचे निसर्ग, समाज, संस्कृती, शेती भिन्न भिन्न प्रकारची असलेली दिसून येते. या भिन्नतेचे दर्शन त्या त्या प्रदेशातील ग्रामीण प्रादेशिक कादंबऱ्यांतून दिसून येते. स्वातंत्र्यपूर्व काळातील जीवनापेक्षा स्वातंत्र्योत्तर जीवनशैलीत खूपच फरक पडलेला दिसतो. पारंपरिक गावगाड्याचा ऱ्हास झालेला दिसतो. नवीन सुधारणा झाल्या, त्यातून काही जटील प्रश्न निर्माण झाले. प्रादेशिक साहित्यातून ऱ्हासमान पर्यावरणासंबंधीचा प्रश्न चित्रित झालेला आहे. नष्ट होऊ घातलेल्या पर्यावरणाची कल्पना यातून येते. हरितक्रांतीच्या हेतूने किंवा नव्या मानवी जैविक गरजांच्या परिपूर्तीसाठी जाणीवपूर्वक प्राणिजात व पादपजात भूरपे आणि यांचा ऱ्हास होत आहे. एक जुने पर्यावरण सर्वांगासह नाहीसे होत चालले आहे. या प्रादेशिक भू-वैशिष्ट्यांबरोबरच प्रामुख्याने प्रादेशिक समाजवास्तवाचा शोधे घेतला आहे. जसे १९९१ साली प्रकाशित झालेल्या विश्वास पाटलांच्या 'झाडाझडती' कादंबरीतून धरणात बुडणाऱ्या एका भूप्रदेशाची विस्तृत व गुंतागुंतीची कहाणी आहे. जांभळी बुद्रुक गाव आणि त्याचा परिसर प्राकृतिक मूल्यांसह नष्ट होत आहे तर सुरेश शिंदे यांच्या 'सर्ज्या' मधून प्राणिपूजेचा ऱ्हास झाला आहे. पश्चिम महाराष्ट्रातील नेहमीच्या दुष्काळामुळे उखडलेपण निर्माण झाले. जानपद जीवनाचा ऱ्हास यातून दिसतो. त्या पार्श्वभूमीवर १९६० ते १९९० या तीन वर्षांतील मराठी कादंबरीच्या आधारे महाराष्ट्राच्या सामाजिक, सांस्कृतिक अंगाचा विचार करावा या उद्देशाने मी विचार करू लागलो. त्यासाठी प्रथम मला प्रदेश म्हणजे काय? प्रादेशिकता म्हणजे काय? आणि प्रादेशिक कादंबरी म्हणजे काय? याचा विचार करणे क्रमप्राप्त वाटू लागले. त्या आधारे संयुक्त महाराष्ट्रातील जीवनसंघर्षाची काही वैशिष्ट्ये आहेत का हे पाहता येईल.

प्रदेश :

प्रदेश म्हणजे प्रांत. जनपद किंवा क्षेत्र होय. किंवा प्रदेश म्हणजे देशाचा एक भाग किंवा प्रांत होय. खेडे आणि शहर दोन्हीही प्रदेशच आहेत, भूभागच आहेत. परंतु येथे सुधारलेल्या जीवनापासून दूर मागासलेल्या भागास प्रदेश म्हणतात. प्रदेश म्हणजे स्वयंपूर्ण जग, निसर्गाच्या कुशीत या जीवनाचा जन्म होतो. म्हणजेच विशिष्ट भूभागावरील विशिष्ट निसर्ग असलेला व मानवी जनजीवनावर प्रभाव गाजविणारा प्रभावी घटक म्हणजे प्रदेश होय. हा प्रदेश लेखकाच्या संवेदनशीलतेवर परिणाम करतो. थोडक्यात, शहरी संस्कृतीपासून, औद्योगिकी-करणापासून दूर असलेल्या प्रांताला, भागाला प्रदेश म्हणता येईल. पेठ, कसबा किंवा शहराच्या जवळ वाढणाऱ्या झोपडपट्टीला प्रदेश म्हणता येणार नाही. कारण तेथे विशिष्ट निसर्गाची पार्श्वभूमी लाभलेली नसते. लोकसंस्कृतीही एक नसते; त्यामुळे झोपडपट्टी जीवन चित्रण करणाऱ्या कादंबरीचा समावेश प्रादेशिक कादंबरीत करता येत नाही.

प्रादेशिकता :

प्रादेशिक हे विशेषण नाही. प्रदेश मूलभत घटक किंवा नायक असतो. प्रादेशिकतेत विविध घटकांचा समावेश होतो. प्रादेशिकतेचे पुढील तीन घटक आहेत. १. भू-वैशिष्ट्ये २. निसर्ग ३. समाजजीवन. याप्रमाणेच समाजजीवनाचे विविध उपघटकही आहेत. ते पुढीलप्रमाणे - १) राजकीय जीवन २) सांस्कृतिक जीवन ३. आर्थिक जीवन आणि ४. शैक्षणिक जीवन ५. घटना, प्रसंगी, व्यक्ती आणि कुटुंब विशेष ६) भाषाविशेष.

सामूहिकता, प्रातिनिधिकता आणि सांस्कृतिक जीवन यांना प्रादेशिकतेत महत्त्वाचे स्थान आहे. प्रादेशिक बोलीभाषा, निसर्ग, व्यक्ती आणि समाज यांच्या परिभाषांतून प्रादेशिकता आकार घेते. थोडक्यात, विशिष्ट प्रदेशांतील निसर्ग चित्रण म्हणजे प्रादेशिकता नव्हे तर इतर घटकांचा प्रादेशिकतेत अंतर्भाव होतो. ते घटक पुढीलप्रमाणे : १) भू-प्रदेशनिसर्गाचे सृष्टीचे चित्रण २) समूहमनाचा गजर ३) सांस्कृतिक, सामाजिक, राजकीय, धार्मिक वातावरण ४) समग्र व परंपरायुक्त जनजीवन ५) लोकसंस्कृतीच्या अधिक जवळ आणि प्रातिनिधिक पात्रांना स्थान ६) विशिष्ट बोलीभाषा ७) उपजिविकेचे साधन ८) समान मानसिकता हे सर्वच घटक एकाच वेळी प्रादेशिक कादंबरीत येतीलच असे नाही. आशयानुरूप त्यांचा नकळत वापर होत असतो. प्रादेशिक कादंबरी म्हणजे केवळ प्रदेश चित्रण नव्हे तर वर उल्लेख कलेल्या घटकांचे रसायन होय.

प्रादेशिक कादंबरी विशिष्ट स्वरूपाच्या प्रदेशाला अधिक महत्त्व देत असते. प्रादेशिक कादंबरीत प्रदेश पात्र म्हणून वावरतो. त्यामधील जीवन प्रातिनिधिक असते. प्रदेशातील परिस्थती, त्यातून साकार झालेल्या मनाचा आविष्कार ती करीत असते. समाजजीवनाचे नियमन किंवा अप्रत्यक्ष केंद्राचे नियंत्रण प्रदेश

करतो. उदा. मधुकर वाकोडे यांच्या 'झेलझपाट' कादंबरीमध्ये मेळघाट या विदर्भातील कोरकूंच्या जीवन व प्रदेशाचे चित्रण दिसते. त्याप्रमाणेच सरकारी धोरणांचा विपरित परिणामही स्पष्ट दिसतो. शेती, शिकार, लाकूड, मोहफुलांची विक्री करून उदरनिर्वाह करणारे कोकरूंची टायगर प्रोजेक्टने जीवनशैलीच नष्ट केली. प्रदेश पार्श्वभूमी म्हणून येत नाही तर तो तेथील घटना, अनुभव, पात्र, संस्कृती यांच्याशी एकरूप होऊन अवतरतो. एकात्म आणि कलाप्रदर्शन येथे अभिप्रेत आहे. म्हणजेच समूहमनाचा आविष्कार किंवा सामूहिक स्वरूपाच्या गजरांची येथे अपेक्षा असते. प्रदेश नियंत्रणाला लोकजीवन साकार होते. लोकजीवनाचा आविष्कार होतो. लोकजीवन प्रदेशाचा रंग घेऊन येते. लोकजीवन प्रदेशाने बंदिस्त केलेले असते. प्रदेशाचे चैतन्य आणि समाजजीवनातील चैतन्य आणि सौंदर्य एकरूप होऊन अवतरते. निसर्ग चित्रणाच्या अधिष्ठानावर सामाजिक आणि सांस्कृतिक स्वरूपाचे दर्शन अभिप्रेत असते. सशक्त स्वरूपाचा प्रदेश, माणूस, संस्कृती, भाषा, निसर्ग, रितिरिवाज यांच्या परिपाकातून एकात्म स्वरूपाचे प्रादेशिक साहित्य जन्मते.

मराठी कादंबरीच्या विकासाबरोबर प्रादेशिकतेविषयीच्या विचारातही बदल झाला. मराठी कादंबरीतील प्रादेशिकतेबाबत बाळसे आले. प्रादेशिकता केवळ कादंबरीचा साज किंवा विशेषण नव्हे तर अविभाज्य अंग म्हणून मराठी कादंबरीत अपरिहार्यपणे आशयानुरूप येऊ लागली. त्यानंतर वि.स. सुखटणकरांनी 'प्रादेशिक' हा शब्द रूढ केला. प्रथम साहित्य आणि नंतर संकल्पना रूढ झाली. बापट-गोडबोले, ल.ग.जोग, डॉ. अ.रा. तोरो, डॉ. द.भि. कुलकर्णी, डॉ. आनंद यादव, स. शि. भावे, म.सु.पाटील, डॉ. मदन कुलकर्णी, डॉ. नागनाथ कोत्तापल्ले, डॉ.द.ता.भोसले, डॉ. रवींद्र ठाकूर, डॉ. रवींद्र शोभणे, पंडित शेटे, शरद घाटे, फ.मु. शिंदे, गो.म.कुलकर्णी, म.पां. कुलकर्णी, पुरुषोत्तम कालभूत यांनी मराठी प्रादेशिक कादंबरीसंबंधी विचार मांडले आहेत. प्रादेशिक कादंबरीचे विविध घटक त्यांनी सांगितले. त्यांच्यात मतभिन्नताही आहे. इंग्रजीत 'रिजनल' किंवा हिंदीतील 'आंचलिक' कादंबरीसंबंधीच्या अभ्यासकांच्या विचारातही मतभिन्नता आहे. प्रदेश म्हणजे काय? प्रादेशिकता म्हणजे काय? प्रादेशिक कादंबरी म्हणजे काय? प्रादेशिकतेचे कृत्रिम आणि अस्सल असे दोन प्रकार करता येतील का? प्रादेशिक कादंबरीचे मुख्य घटक कोणते? प्रादेशिक कादंबरीच्या प्रेरणा कोणत्या? प्रादेशिक हे विशेषण की अंगभूत घटक आहे? नागर पार्श्वभूमीवरील किंवा नागर प्रदेशातील कादंबरीचा समावेश प्रादेशिक कादंबरीत करणे उचित होईल काय? प्रादेशिक कादंबरीत निसर्ग, भू-प्रदेश आणि बोलीभाषेला महत्त्व का दिले जाते? जातिजमातींचे जीवनचित्रण करणाऱ्या कादंबऱ्यांचा समावेश प्रादेशिक कादंबरीत करणे शक्य आहे का? प्रादेशिक कादंबरीत प्रातिनिधिकतेला, व्यक्तीपेक्षा जीवन चित्रणाला आणि लोकसंस्कृतीला महत्त्व का देते? यांसारख्या प्रश्नांबाबत

अभ्यासकांमध्ये मतभेद असलेले दिसतात. काही घटकांबद्दलचे एकमतही दिसते.

विशिष्ट अशा भूप्रदेशातील प्रांतातील जीवनाचे समग्र चित्रणाची अपेक्षा प्रादेशिक कादंबरी करते. प्रादेशिकतेत विविध घटकांचा अंतर्भाव होतो. शहरी पार्श्वभूमीवरील कादंबरीला प्रादेशिक कादंबरी म्हणणे योग्य होत नाही. किंवा पार्श्वभूमी म्हणून येणाऱ्या निसर्गप्रदेशाचे चित्रण करणाऱ्या कादंबरीलाही प्रादेशिक कादंबरी म्हणता येणार नाही. उलट, विशिष्ट यंत्रयुगापासून दूर असलेल्या जीवन चित्रणाला किंवा जाती, जमातींच्या चित्रणाचा प्रादेशिक कादंबरीत समाविष्ट करता येईल.

प्रादेशिक कादंबरी प्रातिनिधिकतेला, समूहमनाच्या गजराला, अपरिहार्य निसर्गाला, लोकभाषेला सामान्य माणसाच्या भावभावनांच्या चित्रणाला महत्त्व देते. त्याशिवाय प्रादेशिक कादंबरी अपूर्ण राहू शकते. प्रदेश किंवा निसर्ग उपरा न ठेवता अंगभूत घटक, पात्र म्हणून येतो. या साहित्याच्या प्रेरणाही वर्तमान वास्तववादी आहेत. विश्वव्यापी रोमँटिक चळवळींची अभिव्यक्ती आणि सामान्य माणसाला अग्रस्थान या प्रकारच्या कादंबरीची प्रेरणा आहे.

प्रादेशिक कादंबरीची उपरोक्त विवेचनाच्या आधारे पुढीलप्रमाणे व्याख्या करता येईल.

''उद्योगप्रधान संस्कृतीपासून दूर असलेली, विशिष्ट भू-प्रदेशातील निसर्ग, परंपरा, सामाजिक, राजकीय, धार्मिक, आर्थिक, सांस्कृतिक समस्याचे आणि लोकसंस्कृतीचे बोलीभाषेतील वास्तव, अस्सल कलात्मक चित्रणास प्रादेशिक कादंबरी म्हणता येईल.''

१९६० ते ९० मधील प्रादेशिक कादंबरी ही तत्पूर्वीच्या आडगावचे चौधरी (बी. रघुनाथ), भावीण (बा.भ.बोरकर), बळी (विभावरी शिरूरकर), बनगरवाडी (व्यंकटेश माडगूळकर), हद्दपार (श्री. ना. पेंडसे), सराई (र.वा. दिघे), गावगुंड (ग.ल. ठोकळ), पवनाकाठचा धोंडी, पडघवली (गो. नि. दांडेकर) व अन्य कादंबऱ्यांच्या पार्श्वभूमीवर तीस वर्षांत ठळक अशा जवळजवळ दीडशे ग्रामीण प्रादेशिक कादंबऱ्या प्रसिद्ध झाल्या. सर्व कादंबऱ्यांचा विस्ताराने विचार करणे केवळ अशक्य आहे. त्यातील वळणावरच्या निवडक कादंबऱ्यांनी जी नवी दिशा मराठी कादंबरीला बहाल केली त्यांच्या आधारे प्रदेश वैशिष्ट्यांची मांडणी करता येईल. तसेच प्रदेशाचा लोकमानसावरील प्रभावही स्पष्ट करता येईल. साधारणत: लेखक ज्या प्रदेशात जन्मतो, वाढतो, घडतो त्याच्यावर त्या प्रदेशाचे संस्कार झालेले असतात. त्यांचा परिणाम त्याच्या निर्मितीवरही होतो.

**पश्चिम महाराष्ट्र :**

फकिरा, माझा गाव, बारी, देव चालले, माकडीचा माळ, वारणेचा वाघ, टारफुला, गोतावळा, कुणाच्या खांद्यावर, इजाळ, चौंडक, कागूद आणि सावली, पाचर इत्यादी कादंबऱ्यांतून चित्रित झालेला प्रदेश हा देश किंवा घाटावरचा प्रदेश म्हणून ओळखला जातो. कोल्हापूर, सातारा, सांगली, नाशिक, नगर, सोलापूर

इत्यादी जिल्ह्यांचा समावेश होतो. हा माणूस भाविक तसाच रांगडा, कष्टाळू, शूर, लढवैय्या आणि मुजोर आहे. तो पंढरीच्या विठ्ठलाचा भक्त आहे. तसाच खंडोबा, जोतिबा, यल्लमा, अंबाबाई, भैरोबाचा भक्त आहे. नेहमीच्या दुष्काळसदृश्य परिस्थितीमुळे देशावरील माणूस उपजिविकेसाठी मुंबईसारख्या महानगरात जातो किंवा साखर कारखान्यांवर ऊस तोडणीसाठी नगरी माणूस स्थलांतर करतो. तसेच देशावरचा शेतकरी शेतावर घर करून राहतो. याचे कारण तो अल्पभूधारक भूमिहीन शेतमजूर आहे. त्यामुळे शेतीतून अधिक उत्पन्न मिळविण्यासाठी त्याला शेतावर राहवे लागते. या प्रदेशातील घरांची रचना कमी पावसामुळे साधारणपणे पत्रे, सिमेंट किंवा उसाच्या पाचटाचे शाकारलेली छपरे किंवा विटामातीची धाब्याची अशी दिसतात. येथे आदिवासी समाज नसला तरी कोल्हापूरच्या बाजूला आदिवासी आहेत. देवदासी ही सामाजिक संस्थाही येथे असलेली दिसते. येथील लोक लढवय्ये, शूर, पराक्रमी असल्याने आणि प्रतिकूल निसर्गामुळे त्यांचे सैन्यात भरती होण्याचे प्रमाण अन्य प्रदेशाच्या तुलनेत सर्वाधिक आहे. देशावरचा दलित महार हा बलुतेदार असतो. परंतु मांग हा सनदशीर शिपाई असतो. देशावरचा माणूस झटपट परिवर्तनाला सामोरा जातो. इंग्रजांच्या राजवटीत देशावरील दलितांनी झटपट ख्रिस्ती धर्म स्वीकारल्याचे दिसते किंवा यंत्रयुगामुळे येथे शेतमजुरीचा प्रश्न निर्माण झाला. या प्रदेशाची स्वतंत्र बोली आहे. ती कोल्हापुरी, सातारी, पुणेरी आणि नगरी या उपप्रकारांनी दृष्टीस पडते. भजनाच्या वेळी देशावर टाळ, मृदुंग. वाजविले जातात असे दिसते. मुंबई-पुण्याच्या प्रभावामुळे आणि कर्मवीर भाऊराव पाटलांच्या कार्यामुळे शिक्षण आणि जागृतीस येथे अगोदर सुरुवात झाली. त्याचा परिणाम म्हणून आधुनिकीकरणाचे वारे येथे लवकर आले. स्वातंत्र्योत्तर काळातील शिक्षण प्रभावामुळे, साहित्यनिर्मितीही येथे अधिक वास्तववादी बनली. मोडकळीस आलेला गावगाडा, कुळकायदा, उपेक्षितांचे जीवनचित्रण, भ्रष्टाचार यांसारखे नवे जीवन अधिक यथार्थपणे निवेदन संवादांसह बोलीभाषेत आलेले दिसते.

**कोकण :**

गारंबीचा बापू, 'हद्दपार' श्री. ना. पेंडसे, 'पडघवली' गो.नि.दांडेकर, 'सर्राद', 'आई आहे शेतात' र.वा.दिघे, 'सारे प्रवासी वडीचे' जयवंत दळवी, 'इंधन' हमीद दलवाई आणि 'भाकरी' व फूल' यांसारख्या निवडक कादंबऱ्यांच्या आधारे कोकणी जीवनाची काही ठळक वैशिष्ट्ये जाणवतात. रत्नागिरी, सिंधुदुर्ग, रायगड, ठाणे या समुद्र किनाऱ्यालगतच्या आणि घाटमाथ्यावरील प्रदेशाचा समावेश होतो. येथील प्राकृतिक वैशिष्ट्यांचा परिणाम या लोकजीवनावर निश्चितच झालेला आहे. डोंगराळ प्रदेशातील हा मानव समाज कष्टाळू, काटक, काटकसरी, मवाळ, कोर्टकज्ज्यांत रमणारा, पाटपाण्यासाठी भांडणारा, कष्टाळू, आणि भ्याड भित्रा आहे. खळनाथ, परशुराम, दुर्गेश्वर, व्याघ्रेश्वर, मंगेशा, एकवीरादेवी, कोकणी

माणसांची श्रद्धा आहे. अतिवृष्टी होऊनही अल्पशा शेतीवर उपजिविका करणारा होत नाही तसेच उन्हाळ्यात पाण्याचा अभाव असतो; त्यामुळे या लोकांचे मुंबईसारख्या महानगरात जाण्याचे प्रमाण अधिक आहे. पुरुष वर्ग शहरात जाण्याचे प्रमाण अधिक असल्याने व जंगली श्वापदांपासून संरक्षण व्हावे म्हणून येथील स्त्री-पुरुष संघटितरित्या गावात किंवा वाडीत एकत्र राहतात. अतिवृष्टीमुळे येथे उतरत्या छपरांची कौलारू किंवा खापरी घे दिसतात. आदिवासी समाजही येथे मोठ्या प्रमाणावर असून त्यांची जीवनशैली, वैशिष्ट्यपूर्ण आहे. दलित महार समाज कोकणातला मानकरी असतो. तो परिवर्तनाला सामोरे जाण्याचे टाळतो. असे दिसते. अन्यायाविरुद्ध आवाज उठविला जाण्यासाठी बौद्ध धर्म स्वीकारण्यात कोकणी दलितांनी टाळाटाळ केलेली दिसते. कोकणी, मालवणी अशा स्वतंत्र बोली ठळकपणे जनरेस भरतात. भजनांच्या वेळी हे लोक नाल, मुदृंग, चकवे ही वाद्ये वाजवितात असेही वेगळेपण दृष्टीस पडते. मुंबईशी असलल्लेल्या संपर्कामुळे शिक्षण प्रसार आणि जागृतीचे प्रमाण सर्वाधिक दिसते. कोर्टकचेऱ्यांच्या बाबतीत ते सर्वांत पुढे असतात. तसेच नोकरी-धंद्यांच्या निमित्ताने त्यांनी गाव सोडल्यामुळे गाव ओस पडते. एक मात्र स्पष्ट दिसते की, साहित्यातून प्रदेश चित्रणाला सुरुवात ही खऱ्या अर्थाने येथील लेखकांनी केली हेही स्पष्ट दिसते. तरीही नजीकच्या काळात मधु मंगेश कर्णिकांनंतर कोकणातून नवीन लेखक पुढे आलेला दिसत नाही.

**विदर्भ :**

'धग' (उद्धव शेळके), 'हाल्या हाल्या दुधू दे' (बाबाराव मुसळे), 'मेड इन इंडिया' (पुरुषोत्तम बोरकर), 'झेलझपाट' (मधुकर बाकोडे) च्या आधारे विदर्भाचे वेगळेपण पाहता येते.

वर्धा, अमरावती, नागपूर, अकोला, गडचिरोली, चंद्रपूर, मेळघाट हा प्रदेश डोंगराळ आणि औद्योगिकीकरणाचा अभाव असलेला आदिवासींचा आहे. निजामी राजवटीचा प्रभाव येथील लोकजीवनावर झालेला दिसतो. हे लोक अधिक श्रद्धाळू, आळशी तितकेच दिलदार प्रेमळ आहेत. मागासलेपण आणि शिक्षणाचा अभाव यामुळे त्यांचे अधिक शोषण झाले आहे. सरंजामदारांचा मुजोरपणा जसा येथे दिसतो, त्याउलट आदिवासींचे दारिद्र्यही दिसते. विदर्भातील लोकांची सादिलबुवा, महादेव, बहिरण आणि अन्य स्थानिक देवता तसेच नागदेवतांवर आदिवासींची श्रद्धा असलेली दिसते. हे लोकही स्थितिप्रिय आहेत. ते सहजासहजी घर गाव सोडत नाहीत. उपजिविकेसाठी शहराकडे धावत नाहीत. मिळेल त्याच्यात समाधानी असतात. प्रत्येकाला पोटापुरती जमीन असल्यामुळे ते व्यसनाधीन, जुगारी असलेले दिसतात. साधारणपणे गाव, वाडी, वस्तीवर हे एकत्र राहतात. आदिवासी समाज येथे अधिक असून त्यांची स्वतंत्र जीवनशैली असली तरी शासनाच्या धोरणामुळे ती उद्ध्वस्त होऊ लागल्याचे स्पष्ट जाणवते. विदर्भातला माणूस सफाईदार हिंदी

बोलतो, याचे कारण निजामाची राजधानी, हिंदी ही त्यांची राजभाषा होती. त्यामुळे वऱ्हाडी भाषेत हिंदी अधिक येण्याचे निजामाची राजवट आणि मध्य प्रदेशाशी जवळीक ही दोन कारणे सांगता येतील. भजनाच्या वेळी ढोल, पिलमपावे वाजविले जातात, हे येथील खास वैशिष्ट्य आहे. शैक्षणिक जागृतीच्या अभावामुळे स्वातंत्र्यपूर्व काळात साहित्य लेखक झालेले नसले तरी आज नवी चिंतनशील पिढी प्रदेश चित्रण करू लागल्याचे स्पष्ट दिसते. बलुतेदारांचे निरर्थक जिणे, भ्रष्टाचार-शोषण-व्यसनाधीनता, आदिवासींच्या पारंपरिक जीवनशैलीचा ऱ्हास हे या काळातील कादंबरीचे विषय प्रदेशाचे रंग घेऊन अवतरले आहे.

**मराठवाडा :**

'पाचोळा' रा.रं. बोराडे, 'गांधारी' ना. धों. महानोर, 'दूर राहिले घर' लक्ष्मीकांत तांबोळी, 'गणगोत' गणेश आवटे, 'विषवृक्षांच्या मुळ्या', वासुदेव मुलाटे, या कादंबरीच्या आधारे परामर्श घेता येईल. यवतमाळ, परभणी, नांदेड, लातूर, बीड, उस्मानाबाद, औरंगाबाद हा काळ्या कसदार जमिनीचा सपाट प्रदेश वैशिष्ट्यपूर्ण आहे. संतांची भूमी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या प्रदेशातील लोक अधिक श्रद्धाळू, अंधश्रद्ध आणि आळशी आहे. निजामी राजवटीच्या प्रभावाखाली त्यांची मानसिकता घडल्याचे दिसते. मागासलेपणा आणि दबलेले दिसतात. सुबत्तेमुळे ते सुखवस्तू आणि चैनी असल्याचेही दिसते. जलसे, दौलतजादा यामध्ये ते रमतात. याचे कारण निजामी राजवटीतील विलासी वृत्ती हेही स्पष्ट आहे. प्रत्येकाला उपजिविकेसाठी शेती असल्याने शेतमजुरांची संख्या कमी असलेली दिसते. त्याप्रमाणे धनिक सरंजामदारांचा मुजोरपणाही दिसतो, असे असले तरी हे लोक स्थितिप्रिय आहेत. हे सहजासहजी घर गाव सोडत नाहीत. उपजीविकेसाठी शहराकडे धावत नाहीत. मिळेल त्याच्यात समाधान मानतात. गावामध्ये ते एकत्र राहतात. शेतावर राहत नाहीत. याचे कारण निजामी राजवटीची दहशत हे सांगता येईल. त्यांची घरे ही दगडमातीची, धाब्याची असलेली दिसतात. तर धनिक सरंजामदारांचे वाडे असल्याचे दिसते. या प्रदेशातील भाषेवर उर्दूचा प्रभाव अधिक दिसतो. तरीही मराठवाड्याला वैशिष्ट्यपूर्ण बोली नाही. तर त्यांची भाषा प्रमाणभाषेच्या अधिक जवळ जाणारी आहे असे दिसते. तसेच शैक्षणिक जागृती उशिरा झाल्याने स्वातंत्र्यपूर्वकाळात हा प्रदेश साहित्यातून अत्यल्पच प्रमाणात चित्रित झाला असून संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापनेनंतर अनेक चिंतनाशील लेखक लिहिते झाले असेही दिसते. बलुतेदारांचे उपेक्षित जगणे, अज्ञानाचा फायदा घेणे, गावठी राजकारणी, श्रद्धाळू माणसांचे केविलवाणे जिणे, सहकारातील भ्रष्टाचार इत्यादी विषय समर्थपणे बोराडे, महानोर, तांबोळी आदी लेखकांनी चितारले आहेत.

**निष्कर्ष :**

पश्चिम महाराष्ट्र, कोकण, मराठवाडा, विदर्भ, प्रदेशातील लोकजीवन विशेषांचा कादंबऱ्यांच्या संदर्भात विचार करत असताना असे लक्षात येते की, या कादंबऱ्यांतून प्रकट झालेली प्रादेशिकता ही त्या त्या लेखकांनी जाणीवपूर्वक प्रकट केली आहे असेच नाही. कादंबरीकार हा एक ललित लेखक असतो. आणि तो आपली साहित्यकृती निर्माण करीत असताना त्याला आकलन झालेल्या जीवनानुभवाचे स्वरूप त्याच्या अंगी असलेल्या कल्पना सामर्थ्यासह प्रकट करीत असतो. हे करीत असताना काही ठिकाणी वास्तवानुभवापेक्षा कल्पनासामर्थ्य, रंजकता, अतिरंजकता, अद्‌भुतता, चमत्कृतिजन्यता, कल्पनारम्यता, स्वप्नरंजकता यांचाही लेखकाच्या लेखन प्रकृतीनुसार आविष्कार झालेला असू शकतो. तरीही येथे वास्तवजीवनदर्शन, प्रेरणाच दिसते.

चारही स्वाभाविक प्रदेशांची प्राकृतिक रचना वैशिष्ट्यपूर्ण आहे. प्रदेशाचा आणि निसर्गाचा त्या त्या प्रदेशातील लोकजीवनावर परिणाम झालेला दिसून येतो. लोकांच्या वेगवेगळ्या स्वभाव प्रकृतीची मानसिकता घडलेली दिसते. प्रदेशातील राजवटीचा प्रभावही लोकजीवनावर असलेला दिसतो. मराठी कादंबरी प्रदेश चित्रणामुळे आशयदृष्ट्या समृद्ध झाली हे मान्य करूनही बैलगाड्यांच्या शर्यती, रेड्यांच्या टकरी, जागरणगोंधळ, वाघ्या मुरळी यांचे दर्शन घडविलेले दिसत नाही. तसेच ग्रामीण सामाजिक जीवनाचे दर्शन घडविणारे लेखन स्त्री लेखिकांनी केलेले दिसत नाही. संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापनेनंतर पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भातील नवी चिंतनशील पिढी लेखन करू लागली असली तरी मधु मंगेश कर्णिकांनंतर कोकणातून नवीन लेखक पुढे आलेले दिसंत नाहीत. तरी उपेक्षितांचे आदिवासींचे जीवन चित्रणाने प्रादेशिक कादंबरी आणि एकूणच मराठी कादंबरी समृद्ध झाली.

जातिजमातींशी आणि विशिष्ट क्षणांशी निगडित जनजीवनाचे चित्रण करणाऱ्या कादंबऱ्यांचा समावेश प्रादेशिक कादंबरीत करता येईल. त्यानुसार पुढीलप्रमाणे संशोधनाच्या नव्या दिशांनी अभ्यास होऊ शकेल.

१) भाविणीचे जीवनदर्शन घडविणाऱ्या प्रादेशिक कादंबऱ्या भावीण (१९५०) बा.भ. बोरकर, देवकी (१९६२), मधु मंगेश कर्णिक, महानंदा (१९७०), जयवंत दळवी, मालतीगंधा (१९७५) आनंद रेगे.

२) तमाशा कलावंतांचे जीवनदर्शन करणाऱ्या प्रादेशिक कादंबऱ्या : 'वैजयंता' (१९५९), अण्णा भाऊ साठे, 'घुंगरू' (१९७१) शंकर खंडू पाटील, 'नटरंग' (१९८०) आनंद यादव, डाळिंबाचे दाणे, (१८७७), उद्धव शेळके, घरानं तमासगीराचं, शशिकांत तासगावकर, (१९८२).

३) देवदासींचे जीवन नाट्य रेखाटणाऱ्या प्रादेशिक कादंबऱ्या : (१९७३) 'वर आभाळ खाली धरती, महादेव मोरे, 'झुलवा', उत्तम बंडू तुपे, (१९८५)

'चौंडक', राजन गवस.

४) आदिवासी जनजीवनावरील तीन कादंबऱ्या.

(१९८५) डांगाणी, अनिल सहस्त्रबुद्धे, (१९८८) 'झेलझपाट', मधुकर वाकोडे (१९८९) 'हाकुमी', सुरेश द्वादशीवार.

प्रादेशिक कादंबरीचे वाङ्मयीन मूल्यमापन करताना एक गोष्ट स्पष्ट होते की, प्रादेशिक कादंबरीचे पथ्य सांभाळण्याने ती जशी प्रादेशिक ठरते, त्याप्रमाणे मूल्यव्यवस्था म्हणजे कथानक, व्यक्तिरेखाटनही सांभाळते म्हणून ती कादंबरीही आहे कारण तिच्यात मनोरंजनाचे सामर्थ्य आहे. प्रादेशिक कादंबरीदेखील मनाला भिडते. अस्वस्थ करते. मानवी भावभावनांचे दर्शन घडविते. वास्तववाद, आत्माविष्कार आणि जीवनशोधाची प्रेरणा असलेली प्रादेशिक कादंबरी रंजक आहे. तिच्यातही रहस्यमयता, गूढता, सूचकता असलेली दिसते. प्रादेशिक कादंबरी प्रदेश विशिष्ट समूहजीवन, चित्रणाला अधिक महत्त्व देते. विशिष्ट प्रदेशातील सुखदु:खे, समस्या, संस्कृती, निसर्गावलंबी जीवन यांचे दर्शन कादंबरीकार घडवितात. वेगळ्या समस्या, निसर्गवर्णने, बोलीचा अनुभवाचा अपरिहार्य भाग माध्यम म्हणून केलेला वापर, नावीन्य यामुळे मनोरंजन होते. तळाच्या उपेक्षित अस्पृश्यांच्या समस्याही चित्रित होतात. त्यातूनही मनोरंजन घडते. सत्यशिवांमुळे प्रादेशिक कादंबरीला सौंदर्य कलात्मकता लाभलेली दिसते. १९९६ नंतरच्या कादंबऱ्यांतून पूर्वसूरींच्या कादंबरीपेक्षा अधिक समाजाभिमुखता, वास्तवाभिमुखता दिसून येते. तसेच या कादंबरीमध्ये कोणी एक नायक असला तरीही खरे नायकत्व त्यातील चिंतनशील सामाजिक मनाला असते. या कादंबरीत खलनायकाच्या रूपात एखादी व्यक्ती नसते तर काहीएक परिस्थिती, प्रवृत्ती किंवा नियती असते आणि त्यासाठी कादंबरीत लेखकाने संघर्ष उभा केलेला असतो. प्रादेशिक जीवनाची ओळख वाढविणारी १९६० ते १९९० या काळातील 'कादंबरी' ही वैशिष्ट्यपूर्ण आहे. काळ आणि जीवनाचा विशालपट या कादंबऱ्यांतून होतो. बदलत्या काळात सुधारणा होत असतानाच नव्या समस्याही निर्माण होतच आहेत. हरितक्रांतीच्या प्रेरणेतून धरणग्रस्तांचा प्रश्न, दुग्धव्यवसायाच्या निमित्ताने बैलांच्या अस्तित्वात निर्माण झालेला धोका, सपाटीकरणामुळे होत असलेली वृक्षतोड, आणि त्यातून पशुपक्ष्यांच्या स्वाभाविक जीवनाला लागलेला सुरुंग, बलुतेदारांचे उखडलेपण, रासायनिक खते, कीटकनाशकांच्या वापरामुळे जमीनपाण्यात झालेला बदल असे नवे प्रश्न लेखकांना आव्हान देतील, तोपर्यंत वैशिष्ट्यपूर्ण प्रादेशिक कादंबरी लिहिली जाईल.

# ग्रामीण कादंबरीतील मराठा स्त्रीचे चित्रण

ग्रामीण, दलित, स्त्रीवादी, जन, देशी, कृषी इ. साठोत्तरी प्रमुख साहित्यप्रवाह असले तरी स्वातंत्र्यपूर्वकाळातही त्यांच्या काही पाऊलखुणा दिसतात. विशेषत: ग्रामीण साहित्याच्या स्वातंत्र्यपूर्व ते २००० पर्यंतच्या कादंबरीतील स्त्रीचित्रण आणि त्यातील मराठा स्त्रीच्या चित्रणाचे स्वरूप येथे अभिप्रेत आहे, त्यानंतरचे चित्रण मात्र बदलत गेल्याचे चित्र दिसते. त्याचा परामर्श क्रमाने पुढे यथावकाश घेतला जाईल. या शोधनिबंधात साधारणपणे २००० पर्यंतच्या ग्रामीण कादंबरीतील मराठा स्त्रीचे चित्रण एवढी मर्यादा घातली आहे. त्यासाठी काही प्रातिनिधिक कादंबऱ्या उदाहरणादाखल अभ्यासल्या असून महाराष्ट्रातील प्रमुख पश्चिम महाराष्ट्र, कोकण, मराठवाडा आणि विदर्भातील ग्रामीण कादंबरीतील 'स्त्री'चित्रणाचा विचार केला आहे.

पश्चिम महाराष्ट्र मुळातच क्रांतिकारक, विकासाच्या योजना, राजकीय, सामाजिक आर्थिक वर्चस्वाचे केंद्र असले तरी स्वातंत्र्यपूर्वकाळ ते आजपर्यंतची स्त्री 'मुकी'च आहे. तिच्या भावभावनांचे चित्रण तितक्या समर्थपणे झालेले दिसत नाही. ती कष्टाळू, संसारदक्ष, संस्कारक्षम, श्रद्धाळू, घरसर्वस्व मानणारी, पतिनिष्ठ, दबलेली, उपेक्षित अशीच ग्रामीण कादंबरीतून चित्रित झाली आहे. याचे कारण समाजवास्तवात दिसते. समाजाचे प्रतिबिंब साहित्यात उमटते, साहित्य हा समाजजीवनाचा आरसा आहे. हे मान्य केल्यानंतर ते मराठी स्त्रीजीवन चित्रणाबाबत सार्थ वाटते.

पश्चिम महाराष्ट्रीय जीवनातील 'स्त्री' चित्रणाचा परामर्श घेताना ना. वि. कुलकर्णी यांच्या 'कसे दिवस जातील' (१९२५) या कादंबरीचा जाणीवपूर्वक विचार करावा लागतो. महात्मा गांधी यांच्या विचारांच्या प्रभावातून त्यांनी लेखन केले असले तरी 'खेड्याकडे चला' असे सुचविताना कादंबरीकार 'स्त्री'चित्रण ही दुय्यमत्वाच्या वास्तवातून साकारतात. सावकाराने जमीन व गावकऱ्यांनी घर हस्तगत केल्यानंतर दुष्काळात जगण्यासाठी मुंबईला जाणाऱ्या कुटुंबातली ही परवड आहे. या कादंबरीतील संवेदनक्षम, रखमा रूपवान, गुणवान पती परमेश्वर मानणारी, फुटक्या नशिबाला दोष देणारी आहे. शोषित, सहनशील, कष्टाळू, नम्र, श्रद्धाळू असली तरी देशावरील मोकळ्या वातावरणातील रखमा शहरात मरणप्राय दु:ख भोगते. व्यसनी नवरा, बहकलेला मुलगा यांचा सांभाळ करण्यासाठी ती खाणावळ चालविते.

'शिपाई' (१९२५) ही ना. वि. कुलकर्णी यांची दुसरी महत्त्वाची कादंबरी आहे. निराबाई ही खेड्यातील निराधार, बाणेदार, सोशीक, परिस्थितीला सामोरी जाणारी, आशावादी स्त्री आहे. नवऱ्याच्या मृत्यूच्या बातमीने गळ्यात धोंडा बांधून विहिरीत जीव देणारी, प्रेमळ, निष्पाप गजरा तर मऱ्हारीची खंबीर विधवा आजी ही एक महत्त्वाची व्यक्तिरेखा आहे. मंजुळा देखणी, सालस मुलगी आहे.

र. वा. दिघे यांनी 'पाणकळा' (१९३९), 'सराई' (१९४३), 'निसर्गकन्या रानजाई' (१९४६), 'गानलुब्धा मृगनयना' (१९५६) , 'आई आहे शेतात' (१९५६), 'पड रे पाण्या' (१९५८), 'कार्तिकी' (१९६९) या कादंबऱ्या लिहिल्या आहेत. 'पाणकळा'मध्ये गहिनाजीची सुंदर बायको पारू ही पतिनिष्ठ आहे. रंगेल रंभाजीचा तिच्यावर डोळा आहे, तरीही त्यांच्या श्रीमंतीला न भाळता ती गरिबीतही समाधान मानते, भुजाबाची बायको जानकीप्रमाणेच ती खानदानी, मर्यादाशील व कष्टाळू स्त्री आहे. त्यांच्या इतर कादंबऱ्यांतील मराठा स्त्रीचे असेच चित्रण येते.

ग. ल. ठोकळांनी 'गावगुंड' (१९४६), 'ठिणगी' (१९६३) आणि 'टेंभा' (१९८२) या कादंबऱ्या लिहिल्या आहेत. पिसाळ फौजदाराची मुलगी 'लीला' ही खानदानी ताठा असलेली तर 'पारू' ही गुणाजीची बायको ग्रामीण मराठा स्त्रीचा अस्सल नमुना आहे. ग्रामीण संस्कृतिपरंपरा यांचे मिश्रण तिच्या व्यक्तिमत्त्वात आढळते, माहेर सासरबद्दल अभिमान बाळगणारी ही खानदानी निर्मळ मनाची स्त्री आहे.

म. भा. भोसले यांनी 'समरांगण' (१९४१), 'उघड्या जगात' (१९४७), 'एका आईची लेकरं' (१९५१), 'घसरगुंडी' (१९६३), 'कायापालट' (१९६६) या कादंबऱ्या लिहिल्या आहेत. त्यांच्या 'उघड्या जगात' या कादंबरीतील काकासाहेब सावकाराची मुलगी चंद्रा आपले मुके प्रेम सखाराम या तरुणास अर्पण करते. चंद्राची आई सावित्रीबाई प्रेमळ आहे. शोषित, बलात्कारित, सहनशील हौशा व तिची विधवा आई सारजा यांचेही चित्रण कादंबरीकाराने केले आहे. स्त्रीचे शोषण हे ग्रामजीवनाचे अविभाज्य अंग तत्कालीन परिस्थितीत कादंबरीकाराने चित्रित केले आहे. गरीब श्रीमंत कोणत्याही घरातील स्त्रीला मूक वेदना सोसाव्याच लागतात, आजही त्यात फरक पडला असे दिसत नाही.

विभावरी शिरूरकरांची 'बळी' (१९५०) मध्ये प्रकाशित झाली. विषय आणि जीवनचित्रणाचे स्वरूप वेगळे असले तरी आबाची आई 'चांगुणा' ही मुलांना जगविण्यासाठी इंग्रज सोजिरापुढे आपली हाडे टाकते, यातून तिची कुटुंबवत्सलता दिसते. व्यभिचाराचा येथे लवलेशही नाही. गो. नि. दांडेकर यांची 'पवनाकाठच्या धोंडी' ही एक महत्त्वाची कादंबरी आहे. 'सारजा' ही धोंडी हवालदाराची मर्यादाशील, परंपराप्रिय, सोशीक पत्नी तर कोंडीची बायको 'सरू' हीदेखील प्रेमळ, समंजस, सोशीक आहे. धोंडी-कोंडीचा संघर्ष येथे महत्त्वाचा असल्यामुळे

सारजा, सरू या स्त्रियांना दुय्यमस्थानीच लेखकाने ठेवलेले दिसते. व्यंकटेश माडगूळकरांनी 'बनगरवाडी' (१९५५) मध्ये धनगरांचे भावविश्व रेखाटले असले तरी त्यातील अंजी, शेकू या मराठमोळ्या, कष्टाळू, भोळ्या, श्रद्धाळू, निष्पाप अशा रेखाटल्या आहेत. त्यांचे जगणे-वागणे कारभाऱ्यावरच अवलंबून आहे, तसेच अण्णा भाऊ साठे, 'फकिरा', 'वारणेचा वाघ', आणि इतरही कादंबऱ्यांमधून मराठा स्त्रीचे चित्रण करताना दिसतात. ग्रामजीवनातील स्त्रियांचे स्थान दुय्यमच असल्याचे यातूनही दिसते. 'फकिरा' हिरो ठरतो, पाटील-कुलकर्णी यांच्या भावभावना रेखाटल्या असल्या तरी 'स्त्री' चित्रणाचा अभावच आहे, तर 'वारणेचा वाघ' मधून सोना, सुगंधा, सुभद्रा, सई, बणबाई यांनाही गौणस्थानीच ठेवलेले दिसते.

रणजित देसाई, 'बारी' (१९५९), 'माझा गाव' (१९६०), 'समिधा' (१९७९) पैकी 'माझा गाव'मधून स्वातंत्र्यपूर्व काळातील खेडे चित्रित केले आहे. येथेही स्त्रियांना दुय्यमत्व बहाल केले आहे. नीतिमत्तेची चाड असलेल्या 'काळी', 'उमा' चित्रित केल्या आहेत. काळी ही सौभाग्याचे मरण मागणारी तर 'उमा' ही खानदानी मराठा घरातील स्त्री पतीच्या रंगेलपणावर पांघरून घालण्याचा प्रयत्न करते, दिरावर आईप्रमाणे माया करते, सत्त्वशील घराण्याची प्रतिष्ठा जपणारी, प्रेमळ व आज्ञाधारक, सुसंस्कृत आहे. शंकर पाटील यांनी 'टारफुला' (१९६४) मधून सुभानराव पाटलाची विधवा, निपुत्रिक पत्नी पाटलीणबाई चित्रित केली आहे, तर दि. बा. मोकाशी यांनी 'स्थळयात्रा', 'देव चालले' (१९६१) 'पालखी', 'आनंद ओवरी' या कादंबऱ्या लिहिल्या आहेत. 'देव चालले'मधील बालविधवा सीताकाकू पुतण्यांवर प्रेम करणारी, मायाळू, समजदार व श्रद्धाळू आहे. प्रेमाचा एकएक धागा जोडला, सर्व धागे निसटले. शेवटी 'देवा'चा धागा निसटल्याने ती अस्वस्थ, उदास होते, वृत्तीने कणखर असूनही तिच्या श्रद्धेला तडा गेल्याने ती विफल होते.

आनंद यादवांच्या 'एकलकोंडा' (१९५९), गोतावळा, (१९७१), 'नटरंग' (१९८०), 'झोंबी' (१९८७), 'नांगरणी' (१९९०), 'धडंभिंती' (१९९२) इतर कथा कादंबऱ्या लिहिल्या आहेत. स्वत:ची आई, आणि ग्रामीण स्त्रिया व त्यांच्या कथा-कविता, कादंबऱ्यांच्या केंद्रस्थानी आहेत, 'गोतावळा'मध्ये रामू सोनवडे यांची बायको आणि मुलगी यांचे अस्पष्ट चित्रण येते. कारण मुळात ग्रामजीवनात स्त्रीचे स्थानच अनुल्लेखनीय, दुय्यम असते; त्यामुळे या व्यक्तिरेखा ठसठशीत असणे केवळ अशक्यच आहे. मुलीला स्थळ पाहण्याचा उल्लेख फक्त येतो, तिचे रंगरूप, भावभावना, इच्छा, आकांक्षा लेखक चित्रित करीत नाही. अर्थात नारबाचे भावविश्व अधोरेखित करणे हेच त्यांना अभिप्रेत आहे, हेही लक्षात घ्यावे लागते.

उत्तम बंडू तुपे यांच्या 'इंजाळ' (१९८४), 'झुलवा' (१९८६), 'काळोखी' (१९८८), 'खाई' (१९८८), 'चिपाड' (१९८९), 'खुळी' (१९९१), या सहा

कादंबऱ्या आहेत. गाव आणि शामा त्यांच्या इंजाळ कादंबरीत केंद्रस्थानी असल्यामुळे त्याची आई पुतळा, पत्नी जगी, लता–आशा या मुली, शांता, सीता, जमनी या बहिणी या गौणस्थानी आहेत. बा. ग. केसकरांच्या 'कुणाच्या खांद्यावर' (१९८४) या कादंबरीच्या केंद्रस्थानी सहकारी साखर कारखानदारीतील शोषण असल्यामुळे मल्हारीची बायको सुरवंता वहिनी या ऊसतोडणी मजूर स्त्रियांचे चित्रण स्वाभाविकपणे दुय्यमस्थानी जाते. श्रमाच्या पलीकडे त्यांना जग नाही. सुरवंता स्वतंत्र होण्याचा प्रयत्न करते, न्याय–अन्याय तिला समजतो, तिचीही वाताहत केसकरांनी रेखाटली आहे. या कष्टाळू बाया 'सांगितल्या कामाच्या आणं दिल्या भाकरी लुगड्याच्या धनी' असे स्वत:ला समजतात, आपले शोषण होते याचे त्यांना भान नाही, कारण साहित्य हा समाजाचा आरसा, प्रतिबिंब आहे, जे समाजवास्तव तेच साहित्यात आविष्कृत होते; त्यामुळे अशा वाताहत झालेल्या प्रातिनिधिक 'सुरवंता'च सर्वच कादंबऱ्यांमधून वावरतात.

राजन गवस 'चौंडकं'मधून जोगतिणीचे भावविश्व चित्रित करतात. सुली, बायजडा, शेवंता, गंगूबाई, तानु, फुली या देवदासी जोगतिणी आहेत, अंधश्रद्धेमुळे स्त्रियांची होणारी समाजमान्य वाताहत येथे केंद्रस्थानी आहे. अज्ञान, देवावरील श्रद्धा, निष्पाप जोगतिणीचा कोंडमारा, देवदासींचे मानसिक शारीरिक शोषण समाजमान्य आहे, हे येथील घटनाप्रसंगांतून अधोरेखित केले आहे. आनंद पाटील 'कागूद आणि सावली'मधून ग्रामजीवनावर भाष्य करतात, येथे नानी, आजी, आई या व्यक्तिरेखा गौणच आहेत. तसेच 'सावली'तील तानू, आंबू, जना या जावा कष्टाळू आहेत. घरातील त्यांचे स्थान नगण्यच आहे, त्यांचा भावनिक कोंडमारा होतो. सोशीक स्त्रियांच्या त्या प्रतिनिधी आहेत. याप्रमाणे रामचंद्र पठारे यांच्या 'पाचर' (१९८९) मधून आधुनिकता आणि जातीय संघर्ष अधोरेखित करताना परिवर्तनकाळात येथे स्त्रीचित्रणाचा अभावच दिसतो.

कोकण–गोव्यासह जीवनचित्रण कादंबरीकारांनी केले असले तरी 'भावीण' व 'पडघडवली'तील स्त्री चित्रणाइतके ठसठशीत स्त्रीचित्रण इतर कादंबऱ्यांमध्ये दिसत नाही. अर्थात 'स्त्री'चित्रण करणे हा उद्देश त्या कादंबरीकारांचा असेलच असेही नाही याकडे दुर्लक्ष करता येत नाही. र. वा. दिघे यांच्या 'सराई'मधील राजसबाई, सुभद्रा, मनोरमा, बय, लाडी आणि 'आई आहे शेतात' मधील नातू सातपुते यांची कष्टाळू आई, बहिष्कृत सगुणा, तिची आई जिजा, बनूताई, पुतळाबाई, या सर्वजणी जिद्दी, कष्टाळू, हिशेबी, खानदानी, प्रेमळ तर राही–रखमा, बायजा, येसूताई, बाबरीबाई या सर्वच गौण व्यक्तिरेखा आहेत.

वि. वा. हडप यांच्या 'अन्नदाता उपाशी' (१९४६) मधील जमना पतिनिष्ठ, सोशीक, कष्टाळू स्त्रीची प्रतिनिधी आहे. लक्ष्मणराव सरदेसाई यांच्या 'मांडवी तू आटलीस?' मध्ये अशोकवर प्रेम करणारी लीना, तसेच हिरा, काकी या धर्मांतरित कुणबी स्त्रिया आहेत. तर 'भावीण' ही बा. भ. बोरकरांची गोमंतकीय

पार्श्वभूमीवरील शेवंता भाविणीच्या आत्मबलिदानाची कथा आहे. रंजना, कमळी या अन्य व्यक्तिरेखा आहेत. त्यांची स्वीकारशीलता, व्यवहारी शहाणपण अधोरेखित करण्याचा प्रयत्न बोरकरांनी केला आहे. 'हद्दपार' ही श्री. ना. पेंडसे यांची कादंबरी आहे. लक्ष्मी ही दवणेप्रभू घराण्यातील विनयवती, घराण्याबद्दल अभिमान असलेली, प्रतिकूल परिस्थितीवर मात करणारी, कामसू, सुस्वरूप आणि प्रेमळ आहे, तर 'गारंबीचा बापू'मधील बंडखोर राधा, व्यभिचारी यशोदा, यमी, मावशी या वेगवेगळ्या मुशीतील स्त्रिया आहेत. गो. नी. दांडेकरांनी 'पडघवली'मधून अंबू वहिनीला निवेदकच केले आहे. श्रद्धाळू, कष्टाळू, सद्वर्तनी अंबू शेवटी अगतिक होऊन मुलांकडे जाण्याचा विचार करते. अक्की, कुशात्या या सामान्य स्त्रिया तर शारदा ही व्यभिचारी रेखाटली आहे. 'सारे प्रवासी घडीचे' मधून जयवंत दळवी यांची नरुची विधवा आई, व्यभिचारी दुर्गाबाय, मणी जपणारी श्रद्धाळू आजी, वामनदाजीची उचापती करणारी बायको, कुरडी बाया, या स्त्रियांचे नगण्यत्वच चित्रणातून दिसते. 'इंधन' कादंबरीतून हमीद दलवाई, हिंदू नवबौद्ध, मुस्लिम संघर्षाचे चित्रण करतात. भाबी आणि लक्ष्मी या श्रद्धाळू तर इतर स्त्रियांचे व्यभिचाराचे चित्रण दलवाई करतात.

'मराठवाडा' हा प्रदेश मुळातच मागासलेला आहे. आजही या प्रदेशाच्या अनुशेषाचा प्रश्न अनुत्तरितच आहे. स्वाभाविकच येथील जीवनाचे चित्रण करणाऱ्या कादंबऱ्यांचा परामर्श घेताना स्त्रियांचे स्थान दुय्यमच असल्याचे दिसते. बी. रघुनाथ हे मराठवाड्यातील महत्त्वाचे कथा-कादंबरीकार, त्यांनी 'आडगावचे चौधरी'मध्ये सरंजामी, जहागीरदारांचे तीन पिढ्यांचे चित्रण येते. स्त्रीचित्रणाला वावच नाही. त्यांच्या घराण्यातील स्त्रीचा विद्रोह करू शकत नाहीत. उघड्या डोळ्यांनी पुरुषांचे रंगढंग पाहतात. वहिनीसारख्या स्त्रिया कुंकवाचे रक्षण करण्यासाठी धडपडतात.

'पाचोळा' ही रा. रं. बोराडे यांची महत्त्वाची कादंबरी, खऱ्या अर्थाने मराठवाड्यातील स्त्रीचे चित्रण कथा कादंबरीतून बोराडे यांनी केले आहे. 'पाचोळा'मधील गंगारामची बायको पार्वती ही प्राप्त परिस्थितीत सुख मानणारी, संसाराची परवड थांबविण्यासाठी धडपडणारी, दूरदृष्टीची, धीरगंभीर, सोशीक, समंजस, मर्यादाशील, प्रेमळ व कष्टाळू रेखाटली आहे. 'आमदार सौभाग्यवती' या कादंबरीतून स्त्रीच्या वाट्याला आलेले सुखदुःख अधोरेखित केले आहे, ती पुरुषप्रधान व्यवस्थेची बळी ठरते. आजही महिला विधेयकास मान्यता मिळत नाही. यातून स्त्रीची उपेक्षाच ध्वनित होते. तसेच ना. धों. महानोर यांनी 'गांधारी'मधून गुलाबबाई, हौसा, जाईबाई, सारजा, शेवंता यांना दुय्यमत्वच बहाल केले आहे. 'गणगोत' या गणेश आवटे यांच्या कादंबरीतून 'आंजू' ही सासूरवाशीण सोशीक, समंजस, संयमी तर तिची रांगडी सासू, अल्लड नणंद सुशाबाई, आंजूची आजारी हतबल आई साकारली आहे. 'विषवृक्षाच्या मुळ्या'मधून वासुदेव मुलाटे यांनी

विश्वनाथ तरटची पत्नी स्मिता प्रेमळ, सुखदु:खात साथ देणारी, तर आई कर्मठ रेखाटली आहे. सुंदर तरुणी माधुरी जोगळेकर चंचल असलेली दिसते.

विदर्भ प्रदेश निसर्गसमृद्ध व आर्थिक मानसिकदृष्ट्या दुर्बल आहे. या प्रदेशातील जीवनचित्रण आहे. या प्रदेशातील जीवनचित्रण करताना स्त्रियांचे चित्रण नगण्यच दिसते. गो. नी. दांडेकरांच्या 'पूर्णामायची लेकरं'मध्ये बयिराम ढोमण्याची आई आलोकाबढी, पत्नी मनकर्णा यासारख्या सरळ, श्रद्धाळू आहेत. त्यात आलोकाबढी कर्तबगार, जहांबाज, हेकट, तर्कट, बडबडी, स्पष्टोक्ती आणि काळ्या आईवर श्रद्धा असणारी, तर मनकर्णा आळशी, झोपाळू खास वऱ्हाडी स्त्रीची प्रतिनिधी आहे. उद्धव शेळके यांच्या 'धग'ची नायिका कौतिक ही कष्टाळू, साहसी, परंपराप्रिय आणि प्रेमळ आहे. 'हाल्या हाल्या दूध दे' या कादंबरीत बाबाराव मुसळे या स्त्री जीवनातील संकटांची मालिका चित्रित केली आहे. आनसा व्यवहारी, सोशीक, समजदार, शहाणी, खानदानी, निष्ठावान, कष्टाळू, सरळमार्गी तर सोबा ही नैतिकता जपणारी, शालीन, निष्पाप, अबोल, खचलेली आईवडलांच्या गैरमर्जीस कारण ठरलेली, सरळमार्गी, विरहव्याकूळ आहे. पुरुषोत्तम बोरकरांच्या 'मेड इन इंडिया'मध्ये राजकारणाचा वारसा असलेल्या कुटुंबातील स्त्रियांना दुय्यमत्व बहाल केले आहे. प्रतिमा इंगोले यांनी 'बुढाई' आणि 'पार्टटाईम' मधून 'स्त्री' चित्रण प्रभावीपणे केले आहे.

**निष्कर्ष :**

१. विषय विवेचनासाठी निवडलेल्या ग्रामीण कादंबऱ्या या मराठी स्त्रीचे चित्रण करण्यासाठी लिहिलेल्या आहेत असे नाही.

२. जाणीवपूर्वक स्त्रीचित्रणाचा कादंबरीकारांचा उद्देशही नाही, जीवनानुभवाचा अपरिहार्य भाग म्हणून स्त्रीचित्रण येते.

३. लेखकाने केले जीवनानुभवांचे चित्रण हे त्याच्या कल्पनासामर्थ्यासह, लेखकाच्या लेखनप्रकृतीनुसार आविष्कृत झालेले असू शकते.

४. कादंबरीतून चित्रित झालेल्या स्त्रिया प्रामुख्याने कुटुंबवत्सल, सोशीक, प्रेमळ, न्याय-अन्यायाची किंवा 'स्त्रीपुरुष' समानतेची जाणीव नसलेल्या श्रद्धाळू, रितिरिवाज, परंपरा, संस्कृती जपणाऱ्या आहेत. रूढीमुळे स्त्रीजीवनाची फरफट होते.

५. 'स्त्री' व्यक्तिचित्रणप्रधान एकही ग्रामीण कादंबरी नाही.

६. अन्याय-अत्याचार सोसणारी, पडेल ते कष्ट करणारी प्रामाणिक स्त्री असेच मराठी स्त्रीचे चित्रण कादंबरीत येते. ती स्थितिशील दिसते, तर अन्य समाजातील स्त्रिया या परिवर्तनाला सामोऱ्या जाताना दिसतात.

७. स्वातंत्र्यपूर्वकाळ ते आजपर्यंत तिला स्वातंत्र्य, जागतिकीकरण, शिक्षण प्रचार-प्रसार यांचीदेखील जाणीव नाही. पुरुषप्रधान समाजात सर्वत्रच स्त्रीची अनेकांगी उपेक्षा होतच असते. तिच्या भावभावना किंवा दु:खाकडे

सन्मानपूर्वक पाहिले जात नाही. तिची प्रतिष्ठा जपत नाहीत. तिच्यावर सतत अन्यायच केला जातो. तिच्याकडे माणूस म्हणून पाहणे आवश्यक आहे.

८. संस्कृतिरक्षण करणाऱ्या या स्त्रिया मात्र शोषणच करतात. घरंदाजपणा हा या स्त्रियांचा खास विशेष सांगता येतो.

९. अन्य समाजातील स्त्रिया मात्र बंडखोरी करताना दिसतात. मात्र मराठा स्त्रियांमध्ये बंडखोरी करण्याची क्षमता विकसित झालेली दिसत नाही. या परिस्थितिशरण तर अन्य स्त्रिया या परिवर्तनशील दिसतात.

१०. अनेक स्त्रियांचे वर्णन येते; पण त्या कोणाची तरी आई, पत्नी, मुलगी, सून अशा अर्थाने; त्यामुळे तिला स्वतंत्र चेहरा, व्यक्तिमत्त्व लाभत नाही. अर्थात जे फडके, खांडेकरांनी केले ते स्त्रीच्याबाबत याही लेखकांनी केले असे म्हणावे लागते.

११. कोकणी मराठी 'स्त्री' कजाग, भांडखोर, स्पष्टोक्ती असलेली दिसते. त्याप्रमाणे पश्चिम महाराष्ट्र, विदर्भ, मराठवाड्यातील स्त्रीचे चित्रण येत नाही. प्रदेशाचे संस्कार त्यातून स्पष्टपणे दिसतात.

१२. राजकारण-समाजकारणात असलेल्या कुटुंबातील स्त्रियांचे जीवनचित्रण अगदी नगण्य असल्याचे दिसते. त्यांना स्वत:चा आवाजच नाही.

१३. फडके तंत्राचा प्रभाव कमी-अधिक प्रमाणात ग्रामीण कादंबरीकारांवरही दिसतो.

ഽ

# ग्रामीण साहित्य संशोधन : अडचणी व उपाय–दिशा

भारतामध्ये नव्हे तर जगामध्ये उच्च शिक्षणात संशोधनाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. सर्व ज्ञान शाखांमध्ये संशोधन कसे व का करावे याचे शिक्षण दिले जाते. म्हणून अनेक विषयांत संशोधन होत आहे. मूलभूत संशोधन व्हावे म्हणून स्वतंत्र संशोधन संस्थादेखील स्थापन झाल्या आहेत. अलीकडच्या काळापर्यंत देशात जवळ जवळ १६० पेक्षा जास्त विद्यापीठ संशोधन क्षेत्रात कार्य करीत आहेत. संशोधनासाठी विद्यापीठ अनुदान आयोग आर्थिक सहाय्यदेखील पुरवत आहेत. म्हणूनच संशोधनाचे क्षेत्र आज विस्तारत आहे. पदवी किंवा पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्यांना चांगले संशोधन येईलच असे नव्हे म्हणून एम.फिल., पीएच.डी., डी.लिट., डी.एस्सी., अशाही पदव्या आहेत. जेणेकरून बारकाव्यांनिशी संशोधन होईल. जेणेकरून संशोधकांमध्ये चिकित्सकवृत्ती वाढीला लागेल. आपणाला येथे वाङ्मयीन संशोधनाचा विचार अभिप्रेत आहेत.

वाङ्मयीन संशोधन हे पृथक्करण प्रधानतेवर आधारलेले संशोधन आहे. शास्त्रीय संशोधनात जी माहिती प्रयोगाच्याद्वारे मिळविली जाते ती माहिती वाङ्मयीन संशोधनात पुस्तकातून मिळविली जाते. वाङ्मयीन संशोधनात प्रथमतः माहितीचे संकलन केले जाते. नंतर त्या माहितीचे सूक्ष्म अवलोकन करून निष्कर्ष काढले जातात. जी पद्धत शास्त्रीय संशोधनात असते तीच पद्धत येथेही वापरली जाते. वाङ्मयीन संशोधनात जी सामग्री व ज्ञान मिळविले जाते ती प्रयोगरूपाने काढलेल्या माहितीप्रमाणे निर्विवाद किंवा निरपवाद असेलच असे नाही. कारण आपली साधनेच तशी आहेत. त्याचबरोबर संशोधन करताना संशोधकाचा संबंध सौंदर्यशास्त्र, नीतिशास्त्र अशा प्रकारच्या शास्त्रातील अमूर्त मूल्यांशी असतो. असेही नव्हे की, आपल्याजवळ जी माहिती असते ती अव्वल दर्जाची नाही. अव्वल दर्जाचे साहित्य हेच नेहमी आपण प्रमाणभूत मानत असतो. म्हणून अभ्यासक प्राचीन ग्रंथांच्या संहिता ठरविताना दिसतात.

ग्रामीण साहित्य संशोधन अडचणी, त्याच्या दिशा किंवा त्यावरील उपाययोजना काय आहेत याचा येथे संशोधक प्रवृत्तीनेच विचार करावयाचा आहे. गेल्या पन्नास ते साठ वर्षांत पुणे विद्यापीठ कार्यक्षेत्रात मराठी विषयाचे पीएच.डी.चे ३१२ प्रबंध सादर झाले पैकी २३ प्रबंधच ग्रामीण साहित्यावर आहेत. त्याचबरोबर २८७ एम.फिल.चे प्रबंध आहेत. पैकी त्रेपन्न प्रबंध हे ग्रामीण साहित्याचे आहेत. याचाच अर्थ हे प्रमाण अत्यंत नगण्य असे आहे. याची कारणे नेमकी काय

असावीत, अडचणी काय असाव्यात, अभ्यासाची / संशोधनाची कोणती दिशा शोधावी लागेल / उपाय शोधावे लागतील याचा बारकाव्यानिशी विचार येथे अभिप्रेत आहे.

**प्रमुख अडचणी :**

१. मूळ अडचण म्हणजे संशोधनाचे स्वरूप आणि संकल्पना पद्धतीची माहिती नाही.
२. ग्रामीण साहित्यात काही ठरावीक वाङ्मय प्रकारांतच लेखन. उदा. कविता, कथा, कादंबरी.
३. नियतकालिकांचा अभाव.
४. तात्त्विक अधिष्ठान, वैचारिक बैठक-आवश्यक, ढिसाळपणा, प्रेरणा निश्चित नाही.
५. ग्रामीण साहित्य संस्थांचा अभाव.
६. नेतृत्व अभाव.
७. देशी जाणिवांचा अभाव.
८. आंतरराज्यीच साहित्य व्यवहार होत नाही.
९. सर्वदूर शिक्षणाचा अभाव
१०. ऐतिहासिकतेचे भान नाही.
११. आर्थिकता/जगण्याचे प्रश्न.
१२. स्वागतशीलता.
१३. ग्रामीण साहित्याविषयी आदराची भावना नाही - प्रस्थापित संशोधन व्यवस्थेकडून उपेक्षा.
१४. आवर्तात सापडलेले साहित्य.
१५. मराठा जात-कुणबी (जो खेड्यात राहतो त्याचे जीवन साहित्यात येणे अपेक्षित.) संकोचित वृत्ती.
१६. इंग्रजी ज्ञान-गुणवत्ता सिद्ध-अन्य भाषांबद्दल अज्ञान.
१७. शासनाची उदासीनता.
१८. खाऊजा धोरणाचा परिणाम - शेतकरी भरडला जातो, ग्रामीण तरुण राजकारणात गेला.
१९. रूढी परंपराग्रस्त साहित्य.
२०. ग्रामीण साहित्याकडे अभ्यासक तुच्छतेने पाहतात - भाषाशास्त्र, सौंदर्यशास्त्र या साहित्याचा अभ्यासक तोच सर्वश्रेष्ठ, हे हलके, फुलके साहित्य अलीकडे आधुनिकतेचा विचार.
२१. मनोरंजन म्हणूनच या साहित्याकडे पाहिले. (हास्यास्पद)
२२. प्रस्थापित समीक्षक ग्रामीण साहित्याला निकृष्ट समजतात. अभिजातवादी साहित्याचा अभ्यास - या साहित्याचा काय अभ्यास करायचा म्हणून

अभ्यासक वळत नाहीत.

२३. संकोचित वृत्ती सोडली पाहिजे.

२४. मुखपत्रिका हवी – ग्रामीण साहित्यिकांनीच समीक्षा केली पाहिजे. ग्रामीण साहित्य चळवळ वाढली पाहिजे.

२५. प्रकाशन संस्थांचा अभाव.

२६. वाचन संस्कृती रुजविण्याचे काम करणे.

२७. शिबिरे, संमेलने, होणे आवश्यक, तरच संशोधन होईल.

२८. समीक्षक–अपवाद–आनंद यादव सर.

२९. रंगनाथ पठारे, विश्वास पाटील, राजन गवस, स्वत:ला ग्रामीण साहित्यिक समजत नाहीत.

३०. समूह भावना – समष्टीचे चित्रण होत नाही.

३१. ग्रामीण लेखक दूरवर खेड्यात विखुरलेला (केंद्रवर्ती ठिकाणी नाही.).

३२. ग्रामीण साहित्य अलिप्तवादी धोरण – चळवळ संघटना यांच्याशी संबंध ठेवणे आवश्यक, न्यूनगंडाची भावना दिसते.

३३. स्त्री सन्मानाचा अभाव.

३४. प्रस्थापितांनाच पुरस्कार (नवीन प्रेरित होत नाहीत). कसदार अभ्यासकांपर्यंत पोहचत नाही. पर्यायाने संशोधन होत नाही.

३५. ग्रामीण साहित्यिकांचा लेखकराव झाला. अपवाद – मुसळे, बोराडे.

३६. साधन–संदर्भग्रंथांची मर्यादा. डॉ. यादव, डॉ. कोत्तापल्ले, डॉ. भोसले, प्राचार्य बोराडे, प्रा. चंदनशीव, प्रा. नलगे, प्रा. मंचरकर, डॉ. मुलाटे यांच्या व्यतिरिक्त ग्रंथ नाही. काही प्रयत्न डॉ. भास्कर शेळके, डॉ. गणेश देशमुख, डॉ. सुधाकर शेलार करताना दिसतात. प्रबंध–एम. फिल., पीएच.डी., ची काही पुस्तके उपलब्ध आहेत.

३७. ग्रामीण साहित्य चळवळ : प्रभाव – अभिनिवेश, वस्तुनिष्ठ संशोधन होत नाही.

३८. तटस्थतेचा अभाव, वस्तुनिष्ठतेचा अभाव, – ग्रामीण लेखक आमची दैवते आहेत; पण त्यांना काही मर्यादा आहेत. त्यांच्या सामर्थ्याबरोबर काही दोषही आहेत याचे चिंतन होत नाही.

३९. ग्रामीण साहित्याची हानी चुकीच्या मार्गाने, संशोधन होत असल्यामुळे ग्रामीण साहित्य संशोधनाला मर्यादा.

४०. भलावण – पाठराखण, गट–तट, चाहत्यांचा वर्ग, पाठ थोपटण्याची – खोटी स्तुती करण्याची प्रवृत्ती वाढताना दिसते.

**उपाय :**

१. नव्या संशोधक अभ्यासकांनी आज चिंतन करून पूर्वसुरींच्या अभ्यासकांच्या लेखन-संदर्भात यथायोग्य वापर करून, नव्याने लेखन करण्याची गरज आहे. उदा. ग्रामीण साहित्याचा इतिहास लेखन केल्याने अनेक प्रश्न सुटतील, त्यासाठी प्रकल्प हाती घ्यावे लागतील. मुखपत्र सुरू केले पाहिजे.

२. चळवळीच्या निमित्ताने असलेला प्रभाव - अभिनिवेश दूर करून वस्तुनिष्ठ मांडणीची गरज आहे.

३. संशोधन शिस्त, पाळून वाङ्मयीन निकष, समीक्षा, संशोधन पद्धतीने करणे शिवाय नव्याने स्पष्ट भूमिका घेणे आज गरजेचे आहे.

४. योग्य मार्गदर्शनाची गरज - मार्गदर्शक - संशोधक विद्यार्थी समन्वयाची गरज.

५. संशोधक क्षेत्रातील अनिष्ट गोष्टींना थारा न देता, संशोधन हाच यावरील उपाय आहे. अन्य चळवळींनी नाकारलेले स्वयंघोषित विद्वान दूर ठेवले पाहिजेत.

**संशोधनासाठी नवीन विषय :**

१. ग्रामीण साहित्य आणि जागतिकीकरण.
२. ग्रामीण साहित्य आणि कृषी साहित्य साम्यभेद.
३. ग्रामीण साहित्य आणि ग्रामीण साहित्याची भूमिका.
४. ग्रामीण साहित्य आणि दुष्काळाचे चित्रण.
५. ग्रामीण साहित्य आणि दलित साहित्य यांचे परस्पर संबंध.
६. ग्रामीण ललित लेखन, चरित्र आणि आत्मचरित्रांचा चिकित्सक अभ्यास.
७. नव्वदोत्तर ग्रामीण साहित्य प्रेरणा स्वरूप.
८. ग्रामीण साहित्यातील मराठा स्त्रीचे चित्रण.
९. श्री. ना. पेंडसे आणि थॉमस हार्डी तौलनिक अभ्यास.
१०. हिंदी-मराठी ग्रामीण कादंबरीचा तुलनात्मक अभ्यास.
११. साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त ग्रामीण हिंदी-मराठी कादंबरी.
१२. ग्रामीण साहित्य-समीक्षेच्या प्रस्तावना
१३. रंजनवादी ग्रामीण साहित्य.
१४. ग्रामीण साहित्याची शैली.
१५. ग्रामीण साहित्यातून आविष्कृत होणारे सामाजिक आणि सांस्कृतिक जीवन.
१६. ग्रामीण साहित्याचे बोलीविज्ञान.
१७. ग्रामीण कादंबरीतील प्रादेशिकता. (१९९० नंतरच्या)
१८. ग्रामीण कादंबरीतील स्त्री जीवनातील स्थित्यंतराचा वेध.

१९. ग्रामीण कादंबरीकार झालेल्या आधुनिकतेचा परिणाम.
२०. ग्रामीण कादंबरी आणि आधुनिकता.
२१. ग्रामीण साहित्यातील खेडे.
२२. ग्रामीण कादंबरी आणि राजकारण.
२३. ग्रामीण साहित्याचा वाङ्मयीन इतिहास.
२४. एकविसावे शतक आणि ग्रामीण साहित्य.
२६. ग्रामीण कादंबरीतील पाटील/सरपंच.
२७. सहकार चळवळ आणि ग्रामीण साहित्य (एक एक वाङ्मयप्रकार घेता येईल.)
२८. शेतकऱ्यांचे प्रश्न मांडणारी ग्रामीण कादंबरी.
२९. ग्रामीण साहित्यातून आविष्कृत होणारा निसर्ग.
३०. ग्रामीण साहित्यातील स्त्री प्रतिमा.
३१. ग्रामीण साहित्यातील स्त्रीचे स्थान.
३२. शेतीचे प्रश्न आणि ग्रामीण साहित्य.
३३. ग्रामीण साहित्यात ध्वनीत होणारे शैक्षणिक प्रश्न.
३४. अप्रकाशित ग्रामीण साहित्य - एक चिकित्सक अभ्यास.
३५. ग्रामीण कादंबरी निवेदन तंत्र - एक अभ्यास.
३६. ग्रामीण साहित्यातील प्राणी जगत, एक चिकित्सक अभ्यास.
३७. ग्रामीण साहित्यातील - गावकुसाबाहेरचे जीवन.
३८. विविध पुरस्कारप्राप्त ग्रामीण कलाकृतींचा अभ्यास (दमाणी, विखे पाटील, महाराष्ट्र शासन, कॉन्टिनेंटल आणि इतर.)

# प्राचार्य रा. रं. बोराडे यांची कथा

मराठी ग्रामीण साहित्यिकांच्या दुसऱ्या पिढीतील सर्जनशील ग्रामीण कथाकार म्हणून रा. रं. बोराडे ओळखले जातात. त्यांची 'वसुली' नावाची पहिली कथा दै. सकाळच्या रौप्यमहोत्सवी अंकात (१९५७) प्रसिद्ध झाली होती. अगदी शालेय वयापासून ते आजतागायत त्यांचे लेखन सुरू आहे. मराठवाड्यातून उदयाला आलेल्या कथाकारांपैकी दिवाकर कृष्ण व बी. रघुनाथ यांच्यानंतर रा. रं. बोराडे हे यशस्वी व लोकप्रिय कथाकार आहेत. बोराडे हे रसिकमान्य कथाकार असून ग्रामीण वास्तवाचे ते चित्रण करतात. १९६० नंतर १९९४ पर्यंत अव्याहतपणे कथा साधना करून एक समर्थ कथाकार म्हणून नावलौकिक मिळविला आहे. त्यांच्या नावावर आतापर्यंत एकूण अठरा कथासंग्रह प्रसिद्ध असून त्यांपैकी 'वानवळा' व 'बोरी बाभळी' हे निवडक कथासंग्रह आहेत. रा. रं. बोराडे यांचे कथासंग्रह खालीलप्रमाणे –

| | | |
|---|---|---|
| १) पेरणी | १९६२ | कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे |
| २) ताळमेळ | १९६६ | व्हीनस प्रकाशन, पुणे |
| ३) मळणी | १९६७ | मौज प्रकाशन, मुंबई |
| ४) वरात | १९७३ | प्रपंच प्रकाशन, पुणे |
| ५) नातीगोती | १९७५ | लोकवाङ्मय गृह प्रकाशन, मुंबई |
| ६) बोळवण | १९७६ | श्री विशाखा प्रकाशन, पुणे |
| ७) वाळवण | १९७६ | व्हीनस प्रकाशन, पुणे |
| ८) फजितगाडा | १९७६ | प्रपंच प्रकाशन, पुणे |
| ९) माळरान – | १९७६ | श्री विशाखा प्रकाशन, पुणे |
| १०) राखण | १९७८ | रोही प्रकाशन, पुणे |
| ११) गोंधळ | १९७८ | श्री विशाखा प्रकाशन, पुणे |
| १२) बुरूज | १९७८ | अक्षर प्रकाशन, औरंगाबाद |
| १३) वानवळा | १९७९ | अमेय प्रकाशन, नागपूर |
| १४) खोळंबा | १९८३ | श्री विशाखा प्रकाशन, पुणे |
| १५) हेलकावे | १९९० | साहित्य सेवा प्रकाशन, औरंगाबाद |
| १६) कणसं आणि कडबा | १९९४ | साकेत प्रकाशन, औरंगाबाद |

१७) हरणी २००२ राजकिरण प्रकाशन, इस्लामपूर
१८) बोरी बाभळी २००३ प्रतिभास प्रकाशन, परभणी इ.

अभ्यासाच्या सोयीसाठी रा. रं. बोराडे यांच्या कथांचे काही प्रकार करावे लागतील. ते असे की,

१) रा. रं. बोराडे यांची ग्रामीण कथा
२) विनोदी कथा
३) बालमनोविश्वाचे दर्शन घडविणाऱ्या कथा
४) खेड्यातील मध्यमवर्गीय कुटुंबाचे दर्शन घडविणाऱ्या कथा
५) ग्रामीण स्त्रीजीवन दर्शन घडविणाऱ्या कथा इ.

**रा. रं. बोराडे यांची ग्रामीण कथा :**

मराठी ग्रामीण कथा म्हटली की, ती प्रणय, शृंगार, रंजकता, स्वप्निल आणि चावटपणाने भरलेली असली पाहिजे, असा नवकथापूर्व काळातील कथेचा संकेत बोराडे यांनी झुगारला आहे. वास्तविक ग्रामीण जीवन कष्टप्रद असते. दिवसभर काबाडकष्ट करूनही संध्याकाळी चूल पेटेलच असे नाही. तेथे प्रेम, शृंगार ही बाब सहज व स्वाभाविकपणे शक्य नाही. बोराडे यांच्या कथा साहित्यातून आविष्कृत होणारे ग्रामजीवन कृषिकेंद्रित आहे. कारण शेती हा मुख्य आधार आहे. शेतीशी निगडित भावजीवन कथाकार रेखाटतात. म्हणूनच शेती, शेतकरी, पिके, पाणी, ऊन, वारा, पाऊस, दुष्काळ, जनावरे इ. संदर्भ अपरिहार्य आहे. कारण शेती हा मुख्य आधार आहे. बोराडे यांच्या ग्रामीण कथेची पार्श्वभूमी शेती आहे. उदा. हुरडा, वाफसा, उन्हाळा, चुंबळ, माघारी अशा अनेक कथांचा विषय कृषिजन्य आहे. म्हणूनच वाफसा या कथेतील उत्तरानक्षत्राच्या पावसाअभावी संतुकरावची पेरणी झाली नाही, म्हणून हळहळ प्रकट होते. उन्हाळा या कथेत शेतीशी निगडित भावजीवन चित्रित होते. या कथेतील महादाण्णाच्या जिवाची तडफड विलक्षण आहे. कारण उन्हाळ्यामुळे उसाचे भवितव्य धोक्यात आहे.

'चुंबळ' या कथेतील वास्तवच मुळात दुष्काळसदृश्य आहे. दुष्काळामुळे रोजगाराचा अभाव आहे. उदरनिर्वाह करणे अशक्य आहे, अशा परिस्थितीत ग्रामीणांची अवस्था चुंबळीसारखी झाली आहे. अशावेळेस मुलीच्या सासरकडून सांगावा येतो की, तुमच्या लेकीला तुमच्या घरी घेऊन जा. यामुळे मुलाचे वडील तात्याबा अस्वस्थ होतात. स्वत: उपासमारीचे जीवन जगत असताना पोट की पोटची पोरगी? असा भावनिक प्रश्न तयार होतो. निसर्गाने मानवी नातेसंबंधात निर्माण केलेला ताण या कथेत आहे.

'देणेकरी' या कथेतूनही बोराडे दुष्काळग्रस्तांची भावस्पंदने रेखाटतात. या कथेत शकुंतलेचा बाप तिच्या सासरी आल्यावर सासूबाई तो देणेकरीच वाटतो. त्याच्या पिशवीबद्दल प्रतिक्रिया या कथेतील सासूबाईला प्रकट करतात. 'काय

पाव्हणा म्हणावं का काय? लेकीच्या घरंला निघाला आन् पदरात चटकोर भाकर न्हाई आणली.'

'चिरफाड' या कथेत शेतीशी निगडित भावजीवन चित्रित होते. जिवापाड वडलोपार्जित जपलेल्या शेतातून रस्ता जात असल्यामुळे या कथेतील वृद्ध नारायणराव विलक्षण हळहळ व्यक्त करतात.

दुष्काळ, पावसाअभावी उद्ध्वस्त झालेल्या ग्रामीण मनाच्या चित्रणाबरोबरच बोराडे प्रचंड पावसामुळे उबगलेली ओली मनेही चित्रित करतात. विशेषत: झड, रवण या कथांमधून हे प्रत्ययास येते.

पितृसत्ताकतेचा मानदंड म्हणून वंशसंवर्धन हा अत्यंत कळीचा विषय बोराडे 'आपल्या वाटा' या कथेतून रेखाटतात. या कथेतील जयवंताच्या लग्नाला दहा वर्षे झाली तरी मूलबाळ नाही म्हणून तो अस्वस्थ आहे. घराण्याला वारसाच नाही तर शेताची मशागत तरी कोणासाठी करायची? परंतु शेत पडीक ठेवण्यापेक्षा ते शिवरामने करावे आणि जयवंताने पंढरीच्या वारीला जावे. विठ्ठलाकडे आपले गाऱ्हाणे मांडावे असे ठरते. जयवंत पंढरीची वारी करून आल्यावर बायकोला दिवस जातात. असा विठोबारायाचा प्रसाद असल्याचे जाणून जयवंताला आनंद होतो.

अशाच आशयाच्या त्यांची पेरणी, बांध, तिफण इ. कथा आहेत. 'पेरणी' कथेतील बळीने मेव्हणीचा सांभाळ केला. ती वयात आल्यावर तिच्या शेतासह तिला आपली दुसरी बायको करावी, यासाठी तो पेरणी करतो. 'बांध' कथेत लग्न होऊन आई-बापाच्या जिद्दीमुळे दोन तरुण जिवांच्यामध्ये निर्माण झालेल्या बांधाचे मानसचित्र साकार होते. 'तिफण'मध्ये हातात बी घेऊन चाड्यावर मूठ धरणाऱ्या संतरामच्या वाट्याला अपत्यहीनतेचे दु:ख येते.

आक, कांगवा, म्हैस, खोप, उताराचा वाट, परवड, खोड, मुरडण इ. कथांमधून कृषिजीवनाशी निगडित भावजीवन आधोरेखित होते. शेतीशी निगडित असलेल्या व्यक्ती, प्राणी, नातेसंबंध, नातेवाईक इ. सर्वांचेच भावजीवन बोराडे चित्रित करतात. बोराडे यांच्या कथांमधून शेती हा घटक वजा करता येत नाही. रान, शेत, पिके, पाऊस, ऊन, वारा, प्राणी, निसर्ग इ. घटकांशी संलग्न नाते आहेत. विशेषत: बोराडे यांच्या हुरडा, भार, गोंधळ, वाटणी, कोवळा हुरडा, निबरहुरडा इ. कथा मुळातच शेतीसन्मुख जीवनाशी निगडीत आहेत.

**रा. रं. बोराडे यांची विनोदी कथा** :

'पेरणी' या त्यांच्या पहिल्याच कथासंग्रहात सहा कथा विनोदी वळणाच्या आहेत. 'ताळमेळ' या कथासंग्रहात सर्वच कथा विनोदी आहेत. याशिवाय फजितगाडा, वरात, गोंधळ, खोळंबा, हेलकावे या संग्रहांतील सर्वच कथा अस्सल विनोदी आहेत.

बोराडे यांनी विनोदी कथालेखनाचे सातत्य टिकवून ग्रामीण विनोदी कथेला



DN 2901

अधिक बळकटी प्राप्त करून दिली.

. बोराडे यांची विनोदी कथा आधी कथा असते आणि नंतर ती विनोदी असते. म्हणजे विनोदी कथालेखन करणे हा त्यांचा पिंड नाही. ग्रामीण जीवनाचे वास्तव दर्शन घडविणे हा त्यांचा लेखनधर्म आहे. बोराडे यांनी आपल्या विनोदी कथेतून ग्रामीण जीवनातील स्वभावविशेष, ताणतणाव, शिक्षण, राजकारण, योजना, सामाजिक परिवर्तन, स्त्री-पुरुष संबंध, व्यसनमुक्ती, साक्षरता प्रसार, कुटुंबनियोजन, अनेक शासकीय योजना व त्यांची अंमलबजावणी आणि त्यातील विसंगती त्यांनी नेमकेपणाने, रंगतदारपणे टिपली आहे. त्यांचे विनोदी कथालेखन रंजक, चटकदार, रसिकांच्या अंत:करणाचा ताबा घेणारे आहे. वाचकांना चिंतन करायला लावणारे आहे. त्यांची कथा ग्रामीण वास्तवातील विसंगती हेरते. यामुळे त्यांची कथा उथळ, भडक, शृंगारिक होत नाही. त्यांच्या विनोदी कथेबद्दल डॉ. भीमराव वाघचौरे म्हणतात, ''त्यांच्या साहित्याची प्रकृतीच मुळात गंभीर आणि वास्तववेधी आहे. येथील मातीशी, येथील माणसाशी ती इमान राखणारी आहे. त्यामुळेच की काय त्यांच्या विनोदी लेखातून एखादे पात्र, एखादी व्यक्तिरेखा केवळ सवयीने, लकबीने, स्वभावाने फार तर हास्यास्पद होईल; परंतु संपूर्ण ग्रामजीवन कधीच हास्यास्पद ठरत नाही. बोराडे यांची विनोदी कथा केवळ हकिगत, किस्सा, रंजकता इ. च्या पातळीवर वावरत नाही. ती थेट वास्तवाला भिडते. विनोद निर्मितीसाठी ती उपहास, अतिशयोक्ती, चमत्कृती, कोट्या, विडंबन इ. च्या आहारी जात नाही. दिलखुलास संवाद, ओघवते आणि स्वाभाविक निवेदन, ग्रामीण विसंगतीचे सूक्ष्म आकलन, घटना प्रसंगांतील खटकेबाज नाट्य, बदलत्या ग्रामीण वास्तवाचे भान इ. वैशिष्ट्यांमुळे त्यांची कथा वाचनीय आणि संस्मरणीय वाटते.

**बालमनोविश्वाचे दर्शन घडविणारी कथा :**

बोराडे यांच्या कथालेखनाचे अनेक पैलू सांगता येतील. 'पेरणी' या कथासंग्रहातील अभ्यास, भल्या घराचे पाहुणे या दोन कथांचे निवेदन पात्रमुखाने केलेले आहे. ही पात्रे लहान-मुले आहेत. खेड्यातील बालमनाची मनोरचना आणि त्याला म्हणून जाणवणारे खेड्यातील विश्व हे त्यांच्या काही कथांचे विषय बनले आहेत. लहान मुलांच्या दृष्टिकोणातून त्यांनी लिहिलेल्या कथा अनुभवाची एक वेगळी छटा पकडण्याचा प्रयत्न करतात. बोराडे यांनी बालकांचे चित्रण सामर्थ्याने, विविधतेने, उत्कटतेने रेखाटले आहे.

बोराडे यांनी भेग, लागेबांधे, लगीन, मळणी, आबाळ, हेळसांड, मुरडण, रोजगार, उन्हाळा, दिवाळी, पयला बा आताचा बा, कोकरू, माझं लगीन, पोर, राखण अशा अनेक कथांमधून बालकांचे चित्रण ते करतात. बालकांच्या मनोदर्शना बरोबर त्या-त्या कुटुंबाचे दर्शनही ते घडवतात. लहान मुलांची सुख-दु:खे, मनोराज्ये, जडण-घडण, भावनिक गुंतागुंत यांना कुटुंबाच्या संदर्भातच आकार

प्राप्त होतो. लहान मुलांचे भावजीवन मराठवाड्याच्या मातीशी, तेथील वातावरणाशी, तेथील दारिद्र्याशी निगडित आहे. उदा. आबाळ, पोर, माझं लगीन, रोजगार या कथा होत. बोराडे बालमनाचे चित्रण जिवंत, प्रत्ययकारी करतात, कारण त्यांनी त्यासाठी ग्रामीण बोलीतील निवेदनाचा चपखलपणे वापर केला आहे. विशेषत: अभ्यास, भेग, लगीन, खेळ, मळणी, दिवाळी, माझं लगीन, पयला बा दुसरा बा, भल्या घरचे पाहुणे इ. कथांची निवदने बालकांची आहेत; त्यामुळे त्यांच्या मनातील भावतरंग नेटकेपणाने साकार झाले आहेत, असे म्हणावेसे वाटते; या प्रकारच्या लेखनातून बोराडे यांनी लहान मुलांचा उपद्रवी निष्पापपणा, त्यांची खेळकर जिज्ञासा, त्यांच्या बालिश आनंदाच्या तऱ्हा या सर्वांचे चित्रण केले आहे.

**ग्रामीण स्त्री जीवन दर्शन घडविणाऱ्या कथा :**

बोराडे यांनी आपल्या कथेतून खेड्यातील स्त्रियांची होणारी कुंचबणा, ओढाताण, मुस्कटदाबी, मूकवेदना, सोशिकता याचे चित्रण केले आहे. 'बोळवण' या कथासंग्रहातील सर्वच कथा स्त्रियांचे दु:ख साकार करतात. बोराडे स्त्री जीवनाचे वास्तवदर्शी, हृदयस्पर्शी चित्रण करतात. पेरणी, मळणी, नातीगोती, बोळवण, वाळवण या कथासंग्रहांमध्ये बोराडे यांनी स्त्री-पुरुष संबंधाचे विशेषत: स्त्री जीवनातील कारुण्याचे, शोषणाचे, सहनशीलतेचे चित्रण केले आहे. स्त्रीला अनेक भूमिका वठवाव्या लागतात. मुळात धारक पोषक धरणीमातेच्या रूपात स्त्री उभी राहते. बोराडेंच्या कथांमधील स्त्री तरुण पत्नी, वृद्ध, आई, प्रौढ भगिनी, सासू असो, अंतिमत: ती जीवनाचे सातत्य सांभाळणाऱ्या धरित्रीची भूमिका पार पाडत असते. यासाठी बोराडे यांनी निर्माण केलेल्या स्त्रीपात्रांपैकी केवळ पाच स्त्रीपात्रांचा विचार केला तरी पुरेसे ठरेल असे वाटते. त्या पाच स्त्रिया म्हणजे -

१) पुतळा (चुंबळ), २) सरस्वती (भेग), ३) जनाई (गोडं), ४) चंद्रभागा (बांध), ५) शेवंता (आबाळ) इ. होत.

चुंबळ या कथेतून स्त्रीजीवनातील कारुण्य व भव्योदात्तता विलक्षण सामर्थ्याने प्रत्ययास येते. या कथेत बोराडे स्त्रीच्या वाट्याला येणारे परावलंबित्व, स्वातंत्र्यसंकोच व असहायता या सर्वांचे परिणामकारी चित्रण करतात. या कथेची नायिका पुतळा आव्हाने सहज स्वीकारते. माहेरपणाचे सुख उपभोगायला मिळत नाही, म्हणून कुंठत नाही की बंडही करीत नाही. त्यापेक्षा आपला संसार अभंग राखणे तिला महत्त्वाचे वाटते. पुतळाच्या जीवननिष्ठाच प्रबळ आहेत, हेच यातून सिद्ध होते.

'भेग' या कथेची नायिका सरस्वती तिचा कष्टकरी नवरा तिच्यापेक्षा वयाने मोठा आहे. सरस्वती त्याची दुसरी पत्नी. तिच्या पदरात एक मूल टाकून नवऱ्याचा जीवनरस आटून जातो. यौवनाने रसरसलेल्या सरस्वतीच्या रात्री अमृतमय करण्यास तो असमर्थ ठरतो. म्हणून रोज रात्री देवळाचा आसरा घेतो. पती सहवासाचा

उपवास भोगणाऱ्या सरस्वतीने मीठ खाणे टाकले. नवऱ्याला दूधतूप खाऊ घालते. त्याच्यातील कामभाव जागृत व्हावा म्हणून त्याला लाल मिरच्यांचा ठेचा वाढते. परंतु पतीकडून प्रतिसाद मिळत नाही. तो देवळाकडेच निघून जातो. सरस्वती आपल्या मुलाच्या भवितव्यासाठी चवचालपणाच्या आहारी न जाता जात्यावर दळायला बसून आपल्या भावना दळून काढते.

'गाठोडं'मधील जनाई आपल्या मुलीच्या, जावयाच्या सुख, समाधान, आनंदासाठी आपले दु:ख बाजूला ठेवते. पहिल्यादाच आलेल्या आपल्या जावयाला योग्य तो मानसन्मान दिला पाहिजे. यांचीच तिला आपल्या आजारापेक्षा जास्त काळजी असते. मान-सन्मानाऐवजी जावई रुसला तर आपल्या लेकीची (रुक्मिणी) जाळभाज होईल, असे जनाईला वाटते.

'बांध' मधील चंद्रभागेला वाटते की आपला संसार टिकावा. पतीशी आपले पुनर्मिलन व्हावे. म्हणून बाप रागवण्याचे भय असूनही ती विश्वनाथाला चोरून भेटते. बापाचा राग शांत होईपर्यंत विश्वनाथाने जिवाचे बरेवाईट करू नये अशी काळजी वाटते. या दोघांमधील विरह, चोरून होणारी अल्पशी भेट, ताटातूट होताना हृदयाला होणाऱ्या वेदना यातून कथाकाराने आदिम जीवनतत्त्वाचे वर्णन केले आहे.

'आबाळ' कथेतील शेवंता एका गरीब शेतकरी शेतमजुराची पत्नी आहे. भावाच्या आजारपणाची वार्ता तिला कळते. ती अस्वस्थ होते. मजुरीसाठी जावे की, भावाला भेटण्यासाठी अशा विचारात ती सापडते. रोजंदारी बुडविणे म्हणजे आपल्यात कुटुंबाला उपवासात ठेवणे होय. दुसरीकडे भावाची भेट घेणेही आवश्यक आहे. परंतु आर्थिक क्षमतेचा मात्र अभाव आहे. नवऱ्याने फक्त चाळीस पैसे दिले. अल्प खर्चानिशी ती भावाकडे जाते. भावाकडेसुद्धा आर्थिक अडचण असते. आपल्याकडील चाळीस पैशातच ती कसेबसे भागवते. येथेही तिची आर्थिक कुचंबणा होते.

यावरील विषयाशिवाय बोराडे यांनी आपल्या अनेक कथांमधून विविध विषय यशस्वीपणे हाताळले आहेत. ग्रामीण जीवनाचे विविधांगी चित्रण करण्यात बोराडे कुशल आहेत. शेतकरी, शेतमजूर, ग्रामीण स्त्रियांचा सासूरवास, ग्रामीण स्त्री-पुरुषांची मानसिकता, पतिसन्मुखता, पतिप्रतारणा, वासना-विकाराची कथा, जावईकथा, बापकथा, वृद्धापकाळ, मृत्युकथा, ग्रामीण गुंडगिरी, लोककथा-लोकसंकेत, श्रद्धा-अंधश्रद्धा, दारिद्र्य, विवाहातील ताण-तणाव, ग्रामीण स्त्रीचे वैधव्य, विभक्त कुटुंब, एकत्र कुटुंबपद्धत, दुष्काळ व निसर्ग, बालविवाह, अन्यायी रझाकार, दलित जीवनाची कथा इ. विविध जीवनस्तरांवरील जीवन चित्रण अतिशय जिवंत व प्रत्ययकारीपणे बोराडे करतात.

**रा. रं. बोराडे यांच्या कथालेखनाचे सामर्थ्य :**

१) ग्रामीण जनतेच्या समूहमनाचे दर्शन ते घडवतात.

२) स्वाभाविक व नैसर्गिक कामवासनेचे चित्रण बोराडे तन्मयतेने करतात. त्यात उथळपणा, बटबटीतपणा, सांकेतिकपणा येऊ देत नाहीत. उदा.- कोकरू, हुरडा, कोवळा हुरडा, निबर हुरडा इ. कथा.

३) त्यांची कथा समाजजीवनाचे व संस्कृतीचे चित्रण करते. समाजशास्त्रात गुंतत नाही.

४) शेती आणि माणूस यांचे जागरूक भान ती ठेवते.

५) माणूस आणि समाज, त्यांचे सामर्थ्य, मर्यादा, गुणदोष, वैविध्य यांच्यानिशी समजून घ्यावा आणि समजून द्यावा. या जाणिवेचा तोल ढळू देत नाही.

६) वास्तवाचे प्रखर भान ठेवून ही कथा बालमानसविश्वाचे प्रभावी चित्रण करते.

७) स्त्रियांचे कारुण्य आणि भव्योदात्तता अतिशय सामर्थ्याने चित्रित करतात.

८) वासनेचं संयत चित्रण करतात. भाषा रंजक, शृंगारिक, बीभत्स होऊ देत नाही.

९) मर्ढेकरी विरोध लयाच्या तत्त्वाचे प्रक्षेपण घडवतात.

१०) द्विध्रुवात्मकतेचा ताण रेखाटतात. उदा. – 'दिमाख' व 'नथणी' या कथांत नागर ग्रामीण जीवन चित्रण येते.

११) रंजकतेचा खोटा सोस दाखवत नाही.

**रा. रं. बोराडे यांच्या कथालेखनाच्या मर्यादा :**

१) दलित अनुभूतीचा अभाव.

२) गावगाड्याबाहेरील जाती-जमाती, त्यांचे आर्थिक, सामाजिक, जातीसंबंध इ. येत नाही.

३) केवळ मराठा जातीच्या कौटुंबिक वास्तवाचे चित्रण ते करतात; यामुळे कथेतील वास्तवाचा अवकाश संकुचित होत जातो.

४) बोराडे यांची कथा ग्रामीणांचे दुःख, दारिद्र्य यांचे सूक्ष्म पातळीवरील चित्रण करते. परंतु त्यामागील कारणे, सामाजिक गुंतागुंत त्यांची कथा रेखाटत नाही.

५) सनातनत्वामुळे कथेतील वास्तव बदलण्याच्या शक्यता संपुष्टात येतात. यामुळे स्थितिशीलता प्राप्त होते.

६) कथेतील पात्रांना सामाजिक भान नाही. कुटुंबासाठी त्याग आहे, देशासाठी नाही.

# कालचक्र : बदलत्या वास्तवाचे चित्रण

आशयसंपन्न विविधरंगी कथा, दोन डझन कलाकृतींचे लेखन करणाऱ्या वि.शं. पारगावकर यांची 'कालचक्र' ही स्वातंत्र्यपूर्व दोन पिढ्या आणि स्वातंत्र्योत्तर एक अशा तीन पिढ्यांच्या काळातील परिवर्तनाचे वास्तव चित्र साकार करणारी कादंबरी आहे. दि. के. बेडेकर, प्रभाकर पाध्ये, वा.ल. कुलकर्णी, विद्याधर पुंडलीक, रा. ग. जाधव आणि प्रस्तावनेच्या रूपाने डॉ. अ.वा. कुलकर्णी यांनी गौरव केलेली कादंबरी आहे. राजेकर घराण्यातील तीन पिढ्या प्रातिनिधिक आहेत. तसेच वारुणादेखील समकालीन स्त्रीची प्रतिनिधी आहे. डॉ. कुलकर्णी म्हणतात, ''कालचक्रानुसार ढासळत गेलेल्या राजेकर घराण्याचे दर्शन कथेत घडते,'' ते सार्थच आहे. त्याप्रमाणे शेतकरी संघटनेचे सक्रिय कार्यकर्ते असलेल्या डॉ. कुलकर्णी यांना कृषिजीवनातील परावलंबित्व दिसते. तेही योग्यच आहे. साहजिकच बदलत्या वास्तवाचा शोध अभिप्रेत असल्यामुळे वाङ्मयीन मूल्यमापनाचा विचार येथे अभिप्रेत नाही.

कलावाद किंवा फडके रंजनतंत्राच्या प्रभावाचा काळ असूनदेखील येथे रंजनतंत्राचा प्रभाव जाणवत नाही. शिवाय बदलत्या वास्तवाचे सहज, स्वाभाविक चित्रण लेखक करू शकले, अन्यथा शहरी वाचक डोळ्यासमोर ठेवून नाट्यमयता, अद्भुत आणि भडकतेचा वापर, आकर्षक घटनांची गुंफण, कल्पकतेचा काव्यमय आणि धुंद करणारा वापर यामुळे कादंबरीतील वास्तव शापित झाले असते.

मधल्या पिढीच्या वारुणाला केंद्रस्थानी ठेवून कादंबरीतील गुंफण केली आहे. भाऊसाहेबांच्या पिढीचा वैभवाचा काळ पहिल्या भागात आठ प्रकरणांत येतो. दुसऱ्या भागात राजेकर घराण्याचा पडझडीचा, संघर्षाचा काळ येतो तर तिसऱ्या विभागातून स्वातंत्र्योत्तर काळातील गर्दीत हरवलेल्या माणुसकीचे आत्मकेंद्रवृत्तीचे दर्शन वि.शं. पारगावकर घडवितात. तिन्ही पिढ्यांच्या काळातील जीवनाची साक्षीदार आहे. वारणा स्नान करत असताना चोरून पाहणाऱ्या नानूस दादासाहेबांनी शिक्षा केल्यामुळे त्याने कायमचे घर सोडले; आणि शेवटी समक्ष भेटून आपल्या प्रेमाची कबुली जबाब देतो, या सर्व घटना संयमाने लेखकाने चित्रित केल्या आहेत. कोठेही या वर्णनात भडकपणा, अतिरंजितपणा नाही. त्यामध्ये पाल्हाळ दिसत असला तरी कृषिजीवनातला संथपणाही त्याला जबाबदार आहे. त्यामुळे त्यात तीन पिढ्यांतील जीवनदर्शन विविध घटना-प्रसंगांतून सुसंगत कथानक साकार झाले आहे.

पहिला विभाग –

वारुणा स्नान करत असताना नानूने चोरून पाहावे, संतापलेल्या दादासाहेबांनी शिक्षा केल्यामुळे दुखावलेला नानू घर सोडून जाणे, नानूचा शोध आणि त्यातील अपयश यामुळे मनात कोठेतरी भाऊसाहेब, की ज्यांच्या घराचा दबदबा आदर्श सर्वत्र होता. परोपकाराची परंपरा, भाऊसाहेबांचा आजार, त्यामुळे राजेकर घराण्याची बेचैनी, अक्कल, उदासीनता, काळजीचे वर्णन, भाऊंचा ताप कमी झाला तेव्हा त्यांना भेटायला येणाऱ्यांची गर्दी आणि शेवटी भाऊसाहेबांचा मृत्यू एवढ्या घटना पहिल्या भागातील आठ प्रकरणांतून येतात.

कादंबरीच्या दुसऱ्या भागात भाऊंच्या मृत्यूनंतर हितचिंतकाने समाचारासाठी येणे, वारुणाची जबाबदारी वाढणे, घरातील माणसांची मने कलुषित होणे, संघर्षास प्रारंभ होणे, असे ''मांमजी होते तोवर घरात असे वातावरण कधीच झालेले नव्हते. चोरीलपीचे, भीतीचे किंवा अबोल्याचे असे कोठलेच वारे वाड्यात आले नव्हते.'' (पृ. ८६) हे अक्का व गोपिकाबाईतील कुजबुजीचे वारुणाने केलेले निरीक्षण किंवा चंद्रा मोलकरीण आणि तिचा नवरा तसेच शारदा आणि अक्कावन्सं यांची कुजबुज बदलते वास्तव स्पष्ट करणारी आहे. दुसऱ्या प्रकरणात विधवा अक्काला सासरी पाठविण्याच्या विचाराने निर्माण झालेला संघर्ष चित्रित केला आहे. ''पूर्वी मात्र घरातील सारे प्रश्न शांततेने, संयमाने, मित भाषणाने सोडविले जात असत इतकेच नव्हे तर काही प्रश्न तर नजरच्या इशाऱ्यानेच सुटत.'' भाऊ गेले आणि या वाड्या वास्तूचे माहात्म्य संपले, दैव ओसरले, सूर्य मावळला की, सूर्यफूल खाली मान घालते तसे जणू या घराने मान खाली घातली होती. (पृ. ९५). वारुणाचा लळा असलेली परंतु तात्या आनंदीचा मुलगा माधवची मॅट्रीकची परीक्षा आणि वारुणाची बेचैनी आणि वांझपणाची जाणीव तिसऱ्या प्रकरणात येते, तसेच माणसांचा गजबजाट तोच होता, आदर तितकाच होता, वागणुकीत बराचसा मोकळेपणा आलेला होता, हे निवेदन बदलत्या वास्तवाचे आहे. भाऊंच्या काळात अन्नधान्याचा तोटा नव्हता, तेच तात्या दादासाहेबांच्या काळात धान्य विकत घ्यावे लागते. त्यामुळेच दुसऱ्या पिढीच्या काळात आपसांत गैरसमज होतात हे त्यातून प्रतिकूल आर्थिक परिस्थितीतील बदलाचे रूप आहे. माधव मॅट्रीक पास होऊन उच्च शिक्षणासाठी औरंगाबादला गेला हे जसे बदलते वास्तव उलट माणुसकीची आपलेपणाची महागाई हेदेखील दुसरे अनिष्ट वास्तव चौथ्या-पाचव्या प्रकरणात येते. मुलगा दुधाचा भाव वाढवितो, कुळ मजूर बजाबाची मुले शेतावरील सालासाठी वाट्यासाठी हक्क सांगतात की ज्या बजाबाला वाट्यापेक्षा भाऊसाहेब अधिक माल देत होते यातले परिवर्तन दूध-धान्य महागले नाही तर माणुसकी महागली हेच सूचित करते. सासरी पाठविलेली अक्की माहेरी येते, विहिरीचे थारोळे पडणे, त्याच्या दुरुस्तीसाठी पैसा नसणे, वाड्याची भिंत पडणे, धाकट्या बहिणीच्या लग्नाला बांगड्या मोडण्याची वेळ येते, हे मधल्या पिढीतील वाताहतीचे द्योतक आहे. अबोल

गोपिकाबाईपण तोल सुटल्यासारख्या अंगावर ओरडतात, दादा-तात्या आर्थिक समस्यामुळे चिडचिड करतात तर पाचव्या प्रकरणात "घर फिरले की वासेही फिरतात." याचे दर्शन जसे घडते तसेच वारुणाविषयीचा तात्याचा गैरसमज दूर होतो. अक्कालादेखील पश्चात्ताप होतो, पण राजेकर घरातल्या मतभेदात चंद्रसारखी मोलकरीणदेखील लक्ष देऊ लागली, शिस्तीला तडा गेला आणि त्यांच्या अपेक्षा वाढल्या. हक्काची जाणीव होऊ लागली. चुगली करण्याची सवय त्यांना लागली. अक्काला माहेरी ठेवण्याऐवजी सासरी पाठविण्याच्या दादांच्या विचाराला गोपिकाबाई, तात्याकडून विरोध होतो. घरातल्या समस्या फक्त पुरुष सोडवित होते; पण त्यामध्ये स्त्रिया सहभागी होऊ लागल्या हेच यातून दिसते. (पृ. १५६-१५८). काळाच्या चक्राबरोबर माणसेही त्याच गतीने बदलत होती. हेच सहाव्या-सातव्या प्रकरणांतील घटना प्रसंगातून चित्रित होते.

कादंबरीच्या तिसऱ्या भागातील एकूण चार प्रकरणांतून माधव सुधाचा म्हणजेच तिसऱ्या पिढीच्या काळातील बदलत्या वास्तवाचे चित्रण येते. दादासाहेब गोपिकाबाईंचा मृत्यू झाला. अगतिक तात्या आनंदी पालीला राहू लागले. वारुणा अनिच्छेने आणि नाइलाजाने वाड्यात जीव जात नाही म्हणून जगत होती. माधव नोकरी करू लागला. माधवने दोन-तीन खोल्या स्वत:कडे ठेवून वाड्यात ज्या बाकी खोल्या भाड्याने दिल्या. माणुसकीभोवती फिरणारा समाज 'पैशा'भोवती फिरू लागला. स्वातंत्र्योत्तर काळात निराशा पदरी पडली. कुळ कायदा यामुळे (कसेल त्याची जमीन) कुळ उद्दाम झाले. श्रमप्रतिष्ठा नष्ट झाली. 'जय जवान जय किसान' चा मंत्र हवेत विरला. रेशनच्या दुकानातील निकृष्ट धान्यावर उदरनिर्वाह करण्याची वेळ आली. हे सर्व बदलते वास्तव लेखकाने समर्थपणे चित्रित केले आहे. वाड्याचे जसे रूप पालटले तसेच गावाचे आळीचे रूप जाऊन बाजाराचे रूप आले. माणसांची गर्दी, रहदारी वाढली. रस्ता मोठा झाला. गाड्या-मोटारींची झुंबड वाढली. चेहरामोहरा बदलला. 'होत्याचं नव्हते झाले आणि नव्हत्याचे होते झाले." राजेकरांच्या वाड्याचे रूप पालटले. रेशनच्या दुकानातून धान्य घेण्याचा काळ आज घरातले गोड्यातेलाचे डबे नाहीसे होऊन, तिथे भांडी किंवा बरण्या आल्या. चांगल्या गव्हाऐवजी निकृष्ट गहू किंवा 'आटा' विकत जाऊ लागले. चूल गेली. रॉकेलसाठी रांगा दिसू लागल्या. सायकली आल्या. धोतरे जाऊन लेहेंगे आले, रूमाल टोप्या जाऊन बोडकी डोकी रस्त्याने फिरू लागली. नऊवारी पातळ जाऊन मुलींच्या अंगावर पाचवारी पातळे आली. मुली हळदी-कुंकू किंवा देवदर्शनासाठी आईबरोबर बाहेर पडणाऱ्या मुली मेकअप करून एकट्या-दुकट्या फिरू लागल्या. थोरामोठ्यांनी ठरविलेल्या मुलींशी लग्न करण्याची परंपरा गेली. माधवने सुधाशी प्रेमविवाह करणे वारुणास हे आवडत नाही या संदर्भात नानू वारूणास म्हणतो, "आता राज्य बदललंय वारुणा. आपला देश स्वतंत्र झालाय. तसाच या देशाचा नागरिकही स्वतंत्र झालाय.

आपण जुन्या पिढीच्या माणसांनी आता जपूनच राहायला पाहिजे. वागायला पाहिजे. (पृ. १८२) नव्या जुन्या पिढीतील संघर्ष अंतर (जनरेशन गॅप) लेखकाने शब्दबद्ध केले आहे. निंदा करण्याची वृत्ती वाढली. आग्रहाने पंक्तीला वाढण्याची राजेकर घराण्याची परंपरा प्रचलित आर्थिक परिस्थितीमुळे नष्ट झाली. जपून जेवायला वाढण्याची नवी सवय बदलत्या वास्तवाचे लक्षण आहे. भोगवाद, चंगळवाद वाढला. त्यागाचा, परोपकाराचा, माणुसकीचा काळ गेला. स्वैर वर्तन, बेफिकिरपणा वाढला हे माधव सुधाच्या वर्तनातून सूचित केले आहे. फॅशनचा प्रभाव, तुटकपणा, हावरेपणा, उद्धटपणा वाढला म्हणून माणसामाणसांतले प्रेम नष्ट झाले. म्हणूनच सोळाव्या वर्षी राजेकरांच्या घरात यावेळी वारुणा वार्धक्यात मात्र हरवल्यासारखी झाली. तिला नानू भाऊजींचा आधार वाटू लागतो. तिच्या व्यक्तिमत्त्वाचे काही पैलू पुढीलप्रमाणे सांगता येतील.

वारुणा निष्पाप, अल्लड, मोकळ्या मनाची, आज्ञाधारक, वागण्यात लाघवी, मर्यादांचे पालन करणारी अशी निरागस आहे. गोरीपान, उंचेली, नऊवारी पातळ घालणारी, रेखीव, नितळ बोलघेवडी वारुणा आणि आयुष्याच्या उत्तरार्धातील थकलेली, भांबावलेली वारुणा या घरात अनेक चढउतारांची साक्षीदार आहे. प्रथम दादासाहेबांशी मर्यादेने किंचित भीती तितकाच आदर आणि जेवढा आदर तेवढाच अभिमान धरून वागणारी वारुणा संयमी शांत आहे. तर मुलांमध्ये ती अवखळपणे, मिस्कीलपणे वागणे, वाचनाची गोडी असलेली, घरातील सर्वांशी एकरूप झालेली दिसते. आपुलकी असूनही दु:ख प्रकट न करणारी, संवेदनशील मनाची, निर्मळ, समजूतदार आहे. चालण्यास डौल, पाणीदार होणारे डोळे आणि बोलका चेहरा असलेली वारुणा स्वप्नवती आणि हजरजबाबी आहे; पण सुधासमोर ती खाली मान घालून वागते.

भाऊसाहेबांच्या मृत्यूनंतर वारुणाची जबाबदारी वाढली. सासूबाई सोवळ्या झाल्या, तर थोरली जाऊबाई (आनंदी) जबाबदारी घेत नाही कारण तिला वारुणा जवळची वाटत होती. (पृ. ८५) वारुणाचा डंख, दु:स्वास करण्याचा स्वभाव नाही तर परदु:खाने व्यथित होणारी अशी आहे. कुजके-नासके संस्कार तिच्यावर कधी झालेच नाहीत. अक्काला हिंगण्याला पाठवण्याचा विचार मांडणारी वारुणा दूर दृष्टीची आहे. (पृ. १००) ती भावनाप्रधानही आहे. मामजींबरोबर त्याचे घर, काळ सारे गेले. उरला सांगाडा (पृ. ११६). पारगावकर वर्णन करतात. ''वारुणाचे व्यक्तित्व म्हणजे पावसातल्या ऊनसावलीचा खेळ होता.'' (पृ. ११८). ती मतलबी नाही, म्हणूनच स्वत:च्या बांगड्या दादासाहेबांच्या स्वाधीन करते ती घर सावरणारी, वागणुकीत रूक्षता, असूया किंवा द्वेष नाही उलट निर्मळ आणि मोठ्या मनाची वारुणा उत्तरार्धात मात्र हतबल झाली याचे कारण म्हणजे वास्तव हेच होय.

## मुक्या जितराबाची कथा – 'सर्जा'

कॉन्टिनेंटल प्रकाशनाने १९९४ साली प्रसिद्ध केलेली 'सर्जा' ही सुरेश पां. शिंदे यांची कादंबरी आहे. दमानिया पुरस्कारप्राप्त आणि प्रा.ग.प्र.प्रधानांनी गौरविलेली आणि प्राचार्य शिवाजीराव भोसल्यांना वैशिष्ट्यपूर्ण, आगळीवेगळी वाटलेली ही कादंबरी आहे. अवघ्या सव्वीस प्रकरणांची, २५६ पृष्ठांची ही कादंबरी. मनोगतात लेखकाने आपल्या अनुभवाचा आणि अनुभवाच्या प्रदेशाचा उल्लेख केला आहे. ''पाहिले, अनुभवले आणि जगलो, ते रेखाटले.'' असा त्यांचा सूर दिसतो. शेतकऱ्यांचे दु:ख त्यांनी चव्हाट्यावर आणले आणि गरीब शेतकऱ्यांच्या जीवनाचे प्रमुख अंग बैल, त्या बैलाच्या कष्टमय जीवनासह प्रातिनिधिक ज्ञानबासारख्या गरीब शेतकऱ्याच्या वास्तवपूर्ण जीवनाचे चित्रण केले आहे. आनंद यादवांच्या नारबाचा गोतावळा नष्ट झाला, त्याप्रमाणे सुरेश शिंदे यांच्या ज्ञानबाचा सर्जा गेला आणि एकूण घरादारावर संकट आले. याचे कारण एका बाजूने भूप्रदेश वैशिष्ट्य असे सांगता येईल त दुसऱ्या बाजेने औद्योगिकीकरणाचे ग्रामीण जीवनाला लागलेले ग्रहण हे सांगता येईल. बदलत असलेली मानसिकता नजरेआड करून चालणार नाही.

साधारणपणे या कादंबरीतून आलेले जीवन हे संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापनेच्या जवळपासचे असलेले दिसते. ते आजच बदललेले, झपाट्याने विकासाच्या दिशेने वाटचाल करणारे, नव्या समस्यांना तोंड देणारे नाही. अर्थात वीस-पंचवीस वर्षांपूर्वीचा अनुभव आजच्या घडीला चित्रित होणे अगदी स्वाभाविक आहे. काही विशिष्ट कालखंड मागे पडल्याशिवाय जीवनातील वेगळेपणही जाणवत नाही. तुलना करता येत नाही. कारण सुरेश शिंदे शेतकऱ्यांच्या जीवनातील अविभाज्य अंग म्हणून 'सर्जा' म्हणजे बैल रेखाटतात; पण आजचे अपरिहार्य अंग आहे. जर्सी गाय, ताजा पैसा हे काळातील अंतर लक्षात घ्यावे लागेल.

वर म्हटल्याप्रमाणे 'बैलाच्या जीवनाबरोबरच शेतकऱ्याचेही जीवन स्पष्ट होताना दिसते. उलट ज्ञानबाबरोबरच सर्जाची ही जीवनकथा आहे. या संदर्भात रा.ग.जाधव म्हणतात, ''.....एका बैलाला कादंबरीचे केंद्र करण्याची दृष्टीही काहीशी अपूर्व आहे. आपल्या जानपद परंपरेत प्राणिपूजा व वनस्पती पूजा प्राचीन काळापासून चालत आलेली आहे. कदाचित वेदपूर्वकाळातील ही

स्थानिक लोकसमूहांची प्रथा कमीअधिक फरकांनी टिकून राहिलेली आहे. नंतरच्या कृषिप्रधान संस्कृतीत गाईबैलांना आणि इतर पशुधनाला सांस्कृतिक महत्त्व प्राप्त झाले व प्राचीन निसर्गदेवतेच्या स्वरूपानुसार त्यांना पूज्यत्व व देवत्वही प्राप्त झाले. गाय ही पृथ्वी आहे असे पूज्य श्रद्धेचे रूपक लोकमानसात सुस्थिर झाले. स्वाभाविकपणेच बैलाचे महत्त्व वाढले. तो महादेवाचा नंदी बनला. बैलपोळ्याची रूढी निर्माण झाली. येथील जानपद जीवनाचा एक अंगभूत घटक म्हणून गाईबैलांना प्रतिष्ठित 'स्थान प्राप्त झाले.'' ही सांस्कृतिक परंपरा मान्य करूनही प्रदेशाने मानवी जीवनावर घातलेल्या मर्यादांचा त्यांच्या जीवनशैलीवरील नियंत्रणाचाही विचार करणे क्रमप्राप्त ठरते.

'सर्जा'मधून पश्चिम महाराष्ट्रातील जेजुरीजवळचा शुष्क, रेताड व अवर्षणग्रस्त परिसर पार्श्वभूमी म्हणून नव्हे तर अनुभवाचा अविभाज्य घटक म्हणून आला आहे. सर्जाच्या आईपासून ही कहाणी सुरू होते. व 'श्रीराम' कारखान्यावर सर्जाच्या अकाली, अपघाती मृत्यूने संपते. न्यानबाच्या कुटुंबाचे सुखाचे दिवस येथे संपतात. कादंबरीचे वाचन करताना एक गोष्ट सातत्याने जाणवते ती ही की, बा.ग. केसकरांच्या 'कुणाच्या खांद्यावर' या कादंबरीची अनुभवदृष्ट्या ही धाकटी बहीण आहे. ऊसतोडणी मजुराची ससेहोलपट मोठ्या ताकदीने केसकरांनी मांडली तो सूर मात्र शिंद्यांना गवसला नाही. या कादंबरीतील माणसांचे दु:खही काहीसे कोरडे वाटते. व्यक्तिरेखाटनालाही काही मर्यादा पडलेल्या दिसतात. अर्थात 'ज्ञानबा' आणि 'सर्जा' जिवापाड जपलेला, नवे गुण उधळणारा सर्जा तर गुराढोरांची आवड असलेला शेतमजूर ज्ञानबा दुसऱ्या बाजूला आहे. ज्ञानबाची बायको कष्टाळू, हुन्नरी तसेच श्रद्धाळू व्यवहारी आहे. बाकी अन्य गौण व्यक्तिरेखा ठसठशीत नाहीत, व्यवहारी तात्या, प्रेमळ म्हातारी, कारस्थानी गावगुंड, बेरकी, मतलबी आणि स्वार्थी असा सरपंच आणि ज्ञानबाचे मित्र सोबती नाना पाव्हणा अस्पष्टच राहिलेले आहत. हे सत्य असले तरी लेखकाला प्रातिनिधिक स्वरूपात बैल आणि त्याचा मालकच जिवंत करावयाचा असल्याने अन्य पात्रांकडे स्वाभाविकपणेच कानाडोळा केला असावा.

पारंपरिक गावगाड्यांच्या आणि लोकसंस्कृतीच्या ऱ्हासाबरोबरच एकूण जीवनशैलीच्या ऱ्हासाचे दर्शनही येथे घडते. भावनेच्या ओलाव्याचा ऱ्हास झाल्याने 'व्यवहारी' परंपरा जन्मली ती ज्ञानबा आणि सरपंचांच्या संघर्षातून व्यक्त होते.

रा.ग.जाधवांनी सर्ज्याची काही ठळक वैशिष्ट्ये नोंदविली आहेत.

१) प्राधान्याने ग्रामीण असलेल्या संस्कृतीचे केंद्र असलेला गरीब शेतकरी व त्याच्याही जगण्याच्या केंद्रस्थानी असलेला बैल ही दोन्हीही या कादंबरीच्या केंद्रस्थानी आहेत.
२) ही कादंबरी संपूर्णपणे ग्रामीण बोलीभाषेत आहे.

३) निवडलेल्या विषयातील सजीवांचे जे जैविक वास्तव पर्यावरण आहे त्या पर्यावरणाचे बरेचसे नेमके संवेदन लेखकाला आहे व हे संवेदन बरेचसे आविष्कृत राखण्यात तो यशस्वीही झालेला आहे.

गरीब शेतकरी, त्याचे जिवाभावाचे गोधन, त्याचा सामान्यतः कठोर व प्रतिकूल असलेला नैसर्गिक परिसर, वस्तीचे चिमुकले अगतिक समूहजीवन त्या विधिवासाच्या (इकोसिस्टिम) पलीकडे उभे राहिलेले, साखर कारखानदारीचे नवे औद्योगिक पर्यावरण, त्या परक्या अनोख्या पर्यावरणात स्वानुकुलन करून घेताना या पहिल्या पर्यावरणीय सजीव सृष्टीची झालेली ससेहोलपट आणि स्वानुकूलनाची प्रक्रिया निलाखस अपयशी ठरल्याचा करुण निष्कर्ष सिद्ध करणारा सर्जाचा अकाली अपघाती मृत्यू आणि त्यातून सूचित होणारे त्याच्या गरीब मालकाचे  उद्‌ध्वस्त घरटे येथे चित्रित केलेले आहे.

सांस्कृतिक जीवनाचा ऱ्हास- बैल महादेवाचा नंदी, वाजतगाजत होणारा पोळा; पण आज मात्र मानापानावरून संघर्ष / वाद होऊ लागला. जिव्हाळा, आपुलकी, प्रेमनिष्ठा, असे आदराचे जीवनच नष्ट होऊ लागले. गावातील संघर्षात राजकारणाचे रंग स्पष्ट होऊ लागले. दोन पार्ट्यांच्या राजकारणाने ज्ञानबासारखे बळी ठरले. म्हणून येथे ज्ञानबाचा कोंडमाराही दिसतो.

लेखक ज्या प्रदेशात जन्मतो, घडतो, वाढतो त्याच्या व्यक्तिमत्त्वावर प्रदेशांचे संस्कार खोलवर झालेले असतात. निर्मितीच्या वेळी ते डोके वर काढतात, 'सर्जा' आणि सुरेश शिंदेंसंबंधीही तेच दिसते. प्रातिनिधिक असलेली 'सर्जा'तील सामाजिकता ही छोट्या ग्रामवस्तीची आहे. सांस्कृतिकता ग्रामीण कृषी जीवनाची आहे. हे दोन्ही घटक शहरीकरण आणि सांस्कृतिकीकरण यांच्या प्रभावापासून अलग राहिलेले आहेत. पारंपरिक असे त्यांचे स्वरूप आहे. कादंबरीतील आशय प्राधान्याने जैविक झगड्याचा आहे आणि तोही परंपरागत वास्तवाशीच असलेला झगडा आहे. नव्या औद्योगिक पर्यावरणाशी  थोडासाच संबंध या झगड्यात दिसतो. प्रदेशाचे लोकजीवनावर वर्चस्व असते. प्राकृतिक वैशिष्ट्यांनी मानवी जीवन नियंत्रित केलेले असते. म्हणून 'दुष्काळा'मुळे स्थलांतराची वेळ पश्चिम महाराष्ट्रातील लोकांवर येते. ऊस तोडणीसाठी म्हणजेच जगण्यासाठी घरदार तोडावे लागते.

व्यंकटेश माडगूळकरांनी 'बनगरवाडी'त सादर केलेल्या दुष्काळी माणदेशा-प्रमाणेच जेजुरीजवळचा शुष्क, नीरस, नापीक, आणि अवर्षणग्रस्त निसर्ग प्रदेश आणि त्यातील पाचपंचवीस कष्टकरी शेतकरी कुटुंबांच्या वस्तीचा हा प्रदेश आहे. या परिसरातील उजाड रेताड शेताचे स्वरूप, माणसांचा आणि बैलगाड्यांचा आधार असणारा डोह, धुळीचे साम्राज्य, रखरखीत माळराने, दुस्तर खडकाळ वाटा, निष्पर्ण खुरटे, झुडपे आणि अल्पशी प्राणसृष्टी ही येथील निसर्गरूप आहे. भूप्रदेशाच्या प्रभावातूनच येथील मानसिकता घडली आहे.

स्वीकारशीलता, सोशिकतेचे स्वाभाविक दर्शन येथे घडते; पण बैलासंबंधी कहाण्या उपऱ्या वाटतात, बैलाचे आजार आणि (औषधोपचार वाचकाचा जीव घेतात.) पण या कादंबरीच्या भाषेसंबंधी अनाकलनीयतेचा आरोप मात्र निराधार वाटतो. अनुभवाच्या मागणीप्रमाणे अपरिहार्यपणे ग्रामीण बोलीतील हे शब्द आले आहेत. उदा. मस (खूप, भरपूर), वारंगुळा (सावड), सडा (एकटाच), भाषा (प्रौढ), धुणं (सोडबांध), पोसची (सांभाळ), कुसटावा (डूख, राग), दलिन्द्र (दारिद्र्य), बकूल (पातेल, भगूल), लांबड (साप) इ. काही इंग्रजी शब्दही बोलीच्या ढंगाने येतात. टायमाला, वारनिंग, याप्रमाणे कादंबरीत सूचकता नाही असे म्हणणे अडाणीपणाचे वाटते, कारण हे जीवन मुळात प्रातिनिधिक आहे. ज्ञानाबा, सर्जा गौण ठरतात आणि ग्रामसंस्कृतीचा ऱ्हास बोलका होणे देवतारूपी बैलापेक्षा आज पैशाची खान असलेली जरशी गाय खरी कामधेनू झाली. गोऱ्याऐवजी कालवड झाल्यावर शेतकऱ्याच्या चेहऱ्यावर आनंद दिसतो.

पुरुषोत्तम बोरकरांच्या 'मेड इन इंडिया' सारखे काहीसे विस्कळीत कथानक याही कादंबरीचे झाले आहे. खरे तर कथानकविरहित कादंबरीचा नवा प्रकार रूढ होऊ घातला आहे. तो काहीसा क्रिकेटच्या कॉमेंट्रीसारखा धावता समालोचक आढावाच आहे. चलतचित्रपटासारखे चित्रण, धूसर चित्रण अनेक चित्रांची मालिका यातून सुसंगती शोधणे. 'हल्या हल्या दूध दे' ही बाबाराव मुसळे यांची कादंबरीही याच वळणाची आहे; त्यामुळे प्रसंग वर्णनात सलगता नाही. ग्रामवस्तीचे जीवन आणि नैसर्गिक परिसराचे मार्मिक वर्णनाचा अभाव, वास्तवाचा अन्वयार्थ लावण्याची दृष्टी नाही. सैलपणा दिसतो, हे मान्य करूनही मुक्या जितराबाच्या आणि मुक्या मनाच्या भावनांचा आनंद यादवांच्या 'गोतावळ्या'प्रमाणे वाट करून देण्याचा सुरेश शिंद्यांचा हा प्रयत्न निश्चितच वैशिष्ट्यपूर्ण आहे.

पश्चिम महाराष्ट्रातील सांस्कृतिक जीवन, जंतरमंतराचे प्रसंगानुरूप दर्शन घडते जसे पोसनी गाय विकायची नसते. गोऱ्याचे मस्तक धापने, नख्या खुडणे, वशिंड उचलणे, कोवळं दुध गोऱ्याला पाजू नये, बाजरीच्या कण्या गायीला दिल्याने ती जास्त दूध देते, तिची कुस वर येते. दोरी करणे म्हणजे अचानक गाय दूध देण्याची थांबू नये, दृष्ट लागू नये म्हणून गळ्यात 'केसरी' (दोरी घालणे) देवाला कोंबडे कापणं, खरखुंटीखाली बिबा, कातड, कावडी पुरणे, जनावराचे कान फडफडणे, शुभशकुन, पाभारीची पूजा, पोळा सण, नव्याने खरेदी केलेल्या बैलाची पूजा, तिवडा रोवण्याची प्रथा, आखाडात नववधूने नवऱ्याचे तोंड न पाहणे इ. म्हणी उखाण्यांतूनही लोकसंस्कृतीचे दर्शन घडते. 'नवाल नवट न टेरीज कवट', 'तटण्याचं झाडं', 'कोळसं आण म्हणणाऱ्याला आलं बाळसं' ही लोकगीते, यात्रा उत्सवांतून लोकसंस्कृतीचे दर्शन घडते.

ऋतूप्रमाणे रंग बदलणाऱ्या निसर्गाचे आणि लोकजीवनाचे सम्यक दर्शन घडत असले तरी खेड्याच्या मूळ जीवनापासून दूर गेल्याने काही मूळ गोष्टींचा लेखकाला विसर पडल्याचे दिसते. ज्ञानबाची बायको निरक्षर असूनही ती बैलाच्या झुली पाहून 'अय्या' म्हणते, ती शिक्षणापासून खूपच दूर असलेली दिसते.

ಐ

# मराठवाड्याचे दर्शन देणारे 'पाचोळा'

कथाकार रा. रं. बोराडे यांनी 'पाचोळा' (१९७१), 'सावट' (१९८७), 'चारापाणी' (१९८९) आणि 'आमदार सौभाग्यवती' (१९९०) या ग्रामीण-प्रादेशिक जीवनचित्रण करणाऱ्या चार कादंबऱ्या लिहिल्या आहेत. 'पाचोळा' परिवर्तन काळातील अकुशल कारागिरांची ससेहोलपट रेखाटते, तर 'चारापाणी' मराठवाड्यातील १९८५-८६ च्या दुष्काळी पार्श्वभूमीवरील प्रादेशिक कादंबरी आहे. 'सावट' उच्च शिक्षणामुळे ग्रामीण भागात निर्माण झालेले नवीन प्रश्न हाताळते, तर 'आमदार सौभाग्यवती' ग्रामीण राजकारणाचे दर्शन घडविणारी कादंबरी आहे.

परंपरागत व्यवसाय उखडला जात असल्याचे दु:ख होत असतानाच, पार्वतीचा नवरा गंगाराम शिंपी गरडाच्या जुन्या धोतराला दंड घालण्याचे नाकारतो. पार्वतीला नवऱ्याचे वर्तन पसंत नसते. तिला भविष्याची काळजी वाटते. आतल्या गाठीचा गरड लातूरहून नवी मशीन आणि फॅशनेबल कपडे शिवणारा टेलर आणतो. त्या टेलरशी स्पर्धा करण्यासाठी गंगाराम सातवीत शिकणाऱ्या भानाला शाळेतून काढण्याचा व अद्ययावत फॅशनचे कपडे शिवण्याचे काम शिकण्यासाठी, लातूरला पाठविण्याचा एकतर्फी निर्णय घेतो. अनिच्छेने भाना लातूरला जातो. वेठबिगाराप्रमाणे त्याला तेथे वागविले जाते. 'आईवरून' त्याला लातूरचा शिंपी शिवीगाळ करतो - मारतो. त्यामुळे भाना परत खेड्यात येतो. दादा-बाबा करून भानाला परत लातूरला पाठविले जाते. तेव्हा गरडाच्या मुलांची संगत धरून तो बार्शीला पळून जातो. मुलगा धंद्याचे अद्ययावत शिक्षण घेत नाही म्हणून गंगारामच प्रशिक्षण घेण्यासाठी लातूरला जातो. अल्पकाळातच हिशेबावरून लातूरच्या शिंप्यांशी मारामारी करतो. त्याला पोलिस पकडून नेतात. आडत्या त्याला सोडवितो. पार्वती गंगारामला घेऊन येते. इकडे दुकानाचे पत्रे काढून मशीनचे डोके चोरीला गेलेले असते. चोरी गरडाच्या सांगण्यामुळे झाली याची खात्री असूनही, पोलिस केस करणे परवडण्यासारखे नसल्याने टाळावे लागते. गंगाराम नवीन मशीन खरेदी करण्याचे ठरून लातूरला जातो. रात्रंदिवस काम करतो. आजार बळावतो. खेड्यात येऊन कायमचे अंथरूण धरतो. भाना किराणा दुकानात काम करू लागतो. पार्वती रोजगाराला जाते. तानी 'भुके'मुळे 'दूदे दूदे' करीत रडते. गंगाराम अधिक चिडचिडा होतो. जयराम कोळ्याच्या मुलीचा भानाने हात धरल्याचे

समजताच भडकतो. त्याला लाथाबुक्क्यांनी मारतो आणि रात्री झोपेतच संपतो. अशा गंगारामच्या हेकेखोर, तापट स्वभावामुळे कुटुंबाची शोकांतिका होते. 'वाळूचा कट्टा फुटल्यावानीच झालं मला. मोप मोप पानी कोंडायला बगायले; तर वाळू काय गवसंना हातात !' (पृ. १४) अशी पार्वतीच्या संसाराची 'पाचोळ्या'सारखी स्थिती होते.

गंगारामच्या स्वभावामुळेच कुटुंबाची वाताहात आणि गंगारामचा मृत्यू होत असला, तरी त्याची बायको 'पार्वती' ही या कादंबरीची नायिका आहे. ती कादंबरीची निवेदिका आहे. तिच्या भावभावनांशी सर्व घटना-प्रसंग एकजीव झाले आहेत, प्राप्त परिस्थितीत सुख मानणारी सर्वसामान्य स्त्री आहे. कुटुंबातील आपले दुय्यम स्थान आहे. नवऱ्यापुढे आपले काही चालत नाही, याची तिला जाणीव आहे. संसाराची परवड थांबवू पाहणारी, दूरदृष्टीची, धीरगंभीर, सोशीक, समंजस आणि दारिद्र्य व मर्यादांची जाणीव असलेली पुत्रप्रेम आणि प्रतिष्ठा यांच्या कात्रीत सापडलेली अगतिक आहे. गरडाच्या स्वभाव आणि ताकदीची तिला कल्पना आहे. सर्वांना सांभाळण्याचा ती प्रयत्न करते. पाचोळ्यातील पारबतीचे व्यक्तित्व अन्य पात्रांमुळे प्रभावी बनते. प्रा. भास्कर चंदनशीव म्हणतात, ''आईचे प्रेम न मिळालेल्या पोरक्या पोरीची ही जीवघेणी भविष्यकथा अधिक भावनाप्रधान, उत्कट, हळवी आणि हृदयस्पर्शी वाटते. या सगळ्या विविधरंगी भावनाट्यातून, ताणतणावातून पारबती मोठ्या समजुतदार पद्धतीने आकाराला येते. तिचे ते हळुवार आत्मनिवेदनही या सगळ्या भावभावनांना प्रत्ययकारी, अर्थपूर्ण बनविते.' प्रा. चंदनशीवांनी पार्वतीच्या व्यक्तिरेखेसंबंधी केलेले भाष्य समर्पक वाटते.

गंगाराम हा खेड्यातील सामान्य शिंपी, फॅशन माहीत नसलेला. कसलेच माप वगैरे न घेता कपडे हातानेच फाडून शिवणारा, अकुशल कारागीर आहे. परिवर्तनाला-आधुनिकीकरणाला सामोरा जाऊ शकत नाही. उलट गरडासारख्या प्रचंड शक्तीशी संघर्ष करतो. मुलाचा तिरस्कार करू लागतो. गरडाविषयी अढी ठेवून त्याच्यावर कुरघोडी करून परिस्थितीवर मात करण्याचे स्वप्न पाहतो. परिस्थितीला तो कधीही शरण येत नाही. सरळ नाकासमोर पाहून चालणारा असल्यामुळे दूरदृष्टी नाही. किरकोळ कारणांमुळे एकेरीवर येणारा, तिरसिंगराव, तऱ्हेवाईक, भडक डोक्याचा, मनस्वी, जिद्दी, भांडखोर, चिडचिडा, रागीट, तांबीस, तापट, हेकेखोर, लहरी, कुढा तसाच स्वाभिमानी आहे. परंपरागत व्यवसायाच्या ऱ्हासाचे दु:ख पचवू शकत नाही. मर्यादित कुवतीचा आणि परंपरेने एकच एक धंदा अंगवळणी पडलेला खेड्याच्या शहरीकरणाने ढासळत जाऊन त्यातच संपलेला दिसतो. 'तानी' ही निष्पाप मुलगी असून, 'खादाड' नियती आहे. 'भाना' सातवीत शिकणारा हुशार, समजदार, आई-बहिणीवर प्रेम करणारा मुलगा आहे. बापाने गरडाशी स्पर्धा केल्यामुळेच आपणास शिकता आले नाही म्हणून बापाच्या

विरोधात उभा राहतो. मशिनकाम शिकण्यास नकार देतो. बापाविषयी अढी ठेवून वागतो. बापापासून दुरावलेला संवेदनाक्षम मुलगा किराणा दुकानात काम करतो. कोळ्याच्या मुलीने आव्हान करताच तिचा हात पकडतो. बाप रागवताच माघारी बोलतो, असा स्पष्टोक्ता आहे, बापाप्रमाणेच स्वाभिमानी आहे. लातूरच्या शिंप्याने शिव्या दिलेल्या त्याला सहन होत नाही.

'गरड' हे कादंबरीतील अप्रगट पात्र आहे. आतल्या गाठीचा, तऱ्हेवाईक, खडूस, दुष्ट आणि ताकदवान सरंजामी वृत्तीचा प्रतिनिधी आहे. पार्वती म्हणते, ''गरडबी काय मामुली आसामी न्हाई, समद्या गावानं ववाळून टाकलेला, लई खडूस की कवा कुनाला तोंड उघडून बोलायचा न्हाई. कुनी आरं म्हनलं तर कारं सुदा न्हाई म्हनायचा. पर त्येचे तीन तेरा केल्याशिवाय न्हाई ऱ्हायचा. गावातल्या भल्याभल्या लोकांना त्येनं हात दावलाया. आपुन तर काय निव्वळ पाचुळ्यावानी, जरा त्येनं फुकलं तर चाल्ले कुठल्या कुठं उडत.'' (पृ. ३). या वर्णनावरून गरडाच्या स्वभावाची आणि सामर्थ्याची कल्पना येते. गरडाचा मुलगा स्पष्टोक्ता, गर्विष्ठ, उर्मट-उद्धट आहे. बाबाच्या श्रीमंतीचा त्याला गर्व आहे. भानाशी संबंध प्रस्थापित करून त्याला बार्शीला घेऊन जातो. गंगारामच्या संसार परवडीस खऱ्या अर्थाने तोच कारण ठरतो. माळ्याची सरू, श्यामराव कदम, यशवंता आणि गया हे प्रेमळ जोडपे, लक्षीमन, भागा आजी, मास्तर, आडत्या, लातूरचा शिंपी, नवा शिंपी, जयराम कोळी आणि त्याची मुलगी, कष्टकरी-रोजगारी आयाबाया आणि अन्य गौणपात्रांच्या चित्रणातून लेखकाने समाजवास्तवाचे दर्शन घडविले आहे.

भू-प्रदेश किंवा निसर्गवर्णन अभावानेच येते; त्यामुळे तिच्या ग्रामीणतेविषयी किंवा प्रादेशिकतेविषयी शंका येणे स्वाभाविक आहे; परंतु येथे एक गोष्ट लक्षात घेतली, तर मात्र अशा शंका येण्याचे कारण उरणार नाही. ही मराठवाड्यातील लातूरजवळच्या खेड्यातील अकुशल शिंप्याची शोकांतिका आहे. म्हणजेच ती जनजातीचे जीवनचित्रण करणारी प्रादेशिक कादंबरी आहे. मधू जामकर म्हणतात, ''येथे मराठवाड्यातील प्रदेशाचे वर्णन येते तेच मुळी आपल्या आशयापासून फटकून असे. सारा परिसर एखाद्या झालरीप्रमाणे कथेच्या अवतीभोवती ठिगळाठिगळांचे कुंपण लावतो.'' ४) तसेच अ. वा. कुलकर्णी म्हणतात, ''या कादंबरीतील एकंदर कथात्मक आराखडा लक्षात घेतला, तर तिला 'ग्रामीण' म्हणता येणार नाही असे वाटते.'' ५) त्याचप्रमाणे माधवकृष्ण सावरगावकर म्हणतात, ''पाचोळामध्ये मात्र हा परिसर किंवा हा ग्रामीणतेचा बोधस्वर अनन्यसाधारण रूप धारण करताना आढळत नाही.'' ६) मधू जामकर, अ.वा. कुलकर्णी आणि माधवकृष्ण या तिघांचे हे विवेचन अर्धसत्य वाटते. अल्पप्रमाणात ग्रामीण भागाचे-परिसराचे उल्लेख आलेले आहेत, ते नाकारता येत नाही. जसे, ''ऊन चपचप करायलेलं... लईच झालं दमल्यावानी अंग बी वलंचिक झालंत

घामानं.' (पृ. ५२) किंवा 'चैत्राचा म्हयना, उनाचा कार झालेला. कासावीस व्हायलं मला.'' (पृ. ८३) या वर्णनांतून पार्वतीची मानसिकता लेखकाने टिपली असून, मराठवाड्यातील जीव घेणारा उन्हाळाही दृष्टिगोचर केला आहे. तसेच कादंबरीचे निवेदन आणि संवाद प्रदेशविशिष्ट आहे. लातूर, उस्मानाबादी बोलीतून पार्वती निवेदन करते. त्यातूनही प्रदेश जिवंत होत जातो. त्यापेक्षा ती जनजातींच्या जीवनावरील अनुभव चित्रित करते, तिच्यातील प्रादेशिकता ही जनजातींच्या जीवनाशी निगडित आहे. प्रदेशापेक्षा जात महत्त्वाची आहे. डॉ. गो.मा. पवार 'पाचोळा'संबंधी म्हणतात, 'मराठी ग्रामीण कादंबरीने आता ग्रामीणतेची कक्षा ओलांडली आहे. चित्रण करण्याच्या दृष्टीने अवघड असलेले अर्थपूर्ण जीवनानुभव कलात्मकपणे प्रकट करण्याचे सामर्थ्य आता तिच्या ठिकाणी आलेले आहे, याचीच साक्ष प्रा. बोराडे यांच्या 'पाचोळा' या कादंबरीतून पटते.'' ७) प्रा. बोराडे यांनी ग्रामीण जीवनानुभवाला बोलीभाषेच्या माध्यमातून कलात्मक आकार दिला आहे. प्रादेशिकतेच्या मर्यादा ओलांडून मानवी जीवनातील ताण-तणाव वर्णन करण्याचे त्यांच्या लेखणीत साधर्म्य आहे, हे सर्व मान्य करूनदेखील प्रदेश आणि निसर्ग एक पात्र म्हणून सजीव होऊन अवतरला नाही, हे मान्यच करावे लागते.

परिवर्तन काळात ग्रामीण भागाचा आधुनिकीकरणामुळे चेहरा-मोहरा बदलण्यास प्रारंभ झाला. कारागिरांचे रोजगार उखडले गेले. नव्या स्पर्धेमुळे जुने नष्ट होऊ लागले. नव्या गोष्टी आत्मसात करण्याची प्रवृत्ती वाढली; त्यामुळे परंपरागत व्यवसाय करणाऱ्या लोहार, सुतार, कुंभार, चांभार, शिंपी यांच्या व्यावसायिक आणि कौटुंबिक जीवनात ताण-तणाव निर्माण झाले. सामान्य कुवतीच्या अर्धकुशल कारागिरांना या बदलाला सामोरे जाता आले नाही. साहजिकच, त्यातून संघर्ष होऊ लागले. गंगारामसारखा परंपरागत धंदा करणारा आणि समाधानाने-स्वाभिमानाने जगणारा कारागीरदखील बदलत्या परिस्थितीला थांबवू शकला नाही. त्याच्या स्वभावामुळे आणि आधुनिकीकरणामुळे त्याची शोकांतिका झाली. अस्मितेची मागणी करणारी ग्रामीण समाजाची भव्य प्रतिमा गंगारामच्या संघर्षातून लेखकाने उभी केली आहे.

जनजातीच्या जीवनावरील मराठवाड्याची पार्श्वभूमी लाभलेली लक्षणीय प्रादेशिक कादंबरी म्हणून 'पाचोळा' कडे बोट दाखवावे लागेल.

ၹ

# 'तहान' कादंबरीतील वैशिष्ट्यपूर्ण व्यक्तिरेखा

आपला देश स्वतंत्र होऊन अर्धे शतक उलटून गेले, तरी भारतापुढील अनेक समस्या जशाच्या तशा आहेत. ग्रामीण भागातील पाणीटंचाई ही समस्या त्यांपैकीच एक. मानवाने अनेक शोध लावले, अवकाशप्रवास केला, संगणक युग सुरू झाले, सर्व क्षेत्रांत प्रगती झाली; पण 'पाणी समस्या' स्वातंत्र्यापूर्वी जशी होती तशीच आहे. किंबहुना दिवसेंदिवस ती जास्तच गंभीर होत आहे.

एरवी आपण पाणी म्हणजे जीवन वगैरे म्हणतो, परंतु हेच पाणी मिळेनासे झाले की माणसाची झोप उडते. विशेषत: ग्रामीण भागात आजही या समस्येचे स्वरूप उग्र बनते. पाण्यासाठी बायकांना मैलोन्‌मैल भटकावे लागते. पाण्याचे सर्व स्रोत संपुष्टात येतात, तेव्हा पायपीट करूनही पाणी मिळेलच याची खात्री नसते. मिळालेले पाणी आरोग्यास उपयुक्त असेलच असे नाही. हे सर्व घडते ते केवळ निसर्गाच्या अवकृपेकुळे. पाणीटंचाईने त्रस्त असलेल्या लोकांची मने होरपळून जात असताना त्यांना मदतीची अपेक्षा असते ती आपल्या लोकप्रतिनिधींकडून, आपल्या सरकारी योजनांकडून. परंतु स्वार्थी लोकप्रतिनिधी व सरकारी योजनातील भ्रष्टाचाराने त्यांच्या आशा मावळतात. गावामधील गावपुढारी, टगे, अडलेल्या, त्रासलेल्या लोकांचा उपयोग आपली तुंबडी भरण्यासाठी करतात.

मानवी मूल्यांचा विसर पडलेल्या समाजात आपली जीवनमूल्ये सांभाळणारा सामान्यांचा वर्ग आढळतो. एवढेच नव्हे तर मूल्यहीन समाजात संघर्ष सुरू होतो आणि हा संघर्ष, भौतिक सुखाच्या मायावी मृगजळामागे धावणारी तरुण पिढी व जीवनमूल्ये जोपासणारी वृद्ध पिढी यांच्यातही आढळतो. शेवटी निराशा पदरी आल्यानंतर तरुणांची होणारी तगमग, त्यांच्यावर आलेला ताण, त्यातूनही योग्य मार्ग दाखविणारी वृद्धांची पिढी समाजामध्ये सापडते. हे ग्रामीण समाजाचे वैशिष्ट्य होय. पाणी टंचाईमुळे केवळ माणसेच हैराण होत नाहीत, तर ग्रामीण जीवनातील अविभाज्य घटक, गावाचे शिवार व शिवारातील शेती वैराण बनते. गुरे-ढोरे, पशू, पक्षी पाण्यावाचून तडफडू लागतात. या सर्व समस्यांचे दर्शन 'तहान' कादंबरीत घडते.

'तहान'च्या निमित्ताने सदानंद देशमुख ग्रामीण भागातील अत्यंत नाजूक व महत्त्वपूर्ण प्रश्नांची चर्चा करतात. या सर्व चर्चेमध्ये कोठेही बेगडीपणा वाटत नाही. ग्रामीण जीवन त्यांनी स्वत: अनुभवल्यामुळे ग्रामीण समस्यांची जाण त्यांना आहे.

स्वत: ग्रामीण जीवन जगलेल्या सदानंद देशमुखांना पाणी टंचाईच्या समस्येने अस्वस्थ केले. या अवस्थेतूनच त्यांनी लेखणी हाती घेतली आणि त्यातून 'तहान' कादंबरी जन्मास आली. अर्थात ही 'तहान' केवळ पाण्याची नाही, तर सुखोपभोग, चंगळवाद यांचीही आहे.

'तहान' या कादंबरीत त्यांनी राघोजी शेवाळे यांची अस्वस्थता मांडण्याचा प्रयत्न केला आहे. राघोजी शेवाळे ही प्रातिनिधिक व्यक्तिरेखा आहे. राघोजी शेवाळेसारखे लाखो लोक ग्रामीण भागाचे घटक आहेत की जे दरवर्षी पाणी टंचाईच्या समस्येला सामोरे जातात. वर्षानुवर्षे एकच समस्या अनुभवतात; पण त्यांच्या नशिबी काही हाती येत नाही. 'तहान' या कादंबरीत राघोजी शेवाळे, बबन शेवाळे, बबनची आई रामकोर, बबनची बहीण, बबनची प्रेयसी इ. पात्रे आहेत. त्यानुषंगाने गावातील चांडाळ चौकडी, रिपोर्टर व स्थानिक पुढारी यांचा उल्लेख आलेला आहे. या पात्रांचा थोडक्यात परिचय आपण करून घेणार आहोत.

**१. राघोजी शेवाळे :**

राघोजी शेवाळे मानवी जीवनाची मूल्ये जोपासणारा वृद्ध पिढीतील शेतकरी आहे. आपल्याकडे असणाऱ्या साधनसामग्रीवर गुजराण करणारे, प्रतिकूल परिस्थितीशी झगडणारे असे व्यक्तिमत्त्व आहे. ज्यांच्यावर आपले जीवन आहे, त्या ग्रामीण जीवनातील अविभाज्य घटक म्हणजे बैलांवर जिवापाड प्रेम करणारा शेतकरी. त्याच्याकडे मुरल्या व छबिल्या या बैलांची जोडी आहे. मुरल्या अन् छबिल्या या दोन बैलांना आपल्या कुटुंबाचे घटक समजूनच तो त्यांच्याशी व्यवहार करीत आहे.

गावामध्ये पाणीटंचाईच्या समस्येने थैमान घातल्यामुळे गावाजवळील पाण्याचे स्रोत संपले आहेत. आता गावापासून दूरवर डांबरी डोह आहे. तेथे पाणी उपलब्ध असले तरी या डोहापर्यंत जाण्याचा रस्ता चांगला नाही. जाताना उतार आणि येताना चढ म्हणून डाबरीच्या डोहाचे पाणी वाहून आणणे कठीण जाते. बैलांना त्रास होऊ नये म्हणून राघोजी शेवाळे आपल्या बैलांना या डोहाकडे पाणी आणण्यासाठी कधीही नेत नाही. गावाजवळील हपशावरून पाणी भरतो.

परंतु राघोजीचा मूल्यवाद पुढे उपयोगी पडत नाही कारण भौतिक सुखाच्या पाठीमागे धावणारा मुलगा बबन, पत्नी रामकोर व मुलगी वर्षा त्याच्याबरोबर राहतात. त्याचा मूल्यवाद कसा चुकीचा आहे. मूल्यवादी जीवन जगल्यामुळे किती वाईट दिवस जगावे लागतात, हे रामकोर जेव्हा राघोजीला सांगते, तेव्हा राघोजीचा राग अनावर होतो व तो रामकोरचे मुखकमल रंगवितो. त्यावर रामकोर आपली कोणती हौस-मौज झाली नाही, चांगले-चुंगले खायला मिळाले नाही, आता मुलगा चार पैसे कमवितो, त्याच्या कमाईवर गुपचूप जगावे व मुलगा जे करतो त्यास योग्य समजावे असे राघोजीला सुचविते तेव्हा त्याला असहाय्य वाटते. अशा प्रकारे जीवन जगणे त्यास अपराधीपणाचे वाटते.

राघोजीच्या कमाईमध्ये रामकोरला नेहमी अठरा विश्वे दारिद्र्यात जगावे लागते. पण मुलाच्या कमाईमुळे मांस-मटण खायला मिळू लागले, म्हणून ती जेव्हा राघोजीला याची आठवण करून देते तेव्हा राघोजीच्या काळजाचे तुकडे तुकडे होतात. रामकोरला मुलगी जेव्हा वडील जेवले नाहीत म्हणून सांगते तेव्हा रामकोर म्हणते, 'जाऊ दे ग ! घेऊ दे सुखढाळऽऽ आपणच भूक लागल्यावर दुल्डी चाफळत येईल. ती सवय होती त्यांची. मानानं खाये ना तूप रोटी अन् निजल्या निजल्या उखळ चाटीऽऽ' हे बोलणे ऐकल्यावर राघोजीला मरणप्राय यातना होतात. यापेक्षा त्याला स्वकमाईची चटणी-भाकर बरी होती असे वाटते.

राघोजीला आपले जीवन नकोसे झालेले. कारण बायको नेहमी टोचणीने बोलते. हातपाय धुण्यासाठी पाणी घेतले तर रामकोर म्हणते, 'वर्षातुपल्या बापले सांग पाणी कमी सांडवंड म्हणा. पाण्याले सोन्याचं मोल हाये आताच्या जमान्यात. माहं करू नाई माणसानं.' ह्या सगळ्या गोष्टी त्याला नित्याच्या होतात. त्याला रामकोर नेहमीच तुच्छ लेखीत राहत. त्याला बैलाला होणारा त्रास सहन होत नाही. राघोजीला आपले बैल म्हणजे मुलाप्रमाणे, त्यांचा सांभाळही त्याने तशाच प्रकारे केलेला म्हणून बैलांना होणाऱ्या त्रासाने तो व्याकूळ होतो.

पुढे गावाची पाणीसमस्या समाप्त व्हावी म्हणून पाणी आंदोलनात तो सहभागी होतो. या आंदोलनाच्या वेळी झालेल्या गोंधळात राघोजीचा पाय मोडतो. चालत-फिरता असताना त्याची पत्नी तिरस्कार करायची, आता तर तो त्यांना ओझे वाटू लागतो. पुढे आंदोलनामुळे गावाला टँकरने पाणी सुरू होते. पण पुढारी व नोकरदार पैशांच्या जोरावर पाणी विकत घेतात आणि गोरगरिबांची स्थिती जैसे थे राहते. राघोजीला एक स्वप्न पडते. या स्वप्नात त्याला बैलाच्या अंगावर कावळे लचके तोडताना दिसतात. बैल नाहीसे होतात, मुलगा बबन्या नाहीसा होतो. पाण्याने सर्वजण व्याकूळ झाल्यावर व नाहीसे झाल्यावर पाण्याची चिळकांडी जमिनीतून फुटते, अशा वेळी पण त्याचा काही उपयोग होत नाही. कारण पाणी नव्हते, त्यावेळी ते पाणी विकायचे. पुढे पाण्यावाचून तहानलेले राहिले. जेव्हा पाणी दारात लागते तेव्हा रामकोर व मुलगा राहिलेला नाही. दोन्ही वेळी त्याची तहान तशी राहते. शेवटपर्यंत राघोजी तहानलेला तसाच राहतो. अशी ग्राम-कृषि-मूल्ये जतन करणारी, त्यासाठी अखेरपर्यंत संघर्ष करत राहणारी राघोजीची व्यक्तिरेखा या कादंबरीतील महत्त्वाचे पात्र आहे.

**२. बबन शेवाळे :**

बबन शेवाळे या कांदबरीतील दुसरे प्रमुख पात्र. तो चंगळवादी गटाचे प्रतिनिधित्व करतो. मूल्यहीन जीवन जगणाऱ्या गटाचा तो आहे. पाणी टंचाईची समस्या जेव्हा गंभीर बनत जाते, तेव्हा बबन शेवाळे पाण्यासाठी अडलेल्या घटकांचा गैरफायदा उठविण्याचा प्रयत्न करतो.

तो पाणी विकण्याचा व्यवसाय सुरू करतो. यापूर्वी कधीही न पाहिलेली

रक्कम त्याने पाणी विकून जमवली आहे. त्यासाठी तो आपल्या वडलांना जिवापाड प्रिय असणाऱ्या मुरल्या व छबिल्या या बैलांना राबवितो. रखरखत्या उन्हात तो त्यांचा उपयोग पाणी वाहण्यासाठी करतो. वास्तविक दुपारी चारा खाऊन विश्रांती घेण्याची वेळ असताना बबन बैलांना जुंपत असल्यामुळे त्यांच्या तोंडाला फेस येतो; त्यामुळे राघोजीचा जीव तळमळतो, पण पैशाची नशा चढलेल्या बबनला आणखी पैसा मिळवावासा वाटतो. बबन शेवाळे पाणी विक्रीतून मोठ्या प्रमाणात पैसा गोळा करतो. अर्थात हा पैसा कसा खर्च करावा हे माहीत नसल्यामुळे तो भौतिक सुखांच्या मागे लागतो. घरामंध्ये दररोज मांस-मटण होते. खाण्या-पिण्याची इच्छा पूर्ण झाल्यावर तो नव्याने उदयाला येणारा नायक आहे. पाण्याच्या निमित्ताने रत्ना या तरुणीशी त्याचा संबंध येतो. पाण्यासाठी व्याकूळ असलेली रत्ना बबनला भेटते आणि दोघेजण एकमेकांच्या प्रेमात पडतात.

परंतु नियतीला हे मान्य नसते. बबन जास्त पैसे मिळावेत म्हणून आणि खूप पाणी विकले जावे म्हणून टायरची गाडी बनवतो. खूप पैसा मिळवतो. घर विकासाच्या दिशेने वाटचाल करत असतानाच बबन व रत्नाची प्रेमकहाणी गावभर होते. गावातील चांडाळचौकडीला ही गोष्ट मान्य नाही. एवढेच नव्हे, तर रत्नाच्या वडलांनाही ही गोष्ट मान्य नाही. तो बबनला गावगुंडाच्या मदतीने चांगला चोप देतो आणि बबनचे दुर्दैव सुरू होते. रत्नाबरोबरची प्रेमकहाणी मिटविण्यासाठी रत्नाचा बाप तोताराम गालफडे, सोमनाथ हावरे पोलिस, प्रमोद नवले वार्ताहर, मोहन काळे ही चौकडी त्याला अडचणीत आणून त्याच्याकडे दहा हजार रुपयांची मागणी करतात. या ठिकाणी बबन शेवाळे ह्या आजच्या भौतिक सुखाच्या मागे धावणाऱ्या तरुणाचे प्रातिनिधिक अध:पतन पाहावयास मिळते.

शेवटी बबनला आपल्या चुकांची प्रचिती येते; पण वेळ निघून गेलेली असते. आता पश्चात्तापाशिवाय काहीच त्याच्या हाती उरत नाही. त्याला वडील जेव्हा सांगत होते खूप पैशाच्या पाठीमागे लागू नकोस; पण त्याने ऐकले नाही त्याची आठवण त्याला होते. संकटाच्यासमयी तो खरेदी केलेल्या सर्व वस्तू पुन्हा विकतो. एवढेच नव्हे, तर आईसाठी केलेली गळ्यातील माळ चोरून नेतो. थोडक्यात बबनला आपल्या सर्व चुका समजतात. आता तो चोहोबाजूने अडचणीत येऊ लागला आहे. कारण पाणी पुरवण्यासाठी गावात टँकर सुरू झाले आहेत. बबनकडून कोणीही पाणी विकत घेत नाही. मागील दिवसांत पाणी विकून त्याला जरी चार पैसे मिळाले होते, तरी त्याच वेळी त्याने ते खर्च केले असतात. बबनच्या पदरी शेवटी निराशा येते. चंगळवादी प्रवृत्तीचे प्रतिनिधित्व करणाऱ्या बबनची व्यक्तिरेखा वाचकाला विचारप्रवृत्त करते.

**३. रामकोर :**

रामकोर ही या कादंबरीतील प्रमुख स्त्री व्यक्तिरेखा आहे. ती राघोजी शेवाळेची पत्नी व बबनची आई आहे. नवऱ्याच्या काळात तिने अत्यंत हलाखीत

दिवस काढले. तिच्या अनेक इच्छा दडपलेल्या आहेत. म्हणून तिला जशी संधी मिळते तशी ती सर्व इच्छा पूर्ण करून घेते. तिचा मुलगा बबन हा पाणी विकून मोठ्या प्रमाणात पैसे मिळवू लागल्याने तिला खूप आनंद होऊ लागला आहे. आता घरची मालकीण म्हणून घराचा संपूर्ण कारभार पाहू इच्छित आहे.

परंतु जुन्या विचारांच्या राघोजीला तिचे हे बदललेले रूप आवडत नाही. उलट तो आपली पूर्वीची परिस्थिती विसरू नकोस, असा सल्ला देतो; पण ती त्याच्याकडे दुर्लक्ष करते. उलट राघोजीनेच काही बदल करून घ्यावयास पाहिजे असे तिला वाटते. तीही इतर स्त्रियांप्रमाणेच आपल्या मुलाच्या कमाईवर खूष आहे. आर्थिक अडचणीमुळे ज्या ज्या गोष्टी आपणास करावयास मिळाल्या नाहीत, त्या आता केल्या पाहिजेत म्हणून ती खाण्यात मांस-मटण वरच्यावर करते. आता तिच्या हातात घरचा सर्व कारभार असून ती कारभारणीप्रमाणे कारभार चालविते.

बबन पाणी विकून पैसे मिळवत असला तरी त्यामुळे बैलांचे होणारे नुकसान राघोजी बोलून दाखवितो तेव्हा ती राघोजीला दंश करण्यासाठी टपलेल्या नागिणीप्रमाणे बोलते आणि त्याच्या कमाईकाळात कसे दारिद्र्यात राहवे लागत होते, आता आपला मुलगा कसा चांगला आहे हे सांगण्याचा प्रयत्न करते. तिच्या अशा वागण्याने राघोजीच्या काळजाचे तुकडे होतात. त्याला चांगले-चुंगले खाण्याऐवजी आपली गरिबीची चटणी-भाकर खूप चांगली होती असे वाटते.

रामकोर ही भोळी भाबडी असली तरी तिला अनेक गोष्टींचा हव्यास आहे. तिला नटण्यामुरडण्याची आवड आहे. म्हणून तर ती बबनला गळ्यातली माळ करण्यास सांगते. बबनही आईसाठी माळ करतो. मुलगा जोपर्यंत पैसे आणून देत आहे तोपर्यंत तो कशा प्रकारे कमवून आणतो आहे याचा कधी ती विचार करीत नाही. वास्तविक अशा प्रकारच्या तिच्या वागण्यामुळे बबन संकटात जातो तशीच तीही नाशाकडे वाटचाल करते. पर्यायाने बबन व त्याची आई शेवटी सर्वस्व गमावून बसतात. रामकोर हे चैनीसाठी आसुसलेले व्यक्तिमत्त्व कायमचे तहानलेले राहते. तिच्या अनेक इच्छा-आकांक्षा अपूर्ण राहतात. त्याचबरोबर तिच्यासाठी केलेली माळही बबन चोरून नेतो, तेव्हा तिला खूप दुःख होते. कायमची असमाधानी असलेली ही व्यक्तिरेखा आहे.

**४. वर्षा शेवाळे :**

ही बबन शेवाळेची बहीण आहे. ती दुय्यम व्यक्तिरेखा आहे. आईवडलांच्या मतभेदात ती कधी आईच्या बाजूने तर कधी वडलांच्या बाजूने राहते. वास्तविक, दुय्यम भूमिका असल्यामुळे एकूण कादंबरीत तिचे संबंध तुटक तुटक येतात. ती स्वविचारी वाटत नाही.

५. रत्ना :

रत्ना ही कादंबरीतील सहाय्यक व्यक्तिरेखा आहे. काही दिवस जिल्ह्याच्या शहरात गेल्यामुळे तिचे राहणीमान टापटीप असून इतर कोणत्याही तरुणाला आकर्षित करू शकेल असे आहे. ती तरुण असून अविवाहित आहे. त्यामुळे बबन शेवाळे तिच्या प्रेमात पडतो; पण त्यांचे प्रेम फार काळ टिकत नाही. रत्ना बबनवर खूप प्रेम करते; पण बबन व रत्ना विजातीय असल्यामुळे समाजाला आणि तिच्या वडलांनाही त्यांनी असे एकमेकांना भेटणे किंवा प्रेम करणे मान्य नाही, म्हणून समाजातील चांडाळ-चौकडी त्यांच्या प्रेमात विघ्न आणतात. त्यात रत्नाचे वडील खलनायकाची भूमिका बजावतात आणि त्या दोघांची ताटातूट करतात. बबन संपूर्ण गावाला पाणी पाजून तहान भागवत असला तरी स्वत: मात्र रत्नाच्या प्रेमासाठी तहानलेलाच आहे. ती त्याची 'तहान' कधीच भागत नाही. उलट रत्नाच्या प्रेमामुळे बबन अडचणीत येत जातो आणि त्याला सर्वस्व गमावून बसावे लागते. पौगंडावस्थेतील बबनची चंगळवादी शोकांतिका रत्नाच्या व्यक्तिरेखेने गडद होत जाते.

६. इतर दुय्यम पात्रे :—

कादंबरीत कथानक उभे करताना इतर काही पात्रे दुय्यम आहेत. कासमभाई, नंदू आळशी, भगवान होगे, गोविंद ताजणे, रत्नाचे वडील, गावातल्या बायका, रत्नाच्या मैत्रिणी, गुलाबराव भालेराव, प्रमोद नवले, ग्रामसेवक, सरकारी अधिकारी अशा विविध व्यक्तिरेखा प्रसंगानुरूप आलेल्या आहेत. याशिवाय मुरल्या आणि छबिल्याचा उल्लेख वारंवार येतो. एवढेच नव्हे, तर सर्व कथानक त्यांच्याच भोवतीने फिरते.

एकीकडे राघोजी शेवाळेची कृषिमूल्ये जपणारी व्यक्तिरेखा तर दुसरीकडे बबन शेवाळे, रामकोर, रत्ना, वर्षा या प्रमुख, तसेच कासमभाई, नंदू आळशी, भगवान होगे, गोविंद ताजणे, रत्नाचे वडील, प्रमोद नवले, ग्रामसेवकादी पूरक व्यक्तिरेखा असा असमतोल या कादंबरीत आल्याने विरोध-समतोल लयाची अशी पारंपरिक चौकट मोडून ही कादंबरी नवा मार्ग चोखाळते. या असमतोलामुळेच राघोजी शेवाळेची पर्यायाने कृषी ग्रामीण पारंपरिक मूल्यांची शोकांतिका या कादंबरीत भीषण रूप धारण करते. या कादंबरीचे खरे यश या वैशिष्ट्यपूर्ण व्यक्तिरेखांमध्येच सामावले आहे असे त्यामुळेच म्हणावेसे वाटते.

# 'पाटलाची लंडनवारी'मधील प्रतिमा

'पाटलाची परदेशवारी'चे मराठीतील पहिले देशीवादी प्रवास वर्णन असे यथार्थ परीक्षण प्राचार्य रा.रं. बोराडे यांनी केले आहे. गरीब शेतकऱ्याच्या घरातील जिद्दी मुलगा, इंग्रजीचा प्राध्यापक, ग्रामीण लेखक आणि तुलनाकार या नात्याने त्रिशंकूसारखा प्रवास कसा होतो हे दर्शविण्यासाठी त्याचे नामकरण 'पाटलाची लंडनवारी' असे झाले आहे. बर्लिनमधील तिसऱ्या जागतिक शेक्सपिअर मेळाव्यात तौलनिक शोधनिबंध सादर करायला जाणारा हा पहिला मराठी माणूस, युरोपातील डझनभर देशांत त्यांना परिक्रमा करायला मिळाल्या, त्यांचेच हे विनोदी, रंजक, उद्बोधक तसेच भेदक चित्रण मराठीत एकमेव आहे. कारण ते 'एक होता कार्व्हर' सारखे प्रेरणा देणारे आहे, असे प्राचार्य बोराडे यांनी म्हटले आहे.

प्रस्तावनेतील उपरोक्त विवेचन नोंदविण्याचा उद्देश एकच आहे तो म्हणजे संक्षेपाने लंडनवारीचे स्वरूप स्पष्ट व्हावे त्या अनुषंगाने त्यातील प्रतिमा, प्रतिकांचा परामर्श घ्यावा. पाच भागांत या प्रवास वर्णनाची विभागणी केलेली आहे. पाटील अस्सल ग्रामीण लेखक आहेत. या मातीचे संस्कार त्यांच्या लेखनावर झाल्याचे स्पष्ट जाणवते; त्यामुळेच लंडनवारीतील प्रतिमा प्रामुख्याने ग्रामजीवन संस्कृतीशी निगडित असलेल्या दिसतात. वर्णनाच्या किंवा निवेदनाच्या ओघात त्या सहजपणे आल्यासारख्या वाटतात. सहजता, स्वाभाविकता, नैसर्गिकता हे त्यांच्या प्रतिमांचे खास लक्षण सांगता येईल. आशयानुरूप अभिव्यक्ती करताना या प्रतिमा चपखल बसल्या आहेत. घटनाप्रसंगांचे वर्णन करताना ग्रामीण जीवनातील प्रतिमा येतात असे जे वर म्हटले आहे त्याचे कारण संस्कारक्षम वयात खेड्यामध्ये जीवन जगताना जे अनुभव त्यांना आले त्याचे संवेदनक्षम मनावर खोलवर परिणाम झाले आहेत.

'प्रवासीपूर्वीची पायवाट' या पहिल्या भागातील काही प्रतिमा पुढीलप्रमाणे आहेत. जसे – सारी स्वप्न भात-खाचरातल्या खेकड्यागत बीळ धरून बसल्याची. गरुडाची गगन भरारी त्यांना माहिती नव्हती, येड्यांच्या बाजारात बत्ताश्यांचा पाऊस पाडण्यासारखे होते. आमच्या घरात सात पिढ्यात कोणाला 'ग'ची गाठ फोडाय आली नाही. उकिरड्या वरच्या किड्यानं हनुमान उडी घ्यावीऽऽ (पृ. १) ह्या प्रतिमांचा विचार करता पाटलांच्या प्रांजळपणाची खात्री पटते. सर्व शपथपूर्वक सांगण्याची त्यांची ही अशी खरी तऱ्हा आहे. अल्पभूधारक

शेतकऱ्याच्या मुलांची स्थिती वेगळी नाही हेदखील गाव-शिव ओलांडण्यास तयार नाहीत, ही झेप फक्त आनंद पाटलांनी चिकाटीच्या बळावर घेतली तर कर्मवीर भाऊराव पाटलांनी रयत शिक्षण संस्थेची स्थापना करण्यापूर्वी शिक्षण घेण्याच्या फंदातही कोणी पडत नव्हते हेच दुसऱ्या प्रतिमेतून स्पष्ट होते. तर तिसऱ्या प्रतिमेतून मर्यादित विश्वात रमणाऱ्यांना गरुडझेप घेणे. त्यांच्या पंखांत बळ नसल्यामुळे केवळ अशक्य होते हे पाटील सूचित करतात. दुबळ्यांचा दुबळा कारभार आणि जीवन जगण्याची शैली त्यातून ध्वनित होते.

परिघावरच्या गावातल्या दुबळ्या रोपट्याची लागण शहरातल्या बाटलीत होणं कठीण होतं. आमच्या आयुष्यात 'अपूर्वाई' नाही व 'थंडीचे दिवस' ही नाहीत. सगळा रखरखीत उन्हाळाच. (पृ.३). या प्रतिमांमधून पाटलांची प्राध्यापक होण्यापूर्वी शहरातील कोणत्याही बौद्धीक वाङ्मयीन चळवळीशी नाळ जमली नव्हती; पण पुढे चिकाटीमुळे संशोधन शिष्यवृत्ती मिळाली. ग्रामजीवन परिघ ओलांडण्याची संधी मिळाली. मर्यादित ज्ञानाची शिदोरी सोडून बाकी सगळेच अज्ञान होते. अशा परिस्थितीत जीवन प्रवासात अनेक वाटसरू भेटले. त्यांनी मार्गदर्शन केले. म्हणून ग्रामीण लेखक प्रवास वर्णनकार होता आले. अन्यथा शहरातील बौद्धिकाचा स्पर्श केवळ अशक्य होता. प्रतिकूल आर्थिक परिस्थितीमुळे रोजच्या जगण्याचाच प्रश्न होता. त्यात नवलाई म्हणजे अपूर्वाई किंवा सुखद अनुभव म्हणजेच थंडीचे दिवस नव्हते म्हणूनच अनेक प्रश्न म्हणजेच सगळा रखरखीत उन्हाळा होता असे पाटील वर्णन करतात. त्यात 'पुलं' व 'मंत्री' यांच्या प्रवासवर्णनांना छेद जातो.

ग्रामीण भागातील वास्तव्यामुळे शोध निबंध म्हणजे काय? परदेशी परिषदेला जायचे कसे? एकूणच न्यूनगंड होता. संशोधन आराखड्यात नवीन मुद्दा मांडणे अत्यावश्यक असते याची जाण नसलेले पाटील लिहितात, "शर्यतीच्या खोंडाचा खांदा विद्यापीठाच्या मैदानात महायचं दिवस, १८१८ ते १९४७ पर्यंतच्या नाटकावरील प्रभाव शोधणे म्हणजे घनदाट जंगलात सोडल्यासारखे होते, आमच्या आयुष्यात सगळे ॲबस्ट्रॅक्टच. (पृ.५). यातूनच संशोधन क्षेत्रातील प्रारंभीचे अडाणीपण, अज्ञानाचे चित्रण करतात. पण पुढे हेच पाटील स्वत:ला विद्वान समजणाऱ्या संशोधकांचे पितळ उघडे पाडण्यासही कचरत नाहीत.

प्रवासाची पूर्वतयारी झाली. अनेकांनी सूचना केल्या, सुटकेस भरली, पैशांची जमवाजमव झाली. अशा प्रसंगी पाटील लिहितात, "काळ्याकुट्ट ढगाला सोनेरी किनार लाभावी तशी ही मुशाफिरी." (पृ. १०). त्याचप्रमाणे प्रत्यक्ष प्रयाणाच्या प्रसंगाचे वर्णन पाटील करतात, "पहिल्यांदा गळ्यात दावे बांधल्यावर वासरू जरा हुंदाडतं. दमुन वळणावर येत, बेंदराच्या बैलागत म्हण!" (पृ. १३). टाय बांधल्यामुळे झालेल्या कोंडमाऱ्याचे अवघडलेपणाचे वर्णन पाटील स्वानुभवातून करतात.

'गगन भरारी' या प्रवास वर्णनाच्या दुसऱ्या भागातही अशाच प्रतिमा अपरिहार्यपणे येतात. प्रत्यक्ष विमान प्रवासाला प्रारंभ झाला, सर्व सोपस्कार झाले, निरीक्षण सुरू झाले, त्यानिमित्ताने आलेले अनुभव सांगताना पाटील लिहितात, ''पांढऱ्या कापडावरून काळा भुंगा फिरावा तसं एक विमान दिशा बदलून गेलं त्याच्या धुराची वेडीवाकडी शेपूट पतंगाच्या शेपटासारखी वाटली.'' (पृ.१९). या प्रतिमेतून पतंगाच्या शेपटाची तुलना विमानाच्या धुराशी पाटील सहजपणे करून जातात. कारण बालवयातील पतंगाचा खेळ ते खेळले नसले तरी त्यांनी खेड्यात हा खेळ नक्कीच पाहिला असणार याकडे दुर्लक्ष करता येणार नाही.

'जागतिक मेळाव्याचा आठवडा' या तिसऱ्या भागातील प्रतिमा स्वानुभवातूनच आविष्कृत झाल्या आहेत. ढगांच्या मंडपात सूर्यदर्शनाची शक्यता नव्हती, आमच्या आयुष्यात फक्त 'सन स्ट्रोक' आणि 'बॅड स्ट्रोक्सच जास्त.' (पृ.२६), बगळ्यांच्या कळपात कावळा घुसल्यागत झालं (पृ.२७), 'शब्द असे साथीच्या रोगासारखे पसरतात' (पृ.५०), प्रवासीसुद्धा सुतकात पडल्यासारखं फिरत होतं. (पृ.५३), आमचं लग्नातलं जातकच मुळी गरुड आणि हरिण होतं, (पृ.५६) दुष्काळग्रस्ताला भव्य उपहारगृहात सोडावं तशी माझी गत झाल्याली.(पृ.५९) प्रतिकूल आर्थिक परिस्थितीतील चिवट ध्येय वेड्या आनंद पाटलांच्या लेखणीतून साकारलेल्या या प्रतिमा आहेत. जर्मनीतल्या भौतिक वैभवानं पाटलांचे डोळे दिपले, जर्मन माणसांची कष्ट करण्याची तयारी त्यांनी पाहिली. श्रमप्रतिष्ठा पाश्चात्त्यांकडून शिकण्यासारखी आहे हे 'कमवा शिका'मधून गेलेल्या पाटलांना अनुभवाला आले. अशा प्रसंगी ढगांच्या मंडपात सूर्यदर्शनाची शक्यता नव्हती असे पाटील वर्णन करतात. विद्यापीठातील शिष्टाचाराचा सुखद अनुभव घेतल्यावर पाटील लिहितात, ''आमच्या आयुष्यात फक्त 'सन स्ट्रोक' आणि 'बॅड स्ट्रोक्सच जास्त' आपल्या देशात शिष्टाचाराचा विचार फारसा होत नाही; त्यामुळे बाहेरच्या जगामध्ये धक्के खावे लागतात हा स्वानुभव पाटील सांगतात. तसेच प्राध्यापक असलो तरी विद्यावाचस्पती नसल्याची खंत त्यांना बगळ्याच्या कळपात कावळा घुसल्यागत वाटली या प्रतिमेतून व्यक्त करतात. शब्द असे साथीच्या रोगासारखे पसरतात असे पाटील वर्णन करतात. कारण आपल्याकडे वापरला जाणारा झेरॉक्स हा शब्द चुकीचा असून झेरॉक्स कंपनीच्या मशीनवर फोटो कॉपी काढतात; परंतु आपण मात्र फोटो कॉपीऐवजी झेरॉक्स हाच शब्द वापरतो (आपल्याकडे कोणत्याही टुथपेस्टसाठी कोलगेट किंवा कोणत्याही कंपनीच्या पाईपसाठी पी.व्ही.सी. पाईप असा चुकीचा शब्द वापरला जातो.) प्लेगची साथ जशी फैलावते त्याचप्रमाणे चुकीचा शब्द वापर झटपट वापरात येतो हे यातून स्पष्ट होते.

जर्मनीतील बर्लिनमधील अनुभव सांगताना प्रवासीसुद्धा सुतकात पडल्यासारखे फिरत होते असे वर्णन पाटील करतात. कारण ज्यू लोकांचे बळी

घेणाऱ्या हिटलरच्या आत्महत्या झालेल्या ठिकाणी पाटील गेले होते. ते ठिकाण उद्ध्वस्त झालेले, नाही चिरा नाही पणती. कोणाचेही हात येथे जुळत नव्हते. हिटलरच्या मृत्यूची आठवण आणि सुतक म्हणजे दु:खाची भावना त्यातून लेखक सांगतो.

लंडनवारीत सौ. गीता पाटलांचा उल्लेख एक-दोन ठिकाणीच येतो. त्यांपैकी आमचे लग्नाचे जातकच मुळी गरुड आणि हरिण होते. गरुडाच्या भरारीची दोरी तिच्या हातात आहे हा उल्लेख महत्त्वाचा आहे. 'रोडा' नावाच्या तरूणीने खांद्यावर हात ठेवलेला फोटो पाटलीनबाईंनी पाहिला आणि म्हणाल्या, "बायको बरी का मेव्हणी? माझ्या मागची पीडा टळली तर आनंदच होईल." सौ. गीता पाटील असे जरी म्हटल्या असल्या तरी लग्नातले देवक गरुड म्हणजे उंच झेप घेणारे आणि त्यामध्ये हरणाची चपळता स्वाभाविक आहे. युरोप दौऱ्याच्या निमित्ताने पाटलांनी गरुडझेप घेतली. परंतु सौ. गीताबाईंच्या हातात आनंदरावांच्या प्रेमाची दोरी होती; त्यामुळे गरूडाला मुक्त संचार करता येणे केवळ अशक्य होते. हे पाटील सूचित करतात, नव्हे भारतीय-देशी संस्काराचे दर्शनच घडवितात.

शेक्सपिअर वरच्या चर्चासत्राचा अखेरचा दिवस उजडला. भरपूर संशोधन साधन-सामग्री हाताशी लागली होती. आणखी काही मिळते का? म्हणून अधाशासारखी पाटलांना घाई झाली होती. सर्व सत्रांमध्ये डोकावत त्यांचा ज्ञान कण वेचण्याचा प्रयत्न चालू होता. 'शेक्सपिअर कसा शिकवावा' हा विषय पाटलांना महत्त्वाचा वाटत होता. म्हणून ते लिहितात, "दुष्काळग्रस्ताला भव्य उपाहारगृहात सोडावा तशी माझी गत झाल्याली." म्हणजेच भुकेलेल्या माणसाला मुबलक अन्न दिसल्यावर कोणते खावे हा प्रश्न पडतो. तसेच शेक्सपिअरवरील संदर्भाचे भांडार समोर असताना पाटलांना आधाशासारखे झाले ही अतिउत्तम प्रतिमा आहे.

'झुकझुक आगीन गाडी' हा चौथ्या भागात मराठमोळ्या प्रतिमादेखील देशी संस्कारातून अवतरल्या आहेत. तोंडात साखर आणि डोक्यावर बर्फाची चीप ठेवणारा माणूस यशस्वी होतो असा स्वानुभव पाटील सांगतात. डोंगरांशी आट्यापाट्या खेळणाऱ्या सागराचा किनारा,' (पृ. ७०) अग्नि व उदकाचं सान्निध्य असं बघायला मिळालं,जंगलातील टेकड्या परसातल्या शेणीच्या हुडवयासारख्या वाटतील, (पृ. ७५) दुष्काळात कधीच आंघोळ न मिळालेल्या रेड्यासारखी माझी अवस्था झाल्याली, (पृ. ८१) विधवा तरुणीसारखे उदास बर्लिन, नशाबाज जिनेव्हा, आळसावलेल्या टच्च युवतीसारखं झुरिच, (पृ. ९३) विशाल नभांतरी नव्या स्वप्नांचा हुतूतू ढगांच्या पटांगणावर सुरू झाला, (पृ. ११५) एखाद्वा ओंडक्याप्रमाणे गडगडत ते रेल्वेपर्यंत आले किंवा ब्रिटिशांचा स्वभाव हिमनगासारखा असतो. (पृ. १२९) या सर्वच प्रतिमा एखादा अपवाद वगळता पाटलांच्या देशी संस्काराच्या प्रभावातून आल्या आहेत. तर काही प्रतिमा या

संशोधन कार्याच्या निमित्ताने प्रवासात आलेल्या अनुभवातून साकारल्या आहेत. पाश्चात्त्य आणि भारतीयांची तुलना करण्यासाठी त्या त्यांच्या लेखणीतून सहज येतात. त्यांचा उत्कट भावनांचा उत्स्फूर्त आविष्कार या प्रतिमांमधून झालेला दिसतो.

नॉर्वे-डेन्मार्कचा प्रदेश जास्त डोंगराळ आहे. समुद्राच्या खाड्या पार करताना फार वळणे घेत रेल्वे पुढे सरकते. हे अनुभवताना पाटलांना गावाकडच्या गौरी गणपतीला निघणाऱ्या 'न्हावना'च्या मिरवणुकीची आठवण येते. टेकड्यांवर बर्फ आहे की कापसाचे ढीग कोण जाणे असे वर्णन ते करतात. याबरोबरच पाश्चात्त्यांच्या प्रभावातून भारतात दुधाचा महापूर आला; पण शेतकऱ्यांच्या पोराला ताक बी मिळत नाही ही व्यथा ते मांडतात. ग्रामजीवनातील परिवर्तनाचे चित्र त्यांना नॉर्वे-डेन्र्माकच्या प्रदेशात आठवते. पाटलांनी गरुडझेप घेतली असली तरी त्यांचे पाय मातीपासून दूर गेलेले नाहीत हेच येथे स्पट होते. स्वीडनच्या राजधानीकडे प्रयाण करतानाच्या सृष्टी सौंदर्याचे वर्णन पाटील करतात, डोंगराशी आट्या पाट्या खेळणारा सागराचा किनारा या प्रतिमेतही खास भारतीय खेळाचे स्मरण पाटलांना होते. त्यातूनही त्यांचे देशीपणच दिसते. नोबेल समारंभ ज्या हॉलमध्ये होतात त्या हॉलचे दर्शन पाटलांनी गाडीतूनच घेतले. खाडी काठावरची ही सुंदर टुमदार वास्तू आणि दारूगोळा तयार करणाऱ्या कारखानदार 'अल्फ्रेड नोबेल'च्या निधीतून पुरस्कार दिले जातात. तेव्हा पाटील लिहितात, 'अग्नि आणि उदकां'चे सान्निध्य असे बघायला मिळाले. तात्पर्य अग्नी, दारुगोळे तयार करणारा नोबेल लेखकांसाठी पुरस्कार-उदक देतो हेच ते अग्नि व उदकाचे सान्निध्य होय. 'फुल्डा नावाचे शहर पहिल्या पावसानतर उगवणाऱ्या भूईफोडासारखे दिसलं', (पृ.७२) 'धो धो पाऊस सुपानं वताय लागला' (पृ.७३), 'जंगलातल्या टेकड्या परसातल्या शेणीच्या हुडव्यासारख्या वाटतील.(पृ.७५) या प्रतिमा खास देशी वाणाच्या आहेत. युथ होस्टेल मुक्कामातील अनुभव सांगताना आपल्या अज्ञानाचे चित्रण पाटील करतात. त्याबरोबर येथील तरुणांची नग्नावस्थेत फिरण्याची तऱ्हा पाटलांना भावत नाही. अंघोळीच्या प्रसंगी गार पाण्याचा नळ चालू करण्याच्या चुकीमुळे, तो बंद करण्याच्या भानगडीत पडलेल्या पाटलांना गरम पाण्याची अंघोळ मिळाली तेव्हा ते लिहितात, ''दुष्काळात कधीच अंघोळ न मिळालेल्या रेड्यासारखी माझी आवस्था झाल्याली.'' आपल्या अज्ञानाचे आणि संस्कृतीचे प्रामाणिक दर्शन घडविणारी ही प्रतिमा आहे.

'झ्युरिच' शहरात पोहचल्यानंतर तेथील लोकांच्या वागण्यातील मोकळेपणा पाहून तर प्रवासातील अनुभवांच्या आधारे पाटील शहरातील माणसांचे वर्णन करतात, विधवा तरुणीसारखे उदास बर्लिन, नशाबाज जिनेवा, आळसावलेल्या टच्च युवतीसारखं झ्युरिच. वेगवेगळ्या शहरांचे दर्शन घेताना पाटलांना माणसांचा आलेला अनुभव या प्रतिमेतून ते व्यक्त करतात. युरोपचा दौरा पूर्ण करून पाटील

लंडनकडे निघाले. युरोप वास्तव्यातील अनुभवांचे सिंहावलोकन सुरू असताना विमान लंडनला पोहचले. विशाल नभांतरी नव्या स्वप्नांचा हुतूतू ढगांच्या पटांगणावर सुरू झाला. खास 'हुतुतू' या देशी खेळाचे स्मरण तर येथे आहेच; पण प्रवासाने माणूस शहाणा होतो, तो विचार करायला लागतो. पाटीलही असे विचार करू लागले. नावीन्याची हौस आजही संपली नाही. अखंड संशोधन, चिंतन चालूच आहे.

शेक्सपिअरच्या मुलखात महिनाभर मुशाफिरी या पाचव्या भागातील प्रतिमा संशोधन क्षेत्रात स्थिरावलेल्या पाटलांच्या सूक्ष्म निरीक्षणातून आलेल्या आहेत. जसे परदेशी कुबड्यांशिवाय मराठी आधुनिक लेखक उभाच राहू शकत नाही का?(पृ.१४५) दुष्काळातल्या लेब्राटपुढं पंचपक्वान्नाचं ताट आलं (पृ.१४७), प्रज्ञावंताशेजारी प्रतिभावंत विसावला आहे. (पृ.१५०) आणि 'अतृप्तेबरोबर समृद्धीचं अपूर्व समाधान होय. (पृ.१९२) या प्रतिमा पाटलांच्या स्वानुभवातून आल्या आहेत. लंडनवारीच्या अनुभवातून वैचारिक घडण झालेल्या आनंद पाटलांनी परदेशी कुबड्यांविषयी रोखठोक सवाल केला तो सूक्ष्म निरीक्षणातूनच असे म्हणावे लागेल. ज्ञानाचा खजिना-पंच पक्वान्नाचे ताट उपलब्ध झालेला कोल्हापूरकडचा एक खेडूत मुलगा 'लेब्राट' आनंदी होतो, तर शेक्सपिअरचे थडगे आणि चर्च एकत्र पाहून प्रज्ञावंताशेजारी प्रतिभावंत विसावला असे ते म्हणतात. तसेच ज्ञानाची मोठी शिदोरी घेऊन परतत असताना समाधानी संशोधक पाटील लिहितात, ''अतृप्ततेबरोबर समृद्धीचे अपूर्व समाधान होते. पंढरीच्या वारकऱ्याला विठ्ठलदर्शनाची ओढ असते तशी शेक्सपिअर दर्शनाची ओढ पाटलांना समाधान देऊन गेली. लंडनवारी करताना आणि आजही पाटलांचे पाय जमिनीवर आहेत. हेही नसे थोडकेऽऽ सारांश : जशी 'पाटलांची लंडनवारी' हे मराठीतील पहिले देशी प्रवास वर्णन आहे त्याचप्रमाणे त्यांच्या सर्व प्रतिमादेखील देशीच आहेत. त्यांत विविधता आहे, अनुभवांना मूर्त रूप देण्याचे सामर्थ्य त्या प्रतिमांमध्ये आहे. त्या आशयानुरूप अपरिहार्यपणे आल्या आहेत आणि त्यामुळेच लंडनवारीच्या सौंदर्यात भरच पडली आहे. 'पॅसेज टू इंडिया' हे प्रवासवर्णन लिहिणारे निरद सी. चौधरी जे जे इंग्रजी ते-ते सुंदर म्हणतात; पण पाटील मात्र तटस्थपणे इंग्लंड व भारताकडे पाहतात.

ꢀ

# 'हाल्या हाल्या दुधू दे !'

बाबाराव मुसळे यांची 'हाल्या हाल्या दुधू दे' ही १९८५ मध्ये प्रसिद्ध झालेली, तिसऱ्या पिढीची ग्रामीण कादंबरी म्हणून प्रथम पुरस्कार मिळालेली कादंबरी आहे. 'धग', 'पाचोळा', 'गोतावळा' या कादंबऱ्यांप्रमाणे हीदेखील वळणावरची कादंबरी आहे. डॉ. मधुकर वाकोडे यांनी कादंबरीचा नायक न्यानबाची तुलना डॉन क्विझोटशी केली आहे. न्यानबा पराभूत सरंजामी मनोवृत्तीचे एक ज्वलंत प्रतीक आहे. असे म्हटले आहे, तर वात्सल्याचे उमाळे जपणारी प्रतिकूल परिस्थितीशी आपल्या सीमित सामर्थ्यानिशी झुंजणारी आनसा 'धग'मधल्या कौतिकची आठवण करून देते. अशा प्रकारे आनसा आणि कौतिकमधील साम्य प्रा. मृणाल चिंचाळकर यांनी सांगितली आहे. ही कादंबरी न्यानबा-आनसाच्या संसाराची शोकांतिका आहे.

प्रस्तुत कादंबरीत प्रसंगांची सहेतुक मांडणी आणि त्यातून साकार होणारे बंदिस्त कथानक नाही, तर तुटक घटनाप्रसंगांतून परिवर्तनकाळातील वास्तव चित्रित केले आहे. नऊ-दहा एकर जमिनीचा मालक न्यानबा, त्याची बायको आनसा, मुलगी सोबा आणि मुलगा पर्कास - असे हे छोटे सुखी कुटुंब आहे. परंतु अंथरूण पाहून पाय न परसल्यामुळे त्याच्या आयुष्यात संकटांची मालिकाच सुरू होते. मेव्हण्याने भरीस घातल्याने न्यानबा सोबाच्या सुखासाठी ऐपत नसताना सावकाराचे कर्ज काढतो. तिचे लग्न करतो. सोडखरेदीने दिलेली जमीन सोडविण्यासाठी लहान तोंडी मोठा घास घेऊन स्वत:कडील जमिनीत कापसाची सुधारित 'एच.फोर' ही जात लावतो. कर्जाची सोय व्हावी म्हणून न्यानबा सोसायटीच्या कारकुनावर विश्वास ठेवून बँकेच्या कर्जाचे पाचशे रुपये पावती न घेता देतो. कारकुनाने बँकेस पैसे न भरल्यामुळे दुसऱ्यांदा भरतो. सावकाराकडून कर्जाऊ घेतलेली रक्कम मेव्हण्याची असल्याचे आणि त्याने विश्वासघात केल्याचे न्यानबाला समजते. न्यानबा नकळत गावातील गटबाजीच्या राजकारणाच्या विळख्यात सापडतो. गावातील संतोबा सावकार आणि शंकर पाटील यांचे पटत नाही. शंकर पाटलांच्या मदतीशिवाय न्यानबाचे पान हालत नाही. न्यानबाने शंकर पाटलाचे बैल शेताच्या मशागतीला आणले म्हणून सावकाराचा मुलगा रंगा पाटलाच्या बैलांना मारहाण करतो, तसेच न्यानबालाही बेशुद्ध पडेपर्यंत मारतो. कारकून, तलाठी आणि ग्रामसेवक त्याचे कर्जप्रकरण अडवितात. आनसा

सावकाराच्या घरी गेल्याने न्यानबा आनसामध्ये अबोला निर्माण होतो. दुष्काळ हे निसर्गनिर्मित संकट येते. सुखात असलेली सोबा बापाला कर्जबाजारी करून नांदायला जाते. माहेरला आली असता आजारी पडते. तिला तिचा सासरा सासरला घेऊन जात नाही. अगतिक न्यानबाला व्याह्याचा गैरसमज घालविण्यासाठी आणि सोबाला सासरी सोडविण्यासाठी जावे लागते. आनसाची भाची रखमा पाटलाच्या शेतावरील पडळीतून कीटकनाशक चोरून आणते. तिची चोरी न्यानबामुळे पकडली जाते. न्यानबाकडील सोबाचा म्हातारा बैल पुरात वाहून मरतो. सर्व प्रतिकूल परिस्थितीवर मात करायचा प्रयत्न करीत असतानाच सोबाच्या सासऱ्याने तिच्यावर अतिप्रसंग केला, तिच्यावर आळतुफान घेतल्याने ती माहेरी येते. तिच्या काळजीत असतानाच न्यानबाला कॅन्सर होतो. शेतात लावलेला 'एच.फोर.' भरपूर वाढतो. पण नर असल्याने त्याला कापूस येत नाही. सोबताचा नवरा विरहाने मनोरुग्ण होतो. कॅन्सरवरील औषधोपचारांसाठी न्यानबा झोपडीची जागा विकतो. परंतु बँकेच्या वसुली अधिकाऱ्यांनी थकबाकीमुळे जप्ती आणल्याने अब्रू वाचविण्यासाठी कर्जफेड करतो. अकोल्याला दवाखान्यात जायचे राहून जाते. नवऱ्याला भेटायला सोबा नणंदेच्या गावी निघाली असता रखमा वैरडाव साधतो. सोबा सरकारी कामावरील साहेबाबरोबर पळून चालल्याची अफवा पसरते. तेव्हा ती आसराच्या बारवात जीव देते. आत्महत्येच्या प्रकारामुळे पंचनामा, पोस्टमार्टेम आणि एकूणच गावभर बदनामी होते. सोबाबद्दलचा गैरसमज यादवनानांच्या सांगण्याने नाहीसा होतो; परंतु आता वेळ गेलेली असते. शाळेत खेळताना पर्कासच्या अंगावर सावकाराचा नातू डिग्या पडतो. पर्कास बेशुद्ध होतो. त्याला अकोल्याच्या दवाखान्यात घेऊन जाण्यास न्यानबाकडे पैसे नसतात. संबा हा न्यानबाचा प्रेमळ पुतण्या पर्कासच्या मदतीला धावतो. पर्कासला औषधपाणी करून घरी घेऊन येतो. तेव्हा कॅन्सरच्या आजाराने न्यानबाचा मृत्यू झालेला असतो. असा हा न्यानबाच्या जीवनातील नियतीचा खेळ आहे. कादंबरीचे शीर्षकच एका लोकगीतावरून लेखकाला सुचलेले आहे. हाल्या दूध देत नाही हे माहीत असूनही न्यानबा त्याची धार काढण्याचा प्रयत्न करतो, ही नियती आर्थिक स्वरूपात आविष्कृत होते. जिच्या सुखासाठी सर्व केले ती सोबा जाते आणि आनसा-पर्कासला सोडून न्यानबाही स्वर्गवासी होतो. अवघ्या नऊ-दहा महिन्यांच्या काळात सामान्य माणसाची कशी परवड होते हे लेखकाने वर्णन केले आहे. डॉ. एस.एम.कानजडे यांनी म्हटले आहे की, ''समकालीन कृषिनिष्ठ अस्सल ग्रामीण वास्तवाचा समर्थपणे वेध घेणारी, चिंतनप्रवृत्त व विचाराभिमुख करणारी गंभीर प्रकृतीची ही एक हृदयस्पर्शी शोकांत कुटुंबकथा आहे.'' हा अभिप्राय कथानकाचे स्वरूप पाहिले तरी समर्पक वाटल्याशिवाय राहत नाही.

प्रस्तुत कादंबरीच्या आभारामध्ये लेखकाने म्हटले आहे की, ''एक ग्रामीण

म्हणून, मी माझ्या फाटक्यातुटक्या अडाणी माणसांची सुख-दुःखे, रागद्वेष मांडण्याचा प्रयत्न केला.'' लेखकाचे वरील मनोगत सार्थ वाटते. कारण सुष्ट आणि दुष्ट व्यक्तींच्या संघर्षातून न्यानबाची शोकांतिका आकार घेते. न्यानबा, आनसा, पर्कास, सोबा, शंकर पाटील, संबा-वछला हे सुष्ट आहेत तर संतोबा सावकार, सोबाचा सासरा, तिचा मामा रावसाहेब आणि रखमा हे दुष्ट आहेत. ग्रामीण लोकांचे प्रतिनिधित्व करणारे रंग्या, यादया, देव्या, बळीराम, तुका माळी, गोईदा, गोईदाची म्हातारी, रघु, तिरमख, सोना काळ्या, वसंता, सोबाच्या गावचा पाटील, तिचा भाया, तिचा गडी, जान्या मांग, सोबाचा नवरा, शाळा मास्तर, डिग्या, श्यामा डॉक्टर, यादव, गुंफा या गौण व्यक्तिरेखा आणि पांडेबुवा तलाठी, ग्रामसेवक, सोसायटीचा कारकून, बेनॉरचे हिरवेसाहेब, बँकेचे वसुली अधिकारी, पोलिस हे भ्रष्ट प्रशासन व्यवस्थेतील सेवक लेखकाने रेखाटून परिवर्तनकाळातील समाजवास्तवाचे दर्शन घडविले आहे.

न्यानबा काळे हा भोळा-भाबडा, गरीब-निरपराधी, साधा-सरळ, भिडस्त, पापभीरू, स्वच्छ चारित्र्याचा, प्रयत्नवादी आपण भले आणि आपल काम भले म्हणणारा सामान्य शेतकरी आहे. सामान्य आर्थिक परिस्थितीमुळे त्याला सोबाच्या लग्नाची काळजी वाटते. मेव्हण्याच्या सांगण्यावरून धनिकाच्या घरात तो मुलगी देतो. कर्जबाजारी होऊन मरतो.

आनसा ही न्यानबाची व्यवहारी, सोशीक, समजदार, शहाणी, खानदानी, निष्ठावान, कष्टाळू, सरळमार्गी, प्रेमळ पत्नी आहे. मुलगा, मुलगी आणि नवऱ्यावर तिचे खरेखुरे प्रेम आहे. सोबा ही नैतिकता जपणारी निष्कपट, इज्जत-इभ्रत जपणारी, शालीन, सुशील, निष्पाप, अबोल तरुणी आहे. सासऱ्याने अतिप्रसंग केल्याने खचलेली, आईवडलांच्या गैरमर्जीस कारण ठरलेली सरळमार्गी, नवऱ्याच्या विरहाने झुरणारी आणि रखमाने बदनाम करण्याचा प्रयत्न केल्यामुळे आसराच्या बारवात जीव देते. पर्कास हा निरागस, अल्लड, निष्पाप, खेळकर मुलगा आहे. तर शंकर पाटील सरळमार्गी, निःस्वार्थी, निर्मळ, प्रेमळ, निरपेक्ष, न्यानबाचा हितचिंतक मित्र आहे.

रावसाहेब हा सोबाचा मामा, आनसाचा भाऊ लबाड, स्वार्थी, ढोंगी, लोभी, पैशाची हाव सुटलेला, नातगोत विसरलेला, विश्वासघातकी, समूहसंस्कृतीतील आचारविचारांना झुगारणारा, कुटील, कपटी, निर्दयी, सहानुभूतीशून्य निष्ठूर असा आहे. तर संतोबा सावकार खऊट, ढोंगी, कुऱ्हाट, आठमुठा, उपटसुंब, कुटील, कपटी, राशीला लागल्यावर सत्यानाश करणारा खलप्रवृत्तीचा आहे. तर 'रखमी' ही आनसाची भाची लावालावी करणारी, चोरटी, खुनशी, चहाटळ आहे. सोबाचा सासरा हा वासनासक्त, उलट्या काळजाचा, दोन सुनांचे बळी घेणारा, सोबावर अतिप्रसंग करण्याचा प्रयत्न अयशस्वी झाल्यावर आळतुफान घेणारा कामांध आहे. ही चारही दुष्ट प्रवृत्तीची माणसे आहेत.

विदर्भातील वाशिम-अकोला परिसरातील खेड्यांची पार्श्वभूमी कादंबरीला लाभली आहे. विदर्भात कापसाचे पीक महत्त्वाचे आहे. विदर्भाइतका अन्य प्रदेशात कापूस पिकत नाही. म्हणून कापसाच्या पळ्हाटी, कंबोडी या जातीऐवजी सुधारित एच्.फोर, एच.सिक्स, ए.के.एच.फोर, चारशे अडुसष्ट डी.एच.वाय., महालक्ष्मी इ. कापसांच्या जातीचे बी लोक वापरतात असा उल्लेख येतो. कापूस फेडरेशन, शेतकरी संघटना यांचेही उल्लेख कापसासंबंधीच येतात. याबरोबर ज्वारी, करडाई, उडीद, मूग, तूर इ. पिकेही प्रदेशाविशिष्टच आहेत. पळस चिल्होरी, हिवर हे प्रदेशविशिष्ट वृक्ष आहेत. विदर्भातील काळ्या मातीचा उल्लेख (पृ.९९) तसेच आसराच्या बारवाजवळील डोंगराळ प्रदेशाचे (पृ.७१) वर्णन लेखक करतो.

ऋतुचक्राप्रमाणे रंगबदलणाऱ्या निसर्गाचे पात्रांच्या मानसिकतेनुरूप चित्रण लेखकाने केले आहे. जसे कृषिजीवनात आषाढ महिना गडबडीचा असतो. लेखक वर्णन करतो, आखाडतोंडचा एक रट्टावून पाणी पडला. उन्हाळाभर उडालेला अन् घराघरावर, झाडा ह्यांच्या फांद्या-पानांवर साचलेला धुरळा पार धुवून निघाला. तात्पुरती उन्हाची काहिली कमी झाली; पण एक दोन दिवसच. पुनः उन्हे इंखासारकं तपू लागले. पहिल्यापरीस गरमी आदिकीची व्हऊ लागली. धडधाकट मानसाहयचे जीव गरमीने गुदमरू लागले. मथाऱ्या कोताऱ्याहयेच त मरणच आले. त्याहयले दिवस डोंगराएवढा वाटू लागला. (पृ. २०) हे मानवाच्या जीवनावर परिणाम करणारे विदर्भातील उन्हाळ्याचे चित्र प्रदेशविशिष्ट आहे. 'तिनं आभाळाकडे पाहयले. ढग गच भरले व्हते. त्याच्याने एकबी चांदणी उघडी दिसत नव्हती.' (पृ. ५५). जीवनात एकही आशेचा किरण न दिसणाऱ्या आनसाच्या मानसिकतेनुरूपच वरील निसर्गचित्र आहे. तर विदर्भातील पावसाळ्याचे वर्णन पहा.

दिवस सरत आला तरी, पाऊस थांबला नाही. वावरात फट्याह्यानं पोटऱ्या इतकाले पाणी वाहू लागले. पाऊस सुरू झाला तव्हाच कसे अंधारून आल्यावाणी झालं व्हतं. धांदभर अंतरावरचे झाडेझुडुपे दिसेना. पावसाचे थेंब झाडाच्या पानाहयावर पडल्याने जिकडेतिकडे निसता टप्‌टप् टप्‌टप् आवाज भरला व्हता. त्यात कव्हाबव्हा गरजात बी व्हते. कडकड इजा बी चमकत व्हत्या. काळ्या मातीत तिचे पाय पोटऱ्यालोकं चिखलात रुतत व्हते. (पृ. ९८-९९). नवऱ्याचा आजार, एच.फोर.ची भानगड, सोबाच्या नांदण्याचा वांदा असा आनसाच्या मनातील अंधार आणि निसर्ग एकरूप झाला आहे. अस्वस्थ मनःस्थितीमुळे पावसाच्या आगमनाबरोबर घराकडे पळण्याची बुद्धी तिला झाली नाही, उलट ती संकटात सापडली. सोबाचा बैल वाहून मेला. ती रात्रभर ओढ्याखाली गारठत बसली.

परिवर्तन काळातील शोषणमूलक समाजवास्तवाचे चित्रण गरीब शेतकरी न्यानबाच्या जीवनाधारे रेखाटले आहे. भ.पुं. कालपे या कादंबरीविषयी म्हणतात, ''या कादंबरीतील समाजजीवन ग्रामीणतेच्या नाळेपासून कोठेही परके दिसून येत

नाही. ते नैसर्गिक व स्वाभाविक वाटते. ते रेखाटताना लेखकाने कोठेही मूल्यमापनात्मक सांकेतिकतेच्या मर्यादा येऊ दिल्या नाहीत किंवा लेखक कोठेही व्याजतंत्राच्या आहारी गेलेला दिसत नाही. या अभिप्रायावरून प्रस्तुत कादंबरीतील ग्रामीण वास्तवाचे स्वरूप लक्षात येते. त्याचप्रमाणे लेखकाने ग्रामीण जीवनातील सुष्ट-दुष्ट प्रवृत्तींचे चित्रण प्रामाणिकपणे केले आहे. इंदुमती लहाने म्हणतात, ''ग्रामीण जीवनातील समान मनाची माणसे, त्यांचे बारीक-सारीक धागेदोरे, त्यांची भांडणे, प्रेम, रोग, लोभ, त्यांच्या भाबड्या कल्पना इ. चे सूक्ष्म निरीक्षण करण्यात लेखक अतिशय यशस्वी झालेला आहे. जे सांगायचे ते निर्भीडपणे, प्रसंगी ग्राम्य शब्दांचा सहजपणे उपयोग करूनही सांगितलेले आहे.'' नवीन सुधारणांचा, राजकारणाचा ग्रामीण जीवनावर होणारा परिणाम हे बदलत्या खेड्यांच्या जीवनाचे वास्तव दर्शन घडविणारी ही कादंबरी अतिशय समर्थ ठरली आहे. या त्यांच्या विवेचनावरून कादंबरीतील समाजजीवनाची कल्पना येते. मुलामुलींच्या सोयरिकीच्यावेळी भाऊबंदांना बोलविण्याची, त्यांचा सल्ला घेण्याची पद्धत ग्रामीण समाजामध्ये असते; त्यामुळे नवीन सोयऱ्याची ओळखपाळख होते, त्याच्या खानदानाविषयी, कुळगोत्राविषयी चौकशी करता येते. लग्नातील मानपान, हुंडा सर्वांसमोर ठरविला जातो. परस्पर सोयरिक केली तर लोक लग्नाला येत नाहीत. लग्नामध्ये विश्वासघात होऊ नये म्हणूनही भाऊबंद निमंत्रित केले जातात. 'सोबा'साठी 'धकंड' घराण्यातील सोयरीक तिचा मामा आणतो, पसंतीनंतर बोलाचाली होण्यापूर्वी चार-दोन लोकांना, कमीतकमी शंकर पाटलाला बोलवावे असे न्यानबाला वाटते. परस्पर लग्न जमविणे त्याला मान्य नाही. अशा वेळी तो आर्थिक कारण सांगून बैठक पुढे ढकलण्याचा प्रयत्न करतो. त्याच्या भिडस्त स्वभावाचा मेव्हणा फायदा घेतो. लग्न जमते. सावकाराचे कर्ज काढून लग्न केले जाते. परंतु मेव्हण्याने विश्वासघात केल्याचे न्यानबाच्या उशिरा लक्षात येते. कारण सोबाचे घराणे वाईट चालीचे, सुनांवर अतिप्रसंग करणाऱ्यांचे असते हे तो प्रत्यक्ष पाहतो. भाऊबंदांना बोलविले असते तर हे लग्नच जमले नसते. सोबावर आत्महत्त्या करण्याची वेळ आली नसती. समाजातील प्रतिष्ठेच्या कल्पनेमुळेही मुलीचे लग्न मोडता येत नाही. पैशाच्या लोभी माणसाला गणगोत, माणुसकी दिसत नसते. पैसा त्याच्या दृष्टीने सर्वात महत्त्वाचा असतो. म्हणून तो विश्वासघात करताना नीति-अनीतीचा विचार करीत नाही. सोबाच्या मामाच्या चित्रणातून समकालीन वास्तवाचे असेच चित्र रेखाटले आहे. नवीन सोयऱ्याने दोन सुना मारल्याचे माहीत असूनही दलालीसाठी किंवा गावातील विधवा बाईच्या संपत्तीवर डोळा ठेवून भाचीचा तो बळी घेतो. (पृ.१२३). बहीण-मेव्हण्याचा विश्वासघात करतो. बहिणीकडून व्याज मिळणार नाही म्हणून स्वत:चे पैसे सावकाराच्या हाताने जमीन गहाण ठेवल्यानंतर देतो. व्याजासाठी सावकाराशी भांडतो. सावकाराची मुलगी त्याच्या घरात दिलेली असते तिला वेठीस धरतो.

सोबाचा सासरा न्यानबाला एच.फोरचे खेटे 'बी' देऊन फसवितो. सोबावर अतिप्रसंग करतो. सोबाच्या भावाने खोट्या 'बी'याण्यांची विक्री केल्यामुळे लोक त्याला स्टँडवर मारतात. (पृ.१४७)

धनिकांची सामान्य माणसांवर दहशत आहे. त्यांच्या विरोधात कोर्ट-कचेरी करायला लोक घाबरतात. संतोबा सावकार आडमुठेपणाने न्यानबाच्या जमिनीचा ताबा घेताना जास्त जमीन घेतो. रंग्या-यादया त्याला बेशुद्ध पडेपर्यंत मारतात. बांधावरील बाभळ तोडतात. तरीही 'भांडणाचं तोंड काळं असते' हे ओळखून आनसा सावकाराकडे जाऊन वाद मिटविण्याचा प्रयत्न करते. याप्रमाणे सोबाच्या सासऱ्यांच्या वर्तनाविषयी माहिती देताना गडी घाबरतो, लहान तोंडी मोठा घास घ्यायचे तो टाळतो, अन् समजा सांगतलं बी. अन् त्या बुवाले समजलं त त्यो गावात सुकानं राहू तरी देईल काय?' (पृ.१२०) असे म्हणतो. यावरून धनिकांच्या आडमुठेपणाची-दहशतीची कल्पना येते. आर्थिक समस्या असणाऱ्याने धनिकांच्या भानगडीत पडू नये हे प्रत्येकजण ओळखून असलेला दिसतो. लोकांमधील प्रामाणिकपणा-माणुसकी नष्ट झाली, व्यवहार-स्वार्थ महत्त्वाचा ठरला. लैंगिक पिसाटपणा, अनैतिकता वाढली. जसे बाजारात न्यानबाने खरेदी केलेली मणभर ज्वारी संपतचा गडी अर्धीच घरी आणतो. बळीराम नावाचा शेतकरी न्यानबाला शेजारी हायब्रीड पेरू नका म्हणून विनंती करतो. त्या बदल्यात ज्वारी देण्याचे कबूल करतो. परंतु न्यानबा ज्वारी मागायला गेल्यावर शब्द फिरवतो. दिलेल्या शब्दाला आज किंमत राहिली नाही. शब्द फिरवणाऱ्यांची संख्या वाढली असे यातून दिसते. कामापूर्ते लोक जवळ येतात, उदा. सोसायटीतून खत मिळावे म्हणून सोन्याकाळ्या न्यानबाला चहापाणी करतो. कारण वाशीमच्या सोसायटीत सोबाचा भाचा कामाला असतो. न्यानबाचा तो वशिला लावण्यासाठी उपयोग करतो. वसुली अधिकाऱ्यांबरोबर आलेले तरुण कारकून सोबाच्या उघड्या देहाकडे टक लावून पाहतात.

आपआपसातील वाद-भांडणावर गावभर चर्चा होते. अफवा पसरविल्या जातात. वाद मिटविण्याऐवजी आग लावतात. दुतोंडेपणा करतात. गरिबांचे संसार उधळतात. गरीब मात्र अब्रूला जपतो. रंग्याने पाटलाचे बैल आणि न्यानबाला मारले. त्याच्या मदतीसाठी कोणीही पुढे आले नाही. नंतर मात्र गावात अफवा पसरतात. शंकर पाटलाने न्यानबाच्याविरोधी फिर्याद दिली. हे सर्व असत्य असते. न्यानबाला भेटायला आलेले लोक सावकाराला शिव्या देतात, त्यांनीच न्यानबाला मार खाताना सोडविण्याची माणुसकी दाखविलेली नसते. सर्वजण गंमत पाहत उभे होते. तेच सल्ले देतात. आनसा सावकाराच्या घरी गेल्याचे समजल्यावर न्यानबा संतापतो. तिला गावातून राघोच्या घरापर्यंत ओढत नेतो. तेव्हा गावकरी जमा होतात. गंमत पाहतात. समाजात बेअब्रू झाल्यामुळे रागावलेली आनसा नवऱ्याबरोबर बोलणे सोडून देते. घराबाहेर पडत नाही, लोक काय

म्हणतील? याची तिला भीती वाटते. (पृ.३९). सोबाचे टापस हरवले असता न्यानबाने ते मोडून खाल्ले असे रंग्या तिच्या सासऱ्याला सांगतो. तो सोबाला न घेताच माघारी गेल्याचे गावभर होते. सोबाच्या सासऱ्याने तिच्यावर अतिप्रसंग केल्याने तिच्या नांदण्यात बांधा येतो. गावकरी-भाऊबंदांमध्ये अप्रतिष्ठा झाली म्हणून ते घराबाहेर पडत नाहीत. लोक मात्र पोटगी मागण्याचा- घटस्फोट घेण्याचा सल्ला देतात. बँकेचे कर्जवसुली अधिकारी न्यानबाच्या घरावर जप्ती आणतात. तेव्हाही गाव जमा होते, झोपडीच्या जागेचे पैसे न्यानबा त्यांना देऊन बेअब्रू टाळतो. औषधोपचाराचा पैसा तो बँकेचे कर्ज भरण्यासाठी देतो. स्वत:च्या जिवापेक्षा न्यानबासारख्या गरिबांना समाजातील प्रतिष्ठा महत्त्वाची वाटते. सडकाच्या सायबाबरोबर सोबा पळून चालली होती अशी दसऱ्याच्या दिवशी रखमी अफवा पसरविते. बदनामीमुळे सोबा आसराच्या बारवात जीव देते. लोक खरेखोटे न पाहता आपले मत नोंदवितात. सोबाचे प्रेत बारवेतून काढून त्वरित सरणावर चढविण्याचा निर्णय शंकर पाटील घेतात. ऐनवेळी दोन पोलिस हजर होतात. निनावी अर्ज केल्यामुळे ते आलेले असतात. पंचनामा, जबानी, चिरफाड या सर्व गोटींमुळे जी अप्रतिष्ठा होते; त्यामुळे सोबासाठी रचलेल्या सरणावर जितेपणीच बसावे असे अनसाला वाटते. सोबाच्या वर्तनाबद्दल सत्यपरिस्थिती सांगण्यासाठी यादवनाना येतात. तेव्हा आनसा म्हणते, ''काय तिनं नाक ठेवलं आमचं? समदं कापून काहाडलं, मरून गेली रांड, पण आमची थकत्या पराईत आब गमावली. त्याच्या परता बाळात्यातच मेली असती त बरं झालं असतं!'' (पृ.१६७), सामान्य माणसाला इभ्रतीची अधिक काळजी वाटत असते.

समकालीन वास्तवाचे चित्रण करताना जातिभेद समूळ नष्ट झालेला नाही असे लेखकाने सुचविले आहे. आनसाच्या माहेरचा जान्या मांग खुशाली चौकशीसाठी येतो तेव्हा घरात येतो, परंतु दाराजवळच बसतो. टकऱ्या तांब्यात त्याला आनसा पाणी देते. तो तांब्याला तोंड न लावता पाणी पितो. तांब्या पालथा घालतो. (पृ.१३३). यातून असे दिसते की उंबऱ्याच्या आत येऊ न शकणारे मागासवर्गीय दारात येऊन बसू लागले. परंतु त्यापुढे बैठकीवर ते बसू शकत नाही. तसेच तांब्याला तोंड न लावता पाणी पितो. यातून विटाळ, बाटणे किंवा स्पर्शबंदी या गोष्टींचीही कल्पना येते. तो ज्या तांब्याने पाणी पितो, तो पालथा घालतो, बाहेरच ठेवतो. थोडक्यात, जातिभेदाच्या कल्पनांमध्ये बदल झाला, परंतु तो समूळ नष्ट झालेला नाही असेच लेखकाने सूचित केले आहे.

जयंतकुमार बंड यांना प्रस्तुत कादंबरी प्रातिनिधिक वाटते. ते लिहितात, ''ही शोकांतिका केवळ एका न्यानबाची नाही तर मोहाच्या पाठीमागे लागून नको ते करू पाहणाऱ्या व अर्थनियतीचे बळी ठरलेल्या, नोकरशाहीने ग्रासलेल्या, परिस्थितीने पीडलेल्या गरिबीने गांजलेल्या, नातेवाइकांकडून नाडल्या गेलेल्या पापभीरू, अतिचांगूल, भिडस्त शेतकऱ्याची शोकांतिका ठरते.'' याचप्रमाणे पुढे ते लिहितात,

''बाबाराव मुसळ्यांच्या ह्या कादंबरीला वास्तवाचे प्रभावी परिमाण लाभलेले आहे आणि हे वास्तव आहे ग्रामीण. ग्रामीण जनजीवनाचे ग्रामीण मानसिकतेतून केलेले हे चित्रण असल्याने ते वास्तव उतरले आहे. न्यानबाची शोकांतिका म्हणून केवळ न्यानबावर लेखकाने आपले संपूर्ण लक्ष केंद्रित केलेले नाही. तर न्यानबा ज्या ग्रामीण परिसरात जगत आहे, त्या ग्रामीण परिसराला त्यांनी जिवंत केले आहे. खेड्यातील माणूस आज ज्या संक्रमणातून वाटचाल करीत आहे, त्याचे यथातथ्य चित्रण या कादंबरीत झालेले आहे. शेती-सुधारणा, रासायनिक खते, सुधारित बी-बियाणे, पंप या सोयी उपलब्ध व्हाव्यात म्हणून सरकारने आखलेल्या योजना व त्यातील भ्रष्टाचार आणि त्यामुळे नाडला गेलेला शेतकरी तर या कादंबरीत उभा राहतो; पण त्याचबरोबर तो परिसरही जिवंत होतो. लोकमानसाचा वेध घेण्याचे मुसळ्यांचे सामर्थ्य लक्षणीय आहे; हा जयंतकुमार बंड यांचा अभिप्राय कादंबरीचे सार्थ मूल्यमापन करणारा आहे. जी गोष्ट अप्राप्य आहे ती मिळविण्यासाठी माणूस धडपडतो. ती मिळत नाही तरी उरी फुटून मरेपर्यंत प्रयत्न करतो. कादंबरीतील न्यानबा अशाच प्रकारे हाल्याचे दूध काढण्याचा प्रयत्न करतो. परिस्थिती नसताना मुलीच्या सुखासाठी जमीन गहाण ठेवून कर्ज घेऊन तिचे लग्न करतो. जमीन परत मिळविण्यासाठी धडपडतो; पण अपयश येते. त्याचा मृत्यू होतो. परिवर्तन काळामध्ये आर्थिकदृष्ट्या सामान्य शेतकऱ्यांची परिस्थिती अधिक खालावली. त्यांचे विविध मार्गांनी शोषण होऊ लागले. आर्थिक विषमता निर्माण झाली. धनिक अधिक धनवान झाले. गरिबांची गरिबी वाढली. अगदी प्राथमिक पातळीवरील जीवन ते जगू लागले. साध्यासुध्या सुखांपासून त्यांना वंचित राहवे लागले. शेतकरी कर्जबाजारी झाला. त्याला महागाईच्या काळात त्या चक्रातून बाहेर पडणे अवघड झाले. कारण उत्पन्न काही प्रमाणात वाढले त्याच्या चारपट खत-बी-बियाणे, कीटकनाशके यांचे दर वाढले. मजुरीचे दर वाढले; परंतु शेतमालाच्या किंमती ठरविण्याचा अधिकार फेडरेशन, मार्केट कमिट्या आणि खरेदीविक्री संघातील कर्मचाऱ्यांना आहे. स्वतःच्या मालाची किंमत ठरविण्याचा अधिकार स्वतःला नाही. सर्वच कार्यालयातील कर्मचाऱ्यांकडून होणाऱ्या भ्रष्टाचारामुळे त्याच्या आर्थिक जीवनमानावर प्रतिकूल परिणाम झाला. भांडवलशाहीकडे तोल गेलेल्या किडक्या मुक्त अर्थव्यवस्थेने सामान्य शेतकऱ्याला दुबळा बनविले. माणूस स्वार्थ, पैसा आणि अर्थनियतीचा दास बनला आहे; त्यामुळेच न्यानबाची प्रयत्न करूनही आर्थिक परिस्थिती सुधारत नाही, विविध ठिकाणी त्याला अडचणी येतात.

आधुनिक पद्धतीची शेती सामान्य शेतकऱ्याला झेपत नाही, मनुष्यबळ आणि भांडवलाअभावी अधिक उत्पन्न मिळविणे अशक्य होते. खर्च अधिक उत्पन्न कमी अशी परवड होते. कर्जबाजारी न्यानबा एच. फोरवर वेळेवर फवारणी करू शकत नाही. अंगापरीस बेंगा मोठा झाला (पृ. ९८) असे त्याला वाटते. स्वतःच्या

आजारावर आर्थिक परिस्थितीमुळेच इलाज करू शकत नाही. आजार अंगावर काढल्याने अवेळीच त्याला मृत्यू होतो.

सरकारी योजनांमधील गैरव्यवहार-भ्रष्टाचारामुळे सामान्य माणसाची निराशा झाली. दुष्काळामध्ये ग्रामीण जनता उपाशी मरू नये म्हणून सरकारने दुष्काळी कामे सुरू केली. तेथे अधिकाऱ्यांनी भ्रष्टाचार करून गरिबांचे शोषण केले. शेतकऱ्यांसाठी खत, बी-बियाणांसाठी शासनाने अनुदान जाहीर केले. तसेच अल्पभूधारक शेतकऱ्यांसाठी शेतीउपयुक्त अवजारे पुरविण्याची योजना राबविली. त्याचा फायदा धनिकांनी घेतला. सामान्य शेतकऱ्यांपर्यंत ती अवजारे आलीच नाहीत. उदा. शंकर पाटलाने न्यानबाच्या नावाने कीटकनाशक फवारणी पंपासाठी अर्ज दिला. तो मंजूर होऊन आल्यावर पाटलाने पंप घेऊन टाकला. अल्पउत्पन्न गटातील शेतकरी शेतमजुरांसाठी सरकारने विहीर, बांधबंदिस्ती, गोबरगॅस, जनावर-पंपासाठी कर्ज दिले. मोठ्या प्रमाणावर सूट दिली. अशावेळी धनिक शेतकरीच अल्पउत्पन्न गटात नावे नोंदवून फायदा घेतात. ज्यांच्यासाठी योजना आहे त्यांना लाभ मिळत नाही. लेखक निवेदन करतो, ''सरकारच्या समद्या योजना शेतकऱ्याने आतल्या खंदी आणायच्या. काहून त योजना सुदी असली तरी ती शेतकऱ्यांच्या हाती पडस्तोर चवभवतालून तिचे लचके तोडून खाणारे लयझंण. त्याहयनं खाऊन खाऊन शिल्लक राहयलेली योजना, शेतकऱ्यांच्या गळ्यात पडते. पैसा घेतानी त शेतकऱ्याले काही वाटत नाही, पण मंग भरतानी त्याले न भेटलेले - मध्यांच्याहयनं खाल्लेले पैसे बी त्याले भरायचं काम पडते, तव्हा त्याचे डोळे पठाडाले जातात.'' (पृ. ११६). शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी शासनाने बेनॉर योजना सुरू केली. त्या योजनेतील हिरवेसाहेब न्यानबाला मार्गदर्शन करतो, पैसे खाणार नाही म्हणून सांगतो. त्यावर न्यानबाचा पूर्वानुभवामुळे विश्वास बसत नाही. तेव्हा तो म्हणतो, ''असे सायब अन् असं सरकार सपनातच दिसंल,'' (पृ. ७९). त्यातून सरकारी योजनांबद्दलची निराशाच दिसते. समकालीन पिढीतील शेतिसंबंधीत शासकीय कर्मचाऱ्यांचा भ्रष्टाचार आणि त्यामुळे गरीब माणसाला येणारा संताप लेखक सरळसरळ निवेदनातून प्रकट करतो. उदा. ''एऱ्ही हे नोकरशाहीवाले लयच माजल्यावाणी करायले. मंग त्यो पांडेबुवा असो का सोसायटीचा कारकून असो. ग्रामपंचायतचा ग्रामसेवक असो का कोण्णा हापीसचा बाबू असो. समद्याहयलेच कामाआंधी गड्ड्या खायालो पाह्यजे. काम व्हवो का न व्हवो, पयले माल लाव! अशा त्याहयच्या मायची भाडच इथिसा जमा करून ठेवली.'' (पृ.२१).

सरकारच्या शिक्षणप्रसाराच्या धोरणामुळे ग्रामीण भागातील तरुण साक्षर झाले. कारकून-तलाठी आणि ग्रामसेवकाच्या नोकऱ्या मिळाल्या. त्यांनी आपल्याच बांधवांकडून पैसे खायला सुरुवात केली. कर्जप्रकरणात पंधरा रुपये शेकडा ते बक्षीस मागू लागले. बँकेचे पैसे न भरता चैन करू लागले. याची साक्ष

न्यानबाचे स्वगत देते. उदा. ''समदे भोसडीचे खाऊजीच; कणगाळीवर मुता मनलं त, त्याचे पण हे लोक पैसे द्या मनतील. कुठीसाबी पैसा खाल्ल्याबिगर कोणी उभं राहू देत नाही'' तरी बरं झालं. भटबामणाच्या पोटचे नाहीत. पहयल्या जमान्यात ते बक्षिसी मांघत, पण अशी उटसूट कहाची बी द्या मनत नसत. हे त खेड्यापाड्याचे. शेतकऱ्याच्या रक्ताचेच असून बी, शेतकऱ्याचे कामं पैसा खाल्ल्याबिगर करत नाहीत.'' (पृ.७) किंवा ''कोणत्याबी नवकरीवर समदे खेडेपाड्याचेच भरले ना। आदुगर असे वाटे की, हे समदे आपलेच मानसे, आता आपले काम पटपट व्हतील. पण काहाचे हो ? पहयल्यापरीस हे बहाद्दर भरले. पहयले तर पैसाच खात, आपले मनता हे त मानसालेबी खयाले जोर करतात. काय जमाना आला ह्यो? अशाने कसे व्हवावे या दुनयेचे?'' (पृ.२१-२२).

सावकाराच्या रंगयाने न्यानबाला बेशुद्ध मारले. तरी त्याने पोलिसांत गुन्हा नोंदवू नये असे पाटील सुचवतात. ''उलटे पोलिस चवकशीले आल्याचे नाटक करतील अन् तुझ्याकडून शंभर दोनशे उपटतील अन्.'' (पृ.२९) असे आनसाला पाटील सांगतात. त्याचप्रमाणे पांडेबुवा तलाठी खाते उतारा देताना, अर्ज लिहून देताना पैसे घेतो. जमिनीची मोजणी करताना ज्याच्याकडून जास्त पैसे मिळतील त्याचा फायदा करून देतो. गरीब श्रीमंतांमध्ये असलेली तफावत आणि ठिकठिकाणी नाडला जाणारा गरीब माणूस याचे प्रत्ययकारी चित्र लेखकाने रेखाटले आहे. फेडरेशनदेखील भ्रष्टाचाराने पोखरले गेले. धनिकांचे कोठेही काही आडत नाही. पैशाने सर्व कामे होतात; परंतु सामान्य शेतकऱ्याचा उत्कृष्ट दर्जाचा माल निकृष्ट ठरवून कमी किंमत दिली जाते. तर धनिकांच्या निकृष्ट मालाला उत्कृष्ट ठरविले जाते. लेखक निवेदन करतो,

''खरे तर गरिबाचाच कोणी वाली नाही. जे मोठ्या मोठ्या खटल्यावाले शेतकरी हायते, त्याहयचे कशाने काही अडत नाही. त्याहयाचा बुरीचा कापूस एच.फोर. मनून पहयल्या ग्रेडात मुकाट्याने जाते अन् गरिबाचा एच.फोर. ग्रेडर लोकाहयले बुरीसारखा वाटते. ते बुरीचा भाव देतात. असंच कुठीसा बी, कोणत्या बँकेत, आफिसात, कोर्ट कचेरीत या मोठ्या हयजवडे दामाजी असतात. दामाजी मव्हरं ते कोणालेबी इकत घेतात, त्याह्याचे कामं आडू देत नाहीत.'' (पृ.१५२).

अशाप्रकारे बँका, सोसायट्या, ग्रामपंचायती, तहसील खाते, पोलिस खाते, कापूस फेडरेशन भ्रष्टाचाराने पोखरले गेले आहे. भांडवलशाहीकडे अर्थव्यवस्थेचा तोल गेला आहे; त्यामुळे शासकीय योजनेबद्दल सामान्य शेतकऱ्यांमध्ये निराशा वाढीला लागलेली दिसते; त्यामुळे त्यांच्या विकासाला खीळ बसलेली दिसते.

राजकारण्याच्या दुटप्पी वर्तनाचे चित्रण लेखकाने केले आहे. सत्ता मिळविण्यासाठी-मतांसाठी त्यांना शेतकऱ्यांचा पाठिंबा हवा असतो; परंतु ते खुर्चीत बसल्यावर त्यांना शेतकऱ्यांचे हित दिसत नाही. जनहिताचा त्यांना विसर पडतो. सत्तास्थाने मिळविण्यासाठी शेतकऱ्याला वापरून घेणारे मंत्री शेतकऱ्यांच्या

मोर्चावर पोलिसांकडून लाठीमार करतात, गोळ्या घालतात. लोक जखमी होतात, मरतात, संपकरी-मोर्चे काढणाऱ्यांचे प्रतिनिधी शेतकऱ्यांचा विरोध मोडून काढतात. न्याय्य मागण्या अमान्य करतात किंवा शेतीमालाच्या किंमतीमध्ये थोडीशी वाढ करतात. 'आपला माल' मंग त्यो कोणताबी का असेना, इकतानी पाहून इका लागते. अन् बाजारात जाऊन काही घ्येयाचं मनलं की, महाग घ्या लागते. अन् दुसऱ्याहयचा घेतानी मातर, त्याहयनं मनली ती किंमत द्या लागते. खरं त शेतकऱ्यांचं कोणी वालीच नाही. (पृ.१५१). या पार्श्वभूमीवर शेतकरी संघटनेकडून लेखक काही अपेक्षा करतो.

गावातील गटतटांच्या-पार्टीच्या राजकारणाने खेडी पोखरली गेली. खेड्यातील संघटितपणा नष्ट झाला. सत्तास्पर्धा सुरू झाली. उदा. सोबाच्या सासऱ्याचे आणि गावच्या पाटलाचे जमत नाही. सोबाशी तिच्या सासऱ्याने अतिप्रसंग केला तेव्हा तिला पाटील माहेरला पोहचवितो आणि राजकारणातील भाऊबंदकीतील डाव साधतो. तसेच शंकर पाटील आणि संतोबा सावकाराचे पटत नाही; त्यामुळे न्यानबा किंवा नारायणसारख्यांची कुचंबणा होते. त्यांच्यावर संकट येते. जसे नारायणाची तुरीची सुडी सावकार पेटवून देतो. न्यानबाला व्याजाचा फटका बसण्याचे कारण पाटील खरेदीच्या वेळी वाशीमला आले, तसेच जमीन मोजणीच्या वेळी संतोबा जास्त जमिनीचा ताबा घेतो, न्यानबाने पाटलाचे बैल मशागतीला आणले म्हणून मार खावा लागतो. सत्तास्पर्धेमुळेच गावात राजकीय गट पडले. सामान्यांची कुचंबणा झाली. एकोपा-प्रेम नष्ट झाले.

ग्रामीण भागातील शिक्षणाची होत असलेली हेळसांड एकाच प्रसंगातून लेखकाने प्रकट केली आहे. काम न करता पगार घेण्याची प्रवृत्ती वाढली. जसे पर्कास, न्यानबाकडे पैसे मागतो तेव्हा तो शिक्षकाविषयी संताप व्यक्त करताना म्हणतो, ''एऱ्ही मास्तर मनला की, गावतल्या समद्या लोकायचं मन्न असंच असते. ते बी खरंच हाये मना. चौथ्या वर्गातल्या पोराले अक्षर फुटत नाही, नाव काढता येत नाही. परीक्षा येवंस्तोर मास्तर शाळंत टेबलावर पाय ठेवून, खुर्चीले मान देऊन ढाराढूर झोपतात. अन् पोऱ्हं त्याहयच्या उरावर धिंगाणा करतात. मंधातच मास्तरले चेव आला त टेबलावर छडी आपटून समद्या पोऱ्हयले गप बसवतात. मंग दुम्हार झोप सुरू. शाळा सुटली- तशी कव्हायबी तिसरा पहाराच सुटते - की धसला मास्तर गोपाळ वाडयात दारू पेयाले. तिथून रस्त्यानं निघाला की, बोलणं सुसत नाही अन चालणं बी सुसत नाही. रस्त्यानं कुठीसा नाही पडला तर घरी जाते.'' (पृ.५८).

शिक्षणव्यवस्थेची हेळसांड वरील वर्णनातून लेखकाने रेखाटली आहे. ज्यांनी मुलांना शिकवायचे, आदर्श आचरणाचे धडे गिरवायला लावायचे तेच दारू पितात, मग मुलांवरील संस्काराचे काय? अशा प्रकारे सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, आर्थिक जीवनातील वास्तवाचे दर्शन लेखकाने घडविले आहे.

आधुनिकीकरणाचा प्रभाव ग्रामीण जनजीवनावर पडला. काही सुधारणा झाल्या. अंतरंग मात्र पूर्णपणे बदलले नाही. सण-उत्सव-यात्रा-याप्रमाणे श्रद्धा-समजुती-परंपरा यांनाही महत्त्व आहे. अज्ञानदेखील आहे. बाबाराव मुसळे यांनी विदर्भातील प्रदेशविशिष्ट संस्कृतीवैशिष्ट्याचे प्रसंगानुरूप चित्रण केले आहे. मुळात कादंबरीचे शीर्षकच एका लोकगीतातून आले आहे,

"चिमणी चिमणी खोपा दे
हाल्या हाल्या दुधू दे."

'हाल्या' हे एक प्रतीक आहे. नियतीपुढे कुणाचे काही चालत नाही; पण येथील नियती 'पैसा' आहे; त्यासाठी आयुष्यभर माणूस धडपडतो. तो मिळविण्यासाठी कष्ट करतो, पण हा हाल्या- पैसा मिळत नाही.

आखाडीची जत्रा जे खास विदर्भाचे सांस्कृतिक वैशिष्ट्य आहे. आसरांच्या संदर्भातील लोककथाच लेखक अनुभवाला वेगळा रंग देण्यासाठी सांगतो. सोबाच्या पाठीमागे आसरा लागल्या, तिच्या आयुष्याचा खेळ झाला, शेवटी तिने आसराच्या बारवात जीव दिला हे निवेदन करण्यापूर्वी लेखक प्रदेशविशिष्ट लोककथा सांगतो. आखाडीच्या दिवशी स्त्रिया भाताचे बोने आणि नारळ आसरांना देतात. ग्रामदेवतांची पूजा करतात (१) पूर्वी गावोगावचे लोक आसरांचा नवस फेडण्यासाठी शिदा घेऊन येत. 'बारवं माय भांडे दे' असे म्हटल्यावर पाण्यावर भांडी तरंगत, हवे तेवढे भांडे लोक घेत व काम झाल्यावर परत बारवेत सोडून देत. परंतु विटाळ झालेल्या बाईने भांडी मागितले तेव्हा तिचा नवरा बुडून मेला. ती वेडी झाली. ती लोकांना जत्रेत भेटते इ. त्याप्रमाणे दुसरी एक लोककथा आहे (२) पाटलाची सून बारवेमध्ये पडून मेल्यामुळे गावकऱ्यांनी आसरांना बोनं-नैवेद्य द्यायचे बंद केले, तेव्हा पटकीची साथ आली. पटापट माणसं मेली. मरीचा कोप झाला. पाटलाच्या स्वप्नात ती आल्यानंतर गावकऱ्यांनी तिचा मान तिला देण्यास सुरुवात केली. या भीतीमुळे पावसाळ्यात स्त्रिया बोणे देतात. नवीन लग्न झालेल्यांचा ती बळी घेते. सोबा आसराला बोनं द्यायला जात असताना 'जळळया माय या आसरा, माहा शालू बी फाटला' तेवढ्याने ती घाबरली. बारवमध्ये तिचा पाय घसरला. तरूणांनी तिला वाचविले. तेव्हा आसरा मागे लागल्या, म्हणून त्यांच्या कचाट्यातून सोडण्यासाठी खणानारळाने ओटी भरण्याचा नवस आनसा करते. (पृ. ७२ ते ७५).

नागपंचमीचा सणदेखील विदर्भातील संस्कृतीचे वेगळेपण सांगणारा आहे. पुरुष पंचमीला आखाडी बाऱ्या परात वाजवून चंदनशेक महाराजांचा जयजयकार करत म्हणतात,

"आखाड्याच्या गळा घालो आखाड्याच्या गळा
नागोबाच्या गळा घालो, नागबाच्या गळा." (पृ. ८०).

साप उतरविणारे लोक पंचमीच्या दिवशी मंत्र उजळतात. त्यांची काही पथ्ये

असतात. जसे भाजलेली भाकर चुल्हीवर उभी ठेवली तर खायची नाही. नागोबाची विशिष्ट पालखी-आखाडे आणि उतारे तयार करतात. मिरवणूक काढतात. स्त्रिया पालखीची पूजा करतात. स्त्रियांच्या अंगात पान येते. त्या सापासारखे झुलतात. स्त्रिया पंचमीच्या दिवशी पाहटे घर सारवतात. भिंतीवर आडवे तिडवे नागोबा काढतात. तेथे हळदीकुंकू लावतात. पांढरे दोरे हळदीने पिवळे करतात. ते कुंकवाने-लाह्यांनी नागोबाला चिकटवितात. दुसऱ्या दिवशी ते दोरे पुरुष- मुले 'पवते' म्हणून हातात बांधतात. सर्व घरभर लाह्या फुटाणे फेकतात. वारुळाची पूजा करून स्त्रिया झोके खेळतात. (पृ. ८०-८१)

शिरवाळाची मिरवणूक पंचमीच्या दुसऱ्या दिवशी निघते. निपुत्रिक स्त्रिया शिरवाळराजाला नवस करतात. मुलगा व्हावा म्हणूनही नवस केला जातो. मुलगा झाला तर पाच वर्षे मिरवणूक काढली जाते. शिरवाळ काळ्या मातीचे करतात. त्याला शिखरावर मोठमोठ्या खिडक्या असतात. शिखरावर नागोबाची फडी काढतात. गाभाऱ्यात पाच फडी नागोबा करतात. नदीकाठच्या कसाड्या आणि गुंजा चिकटवतात. हळदकुंकवाने पूजा करतात. सवाष्ण स्त्रिया शिरवाळीचे नाचून गाणे म्हणतात,

"खडे मनून खडे, परात परात खडे
याच वाटंनं गेले व माय, शिरवाळाचे घोडे
गुजा मनून गुंजा, परात परात गुंजा
याच वाटंनं गला व माय, शिरवाळाचा राजा." (पृ.८२).

रात्री शिरवाळ पाण्यात बुडवितात. या संदर्भात लोकवाङ्मयाचे गाढे अभ्यासक डॉ. मधुकर वाकोडे यांनी आक्षेप घेतला आहे. ते म्हणतात, "या घाटमाथ्यावर नागपंचमीला सक्रुबुवाचा एक उत्सव असतो. चूक अशी झाली. लेखक म्हणतो बाया शिरवाळशेटला नवस करतात, लेकरू होण्यासाठी; पण तो शिरवाळशेटला केलेला नवस नाही, तो शिरवाळसेटही नाही. तो श्रीयाळ आहे. ज्याच्या कथागाथा बाया गातात तो लोकोत्सव आहे. सक्रुबुवाचा. सक्रुबुवा हे एक प्रतीक आहे शंकरांचं, याच सक्रुबुवाला बाया लेकरू व्हावे म्हणून नवस करतात." लोकजीवनाचा वेध घेताना तपशीलातील बारकाव्याकडे लक्ष दिले पाहिजे असे डॉ. वाकोडे सुचवितात.

विदर्भातील पोळा हा सणदेखील वैशिष्ट्यपूर्ण आहे. जसे बैलाचा खांद मळण्यासाठी पळसाच्या पाच पानाच्या देठांचा मान असतो. म्हणून लोक असे देठ शोधून ठेवतात. पोळ्याच्या दिवशी तोडून आणतात. अन्यप्रकार सर्वत्र सारखाच असतो. दसऱ्याच्या दिवशी भवानी मातेच्या देवळासमोर स्त्रिया रात्रभर लहाडी खेळतात, गाडे ओढतात, लोटांगण घेतात.

जात्यावरील ओव्यांमधून पतीच्या विरहाने व्याकूळ आणि मनाचा कोंडमारा झालेल्या सोबाच्या भावना आविष्कृत होतात. उदा.

''जात्यावर बसली, हात जोडतजे सुर्व्याले
कपाळीचं कुखू देवा, जाऊ दे सेल्याले.'' (पृ. १३१)
''माळयानं केला मळा, टाकून गेला कोण्या देसा?
त्याच्या दिसामासा, लिंबोणी आली रसा.'' (पृ.१३२)
''बारा वरसं झाले, माळी बोलंना माळणीले
असून दांडावर तुळस, पाणी चाललं केळीले.'' (पृ.१३३)

लेखकाने ओवीगीतातून सोबाच्या भावनांचा मुक्त आविष्कार घडविला असला तरी यंत्रयुगातील ही स्त्री पिठाच्या गिरण्या आल्या तरी दळण का दळते हे समजत नाही. परिवर्तन काळातील समाज वास्तव चित्रण त्यामुळे उणावते.

यात्रा-सण-उत्सवाप्रमाणे विदर्भातील काही समजुतींचे चित्रण लेखकाने केले आहे. अमावास्येच्या दिवशी बाहेर पडले तर काम होत नाही. दुष्काळात देवळामध्ये पोथी पुराण वाचल्याने, उपासतापास, पारायण केल्याने स्त्रियांनी ओल्या वस्त्राने महादेव-मारोतीला पाणी घातल्याने पाऊस पडतो. मुले बेडूक पकडून मुसळाला लिंबाचा पाला बांधतात, स्वत:च्या कमरेला लिंबाचा पाला बांधतात आणि गावभर धोंडीचे दिवस, पाणी मोठे हिवसे, धोंडी धोंडी पाणी दे म्हणत फिरतात. त्याच्या अंगावर स्त्रिया पाणी टाकतात. त्यांना कुंकू लावतात. ज्वारीच्या घुगऱ्या वाढतात. असे केल्याने पाऊस येतो अशी समजूत आहे. (पृ. ६१) किंवा 'दुनव्यात पाप लय झालं. पोऱ्हं अन् पोऱ्ही वळखू येयेनात. माय-बहयनीची वळख राहयली नाही म्हणून पाऊस येत नाही अशीही समजूत आहे. (पृ. ६०). पाहाटेची स्वप्न खरी होतात. उदा. आनसाला पाहाटे स्वप्न पडते. न्यानबा पर्कासला घेऊन सोबाच्या भेटीला चालला. त्याचप्रमाणे आषाढ महिन्यामध्ये मुलीने नवऱ्याचे तोंड पाहू नये, म्हणून तिला माहेरी आणले जाते. किंवा पतीपत्नींचे एकमेकावरील प्रेम तपासून पाहाण्यासाठी हातावर बांगडी फोडून पाहिली जाते. हातावर काचेचे जेवढे अधिक बारीक बारीक तुकडे पडतील तितके प्रेम अधिक, पण काचेचे तुकडे पडले नाही तर प्रेमच नाही असे समजले जाते. बायको गरोदर असेल तर साप मारू नये, डोक्यावर टिटवी ओरडणे अशुभ समजले जाते. आपण सत्य सांगत असल्याचे प्रमाण म्हणून दिवा किंवा मुलाची शपथ घेतात. जनावराला पोटभर खाऊ घातले तर आशीर्वाद मिळतो. याचप्रमाणे काही रितिरिवाजही आहेत. जसे पाहुण्याला पाय धुण्यासाठी-पिण्यासाठी पाणी देणे. मांगाजवळ अशुभ निरोप पाठविणे, देवाधर्माचे 'सकोण' पाहणे. नवस फेडणे, शनीची शांती करणे. सत्यनारायण किंवा मारोतीला अभिषेक करणे. गंडेदोरे, भारलेले पाणी देणे, जखमेवर मुतणे किंवा रानमिरचीचा कंद गोमुत्रात उगाळून लेप देणे. यांसारख्या गोष्टींतून लोकसंस्कृतीचे दर्शन घडते. दे.शि.दुधलकरांनी या संदर्भात म्हटले आहे की, ''प्रस्तुत कादंबरी हृदयाचा ठाव घेते.'' ती लेखकाच्या सच्च्या अनुभवामुळे, ग्रामीण व्यवस्था, तेथील माणसे, चालीरिती, स्वभाव, सण,

उत्सव, वागणे, बोलणे, ह्या सर्व गोष्टी बाबारावांनी इतक्या जिवंत उभ्या केल्या आहेत की त्या वाचताना वाचक क्षणभर स्वतःला विसरून ग्रामीण वास्तवाच्या तळाशी रममाण होतो. या अभिप्रायाची सत्यता वरील विवेचनावरून पटते.

कादंबरीच्या प्रस्तावनेत निवेदनसंभाषणविषयी डॉ. द.दि.पुंडे यांनी गौरवोद्गार काढले आहेत. (प्रस्तावना, पृ.१६). प्रस्तुत कादंबरीचे निवेदन आणि संवाद वऱ्हाडी बोलीतील आहेत. डॉ. कानडजे म्हणतात, ''ती अतिशय सहज-स्वाभाविक आणि आशयाशी एकजीव होणारी आहे. ती स्वतंत्रपणे नजरेत भरत नाही. आपले स्वतंत्र अस्तित्व दाखवित नाही. इतकी ती आशयाशी एकरूप, एकात्म झाली आहे.'' त्याचप्रमाणे डॉ. वि.भि. कोलते यांनी, आशय आणि अभिव्यक्ती या दोन्ही दृष्टींनी कादंबरी अप्रतिम उतरली आहे असे म्हटले आहे. तर भ.पु.कालपे यांनी, सदर कादंबरीत मुसळेंनी निवेदन व संवाद या दोन्हींतही ग्रामीण वऱ्हाडी बोलीचा वापर केला असून तो अनौपचारिक व आशयाशी एकजीव झाला आहे. असे म्हटले आहे. कादंबरीतील निवेदन संवादासंबंधी वरील सर्वच अभिप्राय सार्थ वाटतात. वऱ्हाडी बोलीतील नावीन्यपूर्ण अपरिचित शब्द आणि शिव्या ग्रामीण वास्तवाचा जिवंतपणा वाढवितात. काही इंग्रजी शब्दांच्या वापरातून आधुनिकतेचा प्रभाव जाणवतो. उदा. इस्टान, थिमीट, बेनॉर, ग्रेडर, एच.फोर, हायबीड, एन्होसल्फान इ. धकंड, सुदं, मव्हर, पाहयटं, दिमाख, बेसला, कुर्हाट, वांढोळा, मांघायली, कावळ्यावाणी, भोंबरा, निकट्ट, बापूले, भ्कासल्यावाणी, गिटकारा, व्हर्क्या, वाक, केकती, हारली, दाटूमुटूच, नीट, एन्हीच, कुचिदवाणी, गुंडा, कल्हमा, हाडोच, खउट, हुब्बक, हिंडगेपणा, हिंदयान, भोंडा, आमाक्शान, झोलाड, इचकावाचका, तिंबे, हिकत्या, चक्टंसक्टं, एव्हडुक्स, घुटघुसणी, व्हनेर, ठोंगळामांड, बेस्तरवार, आईतवार, ठेल्यात, हेम्बाडपुत्रे, कास्तकार, बुरी, नवकर्की इ. शब्द खास वऱ्हाडी बोलीतील आहे. त्याचप्रमाणे गांडमनी, भोसडीचे, मायचं मी रांडरू, गांड, मुत्तमारी, झवन्या, चोदवाया, बायकोची भाडं, खाटकाच्या पोटचा, ढुंगण इ. शब्द आशयानुरूप आल्याने अश्लील वाटत नाही. वऱ्हाडीभाषा अतिशय प्रेमळ वाटते. त्यातली ग्रामीणता तिला शोभून दिसते आणि वऱ्हाडी बोली मनाला भावू जाते. असे मनोरमा बापट म्हणतात. तर, ''भाषाशैली अस्सल ग्रामीण व देशी आहे. ती जिवंत आहे.'' असे श्रीराम गुंदेकर म्हणतात. याची साक्ष कादंबरीतील म्हणी आणि वाक्प्रचारांतून येते उदा. 'वडाची साल पिंपळाले', 'बय बी गेली अन् बयची वाकळ बी गेली', 'ऊर दडपला', 'हल्पाडायले', 'ये घोरा अन् बस खंदाडी', 'सत्यानव-अठयचानव होणे','भांडणाचं तोंड काळं','मेस काईले मनलं नवरा करनं त ती मनते तूच व्हय', 'गरजवंताले अक्कल नसते, 'मव्हरं जावाव त आड् माघं फिरावं त इहीर', 'आपलं बासन लेकाले द्या अन गांडमनी मनून घ्या', 'आंधळं उरावर घेऊन भवताल पाहयाचं काम झालं हे', 'नकटीच्या लग्नात सतराशे

इघ्नं', 'लहान तोंडी मोठा घास', 'कण्हते ती जनते, अन् जारीन मनतेऽऽ दे कळा', 'लोक नांदाली तिले पळवतात, पळायली तिले नांद मनतात.' उदाहरणादाखल घेतलेल्या म्हणी वाक्प्रचारांप्रमाणेच उपमा-प्रतिमा आशयासंबंधाने वेदनेची तीव्रता जाणून घेणाऱ्या लेखकाच्या संवेदनशीलतेचा भाग आहे. उदा. उपमा १. काखेतल्या घागरीवाणीच तिचं मन बी डचमळ डचमळ करत व्हतं. २. आभाळ वऱ्हून निसतंच वहात व्हतं. मायच्या थानातल दूध आटल्यावाणी. ३. कापायासाटी खाटकामाघं चालवलेल्या बोकड्यासारकी तिची गत झाली. ४. 'दोघे नवराबायको आखाड लागलेल्या ढोरासारके डगडग झाले. ५. अनसा व न्यानबा हे संमदा ऐकता ऐकता बर्फावाणी थंडगार झाले. प्रतिमा : १. मग दोन्ही लवनाच्या पुराइतकाच पूर तिच्या दोन्ही डोळ्यांतून सुरू झाला. २. माणसाची आटकली मनजे माणूस कसा सुईच्या भोकातून जाते. या सर्व उपमा-प्रतिमा-म्हणी ग्रामीण समाजवास्तवाचे दर्शन घडवितात. त्या ग्रामीण जीवनातीलच आहेत.

प्रा. कमलाकर दीक्षित लिहितात, ''कादंबरीने वास्तवतेला कलात्मकता व महात्मता या पातळ्यांवर नेले आहे.'' तर पु.ल. देशपांडे लिहितात, ''आर्थिक दारिद्र्यातून निर्माण होणाऱ्या दु:खाची आणि यातनांची ही कथा (तुम्ही) अतिशय परिणामकारक रितीने सांगितली आहे. ग्रामीण जीवनातील अनुभवाला येथे साहित्य रूप आहे. वऱ्हाडी बोलीच्या सर्वत्र वापरामुळे परिणामकारकता साधलेली आहे. ग्रामीण जीवनाचे राग-लोभ, सुख-दु:खे, रुसवे-फुगवे मानापमान व्यक्त करण्यास वऱ्हाडी बोलीच समर्थ आहे. बोलीभाषेच्या वापरामुळे वाशीम परिसरातील कांदबरीचे अस्तित्व अधिक प्रकर्षाने लक्षात येते.'' प्रशांत मानकर यांना न्यानबा निरक्षर आणि म्हणूनच वेळोवेळी फसून चिखलात रुतून बसलेल्या आजच्या शेतकऱ्याचे प्रतिनिधित्व करणारा वाटतो. तर या कादंबरीतून मुसळे यांनी न्यानबाच्या घरासोबतच एक अख्खं गावच्या गाव त्याच्या चेहऱ्यामोहऱ्यानिशी उभे केलेले आहे. असे सोपान हाळमकर म्हणतात.

वरील विवेचन व मान्यवर समीक्षकांच्या अभिप्रायाधारे असा निष्कर्ष काढता येईल की, प्रस्तुत कादंबरी ही केवळ न्यानबाची शोकांतिका नाही तर विदर्भातील एका खेड्याचे ती समूहजीवन चित्रण आहे. त्याचप्रमाणे परिवर्तनकाळातील समाजवास्तवाचे कलात्मक चित्रण करण्याचे सामर्थ्यही तिच्यात आहे. म्हणून 'धग', 'पाचोळा', 'गोतावळा' यांच्यानंतरची ती एक वळणावरची वैशिष्ट्यपूर्ण प्रादेशिक कादंबरी आहे. असे म्हणायला हरकत नाही.

ꣻ

## 'कुकडीकाठच्या कथा' : द. स. काकडे

'वर्गहीन–वर्णहीन दलित शोषितांच्या आभाळभर दुःखास' कथाकाराने कथासंग्रह अर्पण केला आहे. एकूण वीस कथांचा हा संग्रह केवळ ग्रामीण किंवा प्रादेशिक, दलित, अशा प्रवाह प्रकारात समाविष्ट करता येत नाही. तर तो ग्रामीण दलित जाणिवा एकत्रितपणे अभिव्यक्त करणारा कथासंग्रह आहे. जुन्नर तालुक्यातील कुकडी काठच्या प्रदेशाची पार्श्वभूमी कथांना लाभली असली तरी अन्य प्रदेशातही अशा प्रकारचे जीवनानुभव येऊ शकतात म्हणून त्याला प्रादेशिकतेच्या चौकटीत बसविण्यात अर्थ नाही. कोणत्याही चळवळीच्या झेंड्याखाली न येता कथाकार तटस्थपणे लेखन करीत आहे असेच दिसते.

कुकडीकाठच्या कथांमधील व्यक्तिरेखा या गरीब, सोशिक, अगतिक, लाचार, देवधर्म–अंधश्रद्धा पाळणाऱ्या अशा आहेत, एकूण जगण्याभोगण्याचे आणि पाहिल्या अनुभवलेल्या जीवनाचे चित्रण कथाकार करतो असे म्हणावे लागेल. काही ठिकाणी अतिशयोक्तीचा दोष येत असला तरी तो या प्रदेशाचा किंवा समाजजीवनाचा आहे याकडे दुर्लक्ष करता येत नाही.

स्वातंत्र्योत्तर काळातील स्वातंत्र्यसैनिकांच्या घरातील दैन्याचे चित्रण 'पंधरा ऑगस्टचा दिवस' या पहिल्याच कथेत समर्थपणे कथाकाराने केले आहे. देशाच्या स्वातंत्र्याचा रौप्यमहोत्सव साजरा केला जात असताना स्वातंत्र्य सैनिकाच्या घरातील दारिद्र्यावर कथाकार प्रकाशझोत टाकतो. कथाकार शेवटी वर्णन करतो, "'आणि मी' स्वातंत्र्य सैनिकाचा पोरगा असलेला मी... पाठीमागन फाटलेल्या चड्डीतून बाहेर पडलेल्या माझ्या गरिबीच्या झेंड्याला फडकावत कसातरी उभा होतो..."

स्वातंत्र्य सैनिकाच्या मागे त्यांच्या कुटुंबाची वाताहत झाली, लोकशाही व्यवस्थेत स्वार्थाचे राजकारण सुरू झाले, विरक्ती, देशभक्ती, निष्ठा या जीवनमूल्यांना सुरुंग लागला आहे हेच द. स. काकडे वाचकांना सांगतात. तर दुसऱ्या 'एक पाणवठा' या कथेमध्ये शासनाच्या विकास योजनांचा बोजवारा कसा उडाला याचे प्रतिनिधीक चित्रण केले आहे. सुप्रसिद्ध कादंबरीकार रामचंद्र पठारे यांच्या 'पाचर' कादंबरीची आठवण ही कथा करून देते. जातीयतेची पाचर स्वातंत्र्योत्तर काळात घट्ट बसली आहे, ही तेढ नष्ट होण्याची चिन्हे आजही दिसत नाहीत. परंपराप्रिय मुजोर गावपुढाऱ्यांकडून कपटीपणाने दलितांचा काटा काढला जातो. बंड, विद्रोह करणाऱ्या दलित कार्यकर्त्यांचा काटा काढायला गावपुढारी

मागेपुढे पाहत नाहीत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या ''शिका, संघटित व्हा, संघर्ष करा, सत्तास्थानी जा,'' या मंत्राचा परिणाम होऊन दलित संघटित झाले, परंतु अल्पसंख्याक असल्यामुळे बहुसंख्य अशा सवर्णांपुढे हतबल झाले आहेत. समाज परिवर्तनाची अपेक्षा व्यक्त करणारी ही कथा समाजवास्तवाची जाणीव करून देते.

'वंश' ही संग्रहातील तिसरी कथा आहे. वंशाचा दिवा लावण्यासाठी धडपडणाऱ्या माणसांची ही कथा आहे; परंतु सवतीमत्सराचे समर्थ चित्रण कथाकार करतो. खानदानी रांगडेपणा आणि स्त्री हट्टाचे प्रभावी दर्शन येथे घडते. आपला नवरा सवतीशी शरीरसंबंध ठेवत असावा असा केवळ संशय आल्यामुळे धाकटी बायको मुलाबाळांसह आत्महत्या करून वंशाचा दिवा विझविते. अशाच प्रकारची 'खानदान' ही चौथी कथा हुंडापद्धती, डामडौली, मुजोरपणाविरुद्ध भावना-प्रेमाचे चित्रण करणारी आहे. शिकलेला तरुण विरुद्ध निरक्षर बाप आणि भाऊ यांच्यातील संघर्ष या कथेतून येतो. केवळ हुंड्यासाठी साखरपुड्यानंतर लग्न मोडून धनिकाच्या मुलीबरोबर विवाह जमविणारे निरक्षर बापभाऊ आणि शिक्षणाने कोमल झालेल्या प्राध्यापकाने विवाह मोडलेल्या तरुणीशी विवाह करण्यास तयार होण्याचा प्रसंग कथाकार समर्थपणे रेखाटतो, त्याहीपेक्षा स्त्रीचे समाजातील स्थान आजही दुय्यम आहे. हे या घरातील आईच्या प्रतिनिधीक व्यक्तिरेखा चित्रणातून दिसते. हतबल, हताश आईचे दुःख केवळ साक्षर मुलाला दिसते, निरक्षर मुलगा-नवरा यांना तिच्याबद्दल काही घेणे देणेच नाही.

काळ बदलला. शिक्षणाचे संस्कार होऊ लागले; पण शिक्षणाने होणारे हे संस्कार सुसंस्कार न ठरता माणुसकीशून्य जीवन आजही नवी पिढी जगत आहे. रक्ताचे नाते, प्रेम, आपुलकी, जिव्हाळा वाढण्याऐवजी शिक्षण राजकारणांमुळे रक्ताच्या नात्यालाच सुरुंग लागला. जन्म देणाऱ्या आईवडलांपेक्षा धनिक-श्रीमंत अशा नव्या सग्यासोयऱ्यांना जवळ करणारी नवी पिढी आणि नात्या-गोत्यावर-आपत्यांवर जिवापाड प्रेम करणारी जुनी पिढी यांच्यातील संघर्ष 'रक्त'सारखी कथा प्रत्ययकारी पद्धतीने अभिव्यक्त करते. जनरेशन गॅप हा विषय अतिशय उत्तम पद्धतीने कथाकाराने रेखाटला आहे.

'गटारी आमोशा'सारख्या कथेतून गावातील चांडाळ चौकटीचा बेरकीपणा द.स. काकडे चित्रित करतात. बाई-बाटली-पार्टीच्या आहारी गेलेल्या गावपुढारी सरकारी नोकरांनी स्त्रीशोषणाचा सपाटा कसा लावला आहे, याचे दर्शनच कथाकाराने या कथेतून घडविले आहे.

'पाळणासारख्या' कथेतून शकुन-अपशकुनाच्या श्रद्धा-अंधश्रद्धांचे चित्रण कथाकार करतो. विज्ञानयुगातही मागासलेपण नष्ट होऊ शकले नाही. मुले पाळण्यात घातल्यामुळेच गुरवाचे वंश वाढत नाही, पहिली बायको मुले गेल्यानंतर दुसऱ्या बायकोचे मुलेही त्याच पाळण्यात घातल्यामुळे गेले असा श्रद्धाभाव येथे दिसतो. परिवर्तनाचा स्पर्श समकालीन परिस्थिती खेड्यांत दिसत नाही.

'बेरड' या कथेतून दरोडे घालणाऱ्यांमधील विश्वासघाताचे, अविश्वासाचे

आणि त्यांचे शूद्र देवतांवरील विश्वासाचे चित्रण येते. नीतिपरंपरा, इमानाचा धर्म पाळणारे बेरड बेडर असतात. एकमेकाला जीव देण्यात, तसेच वेळ पडली तर जीव घ्यायलाही मागेपुढे पाहात नाहीत. 'सांगावा' ही द. सं. ची कथा शंकरराव खरातांच्या 'दौंडी' कथेची आठवण करून देते. ''पर लोकशाहीत मान्सं जनावरच झालीयात की...'' असे जीवनभाष्य कथाकार करतो. मौतीचा सांगावा सांगण्यासाठी आजही पुढारी गावकोतवालाला पिटाळतात, त्याचा आजार, उपासमार एकूणच त्याच्या जगण्यामरण्याचा प्रश्न गावपुढाऱ्यांना दिसत नाही. दलितांचे शोषण होत असले तरी पोटासाठी अगतिक झालेल्या या माणसांपुढे दुसरा पर्यायही दिसत नाही, ना जमीन, ना घर, न मंदिर प्रवेश, न एक गाव एक मसणवटा, पाणवठा अशी दलित विरोधी समाजव्यवस्था आजही असलेली दिसते. 'एक गाव एक ग्रंथालय' कधी होणार, लोकशिक्षण संस्काराने 'माणूस' कधी होतील हा खरा प्रश्न आहे.

'तांबडी माती' कथेतून पैलवानाच्या तयारीचे खेड्यातील हंगामा, तालमीचे चित्रण केले आहे. तर 'भोग' कथा वेगळ्यावळणाची आहे. खेड्यातील कष्टकऱ्यांनी आपल्या नशिबी आलेले कष्ट मुलांच्या वाट्याला येऊ नये म्हणून मुलांना शिक्षण दिले, परंतु साक्षरांनी नोकरीनिमित्त शहर जवळ केले. आपली बायको मुलेबाळे यांच्यापलीकडे आपल्या शिक्षणासाठी झटलेल्या त्यागी आईवडलांचा विसर पडला, हे समाजातील स्थित्यंतर कथाकाराने 'भोग'सारख्या कथेतून टिपले आहे. नि:स्वार्थी आई आणि स्वार्थी मुले यांच्यातील संघर्षाचे हे चित्रण आहे. वैधव्यातही एक राबणारी मुलावर संतापलेली आई सून गावात येणार म्हटल्यावर हारखते; पण ती गरोदर आहे, आपल्यालाच राबावं लागणार याची जाणीव होताच दुःखी होते, ही कथा राम नगरकरांच्या 'रामनगरी' या आत्मकथनाची आठवणही करून देते. मुंबईतील जागेची अडचण-समस्या येथेही ध्वनित होते.

'शासन' कथेच्याद्वारे बदलत्या काळातील नेत्या-पुढाऱ्यांच्या रांगड्या, ढोंगी वर्तनाचे चित्रण केले आहे. ज्याच्या त्यागातून शिक्षणसंस्था उभ्या राहिल्या, तरुणांना शिक्षण मिळाले त्याचा आदर करणे, गुण आत्मसात केले आहे. 'वाटप'सारख्या कथेतून भाऊबंदकीच्या शापातील संघर्ष चित्रित केला आहे. बापाच्या जागी असणाऱ्या थोरल्या भावाचा त्याग-कष्टाचा विचार न करता जमीन जुमला-गुरेढोरे यांची वाटणी करायला निघालेल्या भावांच्या स्वार्थीपणाचे चित्रण या कथेत येते तर थोरल्या मुलाच्या कष्टांची जाणीव असलेली विधवा आई मात्र त्याच्या पाठीशी उभी रहाते, तेव्हा मात्र स्वार्थी-भाऊ खजिल होतात, माणसे वाईट नसतात, परिस्थिती त्यांना तसे बनविते; परंतु शेवटी जुन्नर तालुक्यात वारकरी परंपरा वर्चस्व गाजविताना दिसते, आजही माणुसकी, आपलेपणा आहे, येथून दिंड्या निघतात, दिंडी भोजन होते, सामुदायिक विवाह येथे रुजले आहेत. पुण्यामुंबईला गेलेले लोकही खेडुतांकडे मागे वळून पाहतात, ही एक जमेची बाजू मुंबईवाल्या भावाच्या स्वभावचित्रणातून अभिव्यक्त होते.

'हेडी' कथा रांगड्या भावाचे चित्रण करते. बहिणीच्या संसाराची वाताहात करणारा भाऊ द. स. चित्रित करतात. परंतु गेली वीस-बावीस वर्षे मी या तालुक्यात आहे. येथे 'बाई' म्हणून बहिणीला अतिशय आदराचे स्थान आहे. हे मी जवळून पाहत आहे, त्यामुळे मला ही कथा भडक, अतिशयोक्त वाटली हे नम्रपणाने लिहावेसे वाटते, क्षमस्व !

'जात धर्म'मधून जातीभेदाचा संघर्ष संवाद-विरोधाच्या पार्श्वभूमीवर अभिव्यक्त होतो. योगायोगाच्या घटनेवर आधारलेली ही कथा अवास्तव वाटली तरीदेखील खेडेगाव, वाड्यातून 'जात' जाण्याची शक्यता नाही हेच सुचवायचे आहे, हे लक्षात घेतले पाहिजे. 'अजगर'सारख्या कथेत शिक्षक आणि आदिवासी स्त्रीच्या व्यभिचाराचे चित्रणआहे. वंश वाढण्यासाठी धडपडणाऱ्या आदिवासी पुरुषानेच आपल्या बायकोच्या व्यभिचाराला संमती देणे, मास्तरचे आभार व्यक्त करणं, किती सत्य किती वास्तव हा प्रश्न सतावल्याशिवाय राहात नाही. याचे कारण मी शोधण्याचा प्रयत्न करतो आहे. आदिवासी समाजातही निष्ठा, नीती कल्पनांना महत्त्व आहे. उत्कट प्रेम आदिवासी स्त्रीपुरुषांमध्ये असते, माझ्या एका विद्यार्थ्याने 'आदिवासींचे जीवनचित्रण करणारे मराठी साहित्य' या विषयावर पीएच.डी.साठी प्रबंध लेखन केले, पुणे विद्यापीठाने प्रबंधाला पीएच.डी. पदवी प्रदान केली. हे सांगण्याचा उद्देश असा की या निमित्ताने मी अभ्यासलेला आदिवासी, कथाकाराने वर्णन केल्याप्रमाणे नाही म्हणून ही कथा वास्तवापासून थोडी दूर जाते की काय अशी शंका येते.

'मुके दुःख' ही द. स. काकडे यांची कथा जरा वेगळ्या वळणाची आहे. स्वतःच्या सात एकर शेतात राबणाऱ्या अकरावीपर्यंत शिकलेल्या, मुक्या तरुणाबरोबर विवाह केलेल्या, नाराज असली तरी पती परमेश्वर मानणाऱ्या ग्रामीण स्त्रीची कथा आहे. मुंबईत प्रोफेसर असलेल्या जमीनमालक तरुणाचे तिच्यावरचे अव्यक्त प्रेम व्यक्त झाल्यावरदेखील ती निष्ठेमुळे त्याला नाकारते, तेव्हा असे वाटते की, 'संस्कृती' खेड्यात जिवंत आहे, हेच वास्तव कथाकाराला सांगायचे आहे, 'लग्न' कथेतून गैरसमजातून विवाह कसे मोडले जातात, त्यातील संघर्ष कथाकार चित्रित करतो तर 'हुंदका' कथा शासनाच्या कुटुंबनियोजन धोरणाचा बोजवारा, धाकदडपशाही यांचे चित्रण करते, तर शेवटी 'कुंकू' ही व्यसनाधीनता, बुवाबाजी आणि स्त्रीच्या पतिनिष्ठेचे नव्हे तिच्या रौद्र रूपाचे चित्रण करते.

सारांश 'कुकडीकाठच्या कथा' अशा विविधतेने नटलेल्या आहेत. येथे दलित-सवर्ण संघर्षाचे चित्रण येते, शिक्षणामुळे सुसंस्काराऐवजी माणुसकी हरपलेल्या जीवनाचे-माणसांचे चित्रण येते. तसेच अंधश्रद्धा, परंपरांचे दर्शन घडते तसेच पती परमेश्वर मानणाऱ्या पतिनिष्ठ स्त्रीचे दुःखही अभिव्यक्त करते. येथे सर्व व्यक्तिरेखांवर प्रदेशाचे तेथील निसर्गाचे संस्कार आहेत, हे नजरेआड करता येत नाही; त्यामुळे द. स. काकडे यांच्या कथेकडून अधिक अपेक्षा करायला हरकत नाही.

ॐ

स्नेहवर्धन Snehavardhan

RIICS

22 APR 2024

Snehavardhan स्नेहवर्धन




**प्रा. डॉ. भास्कर शेळके**
सहयोगी प्राध्यापक व मराठी विभाग प्रमुख
श्री शिव छत्रपती महाविद्यालय, जुन्नर, जि. पुणे.
मोबा. ९८९०६८६५२१, ९८२२४८१८१
ई. मेल bhaskarshelke@yahoo.com
निवास - २३, श्रीदुर्गा, बारव, जुन्नर, जि. पुणे.
दूरभाष (०२१३२) २२२०९४
जन्म दिनांक - १/०६/१९६१


**प्रकाशित ग्रंथ**

१) मराठी कादंबरीतील प्रादेशिकता
२) समीक्षा, संकल्पना आणि स्वरूप
३) ग्रामीण साहित्य : स्वरूप आणि चिकित्सा

**संपादन :-**

४) प्रसार माध्यमे आणि मराठी भाषा
५) चळवळ आणि साहित्य
६) कथा गौरव
७) काव्यकस्तुरी
८) अधिष्ठान अभ्यासक्रम
९) वाङ्मय प्रकार : कविता
१०) विज्ञान वेध
११) ग्रंथवेध


स्नेहवर्धन प्रकाशन